
अदृश्य बाप
अक्षय पोवार
जीवन एक चक्र आहे
काळचक्र की कर्मचक्र ?

अदृश्य बाप

(कादंबरी)

अक्षय पोवार

ई साहित्य प्रतिष्ठान

अदृश्य बाप

लेखक : अक्षय पोवार

28-442, पंचारती सोसायटी, चारकोप सेक्टर 04, कांदिवली पश्चिम,

मुंबई उपनगर, 400067.

संपर्क : 9136843413 / 9096204245

ई-मेल : powarakshay01@gmail.com

वेबसाईट : https://akshaykhajina.blogspot.com

फेसबुक : www.facebook.com/akshaykhajina

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ्लोअर, ईटर्निटी,
ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, ठाणे,
महाराष्ट्र, भारत, ४००६०४
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp - 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव व्हॉट्सॲप करा.)

प्रकाशन : १२ जून २०२६
©esahity Pratishthan®2026

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावना

आपल्या जन्मापासून आपल्या मृत्यूपर्यंत जे काही घडणार ते आधीच ठरलेलं आहे किंबहूना याआधी घडून देखील गेलं आहे. या घटना अजून किती वेळा घडणार त्याला काही मर्यादा नाही. आपला जन्म होत राहणार, मृत्यू होत राहणार. हे कालचक्र अनंत काळासाठी असंच फिरत राहणार. हे मी सांगत नाही, आपल्या पुराणातले प्रसंग सांगतात.

आपल्या जन्मासोबतच बरीच नाती जन्माला येतात. आपला जन्म जसा आपल्या हातात नाही तसंच ही नाती तयार करणं हे सुद्धा आपल्या हातात नाही. खरं तर आपल्या हातात काहीच नाही.

आपण करत असलेलं कर्म आपल्या पुढील जन्माचं भविष्य ठरवत असतं. पण इथे एक गोष्ट खूप रंजक आहे की, आपले किती जरी जन्म होऊन गेले तरी आपल्याला कुठल्याच जन्मीचं काही आठवत नाही. केव्हा तरी देजा वू सारखी परिस्थिती आपल्याला काही क्षणासाठी का होईना एखादा प्रसंग घडून गेल्याचं सूचित करते. पण आठवत काहीच नाही. आपण कोणत्या जन्मात किती पुण्य केलं किती पाप केलं हे फक्त काळाला माहित असतं. आणि काळ कर्माद्वारे बरोबर त्याचा हिशोब पूर्ण करतो.

जेव्हा पण आपल्या सोबत काहीतरी वाईट होत असत तेव्हा आपण वेळेला जबाबदार धरतो पण खरं तर आपलं कर्म आपल्याला या वाईट परिस्थितीत घेऊन आलेलं असतं. मग ते कर्म कुठल्याही जन्मीचं असो फेडावं लागतं. कर्म चांगलं असो वा वाईट, काळ बरोबर ते आपल्याकडून फेडून घेतो.

आपण मागील जन्मी काय केलं हे आपण वर्तमान स्थितीत कधीच जाणून घेऊ शकत नाही. जोपर्यंत आपण स्वत: आपल्या डोळ्यांनी आपलं कर्म पाहत नाही तोपर्यंत आपण चूक केली हे मान्य करू शकत नाही.

पण निसर्गाच्या चमत्कारातून अशी परिस्थिती निर्माण झाली तर.. काळाने आपली चाल खेळली तर..

"अदृश्य बाप" कादंबरी ही अशाच एका निसर्गाने केलेल्या चमत्कारिक संकल्पनेवर बेतलेली आहे. निसर्गाने केलेल्या चमत्कारातून कादंबरी मधील मुख्य पात्र रवी आपल्या हरवलेल्या मुलीचा शोध घेवू लागतो.

निसर्गात हा चमत्कार कसा सुरू झाला.. हा चमत्कार घडण्यामागे नेमका हेतू काय या प्रश्नांची उत्तरं रवी आपल्या मुलीला शोधण्याकरता या संपूर्ण प्रवासात शोधू पाहतो.

काही नाती संपत नसतात फक्त काळाच्या अंधारात कुठेतरी अदृश्य झालेली असतात. असंच बाप अन् मुलाच अदृश्य नात "अदृश्य बाप" या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

"ई-साहित्य प्रतिष्ठान"तर्फे प्रकाशित होणारं हे माझं चौथं पुस्तक आहे. "ई-साहित्य प्रतिष्ठान" सारखी संस्था नव्या लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे याचं कौतुक आहे. "अदृश्य बाप" ही कादंबरी "ई-साहित्य प्रतिष्ठान" या संस्थेमार्फत प्रकाशित होत आहे याचा आनंद आहे

कोणतीही कलाकृती निर्माण होण्यामागे काही अदृश्य वेदना असतात, अन् या अशा वेदनेतूनच कलाकृती साकार होत असते. तुम्हांला ही कलाकृती आवडल्यास प्रतिक्रिया द्यायला विसरू नका. तुम्ही व्यक्त केलेल्या भावना नव्या कार्याची सुरवात करायला प्रेरीत करतात.

धन्यवाद..

प्रस्तुत कथा पूर्णपणे काल्पनिक असून तिचा वास्तवतेशी काहीही संबंध नाही.

बंटी दादा

तू या क्षणी हवा होतास..

भाऊ म्हणून पाठीवर थाप द्यायला,

मित्र म्हणून खांद्यावर उचलून घ्यायला..

तू या क्षणी हवा होतास..

ही कलाकृती, तू दिलेल्या प्रेमाला समर्पित..!

अनुक्रम

उल्कापात 10

वाढदिवस 14

घरवापसी..... 64

भूतकाळ..... 105

काळाच्या अटकेत 126

सोनेरी दगड..... 153

चुकामूक..... 180

काळाचं चक्र 207

रहस्य..... 228

भेट..... 317

जाणीव..... 348

भविष्याची वाटचाल..... 356

उल्कापात

१९२५

नातं.

नातं बनवावं लागत नाही ते आपसूकच बनतं. माणसाचा जन्म झाला की नात्याचाही जन्म होतो. आईचं मुलाशी, मुलाचं बापाशी, भावाचं बहिणीशी, नातवाचं आजीशी, आजोबाच नातीशी. ही नाती माणसाच्या जन्मा सोबतच जन्माला येतात.

नात्यांच्या या गर्दीचा नकळत आपणही भाग होऊन जातो. पण कधीकधी इतकी नाती असूनही माणूस एकटा पडतो. नात्यांच्या या गर्दीत हरवून जातो.

लहानपणी काही वाटत नसतं. तेव्हा काही कळतही नसतं. म्हणावी तितकी जाण नसते. पण जस जसं आपण मोठं होत जातो तस तसं आपसूकच गोष्टी कळू लागतात. चूक काय बरोबर काय कळू लागतं. स्वभाव कळू लागतात. आणि जेव्हा स्वभाव कळू लागतात तेव्हा चांगल्या चांगल्या नात्यातही दुरावा येतो.

मग ते नातं आईचं असो वा बापाचं असो. मुलाचं असो वा मुलीचं. एकदा दुरावा आला की माणूस एकटा पडतोच आणि एकट्या पडलेल्या माणसाला मग जग नकोस वाटतं.

तो आतल्या आतच जळत राहतो. मनातला ज्वालामुखी आसवांनी शांत करत राहतो.

पण कधी कधी परिस्थिती अशी निर्माण होते की मनातल्या ज्वालामुखीचा उद्रेक होतो. मनातला लाव्हा बाहेर येतो आणि चांगल्या चांगल्या नात्यांची राख करू पाहतो.

तरीसुद्धा मन जळतच राहतं. अशा नात्यात राहू वाटत नाही. ते सगळ्यांपासून दूर जायला बघतं. एकटच. जळत्या मनाने.

आकाशातून जळती उल्का वेगाने धावत सुटावी तसं मन धावत सुटतं.

आकाशातून जाणाऱ्या जळत्या उल्केचीही तीच परिस्थिती जी आपल्या मनाची.

ती सुद्धा स्वतःचं मन जाळून, स्वतःला जाळून एकटीच ब्रम्हांडात फिरत असते. अशी जागा शोधत असते जिथे ती स्वतःला शांत ठेवू शकेल. स्वतःची आग शांत करू शकेल.

अशीच एक नात्यांच्या गर्दीत हरवलेली, एकटी पडलेली उल्का मनातला लाव्हा बाहेर काढत ब्रह्मांडातून फिरू लागली.

जळत्या मनाने वायू वेगात सगळ्यांपासून दूर जाऊ लागली.

ती शोधत होती एक जागा जी तिला सामावून घेईल. तिच्या ज्वाला शांत करू शकेल. जिथे ती उल्का शांत राहू शकेल अशी एक जागा.

आणि तिला ती जागा दिसू लागली. निसर्गाने नटलेली पृथ्वी तिला दिसू लागली.

तिचा वेग वाढला. पृथ्वीच्या जवळ जाण्यासाठी तिला मिठी मारण्यासाठी स्वतःला तिच्यात सामावण्यासाठी ती वायू वेगात तिच्याजवळ जाऊ लागली. पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण तिला आपल्याजवळ खेचू लागलं. जणू काही पृथ्वीलाही तिची गरज होती. जणू काही पृथ्वी सुद्धा तिची वाट पाहत होती.

अन् ती आली. पृथ्वीच्या कक्षेत ती आली. जस जसं पृथ्वीच्या जवळ यावं तस तसं उल्केचा वेग वाढू लागला. तिची ज्वाला वाढू लागली.

स्वतःच्याच शरीराचे तुकडे खाली पडताना ती पाहू लागली. तिचं मन तिचं हृदय तिने अजूनही घट्ट धरून ठेवलं होतं. पृथ्वीच्या जवळ जाईपर्यंत आपलं हृदय राहील का नाही याची तिला शाश्वती नव्हती. तरीही तिने हार मानली नव्हती. तिचा वेग कमी झाला नव्हता.

मनातली इच्छाशक्ती तिला पृथ्वीच्या अंतरंगात घेऊन आली. तिने पृथ्वीला मिठी मारली. तिच्या मिठीत येताच तिची ज्वाला शांत झाली.

बराच वेळ ती पृथ्वीच्या मिठीत राहिली. तिचं शरीर उध्वस्त झालं होतं. तिच्या शरीराचा भाग म्हणून फक्त तिचं हृदय जिवंत राहिलं होतं.

एका मध्यम दगडाच्या आकाराचं हृदय अजूनही धडधडत होत. ते अजूनही जिवंत होत.

उल्केची ज्वाला पृथ्वीच्या जलात शांत झाली होती. ती पृथ्वीच्या कवेत विसावली. पृथ्वीने तिला मिठीत घेतलं. उल्केचं हृदय तिने स्वतःच्या मिठीत लपवून ठेवलं.

उल्केला वाटत होतं आपण कुठे आलो, हे कोणाला माहित नसावं. आपण पृथ्वीच्या मिठीत लपून बसलो आहोत हे कोणी पाहिलं नसावं.

पण तसं नव्हतं. आपल्याला जे वाटतं ते मुळात तसं कधीच नसतं. कोणीतरी असतं ज्याला ते सर्व दिसत असतं, जाणवत असतं.

उल्केच्या बाबतीतही तसंच झालं. कोणीतरी तिथे उपस्थित होत. ज्याने तिला पृथ्वीच्या मिठीत लपताना पाहिलं होतं. तिचं धडधडणारं हृदय त्याने पाहिलं होतं. तिच्या हृदयातून निघणारी सोनेरी किरणे त्याच्या घाऱ्या डोळ्यांनी पाहिली होतीत.

त्याने क्षणाचाही विलंब न करता तिच्याजवळ धाव घेतली. विहिरीत पडलेली उल्का स्वतःच्या हातात घेतली. त्या उल्केतला सोनेरी रंगाचा दगड त्याने शिंपल्यातून मोती ओढून काढावा तसा काढला होता. ती उल्का त्याने विहिरीतच टाकली. अन् हसत हसत तो माघारी फिरला.

उल्केचं धडधडणारं हृदय एकदाचं बंद पडलं. तिच्या हृदयाने त्या विहिरीतच अंतिम श्वास घेतला अन् तिचं हृदय विहिरीच्या तळाशी निपचित पडून राहिलं.

••••

वाढदिवस

११-०२-२०२५

सूर्याची सोनेरी किरणं केव्हाच पृथ्वीवर अवतरली होतीत. आतापर्यंत सूर्य चांगला डोक्यावर आला होता. त्याच्या किरणांनी वाफवलेली गरम हवा खिडकीतून रवीच्या खोलीत येत होती.

अन्विताने एसी केव्हाच बंद केला होता. ध्रुवीला केव्हाच शाळेत तयार होऊन पाठवलं होतं. घरातली जमेल तितकी आवरा आवर करून ती आता रवीच्या उठण्याची वाट पाहत होती.

एव्हाना रवी उठायला हवा होता. आज त्याने कामावर सुट्टी घेतली होती. त्याने सुट्टी का घेतली याची तिला कल्पना होती. परंतु ज्या कामासाठी त्याने सुट्टी घेतली ते काम अजून त्याने केलं नव्हत.

अन्विताचा आज वाढदिवस होता. तिचा वाढदिवस आहे म्हणून रवी कामाला गेला नाही हे तिने ओळखलं होतं. परंतु त्याने अजून तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या नव्हत्या. किंबहुना तिचा वाढदिवस साजराही केला नव्हता.

त्याला झोपलेला पाहून तिच्या मनात बरेचसे विचार येत होते. रवी नक्की तिचा वाढदिवस आहे म्हणून कामाला गेला नाही की तो खरंच थकला आहे या कारणाने गेला नाही हे तिला नीट्स कळत नव्हतं.

रात्री तो थकून आलेला हे तिला माहीत होत. तिच्या पोटातल्या बाळाला चुंबन न देताच तो झोपला हेही तिच्या लक्षात आलं होतं. रात्री बारा वाजून गेले तरी तो शुभेच्छा द्यायला उठला नव्हता. दुपारचे बारा वाजत आले तरी देखील तो अजून झोपून होता.

तिने त्याला सकाळीच झोपेत उठवण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्याने कामावर जाणार नाही असं सांगून पुन्हा डोळे झाकले होते. तेव्हापासून अन्विता जरा शांत शांतच वाटत होती. त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याला ताप आला नसल्याची तिने खात्री केली होती.

कामावरचा व्याप आणि प्रवासाचा त्रास यामुळे रवी थकून गेला असेल हे ती मनोमनच ओळखून गेली होती.

रवीने अजून तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या नाहीत या गोष्टीचा तिला राग नव्हता. रवी तिचा वाढदिवस विसरू शकणार नव्हता. आजपर्यंत तो कधीच विसरला नव्हता. तिचा प्रत्येक वाढदिवस त्याने वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला होता.

यावेळीही तो असंच काहीसं करेल याची तिला पूर्ण खात्री होती. तो आता फक्त कोणत्या पद्धतीने तिचा वाढदिवस साजरा करेल या गोष्टीची ती वाट पाहत होती.

ती रवी जवळ आली अन् स्वतःच पोट सांभाळत त्याच्या बाजूला त्याला मिठी मारून पडून राहिली.

त्याच्या बंद डोळ्यांना पाहत ती प्रेमाने त्याच्या केसातून हात फिरवू लागली. तिने हलकसं त्याच्या ओठांना स्पर्श केला आणि त्याला प्रेमाने उठवू लागली.

"ए बबदू उत ना आता." ती लाडाने त्याच्याशी बोलू लागली.

"ह्म्म ऽ." रवीने हलकासा हुंकार सोडला.

"किती दोपणाल दूपाल दाली आता. उत ना. बाल आतवन कादतय तूदी."

"ह्म्म ऽ." रवीने नि:श्वास सोडत हळूहळू आपले डोळे उघडले. त्याला उठलेला पाहून ती गोड हसली आणि हलकसं त्याच्या ओठावर ओठ टेकवले.

"का झोपलास रे इतका वेळ.. काही दुखतय का..?" अन्विता त्याची काळजी करत त्याची चौकशी करू लागली. रवी शांत नजरेने तिच्याकडे फक्त पाहू लागला.

"असा काय बघतोयस बोल, काही दुखतय का.. कामावर पण गेला नाहीस.. काही होतंय का..?"

"अं हं ऽ." रवीने नकारार्थी मान हलवली.

"काही नाही तर मग का झोपलायस इतका वेळ..?" तो शांतपणे तिच्या डोळ्यात बघू लागला.

“नेहमीप्रमाणे सर्व काही मीच ओळखायच आहे का आणि मीच सांगायचं आहे का..?” तो काहीच बोलला नाही. तिने जे ओळखायचं होतं ते ओळखलं.

“ह्म्म ऽ ठीक आहे तर मग.. काहीतरी आहे जे मनाला लागतंय.. कोणती तरी गोष्ट आहे जी सतत टोचत आहे.. बरोबर ..?” रवीने हलकीशी होकारार्थी मान हलवली. अन्विता गालात हसली अन् पुढे बोलू लागली.

“हम्म ऽ.. म्हणजे काहीतरी आहे जे अजूनही तुला शांत बसू देत नाही.. तो विचार सतत तुझ्या मनात येत असतो.. सतत तुला सतावत असतो.. बरोबर ना..”

“ह्म्म ऽ..”

“ओके.. म्हणजे मी बरोबर ओळखत आहे.. आता मला तो कोणता विचार आहे हेच ओळखायच आहे.. तू काही सांगणार नाहीस.. ते माझं मलाच ओळखावं लागेल.. हो ना..?” रवी गंभीर नजरेने बघू लागला. तिने हलकसं त्याच्या गालावर चापटी मारली.

“बघ फक्त.. काही बोलू नकोस.. मी बसते आपली विचार करत..” तो शांत नजरेने पाहतच राहिला.

“आता थोडं मी ओळखलं आहे, थोडं तू सांग.. काय झालंय.. कसला विचार करतोयस..?”

“तुझा..” तो गंभीर नजरेने म्हणाला.

“माझा..” ती गोड हसत म्हणाली. “माझा कसला.. आणि कशाबद्दल..?”

“हेच की, तू आधी का आली नाहीस माझ्या आयुष्यात..” ती गोड हसत त्याच्याकडे पाहू लागली. तो फक्त गंभीर नजरेने तिच्याकडे पाहत राहिला.

“सकाळी सकाळीच फ्लर्ट करायला सुरू केलंस.. हे होतंय का तुला.. म्हणून गेला नाहीस का कामाला..?” ती प्रेमाने त्याच्याकडे पाहत राहिली..

“च्च ऽ.. त्यासाठी नाही.. झोपलो नाही रात्रभर.. हाच विचार मनात येत होता..”

“कोणता.. माझा विचार..?”

“ह्म्म ऽ..”

ती गोड हसत त्याच्याकडे पाहत होती.

“मला तर चांगला गाढ झोपेत दिसत होतास..”

“डोळे झाकले होते पण मनात विचार सुरूच होते.”

“आणि अचानक हा विचार मनात का आला.. आजच का.. कशाबद्दल.. अचानक बायको बद्दल असं का वाटू लागलं..” अन्विता त्याचे ओठ दाबत दाबत बोलू लागली.

“नाही माहित. अचानक काल कामावरून येता येता डोकं दुखू लागलं विचार करून करून..”

"हो का.. आता माझ्यामुळे तुझं डोकं पण दुखू लागलं का.."

"ह्म्म ऽ.."

"चावट.." अन्विताने त्याच्या गालावर हलकीशी चापट मारली.

"बास झालं आता.. पुरे झालं प्रेम.. आलं लक्षात बायको बद्दल किती काळजी आहे ती.. आता ऊठ.. काहीतरी खाऊन घे.. अशी ही सुट्टी घेतलीच आहेस तर दिवसभर निवांत बसून विचार कर.."

"बाहेर जायचंय मला.. म्हणून कामावर गेलो नाही मी.."

"बाहेर..?"

"ह्म्म ऽ.."

"का आणि कुठे..?"

"पोलीस स्टेशनला.."

अन्विताने गंभीर नजरेने विचारलं, "पोलीस स्टेशनला का..?"

"तक्रार करायची आहे.."

"तक्रार.. कसली तक्रार.. कोणाची तक्रार..?"

"तुझी"

"माझी.." अन्विता गालात हसत म्हणाली.

"ह्म्म ऽ."

"आणि कशाबद्दल..?"

"सांगितलं ना, माझ्या आयुष्यात या आधी का आली नाहीस म्हणून.."

अन्विता हसत हसत बोलू लागली. "हो का.. माझी तक्रार करणार आहेस.. बर.. मग मी पण येते तुझ्यासोबत पोलीस स्टेशनला.. मला पण एक तक्रार करायची आहे.."

"कोणती तक्रार..?" रवी गंभीर होत म्हणाला.

"सांगते की, आपण जाणार आहोतच ना पोलीस स्टेशनला तर मग तिकडेच ऐक.." तसं म्हणत अन्विता हसत हसत स्वतःच पोट सावरत खोली बाहेर गेलीही. रवी तसाच गंभीर नजरेने बेडवर पडून राहिला.

••

अन्विताने लाजत लाजत स्वयंपाक गरम केला. रवी जे काही बोलत होता ते अजूनही तिच्या कानात ऐकू येत होतं. त्याचं असं बोलणं तिला आवडत होतं. दरवेळी तो काही ना काही असं बोलत होता ज्याचा तिने कधी विचारच केला नव्हता. रवीची हीच गोष्ट तिला फार आवडत होती.

आपल्या नवऱ्याची प्रेम करण्याची पद्धत तिला आवडत होती. त्याच्या याच गोष्टीच्या ती सुद्धा प्रेमात होती.

त्याने अजूनही तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या नव्हत्या. पण तिला माहीत होतं ज्या अर्थी तो असं काहीतरी बोलत आहे त्याअर्थी नक्कीच त्याने काहीतरी नियोजन केलं आहे. त्याचं सरप्राईज काय असेल याची ती उत्सुकतेने वाट बघत होती.

••

रवी त्याचं आवरून खोली बाहेर आला. त्याला तयार होऊन आलेलं पाहून तिने पटकन त्याला विचारलं.

"आता कुठे जातोयस..?"

"सांगितलं ना मगाशी.."

ती पुन्हा गालात हसली आणि म्हणाली, "पोलीस स्टेशनला..?"

"हो." तो गंभीर चेहऱ्यानेच म्हणाला.. ती हसत हसत त्याच्याजवळ आली..

"ए बच्चा काय झालंय तुला आज..?" तिने त्याच्या पोटाला धरत विचारलं.

त्याने गंभीर चेहऱ्यानेच नकारार्थी मान हलवली. ती त्याच्या डोळ्यात पाहण्याचा प्रयत्न करू लागली. तो तिची नजर चुकवू लागला.. त्याचा चेहरा अजूनही गंभीरच होता.. ती शांत झाली.

"बर असं आहे का.. म्हणजे खरंच तुला माझी तक्रार करायची आहे का..?" त्याने होकारार्थी मान डोलावली.

"चालेल ये मग माझी तक्रार करून.."

तो तिला बाजूला सारत पुढे जाऊ लागला.. ती थोड्याशा हसऱ्या चेहऱ्याने पाहू लागली. तिला कुठेतरी वाटत होतं की रवी नक्कीच काहीतरी सरप्राईज देणार आहे. त्याला बाहेर जाता जाता तिने अडवल..

"थांब.. मी सुद्धा येते.. माझंही काम आहे.."

"गाडी जवळ ये.." तो गंभीर आवाजात म्हणाला आणि बाहेर पडलाही..

अन्विता हसत हसत खोलीत गेली. रवीचं सरप्राईज काय असेल याचा विचार करत करत तयार झाली. दाराला कुलूप लावून ती लिफ्ट मधून खाली गेली. रवी कारमध्ये बसला होता. त्याचा चेहरा अजूनही गंभीर होता. तिने गाडीत बसत त्याच्याकडे पाहिलं. त्याने गाडी सुरू केली आणि काहीही न बोलता पुढेच पाहू लागला.

अन्विता गालातल्या गालात हसत होती. रवी किती गंभीर राहण्याचा प्रयत्न करत आहे हे तिला कळत होतं. तो सरप्राईज देण्यासाठी किती प्रयत्न करत आहे हे सुद्धा तिला कळत होतं.

••

रवीची पोलो गाडी गोरेगाव पोलीस स्टेशन समोर उभी राहिली. पोलीस स्टेशन पाहताच अन्विता खरोखरच गंभीर झाली. रवीने गाडी एका बाजूला लावली. तो गंभीर नजरेने पोलीस स्टेशनकडे पाहू लागला. अन्विता आता खरोखरच विचारात पडली होती.

तिला आतापर्यंत वाटत होतं रवी कुठेतरी अशा ठिकाणी घेऊन जाईल जिथे तिचा वाढदिवस साजरा होणार असेल किंवा एखादं गिफ्ट तिला मिळणार असेल.

परंतु रवीने खरोखरच गाडी पोलीस स्टेशनला आणली होती. आणि त्याचा गंभीर चेहरा पाहून तिच्या चेहऱ्याचा रंग उडाला होता.

"रवी.. काय हे..?" तो शांतच होता. त्याची नजर गंभीर होती.

"माझ्यासोबत येणार आहेस की माझ्या नंतर जाशील..?" ती शांत राहिली. तिला काय बोलावं हे आता कळत नव्हतं.

रवी तिच्या उत्तराची वाट न पाहता गाडीतून उतरला. त्याच्या मागोमाग ती सुद्धा तिचं पोट सावरत उतरली.

"रवी काय हे.. कुठे आणलं आहेस.. आणि काय करतोयस..?" तो काहीच न बोलता चालत राहिला. अन्विता त्याच्या मागोमाग स्वतःला सावरत चालू लागली. त्याचा हात धरू लागली.

रवी तिचा हात झटकू लागला. त्याला हात झटकताना पाहून तिच्या काळजात चर्र ऽ झालं. रवी वेगाने पोलीस स्टेशनमध्ये गेला.

जवळच्याच कॉन्स्टेबलला त्याने तक्रार नोंदवायची असल्याचं सांगितलं. त्या कॉन्स्टेबलने दोघांकडे वर-खाली पाहिलं आणि "कसली तक्रार" असल्याच विचारल.

रवीने कौटुंबिक विवाद असल्याच सांगितलं. त्या कॉन्स्टेबलने अन्विताकडे, रवीकडे गंभीर नजरेने पाहिलं आणि त्याने "आत मॅडम बसल्या आहेत त्यांच्या जवळ जावा" असं हाताने इशारा करत सांगितलं.

कॉन्स्टेबलने इशारा केलेल्या रूमजवळ रवी वेगाने गेला. त्याच्या मागोमाग अन्विताही गेली.

रूमजवळ जाताच रवीला समोरच्या खुर्चीत एक महिला पोलीस अधिकारी बसलेली दिसली. त्याने दारातूनच "मे आय कम इन मॅम" असं विचारलं. त्या महिला पोलिसाने नजरेने इशारा केला आणि त्यांना आत यायला सांगितलं. दोघेही त्यांच्यासमोर येऊन उभे राहिले.

"काय काम होतं..?" महिला पोलिसाने रवीला विचारल.

"मॅम एक तक्रार नोंदवायची आहे." रवी त्यांच्या नजरेला नजर देऊन म्हणाला.

"बसा.. या कोण..?"

रवी शांतच राहिला..

"मी यांची मिसेस आहे."

महिला पोलिसाने अन्विताला खालून वर न्याहाळलं. अन्विताला तिने बसायला सांगितलं.

"बोला कसली तक्रार आहे..?"

"मॅम, माझी तक्रार आहे. मानसिक छळ केल्याप्रकरणी."

"मानसिक छळ..?" पोलीस अधिकारी विचारू लागली. "कोणी केला..?"

रवी शांत झाला. तो खाली पाहू लागला. त्याची नजर गंभीर झाली.

महिला पोलीस अधिकारी अन्विताकडे पाहू लागली. अन्विता आश्चर्य होऊन रवीकडे पाहत होती. तिला आतापर्यंत रवी मस्करी करत आहे असंच वाटत होतं. परंतु तसं काहीच नव्हतं. रवी खरोखर तिला पोलीस स्टेशनमध्ये घेऊन आला होता. आणि तो खरोखरच तिची तक्रार करत होता. अन्विताच्या चेहऱ्याचा रंग उडाला होता.

तिच्या वाढदिवसा दिवशी तिच्यासोबत हे काय होत आहे हेच तिला कळत नव्हतं. अन्विता ही नऊ महिन्यांची गरोदर स्त्री होती.

अशा परिस्थितीत रवी असं काही वागेल याची तिला कल्पना नव्हती. रवीने शब्द जुळवले आणि गंभीर नजरेने बोलू लागला.

"माझ्या बायकोबद्दल मला तक्रार नोंदवायची आहे. माझा मानसिक छळ झाला आहे."

पोलीस अधिकारी अन्विताकडे पाहू लागली. अन्विताचे डोळे भरून आले. तिच्या डोळ्यात चटकन अश्रू उभे राहिले.

"तुम्ही काय बोलत आहात तुम्हाला कल्पना आहे का..?"

"हो.. मी पूर्ण शुद्धीत आहे. मी काय बोलत आहे कोणाबद्दल बोलत आहे याची मला पूर्ण कल्पना आहे.."

पोलीस अधिकारी गंभीर नजरेने पाहू लागली. तिने टेबलावरची तक्रार नोंदवही हातात घेतली.

"कोणता मानसिक छळ झाला आहे तुमच्यासोबत..?"

रवी डोळे इकडे तिकडे फिरवू लागला.

"तुम्हाला विचारत आहे मी.." तिने रवीशी बोलता बोलता पुन्हा एकदा अन्विताकडे पाहिलं. अन्विता अजूनही आश्चर्याने भरलेल्या डोळ्यांनी रवीकडे पाहत होती. रवी मात्र तिच्याकडे पाहत नव्हता.

"बोला माझ्याकडे बाकीचीही कामं आहेत."

रवीने हिंमत केली आणि बोलू लागला.

"मॅम. ही माझी बायको आहे. आमच्या लग्नाला दहा वर्षे झाली आहेत. आम्हाला एक आठ वर्षांची मुलगी सुद्धा आहे. माझी बायको आता नऊ महिन्यांची गरोदर आहे. आमचा संसार सुखाचा आहे. पण.."

"पण काय..?"

अन्विताच्या डोळ्यातून अश्रू येत होते. पोलीस अधिकारी एकदा अन्विताकडे अन् एकदा रवीकडे पाहत होत्या.

"पण मॅम. माझी बायको माझ्या आयुष्यात फार उशिरा आली. मला तिची गरज होती तेव्हा ती माझ्या जवळ नव्हती. मी तिची फार वाट पाहिली. पण ती माझ्यापासून दूर होती. मी जेव्हा एकटा होतो तेव्हा ती माझ्यासोबत नव्हती. मला तिची गरज होती."

"पण जेव्हा मला असं वाटू लागलं की मला कोणाची गरज नाही तेव्हा अन्विता माझ्या आयुष्यात आली. माझ्या आयुष्यातून दुःख निघून गेलं.

परंतु ती जेव्हा माझ्या आयुष्यात नव्हती तेव्हा मी फार दु:खी होतो. ते दिवस माझ्या मनातून जात नाहीत. मी विसरू शकत नाही.''

''त्या दिवसांत मला फार त्रास झाला.. मी मानसिक दृष्ट्या कमजोर झालो. आणि या गोष्टीचा त्रास आजही मला कधी कधी होतो. मला असं वाटतं जर माझी बायको माझ्या आयुष्यात लवकर आली असती तर हा त्रास मला कधी झाला नसता.''

रवी एवढं बोलून शांत झाला. पोलीस अधिकारी दोघांकडे आळीपाळीने पाहत होत्या.

अन्विता अजूनही गोंधळात होती. रवीची तक्रार तिच्या अजूनही लक्षात येत नव्हती. तिला आता रवीला काहीतरी मानसिक आजार झाला असल्याचं वाटत होतं.

''तुमची बायको तुमच्या आयुष्यात आल्यानंतर पुन्हा कधी हा त्रास झाला होता.'' पोलीस अधिकारीने रवीला विचारलं.

अन्विता आश्चर्याने त्यांच्याकडे पाहू लागली. तिला हे अपेक्षित नव्हतं. तिला वाटत होतं रवीची अवस्था त्यांच्या लक्षात आली असेल. परंतु त्यांना रवीचीच बाजू घेताना पाहून अन्विताला दुसरा धक्का बसला होता.

''हो.''

''केव्हा..?''

"असं नेहमी वाटत असतं. कधी कधी खूप वाटतं. त्याचा खूप त्रास होतो. आणि मग मनात वेगवेगळे विचार येतात.."

"कसले विचार..?"

"कोणतेही विचार. दूर जावसं वाटतं. लांब राहावसं वाटतं. कधीकधी आत्महत्या करावीशी वाटते."

रवी असं बोलताच अन्विता त्याच्याकडे पाहू लागली. पोलीस अधिकारी सुद्धा थोडीफार गंभीर झाली.

"मग तर ही फारच गंभीर बाब आहे."

अन्विता दोघांकडेही आश्चर्याने पाहत होती. तिला काय सुरू आहे हेच कळत नव्हतं.

"कोणामुळे तरी आत्महत्या करावीशी वाटणं ही फार गंभीर बाब आहे. आणि या गोष्टीचा फारच त्रास होऊ शकतो. तुमची समस्या मला समजली आहे. आणि त्यावर नक्कीच मी कारवाई करेन."

पोलीस अधिकारी असं म्हणताच अन्विता त्यांच्याकडे पाहू लागली.

"मॅम अहो काय बोलताय तुम्ही हे. तुमच्या लक्षात येतंय का..?"

"हो.. परिस्थिती माझ्या लक्षात आली आहे.. माफ करा मॅडम परंतु तुमच्या नवऱ्याची तक्रार मला नोंदवून घ्यावी लागेल कारण त्यात एक तथ्य आहे. अशा गंभीर स्वरूपाच्या तक्रारीवर आम्ही दुर्लक्ष करू शकत नाही.

मला माफ करा.” त्यांचं वाक्य पूर्ण होताच त्यांनी लेडी कॉन्स्टेबलला आवाज दिला. “जाधव जरा या इकडे..”

सावळ्या वर्णाची एक उंच महिला हवालदार अन्विताच्या शेजारी येऊन उभी राहिली.

“मॅडम तुम्हाला वकील बोलवायचा असेल तर तुम्ही बोलावू शकता. मी या साहेबांची तक्रार नोंदवत आहे. तुम्हाला आत थांबावं लागेल. जाधव यांना लॉकअप मध्ये घेऊन जा.”

पोलीस अधिकारीने असं म्हणताच अन्विताच्या पायाखालची जमीन सरकली. तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ती दोघांकडेही आश्चर्याने पाहू लागली.

महिला हवालदारने अन्विताच्या हाताला धरलं आणि तिला उठवू लागली. तिच्या दोन्ही खांद्यांना धरत ती महिला हवालदार लॉकअपच्या दिशेने तिला नेऊ लागली. अन्विता रवीला आवाज देत देत बोलू लागली.

“रवी अरे काय करतोयस हे.. तू काय बोलतोयस तुला कळतंय का. रवी.. बघ जरा माझ्याकडे.. थांबा थांबा.. तुम्ही मला असं लॉकअपमध्ये ठेवू शकत नाही. एका गरोदर महिलेशी तुम्ही असं वागू शकत नाही..” अन्विता त्या महिलेचा हात झटकत बोलू लागली.

“मॅडम प्लीज को-ऑपरेट करा. आम्हाला कळतंय तुम्ही गरोदर आहात. परंतु ही प्रोसिजर फॉलो करावी लागेल. तुमचा वकील येईपर्यंत

तुम्हाला लॉकअपमध्ये थांबावं लागेल.'' महिला हवालदार तिला हळूहळू लॉक अपच्या दिशेने नेऊ लागली.

अन्विताला काय होत आहे ते अजून कळत नव्हतं. तिला अजूनही जे होतंय ते खरं वाटत नव्हतं.

महिला पोलीस हवालदारने आतल्या खोलीचं दार उघडलं. अन्विताला हळूहळू खोलीमध्ये नेऊन उभं केलं.

अन्विता अजूनही रडत होती. रवीला हाका मारत होती. महिला हवालदारला समजावत होती. परंतु कोणीच तिचं ऐकत नव्हत. तिच्यासमोर आता अंधार उभा राहिला होता. ती एकदम शांत झाली.

ती शांत झाली आणि खोलीत मंदसा उजेड आला. मेणबत्त्यांच्या प्रकाशात तिला माणसं जमलेली दिसू लागली. आणि एक ओळखीचा गोंडस आवाज तिच्या कानावर पडू लागला.

''हॅपी बर्थडे टू यू.. हॅपी बर्थडे टू यू.. हॅपी बर्थडे डियर मम्मा.. हॅप्पी बर्थडे टू यू..''

टाळ्यांचा कडकडाट झाला. खोलीतले दिवे लागले. हॅपी बर्थडे, हॅपी बर्थडेच्या शुभेच्छा तिच्या कानावर येऊ लागल्या.

अन्विता कावरी बावरी होऊन डोळे पुसत इकडे तिकडे पाहू लागली. तिला आजूबाजूला महिला पोलीस अधिकारी, महिला पोलीस हवालदार, कॉन्स्टेबल दिसू लागले. तिच्याकडे हसताना, टाळ्यांचा जोरजोरात

आवाज करताना दिसू लागले. त्या सर्वांच्या मधोमध तिला ध्रुवी दिसली. तिच्या हातात केक होता.

अन्विता आश्चर्याने त्यांच्याकडे पाहत होती. ध्रुवी हसून हसून तिच्या मम्माला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होती.

अन्विताला अजूनही काय होत आहे ते कळत नव्हतं. ती कावरी बावरी होऊन आजूबाजूला पाहत होती.

पाठीमागून जोरजोरात टाळ्या वाजवत आणि शुभेच्छा देत महिला पोलिस अधिकारी आली. सोबत रवी सुद्धा हसत हसत येत होता.

अन्विता आश्चर्याने त्या दोघांकडे पाहत होती. तिला आता काय झालं आहे हे लक्षात आलं होतं. रवी जवळ येताच तिने त्याला मारायला सुरुवात केली. आणि ती रडत रडत त्याच्या मिठीत गेली.

ध्रुवी सोबत प्रत्येक जण "बार बार दीन ये आए" हे गाणं गाऊ लागला.

अन्विता अजूनही रडत होती. असं पोलीस स्टेशनमध्ये येऊन अशा प्रकारे वाढदिवस साजरा होणार याची तिला कल्पना नव्हती.

पोलीस अधिकारीने अन्विताच्या पाठीवर हात ठेवला तेव्हा अन्विता शुद्धीत आली. महिला पोलिस अधिकारीने तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अन्विता भरलेल्या डोळ्याने पाहू लागली.

"या या केक कटिंग करूया." रवी तिला टेबल जवळ घेऊन आला. अन्विताने ध्रुवीच्या हातातला केक घेऊन तो कट केला. प्रत्येकाने जोरजोरात टाळ्यांच्या कडकडाटात अन्विताला शुभेच्छा दिल्या.

अन्विताने केकचा तुकडा ध्रुवीला भरवला. तिने रवीकडे लटक्या रागात पाहून दुसरा तुकडा त्याला न भरवता महिला पोलीस अधिकारीला भरवला. अन्विताच्या अशा वागण्याने प्रत्येक जण हसू लागला.

महिला पोलीस अधिकारीने जाधव बाईंना केक सर्वांना वाटण्याचा इशारा दिला. अन्विता रवीकडे लटक्या रागाने पाहत होती.

"असं सरप्राईज देतात एका गरोदर बायकोला."

रवीने हसत आपले कान धरले अन ओठातच सॉरी म्हणाला. अन्विताने हसत प्रेमाने रवीला मिठी मारली. पोलीस अधिकारीने घसा खाकरला अन् दोघांकडे हसून पाहू लागल्या.

"राग गेला असेल तर ओळख करून द्याल का साहेब..?"

अन्विता रवी पासून दूर झाली.

"अनु मिट माय चाइल्डहूड फ्रेंड, माय क्लोज फ्रेंड, माय बेस्ट फ्रेंड, माय बेस्टी आणि मुंबई उपनगर जिल्ह्याची एसीपी मिस अपूर्वा देशमुख.

अन्विताने हसत हसत हात पुढे केला आणि "हॅलो मॅम" असं म्हणाली..

"ए चल मॅम काय.." अपूर्वाने तिला जवळ घेत मिठी मारली. अन्विता फार प्रेमाने तिच्याकडे पाहू लागली.

"कसं वाटल सरप्राईज..?"

"भयानक होतं फार." अन्विता हसत म्हणाली तसे सगळे हसू लागले.

"काय करणार तुझा नवराच इतका भयानक आहे.. तो आणि त्याचे भयानक आयडियाज.."

"आणि त्याची भयानक मुलगी.." छोटी ध्रुवी पुढे येत म्हणाली. तसं अपूर्वाने तिला जवळ घेतलं.

"हो बाई. तुमची फॅमिलीच भयानक वाटत आहे मला.." अपूर्वा तसं म्हणताच चौघेही हसू लागले.

"या बसू या.." अपूर्वाने त्यांना तिच्या केबिनमध्ये येण्याचा इशारा केला. चौघेही अपूर्वाच्या केबिनमध्ये हसत खेळत गप्पा मारत होते. अपूर्वा अन्विताला रवीच्या भयानक आयडिया बद्दल हसत हसत सांगत होती.

"मी नाहीच म्हणत होते अन्विता, तुला पटणार नाही. पण शेवटी हो का म्हणाले असेल माहित आहे तुला..?" तशी अपूर्वा ध्रुवीकडे बघत हसू लागली. ध्रुवी गालातल्या गालात हसू लागली.

"मला वाटलंच होतं बाप लेकीच प्लॅनिंग असणार हे. बापावर गेली आहे ती एकदम."

"अगदी खरं बोललीस.."

रवी शांतच होता. तो चेहऱ्यावर हसू ठेवून शांत बसला होता.

"मला आधी वाटलं रवी मस्करी करतोय.. पण नंतर त्याने पोलीस स्टेशनला गाडी आणली. आणि बघता बघता तुमच्यासमोर त्यांनी माझी तक्रारही केली."

"ए अगं अहो जावो करु नकोस. मी सुद्धा मैत्रीणच आहे तुझी."

अन्विता गालात हसली अन् पुढे बोलू लागली.

"तू पण त्याला साथ दिलीस मला वाटलं आता गेलेच मी. रवी काही मस्करी करत नाही."

अपूर्वा हसू लागली.

"खरं सांगायचं तर मला हे अजिबात पटलं नव्हतं. मी त्याला म्हणाले देखील ती फार रडेल म्हणून. तर कसा म्हणतो, "जेव्हा रडेल तेव्हाच खरी मजा येईल."

तसं अन्विता त्याच्याकडे लटक्या रागाने पाहू लागली..

"सरप्राईजची.." रवी एकदम बोलून गेला. तसे सगळे हसू लागले.

"पण मला कळत नाही हे ठरलं कसं काय..?" अन्विताने उत्साहाने विचारलं.

रवी बोलू लागला.

"अगं कालच आमची भेट झाली. खूप वर्षांनी भेटलो आम्ही. बराच वेळ आम्ही बोलत बसलो होतो. बोलता बोलता तुझा विषय निघाला

आणि मग काहीतरी सरप्राईज करूया असं ठरलं. मग म्हटलं यावेळी काहीतरी नवीन सरप्राईज देऊ. म्हटलं आता आपली मैत्रीणच एसीपी आहे तर मग पोलीस स्टेशन आपलंच झालं." रवी हसत म्हणाला.

"अपूर्वाला म्हटलं असं असं सरप्राईज द्यायच आहे बायकोला.. करशील का मदत. ती आधी नाहीच म्हणत होती. पण नंतर झाली तयार."

"चांगला फायदा उचललास मैत्रीचा. बघ ना, पहिल्या दिवशीच हे असं. आता तर माझी पोस्टिंग इथेच आहे विचार कर हा काय काय करेल." तसे सर्व हसू लागले.

"ध्रुवी कशी काय इथे.. हिला कोणी आणलं..?"

"मीच घेऊन आले तिला." अपूर्वा बोलू लागली.. "ती तर बापापेक्षा जास्त हुशार. मला म्हणते, "आपण थोडा वेळ मम्माला लॉकअप मध्ये बंद ठेवूया." तशी अपूर्वा हसू लागली. अन्विता आश्चर्याने डोळे मोठे करत ध्रुवीकडे बघून हसू लागली.

"असं काय.. चल तुला घरी दाखवते.."

"आता मी नाही घाबरणार.. अपूर्वा ताई माझी फ्रेंड झाली आहे.." अपूर्वा हसऱ्या नजरेने ध्रुवीकडे पाहू लागली. बराच वेळ त्यांच्या गप्पा रंगल्या.

रवीने अपूर्वाला संध्याकाळी वाढदिवसाच्या पार्टीला येण्याच निमंत्रण दिलं. अन्विताने अपूर्वाला मिठी मारत "पार्टीला ये" म्हणून सांगितल. ध्रुवीने आपल्या नव्या फ्रेंडला मिठी मारत पार्टीला येण्याच वचन घेतलं.

अपूर्वाने हसत हसत त्यांना होकार दिला. तिघांनीही अपूर्वाचा निरोप घेतला अन् आपल्या पोलो गाडीतून घराच्या दिशेने गेले.

••

अन्विता आज खूप खुश होती. रवीने दिलेलं भयानक सरप्राइज तिला आवडलं होत. ती यावेळी सुद्धा त्याचं सरप्राइज ओळखण्यात अयशस्वी ठरली होती. आणि या गोष्टीचा तिला अभिमान होता.

तिला माहित होतं रवी दर वेळी अपेक्षेपेक्षा जास्तच करतो. आताही त्याने मोठी बर्थडे पार्टी ठेवली होती. तिच्या सगळ्या मैत्रिणींना, तिच्या फॅमिलीला बोलावलं होतं.

प्रत्येकजण तिला हसताना खेळताना दिसत होता. ध्रुवी अपूर्वा जवळ बसून तिच्या आजी आजोबांना मम्माची कशी फजिती केली ते हसत-हसत, मम्माची नक्कल करत-करत सांगत होती.

अन्विता तिला पाहून खूप आनंदी वाटत होती. पण रवी वरची तिची नजर हटत नव्हती. रवी किती जरी खुश दिसत असला तरी त्याच्या हसऱ्या चेहऱ्यामागच दुःख तिला त्याच्या डोळ्यात दिसत होतं. तो दाखवत जरी नसला तरी तिला ते कळत होतं.

आज तिच्या वाढदिवसाला प्रत्येकजण उपस्थित होता. अन्विताकडचे सगळे पाहुणे होते. तिच्या मित्र-मैत्रिणी होत्या. तिचे आई-बाबा होते. पण रवीकडच कोणीच नव्हतं.

एक अपूर्वा सोडली तर दुसरं कोणीच नाही. अपूर्वा सुद्धा काल इतक्या वर्षांनी भेटली म्हणून. नाही तर ती सुद्धा आज ईथे नसती.

रवीला तसे मित्र-मैत्रिणी फार कमी. पाहुणे त्या मानाने नाहीच. आणि राहिली आई-बाबांची गोष्ट तर रवीने ते कधीच वारल्यांच अन्विताला सांगितलं होतं. पण खरं काय खोटं काय यापासून अन्विता वंचित होती.

बघता बघता वाढदिवसाची पार्टी संपत आली. सगळ्यांची जेवणं पार पडली. रवी अन् अपूर्वा दोघं काही तरी बोलत आहेत हे अन्विताच्या नजरेने हेरलं होत. अन् त्यांचं काय बोलणं सुरू आहे हे तिला जाणून घ्यायचं होतं.

पण असं त्यांच्यामध्ये जाणं तिला बरोबरही वाटत नव्हतं. शेवटी तिच्या आतलं शंकासुर मन हळुवार स्वतःला सावरत त्यांच्या जवळ चालत गेलं. ती रवी शेजारीच बसली.

"आता कोणत प्लॅनिंग चाललय चोर पोलिसांचं." अन्विता हसत हसत म्हणाली. तसे तिघेही हसू लागले.

"काही नाही गं.. खूप वर्षांनी भेटलो ना.. गावाकडच्या गोष्टी.. तिथल्या आठवणी काढत होतो."

"गावाकडच्या गोष्टी.. मला तर रवीने कधीच सांगितल्या नाहीत.."

"हो का.. कशा सांगणार.. माझ्याकडून कायम फटके खाल्ले आहेत ना त्याने.." तशी अपूर्वा हसू लागली.. "नको काळजी करुस आता.. मी सांगत जाईन तुला अधेमध्ये.." तसं म्हणत तिने अन्विताला टाळी दिली.

अन्विता थोड शांत होत बोलू लागली.

"अपूर्वा थँक्यू.. तू आज इकडे आलीस.. खूप बरं वाटलं.."

"मलाही खूप बरं वाटलं तुम्हा सर्वांना भेटून.. खास करून ध्रुवीला.. आता मी येत जाईन हा तिला भेटायला मध्ये-मध्ये चालेल ना..?" अपूर्वा अन्विताची परवानगी घेत म्हणाली.

"हो हो. आवडेल आम्हाला.." अन्विता हसून म्हणाली.

"बर आता मला निघाव लागेल. अनु आता निघते मी.."

अन्विताने शांत नजरेने मान डोलावली. रवीने ध्रुवीला आवाज देऊन बोलावून घेतलं.

ध्रुवी अपूर्वाच्या गळ्यात पडली अन् तिच्याकडून पुन्हा भेटायला येण्याचं वचन घेतलं. ते तिघेही लिफ्टपर्यंत अपूर्वाला निरोप देण्यासाठी आले. जाता जाता अपूर्वा रवीशी पुन्हा काही तरी बोलू लागली.

"रवी बघ विचार कर.. आता आणखी उशीर नको.. जे झालं ते विसर.. शेवटी सगळं तुझंच आहे.." रवीने गंभीर नजरेने मान डोलावली. अपूर्वा सर्वांना टाटा करत निघून गेली. अन्विता तिच्या बोलण्यात हरवून गेली.

••

अपूर्वा नेमकं कशा बद्दल बोलत होती हे अन्विताला जाणून घ्यायचं होतं. ती कधी एकदा रवीला विचारेल असं तिला होत होतं. परंतु घरात अजून पाहुणे होते. सगळ्यांसमोर तिला काही विचारायचं नव्हतं.

तिला आता कधी एकदा घर रिकाम होतंय असं झालं होतं. तिला आता वाढदिवस पुरे वाटत होता. एकदाचं लवकर घर रिकामं होऊ दे म्हणून ती मनोमन स्वतःशी बोलत होती. परंतु घर काही लवकर रिकामं होत नव्हतं.

काही वेळाने हळूहळू एकएक पाहुणा जाऊ लागला. रवी सासू सासऱ्यांना राहण्याची विनंती करत होता. परंतु अन्विता काहीच बोलत नव्हती. ती अजूनही अपूर्वाच्या बोलण्यात हरवून गेली होती.

रवीने अन्विताच्या हाताला धरताच ती थोडी शुद्धीवर आली. रवीने तिला डोळ्यांनी इशारा केला.

"उद्या जा ना बाबा.. आई आजच्या दिवस रहा इथेच.."

"नाही नको गं.. साहिलची शाळा आहे उद्या.. त्याच आवरावं लागतं."

"एखाद्या दिवशी नातीच आवर." अन्विता एकदम बोलून गेली. रवीने जोरात तिचा हात दाबला. तशी ती हसू लागली.

"बर पुन्हा कधी तरी ये नातीकडे." तशी ती तिच्या आईच्या गळ्यात पडली. बोलता बोलता ते लिफ्टमधून निघून गेले. रवी सासू सासऱ्यांना खाली गाडी पर्यंत सोडायला गेला.

••

अन्विता फ्रेश होऊन आरश्यासमोर येऊन उभी होती. ध्रुवी मोबाईलवर वाढदिवसाचे फोटो बघत बसली होती. अन्विताने तिला जाऊन झोपायला सांगितलं होतं परंतु ती बाबा येईपर्यंत मोबाईल बघत बसते असं तिला म्हणत होती.

"मम्मा हे बघ.." ध्रुवीने त्या तिघांचा एक चांगला आलेला फोटो अन्विताला दाखवला.. "मस्त आहे ना..?"

अन्विताने हसून पाहिलं.

"स्टोरीला टाकते." ध्रुवी पटकन म्हणाली.

अन्विता तिला हसून पाहू लागली अन् म्हणाली, "हा मॅडम टाका हां ऽ.. स्टोरीला टाका.. फेसबुकला टाका.. स्टेटस लावा.. आणि खाली कॅप्शन पण लिहा.. जेलमधे जाऊन मम्माचा वाढदिवस साजरा केला.."

"ओके मम्मा.. डन.." तशी ती हसू लागली.

"घोडे खरंच टाकलंस का.." तशी ती तिला धरू लागली. ध्रुवी तिच्यापासून लांब होऊ लागली.

रवी आला. त्याने दार बंद केलं. अन्विता आरशातून प्रेमाने त्याला पाहू लागली. रवी अन्विता जवळ जाऊन उभा राहिला. त्याने तिला पाठीमागून मिठी मारली.

"ह्म्म ऽ रोमान्स.." ध्रुवी त्यांची मजा घेऊ लागली. रवीने तिला डोळा मारला. तशी ती गालातल्या गालात हसू लागली.

“काय बघतोयस..” ती लाजत बोलू लागली.

“माझं आरशातलं प्रेम..” रवी प्रेमाने पाहू लागला.

“ह्म्म ऽ” ध्रुवी एकटीच गालातल्या गालात हसत होती.

“डोळे बंद कर.” रवी अन्विताच्या नजरेला नजर देत म्हणाला.

“काय ?”

“ह्म्म ऽ माझे डोळे उघडे आहेत.” ध्रुवी गालातल्या गालात हसत एकटीच बडबडू लागली. दोघांनी तिच्याकडे दुर्लक्ष केलं.

रवी एक-एक शब्द हळूहळू बोलू लागला, “डो..ळे.. बं..द.. क..र..”

तिने डोळे बंद केले. त्याने खिशातून एक सोन्याची चैन काढली. ती चैन त्याने अन्विताच्या गळ्यात घातली. तिने डोळे उघडून हसऱ्या नजरेने रवीकडे पाहिलं.

“हे काय आता..?”

“बर्थडे गिफ्ट फॉर बर्थडे गर्ल.” रवीने तसं म्हणताच ध्रुवी त्यांच्याकडे बघू लागली.

“ह्म्म.. मज्जा आहे बाबा एका बाईची..” अन्विताने तिच्या हातातला टॉवेल ध्रुवीच्या अंगावर टाकला.

“आणि हे सगळं केलं ते काय कमी होतं का..?” रवी शांत नजरेने तिच्याकडे पाहत होता.

“कशाला इतका खर्च केलास उगाच.”

"बाबा, कोणाला नको असेल तर मी आहे हे विसरू नको." ध्रुवी त्यांच्या मध्ये-मध्ये बोलत होती. रवी हसत होता.

"ए म्हातारे जाना जाऊन झोप जा. आम्हां नवरा-बायकोच्यात तुझं काय मध्ये-मध्ये.. किती वाजले बघ.. सकाळी डोळा उघडत नाही मग तुझा." अन्विता तिला थोड्या लटक्या रागात बोलू लागली.

"मी म्हातारी नाही तुझी आई म्हातारी आहे. मी अजून लहान मुलगी आहे." ध्रुवीने तिला उलट उत्तर दिलं.

"बघ रवी कशी उलट बोलते ते. मग म्हणते आज्जी मला जवळ घेत नाही. हल्ली फार उलट बोलायला लागली आहे." अन्विताने रवीकडे तिची तक्रार केली. रवी फक्त चेहऱ्यावर हसू ठेवून दोघींना भांडताना बघत होता.

"बोल तिला काही तरी."

"असू दे लहान आहे ती. तिला काय कळतंय."

"हे तुझ्या अशा बोलण्यानेच लाडावली आहे ती."

ध्रुवी हसत होती. तिला माहित होत रवी तिला काहीच बोलणार नाही. उलट तो तिचीच बाजू घेणार अन् तसंच झालं.

"हसते कशी बघ. दात पडकी. दात आहेत का.. मला जेलमध्ये टाकायला निघाली शानी कुठली." तसं बोलत अन्विता तिच्याजवळ गेली. अन् तिला पोटाला गुदगुल्या करू लागली. ध्रुवी जोर जोरात हसू लागली.

बाबा-बाबा म्हणून हाका मारू लागली. ध्रुवी जोर जोरात हात पाय हलवू लागली.

"ए ऽ पाय लागेल पोटाला." रवी तिच्या पायाला धरत सोफ्यावर बसला.

"बाबा तुझ्या बायकोला सांग जरा."

"सांगतो हा.. अनु जरा जोरात कर तिला गुदगुल्या" तसं म्हणत रवीने तिचे पाय जोरात दाबून धरले. अन्विता तिला गुदगुल्या करू लागली. ध्रुवी जोर जोरात ओरडत हसू लागली. ते दोघेही तिची मजा घेऊ लागले.

काही वेळाने मग अन्विता थांबली. रवी सोफ्यावर बसला. अन्विता त्याला टेकून बसली. ध्रुवी रवीच्या मांडीवर जाऊन बसली. तिघही हसून खेळून दमले होते. ध्रुवी रवीला मिठी मारू लागली.

"ध्रुवी जा आत जाऊन झोप. सकाळी परत शाळेत जायला उशीर होतो तुला. रोजचं झालंय हे आता. जा."

"मी नाही.." ती तशीच रवीला बिलगली अन् बाबाला हळू आवाजात काही तरी सांगू लागली.

अन्विताने ते ऐकलं. "काय काय जरा जोरात बोल."

ती एकदम तिच्यापासून नजर चोरू लागली.

"जरा सुद्धा बघवत नाही. दुसऱ्या जवळ दिसलं की लगेच स्वतःजवळ पण पाहिजे. तू काय करणार गं या चैनीच.?"

"तू काय करणार आहेस.?" तशी ती पुन्हा उलट बोलली.

"ए ऽ.. आता लय बोलतेस.. फटके देऊ का.. रवी बोल ना.." रवीने नुसतीच मान डोलावली.

"तुला पण हवीय..?"

ध्रुवीने लगेच त्याला उत्साहाने पाहू लागली अन् जोरजोरात मान हलवू लागली.

"डोळे बंद कर."

अन्विता रवीकडे डोळे मोठे करून बघू लागली.

ध्रुवीने डोळे बंद केले. रवीने एक हात खिशात घालून दुसरी सोन्याची चैन काढली. ही चैन सुद्धा हुबेहूब पहिल्या चैनी सारखी होती. दोन्ही चैनी सारख्या होत्या. दोन्ही चैनीत एक सोनेरी रंगाचा छोटासा हार्ट शेप होता.

चैन घालताच ध्रुवीने डोळे उघडले. अन् जोरजोरात हसू लागली. अन्विताला ती चिडवू लागली. रवी प्रेमाने तिच्याकडे पाहू लागला. अन्विता चेहऱ्यावर हसू ठेवून पाहतच राहिली.

"थँक्यू बाबा." ध्रुवी ती चैन हातात घेत म्हणाली.

"थँक्यू बाबा" अन्विता तिची नक्कल करत म्हणाली. "घे-घे तसंही खोटी आहे ती." अन्विता तिला चिडवत म्हणाली.

"बाबा सांग ना."

"खरी आहे." रवी शांत नजरेने म्हणाला.

"आणि हे हार्ट शेप. ते पण रिअल गोल्ड आहे."

"नाही."

"मग."

"तो एक वेगळा अँटिक दगड आहे. सोनेरी रंगाचा. पण ते सोन नाही."

"सोनेरी रंगांचा पण सोन नाही. मग तो इतका चकाकतो कसा काय..?" अन्विता ध्रुवीची चैन हातात घेत म्हणाली.

"अं ऽ.. तुझी आहे ना तुला.."

अन्विताने लगेच नाक मुरडत तिच्या पोटाला चिमटा काढला.

"घे-घे खोटी चैन आहे असू दे तुलाच.."

"बाबा सांग ना खरी आहे ना.?"

"हंड्रेड पर्सेंट रिअल."

तशी ध्रुवी पुन्हा हसली.

"खुश ना."

"हां ऽ.."

"मग आता."

"आता किसी.." तसं म्हणत ध्रुवी रवीच्या गालावर चुंबन देऊ लागली. रवी तिचे लाड करू लागला.

"बास झाले आता लाड. जा झोप जा.. सकाळची शाळा आहे." तसं म्हणत अन्विता ध्रुवीला रवी पासून दूर करू लागली.

"हं ऽ.. मला माहित आहे का पाठवतेस.. तुला पण लाड करून घ्यायचे आहेत.. बघवत नाही माझे लाड.. लगेच जे दुसऱ्याला मिळतंय ते स्वतःला हवं असतं.. बॅड बर्थडे गर्ल.."

तसं म्हणत ध्रुवी पळू लागली. अन्विता तिला धरायला उठली. रवीने तिचा हात धरून ठेवला. ध्रुवी तिला चिडवू लागली. "ताईला सांगणार मी परत मम्माला जेलमध्ये टाकायला." तशी ती तिला आणखी चिडवू लागली. अन् बाबाला ब्लँक किस देऊन ती तिच्या बेडरूममध्ये गेली.

"म्हातारे तुला उद्या दाखवते." अन्विता लटक्या रागाने तिला ओरडली. ती तशीच मागे वळली अन् हसत म्हणाली, "बेडरूम मध्ये जाऊ या.."

"लाड करून घ्यायला." तसा रवी हसू लागला. अन्विता ही हसू लागली.

"हो लाड करून घ्यायला." ती त्याचे ओठ दाबत म्हणाली. दोघेही त्यांच्या बेडरूममध्ये गेले.

••

रवी कपडे बदलून फ्रेश होऊन आला. अन्विता त्याची वाटच बघत होती. तो तिच्या बाजूला जाऊन बसला.

"मग.. आणखी काय हवंय बर्थडे गर्लला." रवीने हसून विचारलं..

"किसी." अन्विता ध्रुवीची नक्कल करत म्हणाली. तसा रवी हसू लागला अन् अन्विताचे लाड करू लागला. एखाद्या लहान मुलाचे लाड करावे तसा रवी त्याच्या बायकोचे लाड करू लागला. अन्विता त्याचा पुरेपूर आस्वाद घेऊ लागली.

"बास." अन्विताच्या ओठावर ओठ टेकवून तो म्हणाला.

"अजून." तशी ती लहान मुली सारखी हट्ट करू लागली.

रवी पुन्हा तिचे लाड करू लागला. त्याने तिच्या फुगीर पोटावर ओठ टेकवले अन् तसाच हळुवार तिच्या पोटावर तोंड ठेवून एका बाजूला झोपला.

अन्विता त्याच्या केसातून हात फिरवू लागली.

ती आज फार खुश होती. पण खुश जरी असली तरी ती काहीही विसरली नव्हती. दिवसभरातल्या गोष्टी तिच्या नजरेसमोरून दौडू लागल्या. अपूर्वाचे न समजणारे शब्द तिच्या अजून लक्षात होते. तिला आता ते जाणून घ्यायचे होते.

"रवी.."

"ह्म्म ऽ.."

"थँक्यू.."

"वेडी आहेस."

"हो.. तुझ्यासाठी.." रवी एकदम डोळे उघडून तिच्याकडे पाहू लागला. अन्विता जरा गंभीर दिसू लागली.

रवी तिच्या शेजारी बसला. अन्विताने त्याच्या खांद्यावर डोकं टेकवलं. रवी तिचा हात हातात घेऊन तो कुरवाळू लागला.

अन्विता हळूहळू बोलू लागली, "मिट माय फ्रेंड, माय क्लोज फ्रेंड, माय बेस्ट फ्रेंड, माय बेस्टी." अन्विताचे शब्द ऐकताच रवी गालात हसू लागला.

"बेस्टी.. क्लोज फ्रेंड हां ऽ.." रवी गालात हसला.

"हस्तोयस."

"मग काय करू."

"ह्म्म ऽ.. हस.. मजा येतेय ना तुला.. माझ्या मनात काय चाल्लंय याचं काही नाही तुला.."

रवी आणखी जोरात हसला अन् म्हणाला, "खरंच वेडी आहेस. तुझ्या मनात कधी काय येईल ते नाही सांगता येणार."

"ह्म्म ऽ वेडीच आहे मी. मला आता तुम्ही वेडी ठरवणार. मला लॉक अपमध्ये नाही तर, वेड्यांच्या दवाखान्यात टाकणार. ती म्हातारी आहेच तुमच्यासोबत.. आता तिची चांगली मैत्रीण पण झालिये. मग तुम्ही तिघे आनंदात राहणार. आणि मी बसेन एकटी तुरुंगात नाही तर, वेड्यांच्या दवाखान्यात.." अन्विता एकदम लहान मुलांसारखं रडत रडत बोलून गेली. रवी ऐकतच राहिला. त्याला काय बोलावं ते सुचेना.

"अनु काय बोलतेस तुझं तुला तरी कळतंय का."

"चांगलं कळतंय मला. "मी येईन हां अध्ये-मध्ये ध्रुवीला भेटायला.." अन्विता अपूर्वाची नक्कल करत म्हणाली. "ध्रुवीला की रवीला, मला कळत नाही काय.."

"अरे.." रवी ऐकतच राहिला.

अन्विता पुढे बोलू लागली.

"सकाळ पासून बघतेय मी. ती आल्यापासून शांत शांत झालास. तिच्या सोबत लग्न झालं नाही याचा पश्चाताप होतोय ना तुला. एक पोलिस बायको सोडून कुठे एका जॉबलेस, घर सांभाळणाऱ्या मुलीशी लग्न केलं म्हणून वाईट वाटतंय ना तुला.." अन्विता बोलतच होती.

"अनु बस हा आता. वाट्टेल ते बोलू नकोस. किती गैरसमज, किती ओव्हर थिंकिंग, किती शंका.. हे सगळं ना त्या सिरीयल, फालतू सिनेमे बघून येतंय तुझ्या मनात.."

"हेच ओळखलंस का मला. तुमच्यासाठी इतकं करून पण तू मला असं बोलणार. माझ्यावर शंका घेणार." तसं बोलून रवी एकदम शांत झाला. अन् तिचा हात झटकून बेडरूमच्या गॅलरीत गेला.

अन्विता गालातल्या गालात हसली अन् स्वतःला सावरत त्याच्या मागोमाग गेली. रवी गॅलरीत शांत उभा होता. अन्विताने त्याला पाठीमागून मिठी मारली.

“मग ती जाता जाता असं का बोलून गेली..” अन्विता एकदम लटक्या रागात बोलू लागली.

“आता एवढं सगळं तुझं तू ठरवलं आहेस.. मग ती असं का बोलली असेल हे पण तूच ठरव ना.”

“मला तुझ्या तोंडून ऐकायचं आहे.”

“कशाला, मी तर खोटंच सांगणार.. ठरव तुझं तू.. तुला जितक्या शंका घ्यायच्या आहेत त्या घे.. तुझा विश्वास कुठे आहे माझ्यावर.” रवी एकदम शांत झाला.

“बोल नाही तर बघ.”

“नाही तर काय..”

“नाही तर..” तशी ती त्याला गुदगुल्या करू लागली. रवी त्याचं हसू दाबण्याचा प्रयत्न करत होता पण त्याला ते जमत नव्हतं. तिने ते ओळखलं अन् त्याला आणखी गुदगुल्या करू लागली.

“सांग सांग..” तशी ती त्याला आणखी सतावू लागली. रवी फक्त हसू लागला. काही वेळाने मग अन्विता शांत झाली. ती त्याच्या डोळ्यात बघू लागली. रवी तिची नजर चुकवू लागला.

ती त्याच्या नजरेला नजर देण्याचा प्रयत्न करू लागली. रवीला हसू येत होतं अन् तो ते लपवण्याचा प्रयत्न करत होता.

“खरं सांग एक्स गर्लफ्रेंड आहे ना तुझी..?”

"हो. कर तुला काय करायचं आहे ते.."

"वाटलेलंच मला.." तशी ती त्याला लाडाने मारू लागली. रवी आणखी हसू लागला.

अन्विता मग शांत झाली. त्याच्या डोळ्यात पाहू लागली. रवी सुद्धा शांत झाला. त्याला आता कळालं की अन्विता आता मस्करी करत नाही. तो बोलू लागला.

"लहानपनापासूनची मैत्रीण.. बालमैत्रीण.. एकत्र वाढलो आम्ही.. एकत्र खेळलो.. खूप चांगल्या मैत्रीच्या आठवणी आहेत आमच्या.. या व्यतिरिक्त काही नाही. तू जे समजत आहेस तसं काही नाही."

अन्विता त्याच्या डोळ्यात पाहू लागली अन् बोबड्या स्वरात बोलून गेली.

"आय एम सॉली." तिने रवीला घट्ट मिठी मारली. रवीने तिला कवेत घेतलं. दोघेही एकमेकांना घट्ट मिठी मारून बिलगू लागले. पौर्णिमेचा चंद्र त्याची किरणं दोघांवर बरसावू लागला.

"तुला राग आला माझा."

"नाही. मला वाटलं होतच तुझ्या शंकासुर मनात काही ना काही आलं असणारच." ती हळूच हसली.

"फक्त एवढं काय काय लगेच मनात आणशिल हे माहित नव्हतं." तशी ती आणखी जोरात हसली. रवी सुद्धा हसला.

"आय एम सॉरी.." तसं म्हणत तिने तिचे ओठ चुंबनासाठी पुढे केले. रवीने हलकेसे त्यांचा चावा घेतला.

"चावट.." तिने लटका राग व्यक्त केला..

"मी चावट काय.. तू किती चावट आहेस माहित आहे मला.." रवी तिच्या गालाला चिमटा घेत म्हणाला. अन्विता गालात हसत हसत त्याच्या डोळ्यात पाहू लागली. तिचा हात त्याच्या छातीवर फिरवू लागली. तोच तिच्या हाताला काहीतरी जाणवलं.

"हे काय..?" ती त्याचं टिशर्ट खाली घेत म्हणाली अन् एकदम तिने डोळे मोठे केले.

"हे काय रवी किती चैनी केल्या आहेस..?"

"का.. माझ्यासाठी नको करू का मी..?" रवी एक भुवई वर करत म्हणाला. "फक्त तुमच्यासाठीच करायचं का..?"

अन्विताने त्याच्या पोटाला चिमटा घेतला, "कर ना तुझ्यासाठी पण कर हांऽ.. माझी काही हरकत नाही.. तुझ्यासाठी कर.. बायकोसाठी कर.. मुलीसाठी कर.. आणि.." तसं म्हणत ती खुदकन हसली.. "आणि तुझ्या क्लोज फ्रेंडसाठी पण कर.. माझी काही हरकत नाही.." तशी ती हसू लागली. रवीलाही हसू आलं.

दोघेही एकमेकांना पाहत जोरजोरात हसू लागले. हसता हसताच अन्विता शांत झाली. त्याची चैन पाहू लागली. तो हार्टशेप हाताने तपासू लागली. त्याचं निरिक्षण करू लागली.

"रवी कसला दगड आहे रे हा.. सोनं नाही म्हणतोस मग इतका कसा चकाकत आहे. कसला अँटिक दगड आहे हा.?"

रवी बोलू लागला, "कसला आहे माहित नाही. पण ह्दयाजवळचा आहे. आठवणी आहेत या दगडासोबतच्या."

"कसल्या आठवणी..?"

"आहेत अशाच."

"सांगायचं नाही का..?" अन्विता त्याचा ओठ दाबत म्हणाली. रवी गालात हसू लागला अन् म्हणाला, "उद्या.. आज मला खूप महत्वाचं काम करायचं आहे.." तसं म्हणत त्याने अन्विताला आपल्या मिठित घेतलं.

अन्विता लाजत लाजत त्याच्या मिठीत विसावली. रवी डोळे बंद करून त्या क्षणाचा आनंद घेऊ लागला. दोघेही एकमेकांत हरवून गेले.

त्यांना आता कोणी दूर करणारं नव्हतं. त्यांना कधीच कोणी एकमेकांपासून दूर करणार नव्हतं. त्यांच्या मध्ये कोणीही येणार नव्हतं.

अन्विता खुश होती. तिच्या शंकासूर मनात येणाऱ्या गोष्टी खोट्या होत्या. तिला ते माहित होतं पण तरीही तिचं एक मन ऐकत नव्हतं. रवीवर

तिचा विश्वास होता. आणि तो विश्वास दिवसेंदिवस आणखी वाढत होता. दारावर बेल वाजू लागली तसे दोघेही गंभीर झाले.

"इतक्या रात्री कोण असेल..?" अन्विता गंभीर नजरेने म्हणाली.

"बघतो तू थांब इथेच."

रवी बाहेर गेला. अन्विताने त्याचं ऐकलं नाही. ती सुद्धा त्याच्या मागेमागे गेली.

रवीने दार उघडलं. समोर अपूर्वा उभी होती.. ती फार चिंतेत दिसत होती. रवी तिच्याकडे गोंधळून पाहत होता.

"आत येऊ..?" तिने त्याच्या नजरेला नजर देत विचारलं. त्याने गोंधळून मान होकारार्थी डोलावली.

••

अपूर्वा फारच चिंतेत दिसत होती. रवीने तिला पाणी आणून दिलं अन् तो अन्विता शेजारी येऊन बसला. ते दोघेही तिच्या अशा अचानक येण्याने चिंतेत पडले होते.

"मी फोन करतेय तुला केव्हा पासून." अपूर्वाने पाण्याचा ग्लास टीपॉयवर ठेवत बोलायला सुरुवात केली. रवी त्याचा फोन शोधू लागला.

"सायलेंट आहे वाटतं. काय झालं. अस अचानक आलीस..?"

"प्रॉब्लेम झालाय एक."

"कोणता प्रॉब्लेम..?"

अपूर्वा त्याच्या नजरेला नजर देत बोलू लागली, "अंतराने फोन केला होता. बाबांची तब्येत बिघडली आहे." अपूर्वा थांबत थांबत बोलू लागली.

"काय झालं काकांना..?" रवी एकदम दचकून म्हणाला.

"रवी," अपूर्वाने रवीच्या नजरेला नजर दिली अन् म्हणाली, "बाबांची तब्येत बिघडली आहे. आयसीयू मध्ये आहेत ते."

रवी एकदम शांत झाला. ती कोणत्या बाबांबद्दल बोलत आहे हे त्याला आता कळालं होतं. तो काहीच बोलला नाही.

त्याला शांत झालेलं पाहून अन्विता सुद्धा चिंतेत पडली होती. ते दोघं कशाबद्दल बोलत आहेत ते अजून अन्विताला कळालं नव्हतं.

तिच्या माहिती नुसार रवीचे बाबा केव्हाच वारले होते. मग आता अपूर्वा तिच्या बाबांसाठी रवीकडे का आली आहे हे तिला कळत नव्हतं.

"रवी अरे असं काय करतोस. आपलं मगाशीच या बद्दल बोलणं झालं. आज ना उद्या अशी परिस्थिती येणारच होती. आता तरी विचार बदल. अरे तुझ्या शिवाय दुसरं कोण आहे त्यांना. एकुलता एक मुलगा आहेस तू त्यांचा. झालं गेलं सगळं विसर. त्यांना गरज आहे तुझी."

"मलाही होती त्यांची गरज." रवी विषण्णपणे बोलू लागला.

"रवी आता तू लहान नाहीस. असे रुसवे फुगवे बरे नव्हेत आता. बाबा आहेत ते तुझे. मरणाच्या दारात उभे आहेत. पुढे मागे त्यांचं कोण करणार."

"अपूर्वा त्यांना कधीच माझी गरज नव्हती. प्लीज.. माफ कर मला.." तसं बोलत तो तिथून निघून गेला.

"रवी अरे.." अपूर्वा तशीच उभी राहिली. अन्विताला काय सुरू आहे हे आता पर्यंत कळालं होतं अन् तिच्यासाठी हा एक वेगळा धक्का होता.

रवीने त्याचे बाबा केव्हाच वारले असल्याचं तिला सांगितलं होतं पण आज तिला खरं काय ते कळालं होतं.

अपूर्वा अन्विताकडे पाहू लागली अन् तशीच पुन्हा खाली बसली. अन्विता स्वतः उठून तिच्या शेजारी येऊन बसली.

"काय झालंय अपूर्वा..?"

"रवीचे बाबा आयसीयू मध्ये आहेत." अपूर्वा क्षणाचाही विलंब न करता बोलली.

"आमचं मगाशीच यावर बोलणं झालं होतं. मी रवीला म्हणाले होते, बाबांची तब्येत आता बरी नसते. एकदा तरी त्यांना भेटून ये. पण तो काही ऐकायला तयार नाही. त्याच्या मनातला राग अजून गेला नाही. मला सांग असं करून कसं चालेल. देव न करो पण उद्या त्यांचं काही बरं वाईट झालं तर कोण करणार. मरण कोणाला चुकलं आहे का.. आज ना उद्या ही वेळ येणारच ना."

अन्विता शांत होती. तिला नेमकं कशाबद्दल ही भांडणं होती ते माहित नव्हतं. ती फक्त ऐकून घेत होती.

"अनु तू तरी समजाव त्याला."

"हो. मला सांग आत्ता त्यांच्याजवळ कोण आहे..?" अन्विता काळजी करत बोलली.

"अंतरा आहे. माझी सख्खी बहीण. तिच त्यांच्या जवळ असते. पण ती तरी किती बघणार. डॉक्टरांनी तर सरळ सांगितलं आहे." अन्विता विचारात गेली.

"अनु रवी नाही आला तर मी सगळं करेन काकांसाठी. पण तू सांग ते कसं दिसेल. लोकं काय म्हणतील. किती नावं ठेवतील. लोकांचं राहू दे पण शेवटी हा मुलगा आहे त्यांचा. तो बाप आहे रवीचा. त्याची किंमत नको का करायला. जे झालं असेल ते झालं असेल. कोणत्या कुटुंबात भांडण होत नाहीत." अपूर्वा तळमळीने बोलत होती.

"मी समजावते त्याला."

"बघ तू एकदा बोलून." तसं म्हणत ती शांत झाली. "निघते मी अनु. माफ कर इतक्या रात्री मी तुम्हांला.."

"प्लीज अपूर्वा असं नको बोलूस.. बरं झालं आलीस तू.. थँक्यू.. मी समजावते रवीला.."

"चालेल. निघते मी." अन्विता उठली.

"नको, तू नको येऊस आता बाहेर. मी येते."

"बर.. मी करते तुला फोन.. रवीला मी घेऊन जाईन गावी.."

"ह्म्म ऽ.." अपूर्वाने तिच्या हाताला थोपटवलं अन् ती बाहेर गेली. अन्विताने दार लावलं अन् सरळ बेडरूम मध्ये गेली. रवी शांत बसून होता.

अन्विता आली आणि सरळ तिने कपाट उघडलं. तिची बॅग घेऊन ती तिचे कपडे भरू लागली.

रवी ती काय करतेय ते पाहू लागला. अन्विताने तिच्या गळ्यातले दागिने काढले, त्याने दिलेली चैन काढली अन् त्याच्या समोर ठेवली.

ती पुन्हा तिचे कपडे भरू लागली.

"काय करतेस.?"

"जातेय माझ्या घरी. माझ्या बाबांकडे."

रवी एकदम गंभीर झाला.

"अनु.."

"अजिबात बोलायचं नाहीस तू माझ्या सोबत. तुझा माझा संबंध संपला." रवी एकदम उठला अन् तिच्याजवळ गेला.

"काय झालंय..?"

"काय झालंय .. लाज वाटली पाहिजे तुला.. जिवंत बापाला मारलस तू.. माझ्याशी खोटं बोललास तू.. माझ्या पासून सगळं लपवून ठेवलसं तू. माझा विश्वास घात केलास तू.." अन्विता रागारागात बोलत होती.

तिने तिचे कपडे भरले अन् ती ध्रुवीच्या खोलीत गेली. ती ध्रुवीला उठवू लागली. रवी तिला अडवू लागला. अन्विता त्याचा हात झटकू लागली.

"अजिबात हात लावायचा नाहीस मला. लांब राहायचं तू माझ्या पासून. मी नाही थांबणार आता इथे. मी चालले माझ्या मुलीला सोबत घेऊन. ए ध्रुवी उठ." अन्विता तिला उठवू लागली. रवी त्या दोघींच्यामध्ये येऊ लागला.

"माझं ऐक तरी."

"काही ऐकायचं नाही मला.. दहा वर्ष माझ्या पासून लपवून ठेवलंस. खरंच लाज वाटली पाहिजे तुला."

"अनु.. माझं ऐक तरी.."

"काही नाही ऐकणार मी.." तिने त्याचा हात झटकला.

ध्रुवी तिच्या आवाजाने जागी झाली. तिला काय होतंय याची कल्पना नव्हती. तिला फक्त आपले आई वडील भांडत आहेत एवढंच दिसत होत.

अन्विताने ध्रुवीचे कपडे भरायला घेतले. तिची बॅग भरून ती तिच्या हाताला धरून बाहेर पडू लागली.

"बाबा कुठे जातोय..?" ध्रुवी नाजूक आवाजात अर्धवट झोपेत बोलू लागली. रवी तिला जवळ घेऊ लागला. अन्विताने तिला त्याच्यापासून लांब केलं.

रवी एकदमच दुखावला. तो तिच्याकडे पाहतच राहिला. अन्विताला इतक्या रागात त्याने कधी पाहिलं नव्हतं.

अन्विताने तिच्या दोन्ही बॅगा घेतल्या अन् ती बाहेर पडू लागली. ध्रुवी बाबा बाबा करू लागली. अन्विता तिला खेचत स्वतःला सावरत दरवाज्याच्या दिशेने जाऊ लागली. रवी एकदमच दाराआड आला.

"काय झालंय ते एकदा माझ्याशी बोल तरी."

"रवी मला बोलायचं नाही. तू माझ्याशी खोटं बोललास. तू एकटा समजून मी तुला जीव लावला. तुला मागे पुढे कोणी नाही असं मला वाटायचं. मला दया यायची. पण तू मला फसवलस. तुझ्याबद्दल खोटं सांगितलस. अजून काय काय लपवून ठेवलं आहेस काय माहीत."

"अनु मी काहीच लपवून ठेवलं नाही. माझं ऐकून तरी घे."

"काही ऐकायचं नाही मला. जाऊ दे मला. आम्हाला नाही राहायचं तुझ्या जवळ. कळू दे तुला पण मूल दूर गेल्यावर कसं वाटतं ते."

तिने तसं म्हणताच ध्रुवी रडू लागली. रवीचे देखील डोळे भरून आले. तो तिला जवळ घेऊ लागला. अन्विता त्याला तिच्यापासून लांब करू लागली.

"अनु मी काय करावं असं वाटत तुला.. काय इच्छा आहे तुझी.. ऐकतो मी तुझं.. पण प्लीज जाऊ नकोस. तुमच्या शिवाय माझं कोणी नाही या जगात." तसं म्हणताच त्याचे डोळे भरून आले. त्याचा तोल गेला अन् तो गुडघ्यावर बसून रडू लागला. स्वतःच्या बापाला रडताना बघून ध्रुवीलाही आणखी रडू आलं.

अन्विताचे डोळे पाण्याने भरले. तिला रवीला रडवायचं नव्हतं. पण त्याची समजूत घालून तो तयार झाला नसता हे तिला माहीत होत. त्याला आता गावी जाण्यासाठी कसं तयार करायचं हे तिला ठाऊक होत.

अन्विताने त्याच्या डोक्यावर हात ठेवला. त्याने तिच्या पोटाला मिठी मारली. ती सुद्धा दबक्या आवाजात रडू लागली. तिने रवीला उठवलं. तिच्या मिठीत घेतलं. त्याचे डोळे पुसले.

काही वेळाने रवी शांत झाला. अन्विताने त्याच्या नजरेला नजर दिली आणि म्हणाली, "आताच्या आता आपण तिघे गावी जात आहोत. यापुढे मला एक अक्षर देखील ऐकायचं नाही." रवी काहीच म्हणाला नाही त्याने फक्त होकारार्थी मान डोलावली.

अन्विता तशीच सोफ्यावर बसून राहिली. रवी आत निघून गेला. ध्रुवी अन्विताकडे पाहू लागली. अन्विताने तिला जवळ घेतलं.

ध्रुवी तिच्या मम्माला विचारू लागली, "मम्मा कुठे जातोय आपण आता..?" अन्विता चेहऱ्यावर हसू आणत म्हणाली, "आजोबांना भेटायला."

••

पुढच्या तासाभरात गाडी वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर धावत होती. ध्रुवी मागच्या सीटवर झोपली होती. अन्विता रवी शेजारी बसली होती. तिने

रवीचा मोबाईल घेऊन अपूर्वाचा नंबर घेतला. अन् स्वतःच्या मोबाईलने तिला मेसेज केला.

"आम्ही सगळे गावी जात आहोत. सकाळी पोहोचल्यावर कळवते. आता फोन करू नकोस. मी रवीला तयार केलं आहे. बाय"

पुढच्या मिनिटाला अपूर्वाचा प्रतिसाद मिळाला. अन्विताने मोबाईल चार्जिंगला लावला अन् ती समोर पाहू लागली.

तिच्या अश्या वागण्याचा रवीला राग आला असणार हे तिला माहीत होत. पण तिला हेही कळत होत की रवीचं गावी असणं महत्वाच होत. त्याला तयार करण्यासाठी तिच्याकडे हाच एक मार्ग होता.

तिला रवीच्या वडिलांबद्दल जास्त माहिती नव्हती. रवी आणि त्यांच्यात झालेल्या भांडणाबद्दल काही माहित नव्हतं. पण ज्या अर्थी रवीचं चरित्र होतं, त्या अर्थी त्याचे बाबा सुद्धा तसेच असणार होते. शेवटी रवी त्यांचा मुलगा होता.

तिने इतका जो काही उपद्व्याप केला तो फक्त रवीच्या बाबांसाठी. पुढे काय होईल याची कल्पना आता तिला नव्हती. तिने त्याबद्दल विचारही केला नव्हता.

आयुष्यात कधी कोणतं वळण येईल याची कल्पना आपल्याला नसते. आपण तसा कधी विचारही करत नाही. आपण फक्त आयुष्याच्या वाटेवर चालत राहतो. जसा रस्ता आपल्याला घेऊन जाईल तसं आपण चालत

राहतो. त्यातल्या वळणाची, चढ-उतारांची आपल्याला कल्पना नसते. जसं वळण येईल तसं आपण वळण घ्यायला शिकतो. जसे चढ-उतार येतील तसं आपण ते हाताळायला शिकतो.

आयुष्य आपल्याला हेच शिकवत असतं. आयुष्याच्या रस्त्यात येणाऱ्या संकटाच्या वेळी वळण कसं घ्यायचं, आयुष्यात येणाऱ्या सुख-दुःखाला कसं हाताळायचं हेच आयुष्य शिकवत असतं.

आणि आता हीच शिकवण रवीला आणि अन्विताला त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या नवीन वळणाने मिळणार होती.

••••

घरवापसी

१२-०२-२०२५

सकाळचे नऊ वाजत आले होते. पोलो कीणी टोल नाका पार करून पुढे वाठारजवळ आली होती. रवीने गाडी पुलाखालून घेतली होती.

रवीचं पारगांव अवघ्या अकरा किमी अंतरावर होतं. गाव जवळ येईल तसं रवीच्या हृदयातले ठोके वाढत होते. रवीने आधी दवाखान्यात जाण्याचा निर्णय घेतला होता. नवे पारगाव, अमृतनगर वरून गाडी वारणेत पोचली.

हळूहळू आता गाडी कोडोलीत पोहोचली होती. बरोबर "नानासाहेब देशमुख" दवाखान्याशेजारी रवीने गाडी पार्क केली. रवीची गाडी ओळखताच एक मुलगी त्यांच्याजवळ पळत आली.

ती अंतरा होती. अपूर्वाची बहीण. अपूर्वाने रात्रीच तिला सर्व कल्पना दिली होती. ती आता त्यांचीच वाट बघत होती.

"दादा" तिने रवीला हाक मारली. रवी तिच्याकडे पाहू लागला. ती त्याला एकदम ओळखीची वाटू लागली. तिला पाहून त्याला कोणाची तरी आठवण येऊ लागली. तो प्रश्नार्थक पण हसऱ्या चेहऱ्याने तिला पाहू

लागला. अन्विता हळूहळू गाडीतून उतरू लागली. अंतराने तिला हाथ दिला.

"ताईने फोन केलेला तुम्ही येत आहात ते सांगितलं मला."

"कशी आहेस..?" अन्विताने तिची चौकशी केली.

"मी बरी आहे. तुम्ही कशा आहात..?"

"मी पण." अन्विता स्वतःला सावरत गाडीतून बाहेर आली. ध्रुवी सुद्धा बाहेर येऊन उभी राहिली.

"कुठे जायचं आहे..?" रवीने थोड्याशा गंभीर स्वरात विचारलं.

"तिसऱ्या माळ्यावर आहे आयसीयु." तसं म्हणत ते चालू लागले.

रवी आयसीयू समोर उभा होता. त्याला आत जायची हिंमत होत नव्हती. अन्विताने त्याचा हात धरला अन् त्याला घेऊन चालू लागली. अंतरा ध्रुवीसोबत बाहेरच बसून राहिली.

रवीने किती तरी वर्षांनी आज त्याच्या बाबांना पाहिलं होतं. तो जेव्हा भांडून घरातून गेला होता त्या नंतर आज तो त्यांच्या समोर उभा होता.

तो शांत नजरेने त्यांना पाहत होता. त्याच्या नजरेसमोरून त्याच बालपण सुसाट सुटलं होत. एक ना अनेक सर्व चांगले वाईट प्रसंग त्याच्या नजरेसमोर उभे राहिले होते.

अन्विताने त्याच्या बाबांच्या पायाला स्पर्श केला. रवी तसाच उभा राहिला. त्याच्या बाबांची काही हालचाल नव्हती. ते निपचित पडून होते.

ते अजूनही कोमामध्ये होते. रवी एक दोन मिनिटं थांबला अन् बाहेर निघून आला.

"डॉक्टर काय म्हणतायत ?" बाहेर येताच त्याने अंतराला विचारलं.

"काकांना स्ट्रोक आला होता.." रवी शांतच राहिला. त्याला आता काय बोलाव, काय करावं ते सुचत नव्हतं. अचानक तो गावी आला होता. त्याच्याकडे सध्या कोणतंच नियोजन नव्हतं. ते करण्यासाठी त्याला वेळही मिळाला नव्हता.

"दादा घरी जाऊ या. फ्रेश व्हा. काही तरी खाऊन घ्या. लांबून आलात, थकला असाल. ताईला थोडा आराम मिळेल. तुला ही गरज आहे आरामाची. रात्र भर गाडी चालवली आहेस."

रवी शांतच होता. त्याला घरी जायचं नव्हतं. पुन्हा त्या आठवणीत त्याला रमायचं नव्हतं. पण तो नाही म्हणू शकत नव्हता. तो फक्त शांत राहिला.

"इथे कोण मग..?"

"बाबा आहेत ना. काही लागलंच तर ते कळवतील."

"काका इथे काम करतात..?"

"हा दवाखाना आपलाच आहे. काही काळजी करू नका. बाबांच्या अंडर आहे हे सगळं. निश्चिंत रहा."

"काकांना भेटून जाऊ मग.."

"ते आता ओटीमध्ये आहेत. वेळ लागेल. नंतर फोन करतील तुला ते.." रवी काहीच न बोलता तिला पाहत राहिला.

"जाऊ या.?" अंतरा रवीच्या उत्तराची वाट पाहू लागली.

"हो जाऊ या." अन्विताने तिला प्रतिसाद दिला अन् ते घरी जाण्यासाठी निघाले.

••

अंतराने रवीला गाडी वारणेच्या दिशेने घ्यायला सांगितली. रवीने तिला आधी जुन्या गावात त्याच्या स्वत:च्या घरी जाऊ म्हणून सांगितल. परंतु गावात त्यांची गैरसोय होईल म्हणून अंतरा त्यांना तिच्या घरी नेऊ पाहत होती. तेव्हा अन्विताने तिला नजरेने खुणावलं. अंतरा मग शांत झाली.

पंधरा वर्षांनी रवी आज जुन्या गावात आला होता. गावात बराचसा बदल झाला होता. आता म्हणावी तितकी वस्ती गावात दिसत नव्हती. रवीला त्याचं नवल वाटलं.

एका दगडी बांधकामाच्या बंगल्याजवळ गाडी थांबली. रवी गाडीतूनच सगळा परिसर पाहू लागला.

"बाबा घर आलं..?"

रवी शांतच होता.

"हो बच्चा.. चला बाबाचं घर पाहू या.." अन्विताने ध्रुवीला प्रतिसाद दिला. अंतरा प्रेमाने तिला पाहू लागली.

बऱ्याच वर्षानंतर आज रवी त्याच्या घरी आला होता. त्याचे डोळे पाणावले होते. अन्विताला ते जाणवलं होत. पण ती काही बोलत नव्हती. ती त्याला समजू शकत होती.

ध्रुवी तिच्या बाबाला बरेच प्रश्न विचारत होती पण रवी त्याच्या विचारात हरवला होता. त्याला त्या घरात तो बागडताना पाहत होता. लक्ष्मी बरोबर, त्याच्या बहिणीबरोबर खेळताना पाहत होता.

ध्रुवीला तिचा बाबा बोलत का नाही हे कळत नव्हतं. अन्विता तिची समजूत घालत होती. अंतरा ते सर्व प्रेमाने पाहत होती.

"ताई इथे काही नाही. सर्व काही आणावं लागेल. माझ्या घरी आला असता तर."

अन्विता अंतराला जवळ घेत बोलू लागली, "इतक्या वर्षात पहिल्यांदा रवी आला आहे. मग त्याने कुठं जायला हवं. कुठं राहायला हवं.? आम्ही सुद्धा पहिल्यांदा आलोय. मग आम्ही आमचं घर नको का पाहायला.?"

"पण ताई. इथे काहीच नाही."

"असू दे गं जे आहे त्यात ॲडजस्ट करू आम्ही. किती करशील आमच्यासाठी."

"असं नको बोलूस ताई."

अन्विताने अंतराचा हात हातात घेतला.

"रवीकडे बघ. त्याच्या बालपणात हरवून गेला आहे तो. त्याला आता इथून बाहेर काढता येईल आपल्याला. सांग मला.?" अंतरा काहीच बोलू शकली नाही.

"बर मग मी एक काम करते. तुम्ही अंघोळ वगैरे उरकून घ्या. मी आलेच नाश्ता घेऊन."

"अगं.."

"नाही हा ताई. मी ऐकलं ना. आता तू पण माझं ऐकायला हवं." अंतरा तिला अडवत म्हणाली.

"लगेच येते मी. आईने बनवून ठेवला असेल नाश्ता. ती आता मलाच ओरडेल. गावात का नेलं म्हणून. तुम्ही आवरून घ्या. काही बनवायच्या मागे लागू नका. जेवण सुद्धा तयार आहे. फक्त अंघोळ पाणी उरका.. मी आलेच."

"अगं अंतरा."

"आपलं ठरलं की नाही आता." तसं अंतराने तिचा हात हातात घेतला. अन्विता काहीच बोलू शकली नाही. ती शांत नजरेने तिच्याकडे पाहत राहिली. अंतरा तिचा मोबाईल कानाला लावत घराबाहेर पडली.

रवी अजूनही शून्यात हरवला होता. अन्विता त्याच्याजवळ येऊन बसली. त्याचा हात हातात घेतला. अन्विताच्या नुसत्या स्पर्शाने रवीला रडू कोसळलं. रवी हुंदके देत देत रडू लागला. अन्विताने त्याला जवळ घेतलं.

तिचे डोळे सुद्धा पाण्याने भरले होते. ध्रुवीला हे सर्व काय सुरू आहे ते कळत नव्हतं. हे कळण्यासाठी तिचं बालमन अजून तयार नव्हतं.

ती फक्त तिच्या मम्मा शेजारी उभी होती. अन्विताने रवीला शांत केलं. त्याचे डोळे पुसले. काही वेळाने रवी शांत झाला.

"जा फ्रेश हो. मी पाणी गरम करते."

"नको काही करू नकोस तू. अनोळखी जागा आहे तुझ्यासाठी. पाय वगैरे घसरून पडशील. तू तुझी काळजी घे. स्वतःला सावरून चाल या जागेत."

"ह्म्म ऽ.." अन्विताने रवीचा हात हातात घेत त्याच्या हाताला चुंबन दिलं अन् गालात हळूवार हसली.

"रोमान्स करायचा एक चान्स सोडत नाही मम्मा." ध्रुवी तिच्या नटखट गोंडस आवाजात बोलून गेली.. तिने तसं म्हणताच रवीच्या चेहऱ्यावर हसू आलं. त्याला हसताना पाहून त्या दोघीही हसू लागल्या. रवीने ध्रुवीला जवळ घेतलं अन् तिच्या गालाला तो चुंबन देऊ लागला.

"मॅडम गळ्यातली चैन काढा आता."

"मी नाही काढणार."

"अगं हरवली तर."

"मी नाही हरवणार."

“ह्म्म ऽ ठीक आहे.. जाऊ दे तसं ही खोटीच तर आहे..” अन्विता तिला चिडवत बोलू लागली..

“बाबा..” ध्रुवीने रडक्या आवाजात तिची तक्रार केली. रवी प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवू लागला.

“इथे तिथे पळू नको हां ध्रुवी.. आणि आमची नजर चुकवून कुठे जाऊ नकोस..” अन्विता काळजीने बोलू लागली.

“नाही जाणार.” रवी तिच्या डोक्यावर हात फिरवत म्हणाला.

“नाही, हिला आहे सवय. नवीन जागा एक्सप्लोर करायची. नवीन नवीन एडवेंचर्स करायची. ओळखते मी चांगली हिला.” तशी ध्रुवी गालात हसू लागली.

“रवी आताच सांग हिला नीट राहायचं म्हणून. उगाच नको तो व्याप नको इथे. एक तर आलोय आपण कशासाठी आणि ही काय तरी करून ठेवायची.”

“नाही करणार.” रवीने अन्विताची समजूत घातली.

“मलाच सांग तू.” तसा रवी हलकासा हसला अन् म्हणाला, “मम्माला त्रास होईल अशी मस्ती नाही करायची हां बच्चा.. कुठे लांब जायचं नाही आमची नजर चुकवून. आता थोडे दिवस आपल्याला राहायचं आहे इथे. नाही करणार ना..?”

“नाऽ..” ध्रुवी खुश होत म्हणाली. “आणि बाबा शाळा..?”

"सुट्टी.." तशी ती आणखी खुश झाली.

"बघ बघ तिच्या मनासारखं झालं." दोघेही हसून तिच्याकडे पाहू लागले.

"कामाचं कसं करणार आहेस..?"

"सांगतो वडलांची तब्येत बिघडली आहे म्हणून गावी आलोय."

"चालेल." तसा रवी शांत झाला.

"अनु.."

"हांऽ.."

"कोमामध्ये आहेत.. काही सांगू शकत नाही.. किती दिवस आपण तरी.." तसा तो तिच्याकडे शांत नजरेने पाहू लागला.

"पुढचं पुढे बघू.. आता आला आहेस तर जबाबदारीने काही गोष्टी कर.."

"तरी पण.."

"होईल काही तर चांगलं.. जरा वेळ दे.."

तो शांत नजरेने खाली बघू लागला. ती त्याच्या शेजारी बसली. ध्रुवी घरभर फिरत होती. तिचं काम तिने सुरू केलं होतं.. इकडे काय आहे, तिकडे काय आहे पाहत होती. तिच्या आतल्या पोलिसाने घराची झडती घ्यायला सुरवात केली होती..

••

अंतरा नाश्ता घेऊन आली तेव्हा अन्विताची अंघोळ झाली होती. ती ध्रुवीला काय काय सांगत होती. ध्रुवी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत होती. रवी आत आवरत होता.

"झालं का अंघोळ पाणी..?" अंतरा हसऱ्या चेहऱ्याने घरात आली.

"आलीस ये."

"उशीर झाला का मला..?"

"नाही नाही.. आताच आवरलं आमच."

"दादा..?"

"आवरतोय आत."

"बर...आता तो म्हणजे.." अंतराने हाताने तो ठीक आहे ना असा इशारा करत विचारलं.

अन्विताने हसून तिला होकार दिला. तिने आणलेला नाश्ता तिने प्लेट मध्ये सर्वांसाठी काढला.. रवीही तोपर्यंत त्यांना सामील झाला.

"घे अंतरा."

"मी खाऊन आलेय."

"आमच्यासोबत घे गं.." अन्विताने तिला आग्रह केला.

"बर."

"अंतरा खूप लहान होती तेव्हा.. आता किती मोठी झाली.." रवी शांत आवाजात म्हणाला. अंतरा हसून सर्वांकडे पाहू लागली.

"ध्रुवीपेक्षा पण लहान असेल. तिला तर मी आठवत सुद्धा नसेन."

"हो खरं आहे. पण दादाबद्दल बरंच माहिती आहे मला."

रवी गंभीर नजरेने पाहू लागला. अन्विता रवीकडे पाहू लागली. त्यांची नजरच काय ते एकमेकांशी बोलत होती. रवीने ती नजर चुकवली.

"काका सांगत असायचे मला कधी कधी."

रवीने एक निःश्वास सोडला.

"काल ताई पण बरंच काय काय सांगत होती."

रवीला ठसका लागला. अन्विताने तो ओळखला.

काय सांगत होती. अन्विताने रवीकडे पाहत तिला विचारलं.

"हेच रवी दादा भेटला होता. तो आता काय काम करतो वगैरे. तुझ्या बद्दल सांगत होती.. ध्रुवीने दिलेल्या सरप्राईज बद्दल सांगत होती." तशी अंतरा ध्रुवीकडे हसऱ्या नजरेने पाहू लागली.

"मम्मा.." ध्रुवी आश्चर्याने तिच्या मम्माकडे पाहू लागली. ध्रुवीला अंतरा कोण आहे ते अजून माहित नव्हतं. अन्विता तिला सांगू लागली.

"बच्चा अपूर्वा ताई आहे ना तिची बहीण आहे अंतरा दीदी.." तिने तसं म्हणताच ध्रुवी तिच्या जवळ गेली.

"हांऽ मम्मा.?"

"हांऽ."

तशी ध्रुवी अंतराच्या मांडीवरच जाऊन बसली.

"आमच्या ध्रुवीची क्लोज फ्रेंड आहे अपूर्वा."

रवीला पुन्हा ठसका लागला. अन्विता हसऱ्या नजरेने रवीकडे पाहू लागली.

अंतरा ध्रुवीचे लाड करू लागली.

"अंतरा काय करतेस तू आता..?"

"दादा मी आता फर्स्ट इयरला आहे. विवेकानंदला."

"सायन्सला..?"

"होय."

"कोणता विषय.?"

"फिजिक्स."

"का..?" रवी थोडा आश्चर्याने म्हणाला. "बायो वगैरे का घेतला नाहीस. शक्यतो मुलींना तोच विषय आवडतो."

"हो. पण मला नाही. मला अंतराळाची आवड आहे."

दोघेही तिच्याकडे आनंदाने पाहू लागले.

"म्हणजे सायंटिस्ट होणार तर." अन्विता तिचं कौतुक करत म्हणाली.

"स्वप्न तेच आहे बघू आता.."

"छान." रवी कौतुकाने बघू लागला.

"बच्चा दिदी सायंटिस्ट होणार आहे बघ.. तू काय होणार.."

"पोलीस.." ध्रुवी उत्साहाने म्हणाली.

"वाहऽ.. माझं बाळ पोलिस होणार.. आणि काय करणार बच्चा.."

"तुला जेलमध्ये टाकणार." तशी ती जोरजोरात हसू लागली.. तिच्या विनोदावर सगळेच हसू लागले. अन्विता तिच्याकडे लटक्या रागाने बघू लागली.

"लोकांची पोरं डॉक्टर होतात, सायंटिस्ट होतात. माझं बाळ काय होणार पोलीस.. आणि काय करणार मलाच जेलमध्ये टाकणार. वा हां वा ऽ.. आधी चड्डी घालायला शिक.."

ध्रुवी हसतच होती. अंतराही तिच्या विनोदावर खळखळून हसत होती. काही वेळाने मग तिथे शांतता पसरली. मग रवीनेच बोलायला सुरुवात केली.

"एक विचारू अंतरा..?"

"विचार ना दादा."

"म्हणजे एकदम हे अंतराळ वगैरे कसं काय..?"

अंतरा एकदम शांत झाली आणि हसऱ्या नजरेने बोलू लागली.

"खरं सांगायचं तर काकांमुळे. काकांमुळे मला या विषयाची गोडी लागली."

रवी जरा गंभीर झाला. ती त्याच्या वडिलांबद्दल बोलत आहे हे त्याला कळालं. सर्व जण तिचं बोलणं लक्ष देऊन ऐकू लागले.

"काकांना या विषयाची आवड होती. ते सतत चंद्र, सूर्य इतर ग्रहांचा अभ्यास करत होते. आकाशातून होणारा उल्कापात यासारख्या गोष्टी वाचत होते. त्यावर संशोधन करत होते. मला ते बघायला फार आवडायचं. ऐकायला फार आवडायचं. मी लहान असताना सतत त्यांच्याजवळ येऊन बसायचे. ते मला आकाशातल्या ताऱ्यांच्या गोष्टी सांगायचे. मला ते ऐकायला फार आवडायचं." दोघेही तिचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होते.

"मग तुला कशाचा शोध घ्यायचा आहे. म्हणजे कोणत्या गोष्टीवर संशोधन करायचं आहे.?"

"दादाने डायरेक्ट महत्त्वाच्या विषयाला हात घातला" तसं म्हणत ती हसू लागली. रवीने सुद्धा त्याच्या चेहऱ्यावर हसू ठेवलं. अन्विता तिच्या उत्तराची वाट पाहू लागली.

"टाईम ट्रॅव्हल. मला टाईम ट्रॅव्हल या विषयावर संशोधन करायचं आहे. माझा फार आवडता विषय आहे. त्यावर बरंच संशोधन झालं आहे पण मला असं वाटतं की म्हणजे कसं सांगू..?"

"टाईम ट्रॅव्हल शक्य आहे हेच तुला शोधायचं आहे बरोबर ना..?" अन्विताने तिचं वाक्य पूर्ण केलं.

अंतरा तिच्याकडे हसऱ्या नजरेने पाहू लागली. "बरोबर ओळखलं ताई."

"इंटरेस्टिंग." रवी तिच्याकडे कौतुकाने बघू लागला.

“मला पण आवडतात असे सिनेमे बघायला.”

“खरंच ?”

“हो.”

“आणि सिरीयल पण.. जरा विचार कोणकोणते सिनेमे बघितले आहेत.?” रवीने तिला जोड दिली. अन्विताने त्याच्याकडे लटक्या रागात पाहिलं. अंतरा गालात हसली.

“तू त्याचं ऐकू नकोस गंऽ.. खरंच मला आवडतात टाईम ट्रॅव्हल वाले सिनेमे. स्पेस वाले सिनेमे.” अंतरा तिच्याकडे हसून पाहत होती.

“चांगलंय, म्हणजे तुमच्या दोघींचं जमेल आता. तुझं डोकं खाण्यासाठी आता एक टॉपिक मिळाला आहे.” तसा रवी हसू लागला.

“दादा टाईम ट्रॅव्हल ही कॉन्सेप्टच डोकं खराब करणारी आहे.” तशी ती एकटीच हसू लागली. “तुला माहीत आहे दादा, टाईम ट्रॅव्हल हे शक्य नाही. शास्त्रज्ञांनी हे सांगितलं आहे की, टाईम ट्रॅव्हल हे कागदावर सिद्ध झालं आहे परंतु खऱ्या आयुष्यात ते अशक्य आहे. तरीसुद्धा त्यावर इतकं संशोधन सुरू आहे. त्या बाबतीत इतक्या गोष्टी ऐकायला मिळतात. नवीन नवीन संकल्पना समजतात की काय सांगू.”

ते दोघेही तिचं बोलणं लक्ष पूर्वक ऐकत होते. तिच्या बोलण्यातून तिची आवड त्यांना लक्षात येत होती.

“मग तुझं यात काय मत आहे.?” रवीने तिला विचारलं.

"खरं सांगायचं तर टाईम ट्रॅव्हल होऊ शकत नाही असं मोठ्या मोठ्या शास्त्रज्ञांनी सांगून ठेवलं आहे."

"मग तुला त्यांचं पटतं की तुझं मत वेगळं आहे.. तुला टाईम ट्रॅव्हल शक्य आहे असं वाटत का.. टाईम ट्रॅव्हल मधे नेमकं तुला काय संशोधन करायचं आहे."

"माहित नाही त्याच गोष्टीच मी संशोधन करत आहे." ती हसू लागली. मला टाईम ट्रॅव्हल मध्ये रुची आहे पण यात काय संशोधन करायचं आहे या गोष्टीच मी स्वतः स्वतःमध्ये संशोधन करत आहे." तसे तिघेही हसू लागले.

"छान छान. इंटरेस्टिंग विषय आहे. तुला यश मिळेल."

"ह्म्मऽ बघू आता. तसंही अंतराळ, ब्रम्हांड, टाईम ट्रॅव्हल या अशा गोष्टी आहेत ज्यांच्याबद्दल आपण जितकं संशोधन करू तितकं ते कमीच आहे."

अन्विता हसऱ्या नजरेने तिच्याकडे पाहत होती.

"मला वाटतंय तुझं नाव अंतराळ असंच ठेवायचं होतं पण चुकून ते अंतरा असं झालं." अन्विताने तिची बुद्धी लढवली. अन् ती एकटीच हसू लागली.

"बाबा म्हणून मला पोलिस बनायचं आहे." ध्रुवीने पुन्हा एकदा तिच्या मम्माची मस्करी केली अन् सर्वजण जोरजोरात हसू लागले.

अन्विता तिला धरण्याचा प्रयत्न करू लागली. ध्रुवी अंतराच्या मागे लपू लागली. रवी कौतुकाने अंतराला पाहत होता. न जाणो का, तिला पाहून कोणाची तरी आठवण येत होती. कोणाची ते त्यालाही कळत नव्हतं पण आठवण येत होती.

••

चौघांच्या गप्पा चांगल्या रंगल्या होत्या. अंतरा त्यांच्यात मिसळून गेली होती. रवी, अन्विता तिचं बोलणं उत्साहाने ऐकत होते. तिच्या बोलण्यातून तिची आवड त्यांच्या लक्षात येत होती. पण ती त्यात थोडी गोंधळत आहे हे सुद्धा त्यांना कळत होतं.

बराच वेळ अंतराळ, ब्रम्हांड आणि टाईम ट्रॅव्हल वरच्या चर्चा सुरू होत्या. अंतरा काही थांबायचं नाव घेत नव्हती. तिला अशा चर्चा करायला आवडत होत्या.

रवी अधून मधून जांभया देत होता पण अन्विता मात्र तिचं बोलणं उत्साहाने ऐकतच होती. विषयाला विषय वाढवत होती.

ध्रुवी आता मात्र तिच्या बाबाच्या मांडीवर येऊन झोपली होती. बोलता बोलता अंतराच्या लक्षात आलं की त्यांना आता आरामाची गरज आहे. तशी ती शांत झाली.

"ताई मी काय म्हणते थोडा वेळ आराम करा. आपण जेवायला मग घरीच जाऊ."

"नको बाई आता जेवण.. मला तरी नको.."

"होय. नाश्ता इतका झाला आहे आता काही भूक नाही." रवीने साथ दिली. अंतरा त्यांच्याकडे गोंधळून पाहत होती. तिला आता काय बोलावं ते कळत नव्हतं.

"असं काय करताय."

"हो अगं खरंच मला तर काही भूक नाही. वाटल्यास थोडा वेळ पडते मी. रात्री वाटल्यास तुझ्या घरी जाऊ."

"होय. रात्रीच येतो.."

"बर.. चालेल. करा मग आराम. मी येते जरा जाऊन.. माझी एक दोन काम करून येते मी." तशी ती बाहेर जायला उठली.

"ये लवकरच आमची म्हातारी उठली की तुला शोधायला बाहेर पडेल." अन्विता हसून म्हणाली. अंतराने तिला हसूनच होकारार्थी मान डोलावली अन् ती बाहेर पडली.

अन्विता बसल्या जागेवरचं झोपू लागली. रवीने ध्रुवीला एका बाजूला झोपवलं अन् तोही एका अंगावर झोपला.

"रवी"

"ह्म्मऽ"

"अंतरा छान मुलगी आहे ना..?"

"होय.. हुशार आहे खूप.."

“ह्म्मऽ.. मला आवडला तिचा स्वभाव.. मनमिळावू आहे..”

“ह्म्मऽ..”

“रवी..”

“काय..?”

“तुला इथे थोडं स्ट्रेंज वाटत नाही.?”

“कशाबद्दल.?”

“बघ ना. इथे सगळी पडकी घरं आहेत. जास्त वस्ती पण नाही. मला तर गावात आल्यापासून एक माणूस दिसला नाही. विचित्र वाटत नाही. गाव म्हणजे कसं असतं, एखाद्या घरातला माणूस आजारी पडला तर सगळं गाव त्याच्या घरात जमा होतं. पाहुणे वगैरे येतात. इथे असं काहीच नाही. असं का..?”

रवीला कळत होतं तिला काय बोलायचं आहे ते पण तो तिला समजावू शकत नव्हता.

“अनु बोलू आपण नंतर.. थोडा वेळ पडू दे.. मला नंतर दवाखान्यात जायचं आहे पुन्हा.”

“का.?”

“काकांचा फोन आला होता पाचच्या आसपास ये म्हणून. जरा बोलायचं आहे. असेल काही तरी बाबांच्या बाबतीत.” तसं म्हणत तो शांत झाला.

अन्विताही शांत झाली. ती काहीच म्हणाली नाही. सकाळ पासून तिने काय काय पाहिलं या सगळ्या गोष्टी तिच्या नजरेसमोर ती आणू लागली. त्यातच तिची केव्हा झोप लागली हे तिला सुद्धा कळालं नाही.

दोन तीन तासांच्या गाढ झोपेनंतर रवीला जाग आली. त्याने मोबाईल मध्ये पाहिलं तेव्हा पाच वाजले होते.

ध्रुवी आणि अन्विता अजून झोपूनच होत्या. त्याने दोघींना झोपून दिलं. चेहऱ्यावर पाणी मारलं आणि तो दार पुढे करून दवाखान्यात जायला बाहेर पडला.

दवाखाना तसा घरापासून दोन तीन किमी अंतरावर होता. पुढच्या पंधरा एक मिनिटात रवी अंतराच्या वडिलांसमोर बसला होता.

अंतराचे वडील प्रेमाने रवीला पाहत होते. रवीच्या चेहऱ्यावर अपराधी पणाचं बारीक हसू होतं.

"रवी बरं झालं आलास. श्रीधर शुद्धीत असता तर त्यालाही बरं वाटलं असतं." रवी ऐकून घेत होता.

"नेमकं काय झालं आहे बाबांना.?"

"रवी, श्रीधरला इस्केमिक स्ट्रोक झाला होता. या स्ट्रोकमध्ये मेंदूपर्यंत रक्तपुरवठा होत नाही. त्यामुळे माणूस कोमामध्ये जाऊ शकतो. यापूर्वी सुद्धा असाच एक हलकासा स्ट्रोक त्याला आला होता.. तेव्हाच मला थोडाफार

अंदाज आलेला. मी त्याला म्हटलं, तुला आता तुझी काळजी घ्यायला हवी. पण त्याने नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केलं.”

रवी शांतपणे ऐकून घेत होता.

“ऑपरेशन वगैरे काही..”

“शरीर साथ देईल की नाही याची शक्यता मला कमी वाटते. काहीही होऊ शकत. ऑपरेशनमध्ये मला तरी रिस्क वाटते. औषधोपचाराने तो बरा होत असेल तर चांगलच आहे. बाकी निर्णय तुझा असेल..” तसं म्हणत देशमुख साहेब रवीकडे बघू लागले.

“तू आहेस ना.?”

“हो.”

“बर. जाण्याची घाई करू नकोस रवी. बऱ्याच गोष्टी तुला आता बघाव्या लागणार आहेत. समजतय ना.?”

“हो.”

“आणखी एक सांगून ठेवतो. घरामागे तुमची जमीन आहे. तुला माहीत असेल.?”

“हो माहित आहे.”

“आप्पा पाटील घ्यायच्या भानगडीत आहेत. श्रीधरचा त्यांना विरोध होता.” रवी ऐकत होता.

"आता तू आला आहेस आज उद्या भेट घेतीलच ते तुझी. तूला इतकंच सांगायचं होतं की, श्रीधरला ती जमीन कधी विकायची नव्हती. त्याचा जीव होता त्या जमिनीवर. तिथली ती विहीर लक्षात असेल तुझ्या."

"हो चांगलीच."

"श्रीधरने चांगला बंदोबस्त करून ठेवला होता. कुत्र सुद्धा तिथं जाऊ देत नव्हता तो. त्याचा जीव अजूनही तिथं आहे. ती जागा तुला सांभाळावी लागेल रवी."

"आता शेवटी शेवटी त्याला हीच काळजी लागली होती की त्याच्या नंतर कोण बघणार हे सगळं. तुला ते बघावं लागणार रवी. जे श्रीधरच आहे तेच तुझं आहे." अंतराचे वडील त्याच्याकडे गंभीरतेने बघू लागले. रवी फक्त त्यांचं ऐकून घेत होता. त्याच्याकडे दुसरा पर्यायही नव्हता.

काका बोलत होते ते बरोबर होत पण बाबांनंतर ती जमीन सांभाळण हे रवीला जमणार नव्हतं. त्याचा मुंबईत जम बसला होता. तो आता गावी येऊन राहू शकणार नव्हता.

त्याने मनातल्या मनातच भविष्यात ती जमीन विकावी लागणारच असा कयास बांधला होता.

••

ध्रुवी तिचे डोळे चोळत उठली. उठताच ती आजूबाजूला पाहू लागली. तिचा बाबा तिच्या बाजूला नव्हता. तिची मम्मा अजून गाढ झोपेत होती. ती गालात हसली अन् चोर पावलाने दाराबाहेर गेली.

ध्रुवी मधली पोलिस आता पुन्हा जागी झाली होती. सकाळी तिच्या मम्माने ओरडून ओरडून तिच्या आतल्या पोलिसाला शांत केलं होतं. पण आता ती सर्वांची नजर चुकवून एका एडवेंचर जर्नीला बाहेर पडली होती.

तिला वाटेत फक्त चिखल, वाढलेली झाडं दिसत होतीत. ती चालू लागली.. कशाच्या तरी शोधात चालू लागली. तिला काही तरी शोधायचं होतं पण नेमकं काय ते तिला कळत नव्हतं. तिला फक्त असं काहीतरी शोधायचं होतं जे ती अभिमानाने तिच्या बाबाला सांगू शकेल.

ती चालत राहिली. चालत चालत ती घरामागील जंगलात आली. अन् तिला काही तरी दिसलं. ती उत्साहाने पळू लागली.

ध्रुवी एका मोठ्या विहिरी जवळ येऊन थांबली होती. ती विहीर चांगलीच मोठी अन् खोल होती. विहिरीत खाली जायला पायऱ्या होत्या. विहिरीतल पाणी चांगल साफ दिसत होतं. तिचा चेहरा ती विहिरीत पाहू शकत होती.

तिच्यातला उत्साह वाढला अन् ती विहिरीत उतरू लागली. विहिरीतल्या शेवटच्या पायरीवर ती जाऊन बसली. तिला तिचा चेहरा स्पष्ट दिसत होता. ती पाण्यात पाय टाकून आपला चेहरा पाहू लागली.

तिच्या गळ्यातली चैन सुद्धा पाण्यात स्पष्ट तिला दिसत होती. तिने आपली चैन काढून हातात घेतली. अन् प्रेमाने ती चैन विहिरीतल्या पाण्याने धुवू लागली. तिने पायातील पैंजण काढलं अन् पाण्याने धुवून आपल्या कपड्याने ती पुसू लागली.

तिची नजर इकडे तिकडे फिरत होती. तिच्या आजूबाजूच्या परिसराचा ती आनंद घेत होती. आयुष्यात पहिल्यांदा ती अशा ठिकाणी आली होती. तिला गावी आल्यापासून फार बरं वाटत होतं.

ती आता बाबा आला की त्याला बोलणार होती की आपण इथे सुट्टीला येत जाऊ. तिने मनातल्या मनात सर्व ठरवलं होतं. ती हळूहळू तसं पुटपुटत होती.

तिला तिथलं वातावरण फार प्रसन्न वाटत होतं. आकाशातून जाणारा पक्षांचा थवा तिला स्पष्ट पाण्यात दिसत होता. ती त्या पक्षांना हाका मारत टाटा करत होती. त्यांच्याशी बोलत होती. पाण्यातल्या माशांना आवाजाने बोलवत होती. त्यांच्याशी गप्पा मारत होती.

आठ वर्षांच्या ध्रुवीला पुढे काय होणार आहे याची कल्पना नव्हती. ती फक्त तिचं बालपण जगत होती. तिचा वेळ आनंदात घालवत होती.

••

अन्विताला जाग आली तेव्हा ती घरात एकटीच होती. ती स्वतःला सावरत उठली. रवीला तिने हाक मारली. ध्रुवीला आवाज दिला. पण तिला कोणाचाच प्रतिसाद मिळाला नाही. ती थोडी घाबरल्यासारखी झाली.

रवी कधी अस न सांगता गेला नव्हता. तो दवाखान्यात जाणार आहे हे तिला माहीत होत. कदाचित तिची झोप लागली असावी म्हणून तो न सांगताच गेला असेल असं तिला वाटू लागलं. पण ध्रुवी.

ध्रुवी कुठे गेली. तो तिला घेऊन गेला असेल का.. की ती इथेच आहे. ती बाहेर तर खेळत नाही ना.. मग मला आवाज का देत नाही.. ती खेळत खेळत कुठे लांब तर गेली नाही ना.. खेळता खेळता तिला लागलं तर नसेल ना.. तिला काही झालं तर नसेल ना..

एक ना अनेक प्रश्न तिच्या मनात येऊ लागले. अचानक तिला ध्रुवीची काळजी वाटू लागली. तिला शोधण्यासाठी ती स्वतः ला सावरत उठली. घराबाहेर तिला एक स्कूटी दिसली. त्यांची पोलो गाडी दारात उभी नव्हती.

अन्विताने पुन्हा ध्रुवीला आवाज दिला. तिथल्या शांततेत तिचा आवाज आसमंतात गुंजून उठला. ध्रुवीचा कोणताच प्रतिसाद आला नाही. तिने लगेच रवीला फोन केला.

"झाली झोप."

"हो." ती जरा घाबरलेली दिसली. "कुठे गेला आहेस.?"

"दवाखान्यात आलो होतो. तुला सांगितलेलं ना.."

"ह्म्मऽ.. एकटाच..?"

"हो.. तुम्ही दोघी झोपला होता गाढ.. डिस्टर्ब नाही केलं मग.." अन्विता चिंतेत पडली. ध्रुवी रवीसोबत नव्हती. तिला आता भीती वाटत होती. आता रवीला काय सांगायचं हे तिला कळत नव्हतं.

"खायला काही आणू का..?" अन्विता शांत होती.. तिच्या पायाखालची जमीन सरकत चालली होती.

"नको."

"ध्रुवीला विचार काय हवंय का.?"

तिला आता घाम फुटत होता. तिला आता काय बोलाव ते सुचत नव्हतं. रवी फोन वरून तिला सतत विचारत होता. अन्विता शांतच होती.

"अनु विचार.. कुठेय ती.. दे तिच्याजवळ.."

"रवी.." अन्विता आता घाबरून गेली होती.

"काय झालंय.. बोल.. ध्रुवी कुठे आहे..?"

"रवी ध्रुवी.." अन्विता घाबरून बोलू लागली. ती पुढे बोलणार इतक्यात तिला ध्रुवी पळत येताना दिसली. तिच्या मागे अंतरा तिला पकडत पकडत धावत होती. ध्रुवी मम्मा-मम्मा करत, हसत-हसत येत होती. अन्विताने एक निःश्वास सोडला.

"अनु बोल काही तरी काय झालंय." रवी फोन वर चिंतेत दिसत होता.

"काही नाही. काही नको आणूस.. जेवायला जायचं आहे आपल्याला. सकाळी पण जेवलो नाही."

"बर.. ध्रुवी.."

"आहे खेळतेय.. अंतरा आली आहे.."

"बर चालेल."

"ये लवकर.."

"हो येतोय.."

"आता कुठे आहेस..?"

"आहे इथेच. आप्पा भेटलेत.. बोलत बसलोय. सांगतो आल्यावर."

"बर.. ठेवते.." तसं बोलत अन्विताने फोन कट केला..

ध्रुवी पळत पळत आली अन् तिच्या मम्माला बिलगली.

"मम्मा तुला माहितीये का.. तिकडे काय आहे..?"

अन्विता ध्रुवीकडे भरल्या डोळ्याने हसऱ्या नजरेने पाहू लागली. तिने लगेच तिला पोटाशी धरलं.

"किती पळतेस गंऽ बाई..?" अंतरा तिच्या मागेमागे पळत आली.

"मम्मा तिकडे ना मोठी विहीर आहे. खूप छान आहे. त्यात मासे आहेत. आकाशातलं पण त्यात दिसतं." ध्रुवी हसत हसत बोलू लागली.

"हो का.. मला का घेऊन गेली नाहीस तू.. एकटी एकटी गेलीस."

"नाही दिदी सोबत.. तू झोपली होती ना.."

ध्रुवी फारच गोड बोलू लागली. तिने हळूच अंतराकडे चोरट्या नजरेने पाहिलं. अंतरा हसून तिच्याकडे पाहू लागली. ती का हसली हे फक्त ध्रुवीला माहित होतं.

अंतराने हळूच तिच्या हाताला चिमटा घेतला. "लय पळते बाबा ही म्हातारी." तशी ती ध्रुवीला गुदगुल्या करू लागली. ध्रुवी पुन्हा पळत पळत घरात घुसली.

"झाली झोप.?"

"हो.. तू केव्हा आलीस.?"

"कधीच.. ही बया तिकडं खेळताना दिसली मग तिच्याजवळ थांबले. तू झोपली होतीस."

"वाटलंच मला.. एकटी गेली असणार कुठे तरी.. कशी गोड बोलत होतीस बघितलं.. एवढं गोड ती फक्त तिची चोरी लपवतानाच बोलते." तशी अंतरा गोड हसली.

"कुठे गेली.. ध्रुवी.. एऽ म्हातारे कुठं पळत होतीस एकटीच.. कुठे लपून बसलीस..?"

"वरती आहे मी.." ध्रुवीने वरच्या खोलीतून आवाज दिला..

"ये खाली ये.." तशी ती गालात हसू लागली अन् वरतीच बसली.

त्या दोघीही वरच्या खोलीत गेल्या. ध्रुवी अंतराच्या मागे लपू लागली. अन्विता तिला पकडू लागली. शेवटी ती दमली अन् खुर्चीवर बसली. अंतराही ध्रुवीला घेऊन खुर्चीवर बसली.

"येऊ दे बाबाला सांगते मग तुझी मस्ती."

ध्रुवी गालात हसत होती. तिला माहित होतं तिचा बाबा तिला काहीच बोलणार नव्हता.

"कुठे गेलाय दादा..?" अंतराने बोलायला सुरवात केली.

"दवाखान्यात तुमच्या बाबांना भेटून येतो म्हणाला."

"हो का..?"

"हो. बाबांबद्दल असेल काहीतरी."

"हो तसंच असेल."

"अंतरा एक सांग जरा."

"काय ते.?"

"या गावात कोणी राहतं की नाही.?" तशी अंतरा गालात हसली.

"मी सकाळीच तुम्हाला सांगितलं. इथ काहीच नाही."

"काहीच नाही म्हणजे माणूस सुद्धा नाही.?"

"होय." अन्विता गंभीर चेहऱ्याने पाहू लागली.

"कसं आहे माहिती का ताई.. इथं येतो पूर.. पावसाळ्यात हे गाव सगळं बुडून जातं. लोकांची फार वाईट अवस्था होते. आता बरीच वर्ष झालीत

जुन्या गावात कोणी राहत नाही. जे इथे राहायचे त्यांनी नव्या गावात घरं बांधली. काही वसाहतीत गेलीत. इथ त्यांची जमीन आहे. ती फक्त गुरं ढोर बांधायला वापरतात. पावसाळा आला की त्यांना पण वरच नेतात.?

"असं का ते म्हणून.?"

"ताई नदी जाते ना गावातून.. त्यात पाठीमागे ओढा आहे.. लगेच पाणी भरत."

"तरी किती लोकसंख्या असेल इथली.?"

"हे काय मोठं गाव नाही ताई. एक छोटी वस्ती आहे. इथं आधी पासून जास्त कोणी राहत न्हवतं. फार पूर्वी लोकं राहायचीत. पण नंतर हळूहळू सगळी नव्या गावात, वसाहतीत शिफ्ट झालीत."

"बाबा इथेच राहायचे.?"

"होय."

"एकटेच..?"

"एकटेच. मी असायचे इथे अभ्यासाला. पण ते रात्रीचे सुद्धा एकटेच झोपायचे."

"भीती वाटायची नाही त्यांना.?"

"गावच्या लोकांना कसली भीती.?" अंतरा हसत म्हणाली.

"तरी पण."

"कोणाची तरी भीती वाटावी असं काकांनी आयुष्यात कोणाचं वाईट केलं नव्हतं."

"माणसांची नाही पण.."

"भुताची..?" अंतरा हसत म्हणाली.

"तसं नाही गंऽ. म्हणजे इथे कसं सगळं मोकळं मोकळं आहे.. चिखल आहे.. झाडी आहे.. कधी कुठलं जनावर आलं.. साप वगैरे.."

"हांऽ मम्मा मी साप पण बघितला तिथे विहिरीजवळ.. मस्त होता.. खूप लांब.."

तशी अन्विता गंभीर झाली. "तू एकटी गेलेलीस..?"

ध्रुवी एकदम शांत झाली. अन्विताला कळून चुकलं.

"ध्रुवी एकदा सांगितलेलं कळत नाही तुला. कितीदा सांगितलं इथे एकटं कुठे जायचं नाही.. तू अशी ऐकणार नाहीस. येऊ दे बाबाला सगळं सांगणार आहे मी." ध्रुवी शांत बसली.

अन्विता तिला जरा रागात पाहू लागली. तिला निरखून पाहू लागली.

"इकडे ये गं.. तुझ्या गळ्यातलं कुठं आहे. चैन कुठे आहे तुझी.?"

ध्रुवी एकदम गोंधळली. तिला अंधुक अंधुक काहीसं आठवू लागलं.

"ध्रुवी.." अन्विता जरा रागातच बोलली.

"बॅगेत ठेवली आहे."

"कुठल्या बॅगेत..? कधी..?"

"झोपताना.. टोचत होती मला.."

"दाखव, मला आणून दाखव.." ध्रुवी पटकन उठून खाली गेली. अंतरा बारीक हसू ठेवून तिच्याकडे पाहू लागली. अन्विता रागातच होती.

"सोन्याची आहे का.?"

"हो ना.. कालच रवीने दिलीये.."

"मला केली होती त्याने. त्याला माहीत होतं ही सुद्धा हट्ट करणार.. म्हणून हिला वेगळी केली त्याने."

"दादाचं खूप प्रेम आहे."

"खूपच.. लाडावून ठेवलं आहे.. मिळाली का नाही गंऽ." अन्विताने तिला पुन्हा आवाज दिला.

"अगंऽ आणते की थांब शोधेपर्यंत तरी थांब.." ध्रुवीच्या बारीक ओरडण्यावर दोघीही हसू लागल्या.

"पाच मिनिटात शोधून काढ आणि इकडे ये." तशा दोघी पुन्हा हसल्या.

ध्रुवी चैन कुठे पडली असेल याचा विचार करत होती. तिला अंधुक अंधुक जरा काही तरी आठवत होतं. ध्रुवीने जरा डोक्याला जोर लावला आणि तिला एकदम स्पष्ट चित्र दिसलं.

पाण्यात तिचा चेहरा तिला जसा स्पष्ट दिसला होता तसं तिला एक चित्र स्पष्ट दिसलं अन् ती त्या चित्राचा मागोवा घेत पळाली.

अंतरा अन् अन्विताच्या गप्पा सुरूच होत्या. अन्विता रवी आणि त्याचं ध्रुवी बद्दलच प्रेम या गोष्टी तिला सांगत होती..

"दुसऱ्याजवळ काही पाहिलं की लगेच हिला पण ते पाहिजे. ते घेत नाही तोपर्यंत हिचा हट्ट सुरूच. आणि रवी लगेच पोरीच्या प्रेमात दुसऱ्या दिवशी ते घेणारच.."

"काहीही होऊ दे. दुसऱ्या दिवशी तिच्या हातात असणार. खेळणार खेळणार आणि मग ते कुठे तरी बोंबलत पडणार." अंतरा लगेच हसू लागली.

"चांगल मन भरून वापरुन झालं की त्याचा एक भाग भारतात अन् एक भाग परदेशात." अन्विताच्या बोलण्यावर अंतरा खळखळून हसू लागली. अन्वितालाही हसू येऊ लागलं.

"काय सांगू तुला लय करामती पोरगी आहे. सांगेन तेवढं कमी. मस्ती काय कमी नाही. रोज शाळेतून कंप्लेंट. आज हे झालं तर उद्या काही तरी भलतच."

"किती जरी समजावलं तरी ऐकत नाही. त्यात रवी काहीच बोलत नाही. तो आपला लहान आहे. लहान आहे. लहान मुलं मस्ती करतातच. कशाला रागवायच. एवढंच बोलत असतो. मारणं तर दूर रागावतही नाही. मग मलाच जरा ओरडावं लागतं.. मग बसते तोंड फुगवून."

"म्हणून सतत भांडत असते वाटतं."

"भांडण, अगं तू अजून भांडताना बघितलं नाहीस. हसू का रडू अशी परिस्थिती असते."

"होय का.?"

"तिची चूक नसली ना मग चांगली जोरजोरात भांडते. पण तिची चूक असली तर मग गोड बोलत बोलत भांडते. पण भांडते."

"समोरच्याला गोड बोलून बोलून पटवून देते की असं का झालं ते. काय सांगू तुला खूप करामती पोरगी आहे. पण जीव पण तेवढाच लावते. भांडते माझ्यासोबत. पण प्रेम पण खूप करते. मस्करीत बोलते कधी कधी जेलमध्ये टाकीन वगैरे. मजा घेत असते माझी." अन्विता एकदमच हसत हसत शांत झाली.

अंतरा हसऱ्या चेहऱ्याने सर्व काही ऐकत होती.

"आता पण बघ तिला चैन सापडत नाहीये. म्हणून शांत बसली आहे. नाही तर एव्हाना मलाच ओरडत वर आली असती. बघ बघ बॅगेतच होती चैन उगाच मला ओरडतेस म्हणून." तसं म्हणत अन्विताने ध्रुवीला आवाज दिला.

"ध्रुवी.." तिचा काही प्रतिसाद आला नाही. "ध्रुवी गंऽ.." पुन्हा काहीच प्रतिसाद आला नाही.

"तोंड फुगवून बसली असेल आता. आता मलाच कामाला लावणार आहे वाटतं." तसं म्हणत अन्विता खुर्चीतून उठली. अंतराही तिला सावरत उठली.

"ए बाळा काय करतेस.." अन्विता हळूहळू दगडी जिना उतरू लागली अंतरा तिच्या मागोमाग तिला धरू लागली.

"ताई सावकाश."

"हो. काय करतंय माझं बाऽळ. ध्रुवी.."

अन्विता तिला आवाज देतच होती. पण ध्रुवीचा काही प्रतिसाद येत नव्हता.

"कुठं लपलंय माझं बाळ. अन्विताने शेवटची पायरी उतरत आवाज दिला अन् एकदम तिचा चेहरा गंभीर झाला. तिला ध्रुवी कुठेच दिसत नव्हती.

"ध्रुवी.." तिने पुन्हा जोरात आवाज दिला. अंतराही थोडी गंभीर झाली. ती सुद्धा तिला आवाज देऊ लागली. बघता बघता अन्विता एकदम घाबरून गेली.

"कुठे गेली ही परत.?"

अंतराने तिचे हावभाव ओळखले. "ताई शांत हो.. नको काळजी करुस.. इथेच असेल.. बाहेर बघते मी.. तू जरा शांत बस.. मी येते तिला घेऊन.." अंतराने अन्विताला खुर्चीवर बसवलं.

"ताई प्लीज उठू नकोस. बाहेर येऊ नकोस. बघ बाहेर अंधार आहे. उगाच तू धावपळ करू नको. असेल ती इथेच. मी आणते तिला.."

"जा लवकर." अन्विता एकदम घाबरून म्हणाली. अंतरा ध्रुवीला आवाज देत बाहेर गेली.

अन्विताला बसल्या बसल्या घाम फुटला. तिच्या मनात आता नको नको ते विचार येऊ लागले. नकळत तिचे डोळे पाण्याने भरले.

अंतरा ध्रुवीला आवाज देत सरळ घराच्या मागे गेली. तिने मगाशी ध्रुवीला इथेच खेळताना पाहिलं होतं. तिला ही जागा कशी आहे या बद्दल कल्पना होती. म्हणून ती पळत पळत तिच्याजवळ आली होती. ध्रुवी तिला एकटीच खेळताना दिसली होती.

अंतराला पाहून ती खूप खुश झाली होती. अंतराने तिला तिथून पुन्हा घरी नेल होत.

इथे एकटीने येऊ नकोस असं सुद्धा सांगितलं होतं. परंतु ध्रुवी तिथल्या वातावरणात रमली होती. तिला घरी जाऊ वाटत नव्हतं.. अंतराने तिला मम्माला सगळं सांगेन असं सांगून घरी नेल होत.

ध्रुवीने अंतराला नाटकी आवाजात काहीच न सांगण्याची विनंती केली होती. अंतरा ते पाहून खूप हसली होती अन् तिने तिला वचन दिलं होतं..

अंतराला वाटत होतं की, ध्रुवी पुन्हा इथेच चैन शोधायला आली असावी. जे तिच्यासाठी धोकादायक ठरणार होतं.. या जागेचा, इथल्या विहिरीचा इतिहास अंतराला माहित होता.

ध्रुवी विहिरीत तर गेली नसेल ना या विचाराने तिने विहिरीत सुद्धा पाहिलं होत. पण तिला काहीच दिसलं नाही. तिला फक्त विहिरीत चंद्राची सावली दिसत होती.

अंतराने ध्रुवीला आवाज दिला. पण तिला प्रतिसाद मिळत नव्हता. विहिरीजवळ ध्रुवी नव्हती. तिथल्या परिसरात ती नव्हती. ती पुन्हा तिला शोधत शोधत घराच्या दिशेने गेली.

घराच्या दिशेने जात असताना तिला रवीची गाडी येताना दिसली. ती पळत पळत त्याच्या दिशेने गेली.

रवी येताच अन्विता खुर्चीतून उठली. रवीला आवाज देऊ लागली. तोपर्यंत अंतरा देखील आली.

“दादा ध्रुवी..”

“काय झालं..” अंतराला पाहून रवी एकदम घाबरून गेला.

“कुठे आहे ती..?”

“दादा इथेच होती आता.. तिची चैन शोधत होती.. कुठेच सापडत नाहीये.. मी तिकडे बघून आले पण नाहीये.” अंतराने घराच्या मागच्या बाजूला हात करत ईशारा केला.

“रवी..” अन्विताने एकदमच रडवेल्या आवाजात त्याला आवाज दिला. दोघेही तिच्याजवळ गेले.

“रवी... रवी...” अन्विता त्याला धरून रडूच लागली.

“गप गप नको रडू.. असेल इथेच असेल.. मी शोधतो तिला.. मी आणतो तिला..” अन्विता एकदमच गळून पडली.

“अंतरा हिच्याजवळ थांब. हिला सोडून तू कुठे जाऊ नकोस. मी आणतो ध्रुवीला. तू थांब इथेच.. कुठे बघितलं ध्रुवीला.. कुठे खेळत होती..?”

“दादा घरातच होती.. तिची चैन शोधत होती.. संध्याकाळी ती तिकडे विहिरीजवळ एकटीच खेळत होती.. मी तिला इकडे घेऊन आले.. तिला म्हणाले देखील इथे एकटं यायचं नाही म्हणून. मला वाटलं ती तिथेच तिची चैन शोधायला गेली असावी. मी जाऊन आले. पण ती नाहीये तिथे.”

“आवाज दिलास..?”

“हो..”

“विहिरीत पाहिलंस..?”

“वरून पाहिलं.. नाहीये ती..”

रवी एकदम विचारात गेला. त्याच्या मनात वेगळीच शंका आली.

"इथेच थांबा कुठे जाऊ नका.." तसं म्हणत तो बाहेर धावत सुटला.. अन्विताने तिचं शरीर अंतराच्या अंगावर टाकलं होतं अन् आता ती खाली कोलमडू लागली होती. अंतराने तिला खाली बसवलं..

"ध्रुवी ध्रुवी.." अन्विता एकसारखी बोलू लागली.

"मला काही बरोबर वाटत नाही.. ध्रुवी गेली आहे कुठे तरी.. कुठे तरी लांब.. अंतरा.. माझी ध्रुवी लांब चाललीये.. थांबव तिला.. ध्रुवी.. माझ्याकडे ये बाळ.. मला सोडून जाऊ नको.. ध्रुवी..." अन्विता बोलत बोलत रडू लागली. तिला बोलताना पाहून, तिला रडताना पाहून अंतराचे सुद्धा डोळे भरून आले. तिला काय करावं तेच सुचेना. तिने तिच्या बाबांना फोन लावला.

अन्विताने आता डोळे झाकले होते. तिची शुद्ध हरपली होती.. अंतरा तिला शुद्धीत आणण्याचा प्रयत्न करत होती.

रवी धावत पळत घराच्या मागच्या बाजूला आला होता. तो ध्रुवीला एकसारखा आवाज देत होता. पण त्याला कोणताच प्रतिसाद मिळत नव्हता. तो विहिरीजवळ आला. त्याने डोकावून पाहीलं.

त्याला फक्त अंधार दिसत होता. पाण्यात चंद्राची सावली स्पष्ट दिसत होती. तो विहिरीत उतरला. ध्रुवीला आवाज देऊ लागला.

त्याला भीती वाटत होती की ध्रुवी आत कुठे तरी अडकली तर नसावी. तो पाण्यात उतरू पाहत होता. तेवढ्यात त्याला काही तरी चमकताना दिसलं. त्यानं जवळ जाऊन पाहिलं.

ते पैंजण होत. ते ध्रुवीच होतं. त्याने ते ओळखलं. त्याचा चेहरा रडवेला झाला. त्याला कळून चुकलं की ध्रुवी विहिरीत पडली असावी. त्याने पुढचा मागचा कोणताच विचार न करता विहिरीत उडी मारली.

काही क्षणासाठी पाण्यात बुडबुडे आले अन् पुन्हा पाणी स्थिर झालं. चंद्राची सावली पुन्हा स्पष्ट झाली. पाणी पुन्हा एकसारख संथ झालं जणू काही पाण्यात काही पडलंच नाही.

••

अंतराचे बाबा आले होते. त्यांनी अन्विताला शुद्धीवर आणलं होत. अन्विता अजूनही रडत होती. रवीला जाऊन बराच वेळ झाला होता. त्याचा ही कुठेच पत्ता नव्हता.

एव्हाना गावात पोलिस आले होते. अंतरा त्यांना ध्रुवी बद्दल सांगत होती. तिचं वर्णन सांगत होती. रवी सुद्धा तिला शोधत असल्याचं सांगत होती. पोलिसांची एक तुकडी घराच्या मागच्या बाजूला गेली. एक तुकडी गावात शोध घेऊ लागली..

अंतराचे बाबा अन्विताला शांत राहण्यासाठी सांगत होते. पण अन्विताला काही तरी संकेत मिळाला होता. तिला सारखं असं वाटत होतं

की काही तरी खूप वाईट घडणार आहे. घडत आहे. ती एकसारखी रडत होती. तिची शुद्ध हरपत होती. ती पुन्हा बेशुद्ध अवस्थेत गेली. यावेळी अंतराच्या वडिलांनी तिला सरळ दवाखान्यात नेलं.

पोलिसांचा तपास सुरू होता. पण त्यांना काहीच सापडत नव्हतं. त्यांना फक्त अंधार दिसत होता.

अंधार. काळाकुट्ट अंधार. गडद अंधार. गोल गोल विहिरीत चंद्राच्या उजेडात दिसणारा काळाचा अंधार.

••••

भूतकाळ

१३-०२-२०२५

अन्विता ध्रुवीच नाव घेतच शुद्धीवर आली. ती एकदम घामाघूम झाली होती. अंतरा तिच्याजवळ बसली होती. ती पटकन उठून तिच्याजवळ गेली.

"ताई.."

"रवी.. ध्रुवी.."

"ताई.."

"अंतरा... माझी ध्रुवी.. रवी.. कुठेत.. कुठेत..?"

"ताई शांत हो.." अंतरा तिच्या डोक्यावरून हात फिरवू लागली. तिला शांत करू लागली. अन्विता उठण्याचा प्रयत्न करू लागली. अंतराने तिला थांबवलं. अन्विता तिचा हात झटकू लागली. शेवटी अंतराने तिला उठून बसायला मदत केली.

"अंतरा ध्रुवी.."

"ताई.. त्यांचा शोध सुरू आहे."

"रवी, रवी कुठे आहे..?"

"दादा पण रात्री पासून घरी आला नाही. तो पण गायब आहे. पोलीस त्यांना गावात शोधत आहेत." अन्विताचा चेहरा रडवेला झाला.

"कुठे असेल ती.. रवी कुठे गेला..?" ती बारीक आवाजात पुटपुटू लागली.

"ताई शांत हो. तुझी तब्येत बरी नाही."

"मला गेलं पाहिजे. मला त्यांना शोधलं पाहिजे." तशी ती उठू लागली.

"नाही ताई.. तू त्या परिस्थितीत नाहीस. नको काळजी करू. दादा ध्रुवीला घेऊन येईल. शांत हो ताई.

अन्विताचे डोळे पुन्हा पाण्याने भरले. अंतरा तिचं सांत्वन करू लागली. अन्विता अंतराच्या गळ्यात पडून मुसमुसू लागली.

काही वेळाने अन्विता शांत झाली होती. तिच्या समोर अपूर्वा उभी होती. रात्री ध्रुवी आणि रवी नाहीसे होताच अंतराने त्यांची बातमी अपूर्वाला सांगितली होती.

"अनु आधी तू स्वतः ला सांभाळ. ध्रुवीला आम्ही शोधून काढू. रवीही तिलाच शोधत असेल. तो असा कुठे जाणार नाही. येईल तो. तू इथे तुझी काळजी घे.." अपूर्वा व्याकुळ नजरेने तिची काळजी करू लागली.. अन्विता शांतच होती. ती ध्रुवीच्या विचारात हरवली होती. अपूर्वाने तिला समजावलं अन् बाहेर पडली. बाहेर पडताच तिने पीएसआय जाधवांना काही सूचना दिल्या.

"रवी इथे आल्यापासून ते गायब होईपर्यंत तो कुठे कुठे गेला.. कोणाला भेटला.. काय खाल्लं काय पिलं.. सर्व गोष्टी अगदी बारकाईने तपासा."

"एक अन् एक घर, एक अन् एक गल्ली तपासा. वाट्टेल त्याची चौकशी करा. तपासणी करा. मला ध्रुवी आणि रवी उद्यापर्यंत इथे हवेत.. इज दॅट क्लिअर जाधव."

"येस मॅम.."

"एनी डाऊट्स..?"

"येस मॅम."

"बोला."

"मला वाटतंय हे किडनॅपिंग आहे."

"एक्सप्लेन."

"देशमुख साहेबांशी आमचं बोलणं झालं. त्यातून असं कळालं की रवी इथे त्यांना भेटायला आला होता. त्यानंतर आप्पा पाटील यांच्यासोबत त्याची भेट झाली."

"आप्पा पाटील सावकर."

"हो मॅडम."

"त्यांचं काय कनेक्शन..?"

"त्यांना श्रीधर रावांची जमीन हवी आहे. फार वर्षांपासून ते त्यांच्या मागे लागले आहेत."

"श्रीधर काकांची काही तक्रार.?"

"काही नाही. त्यांनी कोणतीच तक्रार केली नाही."

"मग संशय कसा..?"

"श्रीधरराव कोमात आहेत. त्यांच्या नंतर रवी त्या जमिनीचा मालक. मला असं वाटतंय की, त्यांचं या बाबतीत बोलणं झालं असावं. रवीने नकार दिला असावा. पोरीच अपहरण करून तो जमीन बळकाऊ पाहत असेल."

अपूर्वा थोडी विचारात गेली.

"सध्या तरी हाच अँगल आहे मॅम. नाही तर एवढ्या छोट्याशा गावातून दोघेही थोड्याश्या वेळात कसे काय गायब होऊ शकतील."

"कदाचित रवीला काही तरी मिळालं असेल किंवा त्याने काही पाहिलं असेल. त्यातच त्यांनी रवीला सुद्धा पकडून ठेवलं असेल." जाधव एवढं बोलून शांत झाले.

"असू शकत जाधव. ही थेरी असू शकते. बट रिमेंबर आपल्याकडे अजून काहीच पुरावे नाहीत. तुम्हीं एकदा भेट घेऊन या. त्यांचं काय बोलणं झालं याची माहिती घ्या."

"ओके मॅम." तसे जाधव मागे फिरू लागले.

"जाधव."

"येस मॅम."

"थँक्यू."

"हे काय मॅम."

"मला माहित आहे हे माझ्या अंडर नाही.. तरीही तुम्ही माझ्या.."

"इथे तुमचा काय संबंध मॅम. ही घटना तर माझ्या हद्दीत घडली आहे. आणि शेवटी आम्ही तुमच्याकडूनच शिकलो आहोत. काळजी करू नका लवकरात लवकर आम्ही दोघांना सुखरूप घरी आणू." तसं बोलून जाधव मागे फिरले.

अपूर्वा अंतराकडे पाहू लागली. तिने तिच्या खांद्यावर हात ठेवला अन् बोलू लागली.

"अनुची काळजी घे. तिच्यासोबत रहा. तिला एकटीला कुठे सोडू नकोस. मला इथे जास्त वेळ थांबता यायचं नाही. पण माझं इथल्या घडामोडीवर लक्ष असेल. जाधव माझा माणूस आहे. काही लागलं तर त्यांना सांग."

"हो." अंतरा एकदम गंभीर झाली अन् बोलू लागली, "ताई.."

"काय.."

"ध्रुवी भेटेल ना.. मला हे प्रकरण लक्ष्मी सारखं वाटतं आहे.."

"भेटेल.. आपण शोधू तिला.. तू अनुची काळजी घे.." तसं म्हणत ती सुद्धा विचारात हरवून गेली.

••

सूर्याची पिवळसर किरणं जमिनीवर यायला सुरुवात झाली होती. वातावरणात हलकसं धुकं पसरलं होतं. गवतावर अन् झाडांच्या पानावर दव दिसत होते. दुरून कोंबड्याचा आरवण्याचा आवाज येत होता.

सूर्याची किरणं हळूहळू विहिरीच्या पाण्यावर आपली चादर पसरवू लागलीत. विहिरीच पाणी संथ होतं. त्यावर अचानक बुडबुडे येऊ लागले अन् बघता बघता रवीने त्याचं तोंड वर काढलं. तो जोरजोरात श्वास घेऊ लागला. गोंधळल्यासारखा इकडे तिकडे पाहू लागला. ध्रुवीला आवाज देऊ लागला. त्याला ध्रुवी विहिरीत सुद्धा सापडली नव्हती. तो पायरीवर येऊन बसला.

ज्या अर्थी ध्रुवी इथे नव्हती त्या अर्थी ती सुरक्षित होती. रवीला दिलासा मिळाला. त्याला भीती होती की ध्रुवी विहिरीत पडली असावी अन् तिच्यासोबत काही तरी वाईट झालं असावं.

तो पायऱ्या चढत वर आला. वर येताच त्याला वातावरणात बदल दिसला. सूर्याची किरणं त्याच्या अंगावर पडली होतीत. तो गोंधळू लागला. पाच मिनिटापूर्वी आठ वाजले होते. आकाशात चंद्र स्पष्ट दिसत होता अन् आता लगेच सूर्य कसा दिसू लागला. इतक्यात रात्र कशी काय सरली.

तो नेमकं किती वेळ या विहिरीत होता हे त्याला कळत नव्हतं. तो तसाच गोंधळलेल्या मनस्थितीत चालू लागला.

त्याला लवकरात लवकर ध्रुवीला पहायचं होतं. त्याला तिची काळजी वाटत होती. तो घराच्या दिशेने चालू लागला.

रवी मोठी मोठी पावलं टाकत चालू लागला. चालता चालता त्याला काही गोष्टी जाणवू लागल्या. तो जिथे जात होता तिथे त्याला त्याचं घर दिसत नव्हतं. त्याची गाडी दिसत नव्हती. तो एकदम गोंधळून गेला.

ज्या ठिकाणी त्याचं घर होतं तिथं आता काही नव्हतं. तो आजुबाजूला पाहू लागला. त्याला लांब लांब पर्यंत कोणाची घरं दिसत नव्हती. तो सरळ चालू लागला. त्याचं घर शोधू लागला. चालत चालत तो आत गावात आला. त्याला एक दोन झोपड्या दिसल्या. तो त्या दिशेने चालू लागला. तोच त्याला मागून कोणाचा तरी आवाज आला.

"पाव्हण कोण म्हणायचं..?"

एक धोतर नेसलेला पाठीत वाकलेला वृद्ध व्यक्ती त्याची चौकशी करत होता. रवी त्यांच्याकडे बावरून बघत होता.

"व्हय गाऽ.. कुठनं आलायसा..?"

"मुंबई.. मी.. मी.. मी इथे राहतो.."

"आं ऽ..?"

त्यांनी कानाला हात लावला. रवी काय म्हणाला ते त्यांच्या लक्षात आलं नव्हतं. रवी शांत झाला. ती वृद्ध व्यक्ती त्याच्या बोलण्याची आस लावून त्याच्याकडे पाहू लागली.

"पाव्हणं कोण म्हणायचं..?" एक वजनदार आवाज त्याला ऐकू आला. त्याने मागे पाहताच झोपडीतून एक पिळदार शरीराचा दणकट माणूस बाहेर आला. रवी त्याच्याकडे पाहतच राहिला.

"व्हय.. कोण हायसा.. कुठणं आलायसा.. कुणाकडं काम हुतं..?"

"मी राहतो इथ."

"कुठ..?"

"त्या तिथल्या घरात. माझं घर नाही तिथे आता. कोणी नाही तिथे. आता दहा पंधरा मिनिटांपूर्वी तिथं माझं घर होत. माझी बायको होती. कोणी नाही तिथे. माझी मुलगी इथं कुठ तरी हरवली आहे.. ती मिळत नाही.." तसा रवी एकदम शांत झाला.

ती दोघ रवीकडे बघत होते. त्याचं बोलणं पूर्णपने त्यांना कळलं नसावं.

"बसा जरा वाईच.. काय झालंय तुमास्नी..?"

त्या पहिलवान पुरुषाने अंगणात गोणपाट टाकलं. रवीला बसायला सांगितलं. त्यानं आत जाऊन पाण्याचा तांब्या भरून आणला. रवीला प्यायला दिला. रवी गट गट आवाज करत पाणी प्यायला.

त्याला त्याच्या सोबत काय होत आहे ते कळत नव्हतं. या लोकांना कसं सांगाव ते कळत नव्हतं.

"पाव्हणं जरा वाईच हळूहळू बोला. काय हुतंय ती दमानं सांगा. कुठंनं आलायसा..?"

"मुंबई.." रवी पटकन म्हणाला.

"ही कंच गाव. ती कुठं हाय म्हणायचं..?"

रवी शांतच झाला. तो बावरून त्यांच्याकडे पाहू लागला.

"बर कसं आलासा..?"

"गाडीने."

"बैलं कुठ हायत म्हणायची मंग..?"

रवी आणखीनच बावरला. दोघंही त्याच्या उत्तराची अपेक्षा करत बघू लागले. रवी उठला अन् सरळ चालत सुटला. ते दोघेही पाव्हणं म्हणून त्याला हाका मारू लागले.

रवी सुसाट पळाला. तो इकडे तिकडे पाहू लागला. त्याला एकही घर अथवा झोपडी दिसत नव्हती. कुठेच रस्ता दिसत नव्हता. ज्या रस्त्याने तो आला होता तो रस्ता त्याला दिसत नव्हता. वाटेवरची दुकानं त्याला दिसत नव्हती. तो फक्त पळत होता. वेगात धावत होता. पण त्याला कोणीही ओळखीचं दिसत नव्हतं.

तो थांबला. त्याच जागी बसला. जोरजोरात श्वास घेऊ लागला. तो आजुबाजूला पाहत होता. त्याला फक्त झाडी दिसत होती. त्याला काही कळत नव्हतं. तो कुठे येऊन अडकला आहे हे त्याला कळत नव्हतं. तो तसाच रडवेल्या चेहऱ्याने आकाशाकडे बघत राहिला.

••

बराच वेळ चालून पण रस्ता काही दिसत नव्हता. माणसं कोणी दिसत नव्हती. रवी आता भेंडाळून गेला होता. तो कुठे येऊन अडकला आहे हेच त्याला कळत नव्हतं.

तो पुन्हा खाली बसला. आता काय करावं. ध्रुवीचा शोध कुठे घ्यावा. घरी परत कसं जावं याबद्दलच तो विचार करू लागला.

तोच त्याला कोणी तरी चालत येताना दिसलं. दुरून कोणाचा तरी आवाज त्याला ऐकू येऊ लागला. हळूहळू त्याला कोणी तरी जवळ येताना दिसलं.

दोन बायका चालत येत होत्या. त्यांच्या डोक्यावर गाठोडं होत अन् त्या त्याच्या दिशेने येत होत्या. रवी त्यांना बघून उठला.

हळूहळू त्या बायका त्याच्या जवळ आल्या. त्या सुद्धा त्याला निरखून पाहू लागल्या.

"कोण गावचं म्हणायचं..?" त्यातल्या एका बाईने रवीला विचारलं. दुसरी बाई रवीला पाहतच राहिली.

"मी मुंबई वरून आलोय." ती बाई त्याला विचित्र नजरेने पाहू लागली.

"ती कुठलं गाव म्हणायचं..?" रवी पुन्हा गोंधळात पडला. दुसरी बाई त्याला खालून वर पाहू लागली.

"तुम्ही इथलं वाटत न्हाईसा." ती दुसरी बाई म्हणाली.

"होय होय. मी हरवलो आहे. माझी मुलगी इथे हरवली आहे." तो तसं म्हणताच ती दुसरी बाई त्याच्याकडे गंभीरतेने बघू लागली.

"माझी मुलगी इथे कुठे तरी हरवली आहे. आठ वर्षांची आहे ती." रवी ध्रुवीच्या उंचीचा इशारा करत बोलू लागला. "मी शोधतोय तिला. मला मदत करा." ती दुसरी बाई एकदम गंभीर झाली.

"तुम्ही आता कुठंनं येतायसा..?" ती बोलू लागली.

"तिकडून. रवीने हात मागे केला अन् बोलू लागला, "त्या विहिरीच्या इथे माझं घर होत. मी माझ्या मुलीला शोधत होतो अन् अचानक इथे आलो."

रवीचा गोंधळ त्यांच्या लक्षात येत नव्हता. तो त्यांना इथला वाटत सुद्धा नव्हता. तो इथं कसा आला, त्याची मुलगी कुठे हरवली या बद्दल त्यांना काही कल्पना नव्हती.

ती दुसरी बाई त्याला मदत करायच्या उद्देशाने बोलू लागली.

"बघा पाव्हणं, चला आमच्या बर.. माझा नवरा तुमास्नी मदत करील. इथं तिथं भटकून काय बी हुनार नाय." रवीकडे दुसरा पर्याय नव्हता. त्याने त्यांचं बोलणं ऐकलं अन् मागे फिरून चालू लागला.

••

रवी चालत चालत तिथेच आला जिथून तो पळत गेला होता. तो पहिलवान माणूस त्याला गोंधळलेल्या नजरेने पाहत होता. रवी गोणपाटावर गंभीर नजरेने बसला होता..

"पाव्हणं तुम्हीं म्हणताय ती खरं बी असंल.. खरं इथं तशी कुठली प्वॉर आम्ही बघाय नाय. तुम्ही म्हणताय तसली गाडी बी नाय.. अन् तुमचं गाव सुदीक कुठल्या वाटंला हाय ही अजून माझ्या ध्यानात आलं नाय."

रवीला आता कसं व्यक्त व्हावं तेच कळत नव्हतं. काल दिवसभर तो जिथे राहिला होता आज ते घर, त्याची माणसं हे एकदमच नाहीस झालं होत. नेमकं त्याच्या सोबत काय होत आहे हेच त्याला कळत नव्हतं.

"पाव्हणं खरं घाबरु नकासा.. एक माणूस तुमास्नी मदत करील बगा.."

रवीने आशेने त्यांच्याकडे पाहिलं.

"मास्तर."

"कुठं भेटतील ते..?"

"चला.." तसं म्हणत तो पहिलवान मिशीला पिळ मारत उठला. रवी त्यांच्या मागोमाग चालू लागला. चालत चालत दोघेही एका वडाच्या झाडाजवळ आले.

तिथे एक माणूस चबुतऱ्यावर पेपर वाचत बसला होता.

"ओऽ मास्तर हाय का गेला.." तसं त्या पहिलवानाने त्यांची मस्करी करत आवाज दिला.

"किसना का गा.." मास्तर पेपर बाजूला ठेवत हसतमुखाने बघू लागले.

"नाय म्हटलं हाय का गेला ढगात."

"तुमास्नी घेतल्या बिगर आम्ही जातूय व्हय."

तसा किसन पहिलवान मिशीला पिळ देत हसू लागला.

"बोला काय काम काढलं गरीबांकड."

"अवो गरीब आम्ही का तुम्हीं म्हणायचं. विंग्रजांच तुम्ही दोस्त. राजांची ओळख तुमच्यापाशी अन् तुम्ही गरीब व्हय." रवी त्यांचं बोलणं ऐकून गोंधळात गेला.

"बोला बोला काय काम काढलसा.. पाव्हणं कोण म्हणायचं.. इथलं वाटत नाहीत.."

तसा किसन पहिलवान रवीकडे पाहून बोलू लागला. "बघा पाव्हणं म्हटलं नव्हतं मास्तर तुमास्नी लगीच वळखणार." तसा तो पुढे बोलू लागला, "मास्तर, पाव्हणं इथलं नव्हत. म्हणत्यात त्येंची पोरगी इथं हरवल्या."

"व्हय." तसा मास्तर रवीकडे खालून वर बघू लागला.

"पाव्हणं कुठलं तुम्ही...?"

"मुंबई." मास्तरांनी डोळे मोठे केले.

"इथं कसं आलासा..?"

"गाडीने.."

"कंची गाडी..?"

"कार." तसे ते गोंधळात गेले. त्यांना काही कळेनास झालं.

"ती काय असतंय..?"

"तीच मला बी कळंना."

रवी गोंधळला होता. त्याच्या परिस्थिती हळूहळू लक्षात येत होती. त्याने मास्तरांच्या बाजूला असलेला पेपर बघितला. तो फारच जुना वाटत होता. त्याने त्यावरची तारीख बघितली अन् त्याने डोळे मोठे केले. रवी ती तारीख बघतच राहिला.

"हा पेपर कधीचा आहे..?"

"ही पत्र व्हय."

"होय."

"ही हाय जुनं.. खरं आमास्नी नवीनच म्हणायचं."

"आज काय तारीख आहे."

"काय ती."

"आज कोणता दिवस आहे. वार कोणता."

"आता बघा ऐतवार."

"आणि दिवस."

"अठ्ठावीस तारीख बघा"

"कोणता महिना..?"

"पहिला महिना बघा."

"जानेवारी." रवी पुटपुटला. अन् शांत आवाजात म्हणाला.

"हे साल कोणतं आहे..?"

दोघेही त्याच्याकडे गोंधळलेल्या नजरेने बघू लागले.

"पाव्हणं पंचवीस साल चालू हाय हे..

"पंचवीस कोणतं पंचवीस..?" रवी गोंधळून म्हणाला.

"अवो १९२५.. हायसा कुठं.. टिळकांस्नी मरून पाच साल हुतील अंवदाला." रवीच्या पायाखालची जमीन सरकली होती. त्याला हे खरं वाटत नव्हतं.

तो १९२५ मध्ये होता. हे अशक्य होतं. तो वेळेत शंभर वर्षे मागे होता. तो भूतकाळात होता. ही गोष्ट अशक्य होती. त्यांचं डोकं गरगरु लागलं. तो स्वतःला सावरत चबुतऱ्यावर बसला. ते दोघेही गोंधळलेल्या नजरेने त्याला पाहू लागले.

रवीला काहीच कळत नव्हतं. त्याच्या सोबत एक अशक्य घटना घडली होती. जी गोष्ट कधीच घडू शकणार नव्हती ती गोष्ट रवी सोबत घडली होती. हे एक टाईम ट्रॅव्हल होतं. तो शंभर वर्षे मागे भूतकाळात गेला होता. अशा काळात जिथे त्याचं अस्तित्व नव्हतं. अशा काळात जिथे अजून तो जन्माला यायचा होता. अशा काळात जिथे अजून भारत सुद्धा स्वतंत्र झाला नव्हता.

ही गोष्ट अशक्य होती पण निसर्गाने ती शक्य केली होती. निसर्गाने ही त्याच्या सोबत घडवली होती. पण तोच का. त्याचीच का निवड व्हावी. हेच रवीला कळत नव्हतं.

निसर्ग अशा प्रश्नांची उत्तर देत नसतो. तो आपल्याला प्रश्न निर्माण करून देतो. उत्तर हे आपल्याला शोधावं लागतं. निसर्गाचं कामच ते असतं. इथे मीच का.. माझ्यासोबतच असं का.. असं बोलून चालत नाही. सत्य स्वीकारून इथे चालावं लागतं. हेच आयुष्य असतं. हाच आयुष्याचा रस्ता असतो. रवीच्या आयुष्यात आलेल्या या वळणाने त्याचं पुढचं आयुष्य बदलणार होत. रवी आता हे वळण कसं हाताळतो हीच त्याची परीक्षा होती.

तो एकसारखा विचार करत होता. ज्या अर्थी तो इथे आला आहे त्याअर्थी ध्रुवी सुद्धा इथेच आली असणार. तिला शोधायला हवं. लवकरात लवकर शोधायला हवं. रवीला ज्या अर्थी ही गोष्ट इतकी अवघड वाटत होती त्या अर्थी ध्रुवीची काय अवस्था झाली असावी याचा विचार करूनच त्याचं डोकं सुन्न झालं होतं.

"पाव्हणं. कुठ हरवलाय..?"

"मास्तर मला तुमची गरज आहे. किसन भाऊ माझी मुलगी इथं हरवली आहे. मला मदत करा. ती फार लहान आहे. या भागात नवीन आहे. ती घाबरली असणार. मला तिला शोधायचं आहे. माझी मदत करा."

रवी एकदम पोट तिडकीने बोलत होता. त्याची अवस्था बघून ते दोघेही एकमेकांकडे पाहू लागले.

"पाव्हणं घाबरू नगासा.. हुडकू आपण तिला.. चला.." तसं म्हणत मास्तरांनी चबुतऱ्यावरून उडी मारली.

"मास्तर खरं कुठणं हुडकायच खरं.?"

"पाव्हणं सांगतील तिथनं. काय पाव्हणं.. इथंभूत समदं सांगा.. कुठं हरावली. तुम्ही कुठणं तपास घेतलासा समदं सांगा.. आधी तिथं शोधू अन् मग समद्या गावातनं हुडकू."

"बर.." रवी शांत मुद्रेने म्हणाला.

"म्या एक बोलू का मास्तर गावात कोण रडलं तरी आपणाला खबर लागती. पाव्हणं म्हणत्यात तशी पोर इथं आली असंल असं मला वाटत नाय. माझा आपला ईचार बगा.. बाकी तुम्ही म्हणताल तिथं आपण हुडकू नाय असं नाय."

"खरं किसना.. पाव्हणं म्हणत्यात ती बी तर खरं हाय.. बघू त्यांच्या बुद्धीनं चालून.. व्हय पाव्हणं कवा हरवल्या तुमची पुरगी.."

रवीला काय उत्तर द्यावं तेच कळत नव्हतं. तो स्वतः शंभर वर्ष मागे आला होता. त्यात तो इथल्या तारखे नुसार सुद्धा मागे होता. काही तरी विचार करून तो बोलू लागला.

"दोन दिवस तरी झाले असतील."

"अन् तुम्ही कवा हरवलासा.?"

"काल."

"म्हंजी आदी तुमची प्वॉर आणि मंग तुम्ही."

"होय."

"खरं इतक्या लांब तुम्ही का म्हणून आल्ता. काय तर इशेष काम असंलच की.."

रवीला काय बोलावं ते कळत नव्हतं. तो खोटं सुद्धा बोलू शकत नव्हता. अन् खरं देखील बोलू शकत नव्हता. त्याची एक वेगळीच अडचण झाली होती.

"मास्तर तुम्हाला सगळं सांगतो. माझी मुलगी मला भेटू दे.. मी तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तर देतो.. आता माझं लक्ष फक्त माझ्या मुलीवर आहे." तसं म्हणत रवी शांत झाला. त्यानंतर तिघे ध्रुवीचा शोध घेऊ लागले. रवीने विहिरीची जागा, तिथला परिसर, आजूबाजूचा परिसर तपासला.

किसन आणि मास्तरांच्या मदतीने गावात जितकी झोपडी होतीत, तिथं जाऊन तपासणी केली. खरं रवीला काहीच सापडलं नाही. कशाचा सुगावा लागला नाही. तिघही माना खाली घालून मास्तरांच्या घरी आले.

"दमलो बाबा किसना." मास्तरांनी पडवीत आपला बुड टेकला.

"मास्तर जरा तालमीत इत जावा. एवढ्याश्यानं दमता व्हय."

"व्हय बाबा. तुझ्या इतकी ताकद दिली न्हाई देवाण मला."

तेवढ्यात मास्तरांची चिली पिली त्यांच्या अवती भवती जमली.

"व्हय तुमची ताकद एगळी गा." तसा किसन पहिलवान मिशीला पिळ देत गालातल्या गालात हसू लागला.

रवी त्या मुलांना खेळताना बघू लागला. त्याला ध्रुवीची आणखी आठवण येऊ लागली. मास्तरांची बायको पाण्याचा तांब्या घेऊन आली.

"पाव्हणं कुठल्या गावच म्हणायचं..?" ती रवीला तांब्या देत त्यांच्याकडं बघू लागली.

रवी तिला बघतच राहिला. त्याच्या चेहऱ्यावरचे हाव भाव एकदम बदलले. त्याला ती स्त्री आपलीशी वाटू लागली. त्याने शुद्धीत येत तांब्या घेतला.

"लक्षुमी पाव्हणं लय लांबन आल्यात. त्यांची प्वॉर इथं कुठं हरवल्या. तिला हुडकत हुडकत आल्यात ती." किसनरावांनी चूळ भरली अन् घसा खाकरला.

लक्ष्मीबाई हसता हसता शांत झाली. ती एकटक रवीकडं बघू लागली. रवी तिला ओळखीचा असल्यासारखा वाटू लागला. पण कोण ते तिला कळेना. ती गंभीर नजरेने त्याला बघू लागली अन् तशीच आत गेली.

"बर पुढ काय नियोजन मास्तर." किसन पहिलवान विचारू लागला.

"बघा पाव्हणं," मास्तर रवीकडे पाहत बोलू लागले. "आज तुमास्नी एक अन् एक घर दावलं.. एक अन एक गल्ली पालथी घातली.. गोंद्या

सोडला तर गावातल्या हर एका माणसाच्या घरात जाऊन म्या चौकशी केली. तुमच्या लेकी बद्दल ईचारलं.. तुम्ही बघितलसा.. मला तर वाटतंय तुमची लेक इथं नाही..''

''मला काय वाटतं पाव्हणं सरकारची मदत घ्या. तुम्ही बी शहरातलं हाय म्हणताय. सरकारात माझी वळख हाय. तुमास्नी मदत करतील. काय म्हणता..?''

''बघू. आधी आपण इथं शोधू.''

''इथं आणि काय शोधणार. गाव संपलं ही. तुमची प्वॉर इथनं जाऊन जाऊन कुठशी जाणार. अन् इथनं जर गेली असती तर कुणाला तर दिसली असणारच की..'' एवढं बोलून मास्तर त्याच्याकडे गंभीर नजरेने बघू लागले.

''गोंद्या कोण आहे तो त्याची चौकशी राहिली.'' रवी शांत नजरेने म्हणाला.

''त्यो व्हि.. त्यो इल आज उद्या.. आमची गाडी घिऊन गेलाय.. त्याची बी चौकशी करू.. खरं पाव्हणं तुम्ही इथं काल आला म्हणताय.. आमास्नी तुम्ही आज दिसताय.. तुमची लेक हरवली त्याला दोन दिस झालं म्हणताय.. त्यो गोंद्या इथं पंधरा दिसापासून न्हाई.. त्याला तरी काय ठाव असणार.. माझं ऐका कोल्हापुरात जाऊ.. माझी हाय वळख..'' मास्तर रवीकडे पाहतच राहिले.

रवीला तर काहीच कळत नव्हतं. मास्तर सांगतात ते खरं होत. त्याने या गावात तपास केला होता. ध्रुवी जर इथे असती तर ती कोणाला ना कोणाला तरी दिसली असती. पण तसं काहीच झालं नव्हतं. त्याला आता तिचा तपास दुसऱ्या ठिकाणी करावा लागणार होता. ध्रुवीसाठी तो कुठेही जायला तयार होता. तिला घेतल्याशिवाय तो घरी जाणार नाही हे त्यानं मनाशी ठरवलं होतं. गोणपाटावर आकाशातला अर्धचंद्र बघत तो तसाच पडून राहिला.

••••

काळाच्या अटकेत

१४-०२-२०२५

अन्विता अंतराच्या घरी होती. तिचं कशात मन लागत नव्हतं. ती रवीच्या येण्याची आस लावून बसली होती. रवी म्हणाला होता, तो ध्रुवीला घेऊनच येईल म्हणून. तिचं लक्ष दाराकडेच होतं. ती एकसारखी त्यांची वाट पाहत होती.

"ताई.." अंतरा जेवणाच ताट घेऊन तिच्या पुढ्यात उभी राहिली.

"नको मला काही अंतरा.."

"ताई प्लीज खा काहीतरी.. काल पासून काही खाल्लं नाहीस तू. नको स्वतःला त्रास करून घेऊस.. तुझ्या आत एक जीव आहे.. त्याच्यासाठी तरी.." अन्विताचे डोळे भरून आले.. तिच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले.

"माझ्यामुळे झालं हे.. माझ्यामूळे ती हरवली.." तसं म्हणत अन्विता रडूच लागली. अंतराने जेवणाच ताट बाजूला ठेवलं अन् तिला शांत करू लागली.

"असं नको बोलू ताई.. तुझी यात काही चूक नाही.."

"मी उगाच ओरडले तिला.. मी ओरडले नसते तर ती कुठे गेलीच नसती.. ती हरवली नसती.." तसं म्हणत ती आणखीच रडू लागली. अंतरा तिला शांत करू लागली.

"ताई तसं अजिबात नाहीये. जे व्हायचं असतं ते होतं त्याला कोणी जबाबदार नसतं. तू स्वतः वर दोष ओढून घेऊ नकोस. यावेळी ध्रुवी नक्कीच सापडेल.. माझी ताई तिला नक्की शोधेल."

अन्विता भरलेल्या डोळ्याने अंतराकडे पाहू लागली. तिने तिचे डोळे पुसले अन् तिला विचारू लागली.

"यावेळी म्हणजे.. आणखी कोणी हरवलं होतं का.. ती जागा शापित आहे का.. तिथं भूतबाधा आहे का..?"

"ताई ताई जरा शांत हो.. नको ओव्हर थिंकिंग करू. तसलं काही नाही तिथे."

"मग असं का म्हणालीस तू यावेळी म्हणून."

अंतरा बोलता बोलता काही तरी बोलून गेली होती.. नकळत तिच्या तोंडातून ते निघून गेल होतं. तिला या झालेल्या गोष्टी अन्विताला सांगायच्या नव्हत्या. त्या गोष्टी सांगून तिचं आणखी खच्चीकरण करायचं नव्हतं. पण नकळत आता तिच्या तोंडून ते निघालं होत.

"काही नाही. मी तुला समजावत होते ध्रुवीला आपण शोधू म्हणून.. उगाच नको अतिविचार करू तू.."

"अंतरा काही असेल तर प्लीज सांग.. माझ्या पासून काही लपवू नको.. आधीच इथे मी एकटी आहे.. तुझ्या शिवाय आता माझा कोणावर विश्वास नाही.. प्लीज.." तसं म्हणत तिने आणखी डोळे भरले.

"ताई तू एकटी नाहीस. आम्ही आहोत तुझ्या सोबत. मी काही लपवत नाही तुझ्यापासून."

"माझ्या बाळाची शप्पथ घेऊन सांग." अन्विताने अंतराचा हात तिच्या पोटावर ठेवला. अंतरा चांगलीच अडचणीत सापडली. ती गोंधळून गेली.

"अंतरा तुझी नजरच सांगत आहे. काही तरी लपवते आहेस माझ्यापासून.. मला कळालं आहे. आता तुला सांगावच लागेल." अन्विता गंभीर नजरेने म्हणाली.

"ताई तुला सांगते मी.. पण ताई तू समजते तसं काही नाही.. सगळं सांगते मी.. पण आधी खाऊन घे.."

"नाही.."

"ताई तुझी जबाबदारी आहे माझ्यावर. तुझी तब्येत बिघडली तर मला वाईट वाटेल. मी म्हणाले ना तुला सांगते म्हणून.. मग सांगते सगळं.. खरं सांगते." तशी अन्विता शांत झाली. अंतराने तिला जेवणाच ताट दिलं.

ती हळूहळू एक एक घास खाऊ लागली अन् अंतराकडे बघू लागली. अंतरा तिच्या समोर खुर्ची घेऊन बसली. पाणी पित ती बोलू लागली.

"आधीच तुला सांगते ताई तू ही गोष्ट ध्रुवीशी रिलेट करू नको." अन्विताने होकारार्थी मान डोलावली.

अंतरा पुढे बोलू लागली, "तुला दादाबद्दल किती माहिती आहे. त्याच्या पास्ट बद्दल..?"

"त्याचे बाबा जिवंत आहेत हे मला काल कळालं आणि मीच भांडून त्याला इथे घेऊन आले." अंतराने तिला ओळखायचं ते ओळखलं.

"ओके. म्हणजे तुला काही माहीत नसावं."

"काहीच नाही."

अंतरा पुढे बोलू लागली, "ताई दादाला एक बहीण पण होती.. दादापेक्षा दोन तीन वर्षाने लहान असावी काहीतरी. ती लहान असतानाच हरवली. तेव्हा दादा इथे होता. तेव्हा सगळं चांगलं होतं. ती ज्या दिवसापासून हरवली त्या दिवसापासून ती पुन्हा कधी दिसलीच नाही. तिचा कुठेच शोध लागला नाही. तिला परत कोणी पाहिलं सुद्धा नाही."

अन्विता आश्चर्याने अंतराला पाहत होती.

"ही गोष्ट मला माझ्या ताईकडून कळाली. तुला खोट वाटेल ताई पण, अपूर्वाताई पोलिस होण्यामागे हेच कारण आहे."

"म्हणजे..?"

"म्हणजे दादा-ताई लहान असतानाची गोष्ट आहे. ते एकत्र खेळत असतानाच हे सर्व घडलं होतं."

"माझी ताई तेव्हा इथे होती. कुठे तरी ती सुद्धा या बाबतीत तिला दोषी मानते."

"तिचं म्हणणं असायचं की आम्ही खेळायला गेलो नसतो तर असं कधी झालंच नसतं."

"तेव्हा तिचा तपास झाला असेल पण ती कधी सापडली नाही. माझ्या ताईच्या मनातून ही गोष्ट अजून गेली नाही. कोणाचीही मिसिंग केस असेल तर ताई स्वतः जातीने लक्ष घालते." तेवढं बोलून ती शांत झाली. अन्विता चिंतेत गेली.

"ताई हेच मला तुला सांगायचं नव्हतं. तू उगाच ओव्हर थिंकिंग करशील.. गोष्टी रीलेट करू पाहशील.. हे मला माहीत होत.. मला तुला अजून त्रासात पाहायचं नव्हतं. एवढंच.."

अन्विता विचारात हरवली होती. काही वेळाने मग ती बोलू लागली. "तरी काय वय असेल तिचं..?"

"नऊ दहा वर्षांची असेल."

"त्या नंतर कोणी हरवलं होतं.?"

"नाही."

"ती पण घराच्या परिसरातून हरवली होती."

"होय. त्या विहिरी जवळ. ताई म्हणते की आम्ही तिला शेवटचं तिथेच पाहिलं होत."

अन्विता काही गोष्टी जोडू पाहत होती. तिच्या लक्षात काही काही गोष्टी येत होत्या. नवीन नवीन प्रश्न जन्माला येत होते. त्या नव्या प्रश्नांचा गुंता तिच्या डोक्यात होत होता. त्यांची उत्तर शोधण्यात ती स्वतःला त्यात हरवून बसली.

"ताई.." अंतराने तिला आवाज दिला.

"हांऽ.."

"प्लीज गोष्टी रिलेट करू नकोस. ध्रुवी आपल्याजवळ येणार आहे. रवी दादा तिला आणणार आहे." अन्विताने शांत नजरेने मान हलवली.

"अंतरा नाव काय होतं रवीच्या बहिणीच."

अंतराने एक दीर्घ श्वास घेतला अन् म्हणाली,

"लक्ष्मी."

अन्विता पुन्हा लक्ष्मीच्या विचारात हरवून गेली.

••

पीएसआय जाधव त्यांच्या समोर असलेल्या फळ्यावर बारीक लक्ष देऊन पाहत होते. त्या पांढऱ्या फळ्यावर रवी बद्दलची सर्व माहिती त्यांनी मांडली होती.

घडलेल्या घटना ते पुन्हा पुन्हा तपासत होते. ध्रुवीचा आणि रवीचा तपास कोणत्या बाजूने सुरू करावा हाच त्यांच्या पुढे एक मोठा प्रश्न होता.

अपूर्वाने सांगितल्यानुसार त्यांनी आप्पा पाटील यांची भेट घेतली होती. पण त्यांना तिथून वेगळी माहिती मिळाली नव्हती. त्यांचा संशय आप्पा पाटलांवर जरी असला तरी ठोस असं काही त्यांना मिळालं नव्हतं. त्यांनी काही माणसं आप्पा पाटलांच्या पाळतीवर ठेवली होती. त्यांचं लक्ष आता तेवीस वर्षांपुर्वी हरवलेल्या लक्ष्मीवर खिळून होत.

लक्ष्मी सुद्धा अशीच हरवली होती अन् ती रवीची बहीण होती. आधी त्याची बहीण अन् आता त्याची मुलगी अन् स्वतः तो बेपत्ता होता. ही बाब म्हणावी तितकी साधी नव्हती हे त्यांच्या लक्षात आलं होतं. त्यांची नजर तपासाची कडी शोधण्यात खिळून होती.

••

२९-०१-१९२५

रवी सकाळी सकाळीच उठून बसला होता. मास्तर गावातल्या कुणा माणसाला बैलगाडीसाठी विचारायला गेले होते. लक्ष्मीबाई चुलीसमोर बसून विचारात हरवली होती. ती तिच्या भूतकाळात हरवली होती.

कधी एके काळी ती सुद्धा अशीच हरवली होती. तिने घरी जाण्याचा प्रयत्न केला होता पण सगळे प्रयत्न अयशस्वी झाले होते.

तिला वाटत होतं तिला शोधत कोणी तरी येईल. कोणी नाही आलं तरी तिचे बाबा तिला शोधत येतील. पण वाट पाहून पाहून तिने शेवटी सत्य स्वीकारलं होतं.

तिला ते स्वीकारावं लागलं होतं. बाल वयात नाही पण तरुण वयात तिला परिस्थितीची जाणीव झाली होती. अन् परिस्थती हीच होती की ती काळाच्या अंधारात कुठे तरी हरवली होती. अशा ठिकाणी जिथे तिला शोधणारं कोणी जन्माला सुद्धा आलं नव्हतं. मोठी होत जाईल तशी लक्ष्मी त्या काळाची सोबतीन बनून गेली.

आज इतक्या वर्षांनी एक पुरुष स्वतःच्या मुलीला शोधायला आला हे पाहून तिचं मन रडू लागलं होतं. ती कुठे तरी स्वतःला त्या मुलीत शोधू पाहत होती.

तिला सर्व काही जाणून घ्यायचं होतं. तिनं चुलीतला जाळ कमी केला अन् डोक्यावर पदर घेऊन बाहेर आली. रवी विचारात हरवला होता. तिने त्याला आवाज दिला.

"व्हय पाव्हणं." रवीने ती आल्याचं पाहिल..

"बोला."

"न्हाई म्हंजी नाव काय तुमच्या लेकीच..?"

"ध्रुवी."

"काय ती..?"

"ध्रु.. वी.."

तिला ते कळेनास झालं.

"लयच अवघड नाव ठिवलसां.." तशी ती हसत म्हणाली. रवी देखील गालात हसला.

"अन् तुमच्या बायचं..?"

"अन्विता.."

"काय ती..?"

"अ..न्वि..ता.." रवी पुन्हा एक एक शब्द बोलू लागला.

लक्ष्मीनं खूपच विचित्र तोंड केलं. तिला ते नाव अजिबात कळालं नव्हतं. तरी ती हसून म्हणाली, "असू दे.. तरी बी चांगलच हाय.." रवी हलकासा हसला.

"तुमच्याकडं सगळ्यांची अशीच नाव असत्यात." रवी नुसताच हसला.

"ती न्हवं तुम्ही इथं आला कसं काय..?"

रवी पुन्हा तोच प्रश्न ऐकून वैतागला. त्याला तेच तेच पुन्हा स्पष्ट करून सांगायचं नव्हतं.

"चुकून आलो."

तशी लक्ष्मीबाई पदर तोंडात धरून हसू लागली. रवीला ही तिला बघून हसू आलं.

पाठीमागून मास्तर येताना दिसले तशी लक्ष्मीबाई पटकन उठून आत निघून गेली. रवी तिला पाहतच राहिला. मास्तर फारच वैतागले होते. ते

कुणाला तरी शिव्या देतच येत होते. ते झटझट चालत आले अन् रागा रागात खाली बसले.

"लक्ष्मे तांब्या आण गं." लक्ष्मी पळत पळत पाण्याचा तांब्या घेऊन आली. मास्तरांनी गटगट पाणी पिल अन् तांब्या जोरात खाली आपटला.

"न्हाई यायला अजून."

"न्हाई नव्हं.. कुठं गेलंय रांडचं कुणास ठाव.. गेलंय ती गेलंय झवनं माझी गाडी बी घिऊन गेलंय."

"धोंडू नाना काय म्हणत्यात..?"

"इल म्हणत्यात नुसतं. आता कवा इल काय म्हाईत.. कुठ आपली आय निजवाय गेलंय म्हाताऱ्याला बी ठावं नाय.." मास्तर रागारागाने बोलत होते.

"मास्तर काय झालंय..?"

"काय नाय वो पाव्हणं.. एका बेण्यान माझी बैलं नेल्यात गाडीला जुंपून.."

"बेन सकाळ पातूर येतो म्हटला हुता पंधरा दीस झालं अजून पत्त्या न्हाई." मास्तर तावातावाने बोलत होते.

"कुणा दुसऱ्याची गाडी मिळणार नाही..?"

"न्हाई गा.. गावात लय गाड्या न्हाईत.. ज्याची हायत ती जाग्याव न्हाईत."

"मग आता."

"थांबाव लागल. गाडी इस्तवर थांबावं लागलं. दुसरा पर्याय न्हाई पाव्हणं.."

रवी फारच नाराज दिसू लागला. मास्तरांना त्याची परिस्थिती कळत होती. खरं तेही सध्या काही करू शकत नव्हते. रवी ध्रुवीच्या आठवणीत पुन्हा हरवून गेला.

••

१४-०२-२०२५

अंतराशी बोलल्यापासून अन्विता वेगळ्याच विचारात होती. ती लक्ष्मीची अन् ध्रुवीची कडी जोडू पाहत होती. तिला कुठे ना कुठे वाटत होत की या दोन घटनांमध्ये काही ना काही साम्य नक्की आहे. तेच ती विचार करून शोधत होती.

पण हा प्रश्नांचा गुंता विचार करून सुटणार नव्हता. त्यासाठी तिला अंतराशी बोलावं लागणार होतं. हा गुंता बोलून, प्रश्नांची खोड करूनच सुटणार होता.. अंतरा समोरच खिडकीत मोबाईल घेऊन उभी होती.. अन्विताने तिला आवाज दिला.

"अंतरा.."

"हो ताई.." तिने लगेच मोबाईल बाजूला ठेवला अन् तिच्या समोर आली.

"अपूर्वाने काही सांगितल.?"

"नाही अजून."

"आणि त्या जाधवांनी..?"

"काहीच नाही. त्यांना नवी अशी काही माहिती मिळाली नाही."

"ते कुणाकडे तरी जाणार होते ना.. कोणी सावकार का कोण तो..?"

"आप्पा पाटील होय."

"हो.."

"ताई म्हणत होती जाधवांना विशेष काही माहिती कळाली नाही. त्यांची थोडक्यात भेट झाली होती. त्यात पण ते काकांची विचारपूस करत होते. एवढंच काय ते.. पण ताई म्हणत होती, जाधवांनी त्यांच्यावर नजर ठेवली आहे."

"बर.." अन्विता पुन्हा खिडकीत पाहू लागली.

"ताई मला माहित आहे तू खूप टेन्शन मध्ये आहेस. पण काय करणार."

"मला तुला काही तरी विचारायचं आहे."

"बोल ना ताई."

"तू कसं बघतेस या सर्व गोष्टींकडे..?"

"म्हणजे ताई.?"

"म्हणजे या दोन दिवसात जे झालं. तू पाहिलंस काय काय झालं ते. तुला काय वाटतं या सगळ्या बद्दल. हे कशा करता होत असेल.?"

"नाही माहित ताई."

"तरी पण.." अंतरा ओठ पाडत विचार करू लागली.

"बघ पोलिसांनी कसं त्यांचा अँगल सांगितला की कदाचित जमीन बळकावण्यासाठी हे अपहरण असू शकतं त्यामुळे ते या दृष्टिकोनातून तपास करत आहेत."

"बरोबर."

"तसंच तुझं या बाबतीत काय मत आहे.?"

"मला नाही सांगता येत ताई. तुला काय वाटतं.?"

"बघ माझं स्पष्ट मत मी मांडते. त्यावर तू प्रश्न कर मला."

"ठीक आहे ताई."

"बघ मला वाटतंय की हे प्रकरण अपहरणाचं नाही. म्हणजे तूच विचार कर जर आप्पा पाटील या माणसाला रवीची जमीनच हवी होती तर त्याने त्याच्या वडिलांकडून केव्हाच बळकावून घेतली असती."

"तसं कसं करणार ताई त्याने थेट संशय त्याच्यावर गेला असता ना."

"ठीक आहे.. ते पण गृहीत धरू आपण. पण मग त्यानेच जर हे सगळं केलंय तर तो अजून शांत का आहे. त्याने आता पर्यंत मला बोलवून धमकवायला हवं होतं."

"वाट बघत असेल."

"कसली वाट."

"प्रकरण शांत होईपर्यंत."

"आप्पा पाटील राहू दे.. जर दुसरं कोणी जरी हे केलं असतं तरी त्याने आपल्याशी संपर्क केला असता. त्याच्या डिमांड सांगितल्या असत्या. पण तसं काही झालं नाही. आणि होणारही नाही."

"कसं काय असं बोलू शकतेस.?"

"कारण ही केस अपहरणाची नाही. जमीन बळकावण्याची नाहीच." अंतरा गंभीर नजरेने बघू लागली.

"मग तुला काय बोलायचं आहे ताई. कशासाठी कोणी ध्रुवीला नेलं असेल.?"

"लक्ष्मी कशी गायब झाली.?"

"तिचा इथे संबंध कसा.?"

"आहे. थेट संबंध आहे. ज्या प्रकारे लक्ष्मी गायब झाली त्या प्रकारे ध्रुवी गायब झाली. जे लक्ष्मी सोबत घडलं तेच ध्रुवी सोबत घडलं आहे. फक्त कसं ते आपल्याला शोधून काढायचं आहे."

"ताई विषय वेगळ्या दिशेला नेत आहेस."

"नाही अंतरा. जरा विचार कर. आपण जर असं धरून चाललो की आप्पा पाटलांनी हे सगळं केल आहे तर त्यांनी आत्ताच का केलं हे सर्व.. ते आधी देखील करू शकत होते. काकांनी सांगितल्या प्रमाणे ते आधी पासून या जमिनीच्या मागे आहेत. ते आधी पासून श्रीमंत आहेत. त्यांना जर

अशीच जमीन बळकवायची होती तर त्यांनी लक्ष्मीच्या वेळेसच बळकावली असती.”

“लक्ष्मी गायब झाली तेव्हा थेट संबंध त्यांच्याशी जोडला जाऊ शकला असता. त्यांनीच जर लक्ष्मीच अपहरण केलं असतं तर फार पूर्वीच सगळं संपलं असतं. पण तसं काहीच झालं नाही. लक्ष्मी कुठेच मिळाली नाही. कुठेच दिसली नाही”

“पण ताई..”

“माझं ऐकून घे जरा मग बोल. मला सांग.. बाबांचे आणि आप्पांचे संबंध कसे होते..?”

“कसे होते म्हणजे.. तसे चांगले होते. बोलून चालून.”

“कधी त्यांच्यात भांडणं.. मारामारी.. शिव्या.. किंवा इतर कोणतीही गोष्ट जमीन मिळवण्यासाठी.. पैशाची गरज वगैरे दाखवून...?”

“नाही कधीच नाही.. कधी तरी ते यायचे काकांना भेटायला. पण प्रेमाने चौकशी करायचे. काकांना कशाची गरज वगैरे आहे का नाही हेच विचारायचे.”

“मला सांग बाबांचं मत काय होतं.. कधी त्यांनी आप्पांच्या मागे त्यांना शिव्या घातल्या.. लक्ष्मीसाठी त्यांना दोष दिला.”

“नाही कधीच नाही. उलट बाबा लक्ष्मीच्या तपासावर कधीच काही बोलले नाहीत. कधी पोलिस स्टेशनात गेले नाहीत. जसं की त्यांना काही..”

"गरजच नाही.." अन्विताने तिचं वाक्य पूर्ण केलं.

"हो म्हणजे कधी कधी असंच वाटायचं. असं मी नाही माझे बाबा घरात बोलत असायचे. आम्ही ते ऐकायचो."

"पण तसं नाही अंतरा. त्यांना गरज नाही हे कधीच नव्हतं. कारण त्यांना माहीत होतं पोलिस जो तपास करत आहेत तोच मुळात चुकीचा आहे. त्या तपासाने लक्ष्मी कधी मिळणारच नव्हती. ती पद्धतच चुकीची होती."

"म्हणजे.?"

"म्हणजे, अंतरा बाबांना माहित होतं लक्ष्मी कुठे हरवली आहे ते आणि ते त्याच पद्धतीने तिचा तपास करत होते."

"तुला काय बोलायचं आहे ताई.?"

"अंतरा तू इतके दिवस बाबांसोबत होती तुला कधीच शंका आली नाही.?"

"कशाबद्दल ताई.. मला तू काय बोलत आहेस ते लक्षात येत नाही. मला आता कळेनासं झालं आहे."

"अंतरा मला सांग तुझी मुलगी हरवली तर तू सगळं सोडून दुःख करत बसशील का तिला शोधण्याचे प्रयत्न करशील.?"

"मी प्रयत्न करेन."

"बाबांनी तेच केलंय अंतरा. बाबांनी आयुष्यभर त्यांच्या मुलीला शोधण्याचे प्रयत्न केलेत. आपण जे समजत आहोत ती बाबांची आवड नाही. ती आवड कधीच नव्हती. ती गरज होती. तो प्रयत्न सुरू होता."

"पण ताई कशाचा प्रयत्न. असं काय होतं जे बाबा पोलिसांना सांगू शकत नव्हते. पोलिसांना राहू दे मला सांगू शकत नव्हते.

"नाही माहित अंतरा. ते मला माहित नाही. कदाचित ती अशी एखादी गोष्ट असावी ज्यावर कोणाचा विश्वास बसला नसता. ज्यावर बाबांचा सुद्धा विश्वास बसत नव्हता."

"मग ते का प्रयत्न करत होते.?"

"कारण त्यांनी ते होताना पाहिल असेल. म्हणून त्यांना ते कसं होतंय ते जाणून घ्यायचं असेल. असं होऊ शकतं. त्याशिवाय एखादा माणूस अंतराळ या विषयात स्वतःला कसा झोकून देईल.."

"एक सामान्य गावकरी, एक सामान्य शिक्षक अचानक संशोधक बनण्याचा विचार करेल. काहीच गरज नाही. जेव्हा माणसाची स्वतःची, त्याच्या हृदयाजवळची गोष्ट हरवते ना तेव्हा तो काहीही करू शकतो. कोणत्याही थराला जाऊ शकतो. ती मिळवण्यासाठी तो जीवही देऊ शकतो. तेच माझ्या रवीने केलंय अंतरा."

"रवी ध्रुवीच्या मागे गेला आहे. तो इथे नाहीच. तो एका वेगळ्या जगात आहे. असं जग जे आपण पाहू शकत नाही. असं जग जे आपल्या डोळ्यांना

समोर असून पण दिसणार नाही. ते जग पाहायला बाबांचे डोळे हवेत अंतरा.”

“ताई तुला काय म्हणायचं आहे तुला कळतंय.?”

“चांगलच. रवी एका विशिष्ट जगात माझ्या ध्रुवीला शोधतोय. आणि मला त्यांना परत आणण्यासाठी ते जग शोधावं लागेल.” अंतराच्या अंगावर शहारे आले होते. ती गंभीर चेहऱ्याने तिला पाहत होती.

••

२९-०१-१९२५

उन्हानं जमीन तापली होती. जमिनीवर पाय ठेवला तर तो भाजून निघत होता. मास्तर पुन्हा एकदा त्यांची गाडी आली का ते पाहायला गावात गेले होते.

रवी विहिरीजवळ येऊन बसला होता. तो भूतकाळात कसा आला याचा विचार करत होता. त्या विहिरीचं निरीक्षण करत होता. त्याला कळत होतं टाईम ट्रॅव्हल ही काही साधी गोष्ट नव्हे.

भूतकाळात मागे कसं जाता येईल, भविष्यात पुढे कसं जाता येईल यावर शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत. किती तरी विद्वानांनी त्यांची मत मांडली आहेत. त्यांच आयुष्य घालवल आहे.

काही काहींनी तर टाईम ट्रॅव्हल कागदावर शक्य आहे पण रियालिटी मध्ये अशक्य आहे असं ठाम सांगितलं आहे. किती भेद मतभेद या एका विषयावर !

जी अशक्य गोष्ट कधी घडणार नव्हती तीच अशक्य गोष्ट त्याच्यासोबत घडली आहे यावर त्याचा विश्वास बसत नव्हता.

परंतु त्याला एक कळत नव्हतं. जर या विहिरीतून माणूस भूतकाळात येतो तर मग ही गोष्ट अजून कोणाला कळाली कशी नव्हती.

ध्रुवीसारखे किती लोक गायब व्हायला हवे होते. इथे राहणारे कितीतरी लोक भविष्यात यायला हवे होते. तसं का होत नव्हत.

रवीला पुन्हा त्या पाण्यात जावसं वाटलं. पण ध्रुवीला घेतल्याशिवाय तो तिथून जाणार नव्हता.

त्याला नकळत त्याच्या बहिणीची आठवण येऊ लागली. त्याला आठवत होतं लहान असताना त्याची बहीण सुद्धा अशीच नाहीशी झाली होती. त्यानंतर ती परत कधीच मिळाली नव्हती. ती कोणालाच दिसली नव्हती.

रवीला आता ती नक्कीच भूतकाळात कुठेतरी हरवली होती यावर विश्वास बसला होता.

परंतु लहान असताना त्याने कितीतरी वेळा या विहिरीत उडी मारली होती. त्याच्या बाबांच्या नकळत तो या विहिरीत पोहत होता, तर मग तेव्हा

का तो भूतकाळात आला नाही. कालच असं काय घडलं, लक्ष्मी हरवली तेव्हा असं काय घडलं ?

या विहिरीचं नक्कीच काहीतरी रहस्य होतं.अन् ते काय ते सुद्धा त्याला शोधून काढायचं होतं.

त्याला ही गोष्ट आधी का काळाली नाही या गोष्टीचं वाईट वाटत होतं. तो काहीच करू शकत नव्हता. परंतु त्याला ही गोष्ट आता कळाली होती आणि तो पुन्हा तीच चूक करणार नव्हता. तो ध्रुवीला शोधणार होता आणि तिला घरी घेऊन जाणार होता.

रवी पाण्यात दिसणाऱ्या त्याच्या प्रतिबिंबाकडे पाहत बसून राहिला. तो त्यात ध्रुवीला शोधू लागला. तोच त्याला कुणाचा तरी चेहरा दिसला.

"पाव्हणं हिरित पडचाल.. खाली काय करतायसा..?" लक्ष्मीबाईंनी रवीला आवाज दिला. रवीने वर पाहून त्यांना उत्तर दिलं.

"काही नाही बसलोय."

"वर या. ही हीर काय चांगली न्हव्हं.." त्यांनी तसं म्हणताच तो गंभीर झाला अन् वर गेला. लक्ष्मीबाई झाडाखाली जाऊन बसल्या. तो ही त्यांच्या बाजूला जाऊन बसला.

"विहीर चांगली नाही म्हणजे.?"

"शापित हीर हाय ही."

"शापित.?"

"व्हय. इथं कवा काय चांगलं हुईत नाय."

रवी एकदम गंभीर झाला. "काय होत इथं.?"

"जनावर मरून पडत्यात इथं. दिसाय ही जागा माप चांगली हाय.. खरं ती म्हणत्यात ना दिसतं तसं नसतं." रवी जरा चकित झाला. त्यांचं बोलणं ऐकू लागला.

"मास्तर कधी पर्यंत येतील.?"

"येतील गोंद्याचां सुगावा घिऊन."

"गाडीवाला माणूस.?"

"व्हय."

तसा तो शांत झाला.

"व्हय पाव्हणं. तुम्ही सरकारात का जाईत न्हाई. मास्तरांच्या वळखी लय हायत. त्ये तुमास्नी वाट्टेल ती मदत करत्याल बघा. तुमची ल्याक घावल की." रवी शांत होता. तो शांत नजरेने म्हणाला.

"लक्ष्मीबाई एक सांगू तुम्हाला."

"बोला की."

"माझ्या सोबत काय झालं आहे हे मी कोणाला सांगू शकत नाही. ते कोणाला समजावू शकत नाही. माझ्या लेकीचा शोध हा माझा मलाच घ्यायला हवा. ज्याचं हरवत त्यानंच ते शोधावं लक्ष्मीबाई." तसा रवी पुन्हा गंभीर झाला.

"पाव्हणं.. माझ्या मनातल बोललासा बघा. तुमच्या बर काय हुतंय ती मी समजू शकते बघा. बरोबर हाय ज्याचं हरवलं त्यांनच ती शोधावं त्यालाच ती घावल." तशा त्या गंभीर झाल्या.

"लक्ष्मीबाई तुम्हाला बघून मला कोणाची तर आठवण येते बघा. मला नाही माहीत कोणाची खरं आठवण येते. माफ करा तुम्हाला वाईट वाटलं का ?"

"नाय नाय पाव्हणं. अवो माणसं वळखतो आम्ही.. काय बी वाइट नाय बघा ह्यात. तुम्ही जी म्हणताय माझं बी तिचं म्हणणं हाय बघा. तुम्हीं कोण हायसां म्हाईत नाय खरं आपलं वाटतायसा बघा." रवी हलकसं हसला.

"तुम्ही याच गावच.?" लक्ष्मीबाई विषन्नपणे हसल्या.

"व्हय बी अन् नाय बी."

"म्हणजे.?"

"तुमास्नी नाय कळायचं पाव्हणं."

"का.?"

"जसं तुमचं म्हणणं हाय तिचं माझं म्हणणं हाय बघा. तुम्ही म्हणतायसा तुमचं कुणाला कळणार नाय तसंच माझं बी हाय बघा. माझं बी कुणाला कळणार नाय."

रवी पुन्हा हसला. त्याला वाटू लागलं तो काही सांगत नाही म्हणून त्या काही सांगत नाहीत. पण तसं नव्हतं.

"व्हय पाव्हणं आता तुम्ही गेला की परत येणार का नाय.?"

"नाही माहित लक्ष्मीबाई. पुढे काय होईल ते. पण जर सगळं चांगलं झालं तर तुम्हाला भेटून नक्की जाईन."

"व्हय व्हय तर.. चांगलच व्हील.. घावल बघा तुमची लेक.."

"खूप बर होईल."

"अवो ही दुनिया गोल हाय जाऊन जाऊन कुठं जातील माणसं.. पुन्हा भेटतीलच की.." रवी पुन्हा चकित होऊन त्यांना पाहू लागला. त्यांच बोलणं त्याला काळाशी सुसंगत वाटत नव्हतं. तो बोलू लागला.

"बरोबर लक्ष्मीबाई माणसं भेटतील पण ती वेळेत भेटायला हवी. वेळ निघून गेल्यावर ती भेटलीत तर त्याला काही अर्थ उरत नाही. मग ती भेटून न भेटल्यासारखी झालीत."

"पाव्हणं तुम्ही कोण हायसा वो.. अगदी माझ्या मनातलं बोललात बगा. तुमचं जी म्हणणं हाय माझं बी तिचं म्हणणं हाय." रवी गालात हसला.

"व्हय पाव्हणं एक बोलू का.. तुम्ही आपलंसं वाटता वो.." तसं लक्ष्मीबाईने डोळे भरले. रवी एकदम विचारात गेला. त्यांचं रडणं त्याला कळेनासं झालं.

"लक्ष्मीबाई काय हे.. का रडताय..?"

"लय दिस मनात हाय बघा. कुणाला तर सांगायचं हाय. बोलायचं हाय. खरं कुणाला सांगणार. काय म्हणून सांगणार. ती कुणाला बी कळणार नाय

बघा.” रवी ऐकत होता. “तुम्ही आपलंसं वाटता मन मोकळं करू वाटतंय बघा.”

“बोला लक्ष्मीबाई. मन मोकळं करा.”

“खरं तुमी कुणालाबी सांगणार न्हाईसा ना..?”

“विश्वास ठेवा.”

“पाव्हणं मी इथली न्हाई बघा.”

“मग.?”

“मी या जगातलीच न्हाई बघा.” तसे तिचे डोळे भरून आले. “ही जग माझं न्हाई. ह्यो काळ माझा न्हाई. ही माणसं माझी न्हाईत. माझी माणसं अजून जन्माला सुद्धा आली नाहीत.”

रवी सुन्न झाला होता. त्याच्या डोक्याला मुंग्या आल्या होत्या. त्याला आता ती ओळखीची वाटत होती. तो डोळे भरून तिला पाहत होता.

“मी सुदीक लहान असताना हरवले हुते बघा. पाव्हणं तुमास्नी पटणार न्हाई खरं म्या माझ्या काळातन लय मागं आले. माझी माणसं मला शोधू शकणार न्हाईत पाव्हणं.”

“ही हीर लय वंगाळ. ह्या हीरीन माझं समदं हिरावून घितलं बघा. समदं हिरावून घितलं.” तशा त्या रडू लागल्या.

रवीच्या डोळ्यातून तर केव्हाच पाणी यायला सुरू झालं होत. त्याला सर्व कळून चुकलं होतं. सोबत असलेली बाई दुसरी तिसरी कोणी नसून त्याची बहीण होती. त्याची सख्खी बहीण.

लक्ष्मीबाई शांत झाल्या. पण रवी अजून शांत झाला नव्हता. त्याला रडताना बघून त्या गोंधळून गेल्या. त्यांना काय करावं ते कळेना. रवी त्यांच्या डोळ्यात डोळे घालून बोलू लागला. रडता रडता बोलू लागला.

"लक्ष्मीबाई तुम्ही माझ्या मुलीचं नाव विचारलं.. माझ्या बायकोचं नाव विचारलं.. पण या श्रीधर रावाच्या मुलाचं नाव विचारलं नाही.. तू या रवीचं नाव विचारलं नाहीस.. लक्ष्मी तू माझं नाव विचारलं नाहीस.." तसा तो रडू लागला.

लक्ष्मीचे डोळे भरून आले. तिच्या अंगावर शहारे आले. तिचं डोक सुन्न झालं. दोघांनी एकमेकांना मिठी मारली. त्यांच्या आसवांचा बांध फुटला. दोघेही एकमेकांच्या गळ्यात पडून रडू लागले..

तेवीस वर्षांची प्रतिक्षा संपली होती. जे अशक्य होतं ते पुन्हा एकदा शक्य झालं होत. पण आता वेळ बदलली होती. परिस्थिती बदलली होती. काळ बदलला होता. रवीने लक्ष्मीलां जवळ घेतलं. तिचं सांत्वन केलं. लक्ष्मी शांत झाली. रवी सुद्धा शांत झाला.

"कुठे हरवली होतीस लक्ष्मी.?" लक्ष्मी पुन्हा भरल्या डोळ्यांनी त्याच्या गळ्यात पडली. "खुप शोधलं तुला. दिवस रात्र एक केला. पण कुठेच सापडली नाहीस. आणि आज अशी.." तसे रवीचे डोळे भरून आले.

"मी आशा सोडली हुती दादा.. मला कळून चुकलं हुतं.. आता मी माघारी न्हाई जाऊ शकत. मला ही सत्य स्वीकारावं लागलं."

"लक्ष्मी आता चल माझ्या बरोबर. "

"न्हाई दादा.. तू मला नेऊ शकत नाहीस."

"का. मास्तरांना सांगू नकोस. त्यांच्या माघारी जाऊ आपण."

"तुला कळंना झालंय. इथनं माघारी जाता येत न्हाई."

"काय..?" रवी एकदम ओरडून म्हणाला.

"व्हय. आता तू बी इथं फसलास."

"काय बोलतेस लक्ष्मी..?"

"तुला काय वाटतं दादा मी आले नसते व्हय इथनं. लय प्रयत्न केला मी. खरं नाय इऊ शकले म्या परत." लक्ष्मी गंभीर नजरेने बोलत होती. रवी सुन्न झाला होता..

"लक्ष्मी माझी बायको तिकडे एकटी आहे. माझी मुलगी इथे हरवली आहे. आणि तू हे काय बोलतेस.?"

"खरं तिच म्हणते म्या. इथनं जाता येत न्हाई. एकदा आलेला माणूस इथनं जाऊ शकत न्हाई."

"खोट बोलतेस तू. तुला मला पण इथे ठेवायचं आहे म्हणून असं बोलतेस तू.. हो ना.. हो ना लक्ष्मी.."

"दादा म्या खोट बोलत न्हाई. तुझं वाईट म्या चिंतीत न्हाई.. वाटल्यास हीरीत जाऊन बघ.. तुला पटल.. म्या लय प्रयत्न केलंत. म्या अजून इथच हाय.."

रवीला तिचं म्हणणं पटत नव्हतं. तो उठला. विहिरीच्या दिशेने जाऊ लागला. पायऱ्या उतरून तो खाली आला अन् त्यानं पाण्यात उडी मारली. तो खोलवर गेला अन् पुन्हा वर आला. दिवस होता तसाच होता. तो पुन्हा विहिरीच्या वर आला. लक्ष्मी तिथेच बसली होती. ती बोलत होती ते खरं होतं. पण त्याला पटत नव्हतं. तो पुन्हा खाली गेला. लक्ष्मी त्याला आवाज देत त्याच्या जवळ गेली.

"दादा वर ये.." त्याने पुन्हा उडी मारली. आपलं तोंड पाण्यात बुडवून तो पुन्हा वर आला. त्याला लक्ष्मी तिथेच रडवेला चेहरा करून उभी दिसली.

त्याने पुन्हा डुबकी मारली. पुन्हा वर आला. पण नाही. पुन्हा तेच.. तो सतत डुबक्या घेऊ लागला, वर येऊ लागला. लक्ष्मी रडतच होती.. रवी रडत रडत त्याचे प्रयत्न करत होता. पण त्याला अपयश मिळत होत.

तो वर आला अन् पायरीवर बसून रडू लागला. त्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्याला आता समोर फक्त अंधार दिसत होता. काळाचा अंधार. काळाकुट्ट अंधार.

••••

सोनेरी दगड

१५-०२-२०२५

अंतरा आणि अन्विता दोघीही जाधवांच्या समोर बसल्या होत्या. पीएसआय जाधव संपूर्ण प्रकरणाची नव्याने माहिती घेत होते. ध्रुवी बद्दल, रवी बद्दल तसेच लक्ष्मी बद्दल विचारत होते.

रवीच कोणाशी मुंबईत वैर आहे का. गावी कधी कोणाशी वैर होतं का. रवीच्या बाबांचं कोणाशी वैर होत का. रवीचे आणि त्याच्या बाबाचे संबंध कसे होते. तो इतकी वर्ष त्यांच्यापासून लांब का होता इत्यादी प्रश्नांवर त्यांना उत्तर हवी होती. अन्विताला जितकी माहिती होती तितकी ती त्यांना सांगत होती.

जाधवांच समाधान काही होत नव्हत कारण त्यांना कोणत्या बाजूने आता तपास करावा हे कळत नव्हतं. त्यांनी घडलेल्या घटनेनुसार उपलब्ध माहितीनुसार प्रत्येक बाजूने तपास केला होता परंतु त्यांच्या हाती काहीच लागत नव्हत. अन्विताने त्यांना आप्पा पाटील यांच्या विषयी विचारल.

“पाटील कोण आहेत ते तिथून काही लीड सर.?”

“काहीच नाही. माझी शंका होती की या घटनेत त्यांचा हात असावा. परंतु तिथूनही काही लीड्स मिळत नाही.”

"सध्या आपल्याकडे आप्पा पाटील आणि हे जमीन प्रकरण हीच एक लीड आहे." ते पुढे बोलू लागले. "मी श्रीधर रावांच्या मुलीबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तिच्या तपासाची फाईल पाहिली."

"मला बऱ्याच गोष्टी समान वाटल्या. ती सुद्धा दहा वर्षांची असताना हरवली. त्याच ठिकाणावरून जिथून तुमची मुलगी हरवली. त्यानंतर तिचा कुठेच पत्ता लागला नाही. ती कोणालाच दिसली नाही. हे फार विचित्र वाटतंय मला."

"मी असाही विचार करून पाहिला की जर यात सुद्धा आप्पा पाटलांचा हात असता तर त्यांनी पूर्वीच श्रीधर रावांना धमकावून मुलीची भीती दाखवून ती जमीन बळकावली असती परंतु तसं काहीच झालं नाही."

"उलट गावकऱ्यांकडून मला असं कळालं की श्रीधर रावांचे आणि आप्पा पाटलांचे चांगले संबंध होते."

"आप्पा पाटलांना श्रीधर रावांच्या जमिनीत रस होता परंतु त्यांनी कधी धमकावून किंवा पैशांची लालसा दाखवून ती जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला नाही. आणि हीच गोष्ट मला थोडी विचित्र वाटते. आप्पा पाटील नेमका माणूस चांगला आहे की वाईट आहे, हेच नीट कळेनासं झालं आहे."

"बर त्यांची आणखी चौकशी करण्यासाठी आपल्याकडे तसा भक्कम पुरावा देखील नाही त्यामुळे जितकं लांबून करता येईल तितकच काय ते

आपण करू शकतो.” एवढं बोलून पीएसआय जाधव शांत झाले. त्या दोघीही शांतच होत्या.

“चालेल काय असेल तर मी कळवतो.” तेवढं बोलून पीएसआय जाधवांनी तिथून काढता पाय घेतला.

अंतरा अन्विताकडे पाहतच राहिली. पीएसआय जाधवांनी जे काही सांगितलं तीच चर्चा काल त्या दोघींची झाली होती. अंतराला अन्विता जे काही बोलत होती ते आता जरा जरा पटत होत. परंतु अन्विताला नेमकं काय म्हणायचं आहे हेच तिला नीटसं कळत नव्हतं.

खरंतर ते अन्वितालाही माहित नव्हतं फक्त तिला इतकं माहीत होतं की ही घटना काहीतरी वेगळी आहे. ही घटना अपहरणाची, जमीन बळकवण्याची घटना नाही. ज्या प्रकारे लक्ष्मी बेपत्ता झाली त्याच प्रकारे ध्रुवी सुद्धा बेपत्ता झाली. इथे नक्कीच काहीतरी गूढ आहे.

“ताई आता काय मग..?” अंतरा शांत नजरेने म्हणाली.

“आपल्यालाच काहीतरी करावं लागेल अंतरा. आपल्याला असं पोलिसांसारखं शांत बसून धीम्या गतीने चालून नाही चालणार.”

“हो पण आपण नेमकं करायचं तरी काय..?”

“आपण थोड्या वेगळ्या दृष्टिकोनाने विचार करू. आपण बाबा जे करत होते तिथून तपास सुरू करू.”

“म्हणजे.?”

"म्हणजे हेच की आपण बाबांच्या खोलीत जाऊ. त्यांचं काम पाहू. तुलाही कल्पना असेलच की, तू त्यांच्यासोबत राहिली आहेस. त्यांचं काम जवळून पाहिलं आहेस."

"हो पण काकांनी कधी लक्ष्मीचा विषय काढला नाही. त्यांनी कधी रविदादाचा विषय काढला नाही. त्यांनी कधीच पोलीस तपास कसा करत आहेत याची सुद्धा पर्वा केली नाही."

"ते फक्त त्यांच्या संशोधनात गुंतून राहिले. मी समजत होते की लक्ष्मीच्या दुःखापासून, दादाच्या दुःखापासून, कुटुंब गमावल्यामुळे, एकटे पडल्यामुळे त्यांनी असं स्वतःला कोणत्यातरी कामात गुंतवून ठेवलं असेल. त्यांना अंतराळ, ब्रम्हांड यासारख्या इत्यादी विषयाची गोडी लागली असेल. त्यामुळे ते मन रमवण्यासाठी याबद्दल वाचन करत असतील."

"नाही अंतरा ते फक्त आवड म्हणून, हौस म्हणून किंवा मनोरंजनासाठी या गोष्टीत गुंतले नव्हते. हे मी तुला शंभर टक्के खात्रीने सांगू शकते. रवीचे बाबा हे नक्कीच लक्ष्मीला परत आणण्याचे प्रयत्न करत होते. कदाचित त्यांना माहीत होतं की लक्ष्मी कुठे हरवली आहे ते."

"मग त्यांनी तसं कधी सांगितलं का नाही. पोलिसांना का सांगितलं नाही.?"

"कदाचित त्यांना वाटलं असावं की आपण जे सांगणार आहोत ते कोणाला पटणार नाही. किंवा त्यांचा पोलिसांवर विश्वास नसावा. किंवा

असही असू शकतं की त्यांना जे वाटत आहे त्यात त्यांना पूर्णपणे खात्री नसावी. काहीही असू शकत. आपल्याला सध्या काहीच माहित नाही. त्यांचं काम बघितल्याशिवाय आपण काहीच ठरवू शकत नाही." तसं म्हणत अन्विता उठली.

"चल आपण गावात जाऊ. बाबांची खोली तपासू, त्यांचं काम पाहू. त्यावर एक नजर फिरवून बघू. आपल्या काय लक्षात येतं ते पाहू. बाबांना काय शोधायचं होतं कदाचित ते आपल्याला मिळू शकतं."

अंतरा तिच्या मागोमाग खोली बाहेर पडली. दहा-पंधरा मिनिटात ते गावात पोहोचले होते. रवीची गाडी तिथेच एका बाजूला उभी होती. ती दोघं हरवल्यापासून ती गाडी तिथेच होती. ती गाडी पाहताच अन्विताने डोळे भरले. अंतराने तिची कार एका बाजूला लावली आणि त्या दोघीही वरती खोलीत गेल्या.

अंतराने बाबांचं जे काही साहित्य होतं, त्यांच्या ज्या काही नोट्स होत्या त्या सर्व टेबलावर मांडल्या. अन्विता त्यांच्या खोलीचं निरीक्षण करू लागली.

तिला काचेच्या बरण्या दिसत होत्या. त्यात माती, पाणी, दगड यांसारख्या गोष्टी होत्या. बाबांनी भिंतीवर काही ठिकाणं आणि तिथे झालेले उल्कापात या नोंदी करून ठेवल्या होत्या.

अन्विता अंतराला विचारू लागली, "अंतरा तुला काय माहित आहे ? बाबा काय करत होते ? कशाबद्दल माहिती घेत होते ? कोणत्या गोष्टींची चर्चा करत होते ? तुला जितकं माहित आहे ते आधी मला सांग." अंतराने होकारार्थी मान डोलावली.

"ताई, बाबा अंतराळ, ब्रम्हांड तसंच पृथ्वीवर घडणाऱ्या विशिष्ट घडामोडी यांची माहिती सतत वाचायचे. शास्त्रज्ञांच्या मुलाखती, त्यांची पुस्तकं हे ते आवडीने वाचायचे."

"ज्या ज्या ठिकाणी उल्कापात झाला आहे त्या ठिकाणी ते आवर्जून भेट द्यायचे. तिथली माती, पाणी, दगड या गोष्टी घेऊन यायचे. त्यांचं निरीक्षण करायचे. त्याबद्दल माहिती शोधायचे. त्या गोष्टींची चाचणी करून घ्यायचे."

"कशाबद्दल करत आहेत किंवा त्यातून आपल्याला काय कळणार आहे, काय शोधत आहेत त्याबद्दल त्यांनी कधी चर्चा केली होती.?"

"विशेष असं कधी सांगितलं नाही परंतु त्यांना वाटायचं की आकाशातून काहीतरी पृथ्वीवर येतय याचा अर्थ ते नक्कीच काहीतरी विशिष्ट असणार. त्याचे गुणधर्म वेगळे असणार. यासारख्याच गोष्टी ते मला सांगायचे."

"तुमची चर्चा कोण कोणत्या विषयावर व्हायची.?"

"तसं पाहिलं तर आम्ही बऱ्याच विषयावर बोलायचो. अंतराळ किंवा ब्रह्मांड हा विषय असा आहे की आपण जितकं बोलू तितकं कमी आहे. जितकी माहिती घेऊ तितकी कमी आहे. दर वेळेस आपल्याला काहीतरी नवीन समजत. काहीतरी नवीन ऐकायला मिळतं. वाचायला मिळतं. नवीन नवीन गोष्टींचा शोध लागतो."

"तरी सुद्धा तुला कोणत्या विषयावर चर्चा करायला आवडायचं किंवा बाबांना कोणत्या विषयाबद्दल बोलायला जास्त आवडायचं. असा एखादा विषय असणारच की."

"तसं पाहिलं तर मग त्यांना टाईम ट्रॅव्हल बद्दल बोलायला आवडायचं आणि मलाही ते ऐकायला आवडायचं."

"टाईम ट्रॅव्हल.." अन्विता जरा गंभीर होत म्हणाली.

"टाईम ट्रॅव्हल या विषयावर तुमची काय चर्चा व्हायची..?"

"खरंतर मी त्यांना सिनेमे पाहून प्रश्न विचारायची. टाईम ट्रॅव्हल या विषयावर इतके सिनेमे आहेत, ही कॉन्सेप्ट इतकी खोल आहे की मला त्यात खूप मजा वाटायची."

"मला माहित होतं बाबा अंतराळ, ब्रह्मांड यांसारखे विषय वाचतात समजून घेतात."

"मी त्यांना त्याबद्दलच विचारायची. एखाद्या सिनेमामध्ये कशाप्रकारे टाईम ट्रॅव्हल दाखवलं आहे, कशाप्रकारे टेक्नॉलॉजी दाखवली आहे हे सांगायची."

"त्यावर ते काय म्हणायचे.?"

"त्यांच असं मत होतं की हे सिनेमे आहेत ते आपण सिनेमे म्हणूनच पाहिले पाहिजेत. सिनेमांमध्ये दाखवणाऱ्या टेक्नॉलॉजी वर त्यांना काही विशेष असा रस नव्हता. ते म्हणायचे की सिनेमा वाल्यांना फक्त कॉन्सेप्ट माहित आहे."

"त्यांना माहित आहे टाईम ट्रॅव्हल होऊ शकतं परंतु ते कसं होऊ शकत हे त्यांना माहित नाही. सिनेमे बनवणारे या गोष्टींचा अभ्यास करून त्यांच एक कल्पना विश्व तयार करतात आणि त्यातून त्यांच्या कल्पनाशक्तीतून एखादं असं यंत्र बनवतात ज्यातून ते आपल्याला असं दाखवतात की टाईम ट्रॅव्हल होऊ शकत. परंतु प्रत्यक्षात टाईम ट्रॅव्हल असं कामच करत नाही."

"मग बाबांच्या मते टाईम ट्रॅव्हल कसं काम करत.?"

"काका बोलायचे की जर निसर्गाला आपल्याला भूतकाळ दाखवायचा असेल किंवा भविष्यकाळ दाखवायचा असेल तर तो त्याच्या पद्धतीने दाखवेल. आपलं काम हे आहे की त्याची पद्धत कोणती आहे ते आपण ओळखायचं."

"बाबांनी हे सिनेमे पाहिले होते.?"

"हो म्हणजे त्यांना सिनेमा पाहायची आवड होती. मी त्यांना माझ्या लॅपटॉप वरती ते उपलब्ध करून द्यायची."

"ओके. तुला काय वाटतं मग बाबा जे बोलत होते ते कितपत बरोबर असेल किंवा तुझी थेरी काय आहे याबाबत.?"

"टाईम ट्रॅव्हल बाबत.?"

"हो."

"बघ ताई मी पर्वा सुद्धा तुला म्हणाले होते की मी याबाबत गोंधळलेली आहे. म्हणजे शास्त्रज्ञांच म्हणणं आहे की टाईम ट्रॅव्हल कागदावर शक्य आहे. परंतु ते प्रत्यक्षात अशक्य आहे. कारण त्यासाठी भरपूर प्रमाणात आपल्याला ऊर्जा हवी आहे ती निर्माण करणं अशक्य आहे."

"परंतु अशक्य असं काही नसतं."

"हो ते आहेच. पण ताई आपल्यापेक्षा जास्त हुशार शास्त्रज्ञ आहेत. त्यामुळे त्यांच तर आपण ऐकायला हवं ना. कदाचित भविष्यात ते कोणत्यातरी नवीन पद्धतीने टाईम ट्रॅव्हल शक्य आहे असं सुद्धा म्हणतील आपण काय सांगू शकतो."

"ह्म्मऽ.. तुझं पण बरोबर आहे. असं होऊ शकतं."

अन्विताने बाबांच्या संग्रहातील काही पुस्तकं पाहिलीत. ती त्यांच निरीक्षण करू लागली. तिला एकाच नावाची दोन पुस्तकं दिसलीत.

तिने ती पुस्तकं हातात घेतलीत. त्या पुस्तकांचं निरीक्षण करू लागली. त्यातली पानं चाळू लागली. तिला त्यात वेगवेगळ्या आकृत्या दिसत होत्या. टाईम ट्रॅव्हल संबंधित वेगवेगळ्या संकल्पना दिसत होत्या.

तिने ती पुस्तकं पुन्हा खाली ठेवली. तिला त्यातल्या गोष्टी कळेनाश्या झाल्या. ती अंतराला त्याबद्दल विचारू लागली.

"वेळेचे अंतरंग यात काय आहे..? बाबांनी लिहिलं आहे हे पुस्तक.."

"यात ताई टाईम ट्रॅव्हल बद्दलच आहे."

"काय काय आहे.?"

"म्हणजे असंच की, खरंतर बाबांनी हे सोप्या भाषेत सांगितलेलं आहे. टाईम ट्रॅव्हल बद्दल जे काही संशोधन आहे किंवा ज्या काही संकल्पना आहेत त्या शक्यतो आपल्याला लगेच समजणाऱ्या नाहीत. कारण की हा विषय इतका क्लिष्ट आहे की ते सामान्य माणसाला समजावून सांगणं थोड अवघडच आहे. बाबांनी मग सोप्या भाषेत या गोष्टी समजावून सांगितल्या आहेत."

"ओके. सांग त्यातल्या त्यात एक दोन गोष्टी. बघू कळतंय का मला.?"

"बर .. ताई कसं आहे माहिती का, जर समज टाईम ट्रॅव्हल हे शक्य झालं तर मग काही विरोधाभास निर्माण होतात त्यांनाच आपण टाईम ट्रॅव्हलमधले पॅराडॉक्स असं म्हणतो.. पॅराडॉक्स म्हणजेच विरोधाभास."

"आणि कोण कोणते आहेत हे पॅराडॉक्स.?"

"प्रेडेस्टिनेशन पॅराडॉक्स, बूटस्ट्रॅप पॅराडॉक्स, ग्रँड फादर पॅराडॉक्स हा फार फेमस आहे."

"आणि यांचा अर्थ काय होतो टाईम ट्रॅव्हलमध्ये.?"

"आता प्रेडेस्टिनेशन पॅराडॉक्स म्हणजे काय असतो माहितीय का ताई, समज तुला एखादी भूतकाळातली घटना बदलायची आहे तर मग तू काय करतेस, टाईम ट्रॅव्हल करून भूतकाळात येतेस आणि ती घटना बदलू पाहतेस पण तेव्हा तुझ्या लक्षात येतं की ही घटना माझ्या मुळेच घडली आहे. मी जर भूतकाळात गेले नसते तर असं घडलच नसतं."

"अजून जरा सोप्पं करून सांगशील.?"

"उदाहरण घेऊ ताई एक. समज तुझ्या मित्राचा एक्सीडेंट झाला. तुला आता तो एक्सीडेंट थांबवायचा आहे. तू भूतकाळात जाते आणि तो एक्सीडेंट थांबवू पाहतेस पण तो थांबवताना तुझा एक्सीडेंट होतो आणि तेव्हा तुला कळतं की समोर एक्सीडेंट झालेली व्यक्ती म्हणजे तुझा मित्र आहे. म्हणजे हे तुझ्या मुळेच झालं."

"म्हणजे मी भूतकाळात गेले नसते तर.."

"एक्सीडेंट झाला नसता."

"आणि दुसरा कोणता म्हणालीस तो.?"

"बूटस्ट्रॅप पॅराडॉक्स.."

"हा काय आहे.?"

“एखादी गोष्ट भविष्यातून भूतकाळात आणणे.

“उदाहरण.”

“समज भविष्यात तू एक पुस्तक लिहील. आणि कोणीतरी ते पुस्तक तुला भूतकाळात दिलं. आणि तुला सांगितलं हे पुस्तक तू लिहिल आहेस.. पण भूतकाळात तुला ते माहीतच नाही. पण त्याचा अभ्यास करून तू तेच पुस्तक लिहितेस.”

“असं कसं.”

“असंच. म्हणून तर हे विरोधाभास आहेत.”

“आणि तो फेमस वाला म्हणालीस तो..”



तसं अंतराने एक खडू घेतला आणि बाबांच्या खोलीत असणाऱ्या फळ्यावर ती काही लिहू लागली. “हे बघत ताई,” तिने फळ्यावर ग्रँड फादर

पॅराडॉक्स असं लिहिलं आणि लिहीत लिहीत बोलू लागली. "ताई आकृतीकडे नीट काळजीपूर्वक बघ म्हणजे तुला कळेल."

"हो."

"हा पॅराडॉक्स काय सांगतो माहितीय का ? जर समज तुझा जन्म झाला. बरोबर आणि तू टाईम मशीन बनवलीस. तर मग तू मागे भूतकाळात जाशील. तुझ्या आजोबांना भेटशील. आणि तू त्यांना मारून टाकशील."

"का.?"

"असं समज फक्त."

"बर."

"जर तू तुझ्या आजोबांना मारलस तर तुझ्या वडिलांचा जन्म होणार नाही. तुझ्या वडिलांचा जन्म होणार नाही याचा अर्थ तुझाही जन्म होणार नाही. आणि जर तुझाच जन्म झाला नाही तर तू टाईम मशीन कशी बनवलीस."

"याचा अर्थ टाईम मशीन बनली नाही. मग तू भूतकाळात गेली नाहीस. तू आजोबांना मारलं नाहीस. तुझ्या वडिलांचा जन्म झाला, तुझा जन्म झाला."

"मग माझा जन्म झाला तर मी टाईम मशीन बनवणार." अन्विता पटकन म्हणाली.

"बरोबर आणि हे चक्र असंच फिरत राहणार. इथे दोन पॉसिबिलिटी तयार होतात. एकतर तू टाईम मशीन बनवतेस किंवा एक तर तू टाईम मशीन बनवत नाहीस. एकतर तुझा जन्म होतो किंवा तुझा जन्म होत नाही."

"काही कळालं नाही मला अंतरा. अजून सोप्या भाषेत सांग."

"बघ ताई. ही कॉन्सेप्ट कशी काम करते. जर समज तू भूतकाळात जाऊन काही बदललं तर तुझं भविष्य बदलत.. म्हणजे तू भूतकाळात जाऊन काहीच बदलू शकत नाही. त्याने तुझ्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. निसर्ग त्या गोष्टीला परवानगी देणार नाही."

"आणि जर समजा मी बदललं तर..?"

"पहिली गोष्ट अशी आहे की तसं होऊ शकत नाही कारण की निसर्ग त्या गोष्टीला परवानगी देणार नाही. कारण की तू भविष्यातून भूतकाळात गेली आहेस तर मग तुझ्या अस्तित्वावर प्रश्न उभा राहतो."

"तेव्हा ही कॉन्सेप्ट इथे लक्षात घेण्याची ही आहे की, जर तू काही बदललं तर तुझी एक वेगळी टाईम लाईन सुरु होते."

"म्हणजे.?"

"म्हणजे असं की नवीन विश्व तयार होत. दोन विश्व तयार होतात. ज्यात तू आहेस आणि ज्यात तू नाहीस. वेळेवर याचा कोणताच परिणाम होत नाही तो फक्त दुभागला जातो." अंतराने एक सरळ रेषा काढली आणि ती दोन ठिकाणात विरुद्ध बाजूला नेली. "ताई आकृती बघ म्हणजे तुला कळेल."

"म्हणजे दोन शक्यता."

"होय."

"आपलं ब्रह्मांड किती मोठं आहे माहित आहे तुला.?"

"खूप मोठं आहे."

अंतरा गालात हलकीशी हसली. "आपल्याला कल्पना सुद्धा नाही इतकं मोठं आहे. मल्टिपल टाईम लाईन, मल्टी युनिव्हर्स याबद्दल तुला कितपत माहित आहे ताई."

"जेवढं सिनेमामध्ये पाहिलं तितकच."

"जितकं त्यांनी दाखवलंय त्यापेक्षाही भरपूर मोठं आहे. आपलं विश्व हे पसरत जात आहे. ते एक्सपांड होत आहे."



"हो पण विश्वाचा आणि टाईम ट्रॅव्हलचा कसा संबंध जोडू शकतो.?"

"विश्व म्हणजे, हे विश्व आपण तयार करतो. या विश्वाची रचना ही आपल्यामुळे होते."

"कशी काय.?"

"हेच जे मी तुला सांगत आहे पॉसिबिलिटी. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. एक पॉझिटिव्ह आणि एक निगेटिव्ह. या दोन बाजूची दोन विश्व तयार होतात. जर समज तू एखादा निर्णय घेतलास. तर त्या निर्णयाचं एक विश्व तयार होत. आणि जर तो निर्णय घेतला नसतास तर त्या न घेतलेल्या निर्णयाचं एक विश्व तयार होत."

"असं कसं होऊ शकतं.?"

"कसं होऊ शकतं हे माहित नाही पण मल्टी युनिव्हर्स कॉन्सेप्ट आपल्याला हेच सांगते. आणि हे आपल्या पुराणातसुद्धा सांगितलेलं आहे की आपण फक्त एकटे नाही आहोत. अशी भरपूर विश्व आहेत. आणि ही विश्व आपल्यामुळे निर्माण झाली आहेत. आपण घेतलेल्या निर्णयामुळे तयार झाली आहेत."

"अशक्य.. म्हणजे दुसऱ्या एका विश्वात माझ्यासारखीच एखादी अन्विता असू शकते."

"होय. माझ्यासारखीच एखादी अंतरा असू शकते ध्रुवी असू शकते."

"मग त्या विश्वात सुद्धा हेच घडत असेल."

"कदाचित थोडेफार बदल असतील. कारण आपल्या निर्णयावरती ते डिपेंड करत. एखाद्या विश्वात ध्रुवी हरवली नसेल. एखाद्या विश्वात लक्ष्मी हरवली नसेल. काहीही होऊ शकत."

"मग अंतरा या दोघी या विश्वातच हरवल्या नसतील कशावरून.?" अन्विता गंभीर नजरेने म्हणाली.

"ते अशक्य आहे ताई. कारण आपण जे बोलत आहोत हे काही सिद्ध नाही. हे कोणीही पाहिलं नाही. ही फक्त एक थेरी आहे. या फक्त संकल्पना आहेत. आपण आपल्यासारख्याच विश्वाचा शोध घेत आहोत परंतु अजून आपल्याला ते सापडलं नाही. या गोष्टी आपल्या पुराणात आहेत आणि त्या खऱ्या असू शकतात असा आपला विश्वास देखील आहे परंतु आपण त्याच गोष्टीवर विश्वास ठेवतो ज्या गोष्टी आपण डोळ्याने पाहतो ज्या गोष्टी आपल्या समोर सिद्ध होतात."

"तू जे बोलत आहेस ते अशक्य आहे. आणि हे विश्व काही म्हणजे आपल्या बाजूलाच आहे असं नाही." हे विश्व संपूर्ण ब्रम्हांडात आहे. आणि ब्रम्हांडात आपण प्रवास करू शकत नाही. ती ताकद, ते ज्ञान, ती टेक्नॉलॉजी अजून अस्तित्वात नाही."

अन्विता पुन्हा शांत झाली. कारण अंतरा बोलत होती ते काही प्रमाणात तिला पटत होतं.

"विश्वाचं राहू दे. आपण इथलं बोलूया. बाबा ज्या अर्थी या गोष्टींचा अभ्यास करत होते किंवा या गोष्टींवर संशोधन करत होते त्याअर्थी त्यांना नक्कीच असं काहीतरी कळालं असेल ज्याने ते या गोष्टींचा अभ्यास करू लागले ही शक्यता असू शकत नाही का..?"

"नाही सांगू शकत."

"मी सांगते अंतरा. मला तुझं मान्य आहे की टाईम ट्रॅव्हल होऊ शकत नाही, हे अशक्य आहे. मग बाबा या गोष्टींचा विचार का करत होते. ते या विषयात संशोधन का करत होते. त्यांना आवड होती, त्यांचं मनोरंजन होत होतं यासाठी ते हे सर्व करत होते हे मला पटत नाही."

"आता माझं ऐक. मला असं वाटतं की बाबा लक्ष्मीला शोधण्यासाठी त्या विषयाचा अभ्यास करत होते. या विषयात संशोधन करत होते त्यांना खात्री होती की लक्ष्मी ही वेळेत कुठेतरी हरवली आहे त्यामुळे ते वेळेचा अभ्यास करत होते."

"पण ताई."

"साधी गोष्ट आहे अंतरा.. दोन मुली नाहीशा होतात. आपल्या नजरेसमोरून नाहीशा होतात. त्या कोणालाच दिसत नाहीत. असं कसं होऊ शकत. जर समज त्यांचं काही बरं वाईट झालं असेल तर आपल्याला काहीतरी मिळालं असतं. पण तसं काहीच झालं नाही. असं होऊच शकत नाही. बाबांना हीच गोष्ट माहीत होती. कदाचित त्यांनी पाहिलं होतं."

"परंतु ताई म्हणत होती की बाबा त्यावेळी तिथे नव्हतेच. तिथे फक्त लहान मुलं खेळत होतीत."

"मला ते बोलायचं नाही अंतरा. बाबांनी लक्ष्मीला गायब होताना पाहिलं नसेल पण बाबांनी टाईम ट्रॅव्हल होताना पाहिल असेल तर." अंतरा अन्विताकडे गंभीर नजरेने बघू लागली.

"ते कसं शक्य आहे ताई."

"अशक्य का नाही. तूच विचार कर एखादी घटना तुझ्यासमोर घडते परंतु ती शब्दात सांगू शकत नाहीस कारण की तुला माहित आहे, हे अशक्य आहे आणि ते लोकांना पटणारच नाही. मी त्यांना समजावून सांगू शकणार नाही जोपर्यंत मला स्वतःला ते कळत नाही हे कसं काय होत आहे ते. मी लोकांना सांगू शकत नाही की, अशा प्रकारे ही गोष्ट होऊ शकते. अशा परिस्थितीत या गोष्टी मी कोणाला सांगेन. कोण माझ्यावरती विश्वास ठेवेल."

"अंतरा बिलीव्ह मी बाबांना हे माहीत होतं. त्यांचं दुर्दैव इतकं होतं की त्यावेळी त्यांना समजून घेणार कोणी नव्हतं. तू जरी असलीस तरी तू फार लहान होतीस. या गोष्टी तुला तेव्हा कळाल्या नसत्या. बाबांना स्वतःला हे कसं होत आहे हे शोधायचं होतं म्हणूनच ते या गोष्टीत गुंतून गेलेत अंतरा. तुझ्या लक्षात येतंय का."

अंतरा सुन्न झाली होती. तिला काही कळत नव्हतं. अन्विता अशक्य असणारी गोष्ट होऊ शकते हे खात्रीने सांगत होती परंतु तिच्याकडे कोणता पुरावा नव्हता. ती फक्त एक थेरी होती.

"पण ताई. हे खरंच शक्य नाही. जरी टाईम ट्रॅव्हल शक्य झालं तर ते अंतराळात होऊ शकतं पण ते होण्यासाठी ती पद्धत वेगळी आहे ताई ते समजून घे."

"कोणती पद्धत आहे.?"

"बघ ताई, जर टाईम ट्रॅव्हल होणार असेल तर आपण भविष्यात जाऊ शकतो पण भूतकाळात कदापि जाऊ शकत नाही. निसर्ग या गोष्टीला परवानगी देऊच शकत नाही."

"असं नाही अंतरा.. आपल्याला ज्या गोष्टी कधी माहित नव्हत्या याचा अर्थ असा नव्हता की त्या कधीच अस्तित्वात नव्हत्या. या गोष्टी निसर्गात होत्या, आपल्याला फक्त वेळ आली तेव्हा त्या कळाल्या. तुला काय वाटतं हे अंतराळ, हे ब्रह्मांड हे आज निर्माण झालं. नाही.. हे आधीपासून होतं फक्त माणूस विकसित होत गेला तसं तसं त्याने ते शोधून काढलं. त्या त्या वेळेला निसर्गाने त्याला मदत केली."

"असेल ताई. पण आपण जे बोलत आहोत त्याला काही शास्त्रीय पुरावे सुद्धा हवेत ना. आता मी काय सांगत आहे ते आधी ऐक."

"बर बोल."

"शास्त्रज्ञांचं मत आहे की आपण भविष्यात टाईम ट्रॅव्हल करू शकतो पण कसं ते ऐक. आईन्स्टाईन काय म्हणतो माहितीय का, वेळ ही प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या गतीने चालते. उदाहरण द्यायचं झालं तर जर तू अंतराळात प्रवास करत आहेस तर जितका वेळ तू अंतराळात प्रवास करशील त्यामानाने पृथ्वीवर खूप वर्षे उलटून गेली असतील."

"मग अंतराळवीर वर जाऊन पुन्हा येतात ते."

"ताई प्रवास म्हणजे संपूर्ण अंतराळात प्रवास, संपूर्ण ब्रम्हांडात प्रवास. विशेष करून ब्लॅक होल जवळचा प्रवास. कारण तिथे गुरुत्वाकर्षण भरपूर प्रमाणात असतं.. वेळ तिथे जवळजवळ थांबतेच असा प्रवास.. हा प्रवास म्हणत आहे मी. जो अजून झाला नाही. हे एक शास्त्रीय मत आहे. जे आईन्स्टाईनने मांडलं आहे. ज्याला भरपूर शास्त्रज्ञांनी पाठिंबा दिला आहे.

जेव्हा तू असा प्रवास करतेस आणि पुन्हा पृथ्वीवर येते तेव्हा पृथ्वीवरती बरीच वर्षे उलटून गेली असतील. तुझ्यासाठी अंतराळातला एक दिवसाचा प्रवास, हा पृथ्वीसाठी कितीतरी वर्षांचा प्रवास असू शकतो. याचा अर्थ तू जेव्हा पृथ्वीवर येशील तेव्हा भविष्यात आली असशील. या प्रकारचं टाईम ट्रॅव्हल होऊ शकतं. पण हे सुद्धा अजून झालं नाही. हे सुद्धा एक शास्त्रीय मत आहे. एक संकल्पना आहे."

"टाईम ट्रॅव्हल जर झालं तर आपण भविष्यात जाऊ शकतो परंतु आपण भूतकाळात जाऊ शकत नाही."

"असेल अंतरा. तसंही असेल. पण ज्या प्रकारे तू बोलत आहेस की ही फक्त संकल्पना आहे बरोबर."

"होय."

"आणि शास्त्रज्ञ त्यावर अभ्यास करत आहेत.. त्यावर संशोधन करत आहेत हेही खरं."

"होय."

"मग अंतरा बाबांना एखादी संकल्पना कळाली असेल आणि ते त्यावर संशोधन करत असतील असं होऊ शकत नाही का..? बघ ना, तू जरा ही खोली बघ. इथल्या वस्तू बघ. इथली प्रत्येक गोष्ट अंतराळाशी, वेळेशी संबंधित आहे." अंतरा शांत होती.

"अंतरा मला तुझं सगळं पटतंय.. मला सगळ्या संकल्पना मान्य आहेत.. पण माझं म्हणणं ऐकून घे. मला फक्त इतकं बोलायचं आहे की लक्ष्मीचं किंवा ध्रुवीचं गायब होणं ही काही साधी घटना नाही. त्या जर आपल्या जगात गायब झाल्या असत्या तर त्यांच्याबद्दल आपल्याला काहीतरी कळालं असतं. पण मला असं वाटत आहे की त्या गायब झाल्या आहेत परंतु त्या आपल्या जगात नाहीत. त्या एका वेगळ्या जगात, एका वेगळ्या वेळेत गायब झाल्या असतील. आपण त्यांना इथे शोधत आहोत परंतु त्या इथे नाहीत. आपण त्यांना तिथे शोधायला हवं जिथे त्या आहेत."

"आणि याच जगाचा शोध बाबा घेत होते. त्या जगात जाण्याचा रस्ता बाबा शोधत होते. आणि त्या जगात जाण्यासाठीच त्यांचं टाईम ट्रॅव्हल वर संशोधन सुरू होतं. बघ ही पुस्तक. बघ इथल्या वस्तू. इथली प्रत्येक गोष्ट वेळेशी संबंधित आहे."

"पण ताई, जर समज त्या गायब झाल्या, तर कशा गायब झाल्या. कुठे गायब झाल्या.. त्यांना आकाशाने उचललं की जमिनीने गिळलं. तसं असतं तर मग आतापर्यंत किती तरी लोकं गायब झाली असती. याचा पण तू विचार कर ना." अन्विता शांत झाली. अंतरा बोलत होती त्यात पण तथ्य होतं.

ती शांत नजरेने बोलू लागली, "अंतरा मला माहित नाही त्या नेमक्या कश्या गायब झाल्या. त्यांना आकाशाने उचललं की जमिनीने गिळलं हे मला माहित नाही. पण एवढं नक्की की त्या निसर्गाच्या मदतीने कुठे तरी गायब झाल्यात. आता ते कसं झालं, काय झालं याचं रहस्य काय आहे हे मला माहित नाही. मला वाटतं ते बाबांना माहित होतं. आणि त्याचाच ते अभ्यास करत होते."

"माझं असं ठाम मत आहे अंतरा की, बाबांना टाईम ट्रॅव्हल होऊ शकतं हे माहित होत आणि ते कसं करायचं किंवा त्यासाठी काय हवं याच गोष्टीचा शोध ते घेत होते."

अंतरा शांतच होती. तिला कुठेतरी अन्विताच म्हणणं पटत होतं परंतु अन्विताच्या बोलण्यावर विश्वास ठेवायला कोणताच पुरावा उपलब्ध नव्हता. ही फक्त एक थेरी होती. जी खरी सुद्धा असू शकत होती किंवा खोटी सुद्धा असू शकत होती. अंतरा विचारातच हरवून गेली होती.

••

३०-०१-१९२५

दिवसभर प्रयत्न करून देखील टाईम ट्रॅव्हल होत नव्हतं. परंतु रवी काही त्याची जिद्द सोडत नव्हता. दिवस आता मावळला होता. रात्र झाली होती. अर्धचंद्राच्या प्रकाशात रवी विचार करत बसला होता.

त्याला काहीच सुचत नव्हतं. लक्ष्मीने जे सांगितलं ते खरं होतं. रवी इथे अडकून पडला होता. त्याला भविष्यात त्याच्या वेळेत जायचं होतं परंतु तो जाऊ शकत नव्हता.

टाईम ट्रॅव्हल बंद का झालं हे त्याला कळत नव्हतं. त्याचे प्रयत्न सुरू होते. त्याने पुन्हा विहिरीत उडी मारली. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. टाईम ट्रॅव्हल होत नव्हतं. त्याला आता भीती वाटत होती. जर तो इथेच अडकून बसला तर काय होईल या विचारानेच त्याचं डोकं सुन्न झालं होतं..

त्याने शेवटचा एक प्रयत्न केला अन् तोही अयशस्वी झाला. तो मान खाली घालून पुन्हा मास्तरांच्या घरी गेला. रवीला ओलाचिंब आलेला बघून मास्तर गोंधळून गेले होते.

"पाव्हणं हे काय म्हणायचं.?"

"काही नाही जरा विहिरीत एक उडी मारली."

"रातच्याला." रवीने होकारार्थी मान डोलावली.

मास्तर त्याच्याकडे गंभीर नजरेने पाहू लागले त्यांना हे काहीतरी भलतंच वाटू लागलं. त्यांनी घरात जाऊन कोरडा कपडा आणला आणि रवीला दिला.

लक्ष्मी चुलीसमोरच बसली होती. तिला काय होत आहे हे माहीत होतं. परंतु ती काही बोलू शकत नव्हती. मास्तर तिच्याजवळ गेले.

"लक्ष्मे जरा वाईच चाऽ करतीस का पावण्यास्नी." लक्ष्मीने शांत मुद्रेत मान डोलावली.

"लक्ष्मे पाव्हण्याचं मला काय खरं वाटंना आता.. रातच्याला हीरीत पव्हून आल्यात. पव्हाय गेल्ते का जीव द्याय गेलते मला जरा शंकाच हाय.." मास्तर गंभीर चेहऱ्याने बोलू लागले.

"पाव्हण्याकडं लक्ष ठेवाय पायजे. उगा जीवाचं काय तर वंगाळ करून घितील."

"ठिवा लक्ष." लक्ष्मी त्यांच्याकडं न बघताच म्हणाली.

"तुला आणि काय झालं म्हणायचं.?"

"कुठं काय."

मास्तर जरा शांतच झाले अन् बोलू लागले, "लक्ष्मी आनि दोन दिस फकस्त कड काड.. त्यो गोंद्या आला की मी सवता पावण्यास्नी घिऊन जातो. मला बी कळतय खरं काय करायचं. हरवलेल्यास्नी वाट दावाय नको का.."

मास्तरांनी लक्ष्मीच्या शांततेचा वेगळा अर्थ घेतला होता. परंतु तिच्या आत सुरू असलेल्या थैमानाची त्यांना कल्पना नव्हती. तिने भरल्या डोळ्याने चहा पेल्यात काढला अन् मास्तर तो पेला घेऊन बाहेर गेले.

रवीने गरम गरम चहा पिऊन घशाला गरम केलं. मास्तरांचं बोलन रवीन ऐकलं होतं. त्याला त्यांची परिस्थिती कळत होती पण तो त्यांना काही मदत करू शकत नव्हता. तो घरात गेला अन् खुट्टीवर अडकवलेली पॅंट घेऊन बाहेर आला. त्याने खिशात हात घातला. पण त्याच्या एक गोष्ट लक्षात आली. त्याच्या जवळचे पैसे या वेळेत चालणार नव्हते.

त्याच्या हाताला त्याचं ब्रेसलेट लागलं. ध्रुवीचं पैंजण लागलं. त्याची सोन्याची एक चैन लागली. ही तिचं चैन होती जी त्याने अन्विताच्या वाढदिवसाला केली होती. यात सुद्धा तोच सोनेरी रंगाचा एक छोटासा दगड होता जो त्याने हार्ट शेपमध्ये तयार केला होता. त्याने तो दगड काढला. ते काही सोन नव्हतं. तो दगड काढता काढता खाली पडला.

त्याची नजर त्या दगडावरच खिळून राहिली. हा तोच दगड होता जो त्याला लहान असताना घरातल्या अडगळीच्या खोलीत एका पेटीत सापडला होता. सोनेरी रंगाचा चकाकणारा दगड. या दगडामुळेच रवीची अन लक्ष्मीची भांडणं झाली होतीत. लक्ष्मी रडायला लागली तेव्हा त्याने हा दगड तोडून त्याचे दोन तुकडे केले होते. पण दगड तोडताच त्याचे दोन तुकडे हे आणखी चांगले दिसू लागले होते. हा दगड आधीपेक्षा जास्त चकाकू लागला होता. तेव्हा त्याने एक दगड लक्ष्मीला दिला अन् एक दगड स्वतः जवळ ठेवला. त्याला लहान असताना तेव्हा हा दगड म्हणजे सोन्याचा हिरा वाटत होता परंतु तसं नव्हतं. तो सोन्याचा दगड नव्हता. हा विशिष्ट दगड होता. याचं उद्दिष्ट वेगळंच होतं जे रवीला अजून कळालं नव्हतं.

दगडाला पाहताच रवीच्या डोक्यात विविध प्रसंग येऊ लागले. हा दगड भेटल्या नंतरच लक्ष्मी गायब झाली होती. हाच दगड ध्रुवीकडे असणाऱ्या चैनीत होता. अन् हाच दगड रवीकडे असणाऱ्या चैनीत होता. त्याला हा गुंता सुटू लागला. काही काही गोष्टी त्याला कळू लागल्या. अन् नकळत बऱ्याच दिवसांनी त्याच्या चेहऱ्यावर सकारात्मक हसू आलं होतं.

त्याला टाईम ट्रॅव्हल कशामुळे होत आहे हे कळाल होतं. तो घरी जाऊ शकत होता. त्याने सकाळीच इथून निघून जाण्याचा निर्णय घेतला.

••••

चुकामूक

३१-०१-१९२५

रवीने सकाळी डोळे उघडले तेव्हा तो एकटाच होता. मास्तर अन् लक्ष्मी सकाळीच कुठे तरी गेले होते. घरात मास्तरांची पोरं झोपून होतीत. मास्तर कुठे गेले हे त्यांना काही समजत नव्हतं. तो उठला अन् विहिरीच्या दिशेने चालू लागला.

त्याला आता इथून निघून जायचं होतं परंतु मास्तर अन् लक्ष्मी दोघेही कुठेतरी गेली होतीत. त्यांना भेटूनच इथून जायचं असं त्यानं ठरवलं अन् तिथेच विचार करत बसून राहिला.

••

१६-०२-२०२५

अन्विता अन् अंतरा सकाळीच गावात आल्या होत्या. अन्विताचा तिच्या थिअरी वर पुर्ण विश्वास होता परंतु ते सिद्ध करण्यासाठी तिच्या जवळ कोणताच पुरावा नव्हता.

ती बाबांच्या खोलीतील वस्तूंवर पुन्हा पुन्हा नजर फिरवत होती. बाबांनी त्यांच्या खोलीतील भिंतींवर काढलेली रेखाचित्रे, चंद्राच्या विविध

आकृत्या, उल्कापात झालेल्या ठिकाणची रेखाचित्रे त्याबद्दलची माहिती ती लक्ष देऊन पाहत होती.

अंतरा बाबांच्या नोट्स, त्यांची पुस्तकं पुन्हा पुन्हा चाळत होती. बाबांनी कुठे काय लिहून ठेवलं आहे का ते शोधण्याचा प्रयत्न करत होती.

अन्विता उल्कापात झालेल्या ठिकाणांची माहिती पाहताना तिला काही माहिती ओळखीचं वाटू लागली. तिने ती अंतराला दाखवली.

"हो इथलीच माहिती आहे ती."

"तुला हे माहित होतं.?"

"हो म्हणजे सर्वांना माहीत आहे. इथे गावात उल्कापात झाला होता ते. रेकॉर्ड मध्ये आहे ते." अन्विता थोडी गंभीर झाली.

"अंतरा तुला यात काही विशेष वाटत नाही.?"

"नाही.. का..? आपल्या गावात उल्कापात झालाय यात विशेष काय. असा उल्कापात होत असतो. महाराष्ट्रात कित्येक ठिकाणी झालंय असं. यात आपलं गाव पण आहे यात काही विशेष नाही."

अन्विता तरीही गंभीर होती.

"ताई मला कळतंय तुला काय बोलायचं आहे ते.. पण तू जे विचार करतेस तसं काही नाही. उल्कापाताचा आणि टाईम ट्रॅव्हलचा काहीही संबंध नाही. दूर दूर पर्यंत नाही."

अन्विता काहीच म्हणाली नाही.

"शास्त्रज्ञांच काय मत आहे.?"

"विशेष काही नाही. असं होत असतं. हे काही वेळेशी संबंधित नाही. आतापर्यंत तसं कधी आढळलं नाही."

"कदाचित आता आढळेल."

"ताई.." अंतरा या गोष्टीला काहीही अर्थ नाही अशा नजरेने पाहू लागली.

"विचार कर ना अंतरा. या गावात उल्कापात झाला होता. आणि याच गावातून दोन मुली बेपत्ता झाल्या आहेत. अतिशय गूढ पद्धतीने. विचित्र वाटत नाही."

"ताई ज्या मुली बेपत्ता झाल्या आहेत त्या हल्ली झाल्या आहेत. उल्कापात शंभर वर्षांपूर्वी झाला होता. कुठेच जवळ जवळ संबंध नाही. आणि पहिली गोष्ट म्हणजे असं काहीही होऊ शकत नाही."

"का ?"

"कारण तसं कधी झालं नाही. त्याला कोणता पुरावा नाही. या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत."

"पण अंतरा."

"प्लीज ताई. मला माहित आहे. तू काहीतरी क्लू शोधायचा प्रयत्न करत आहेस पण ताई तू बोलतेस ते इलॉजिकल आहे. तुला कसं समजावू

मी.” तशी अंतरा पुन्हा ती पुस्तकं चाळू लागली. अन्विता शांत झाली अन् त्या माहितीत हरवून गेली.

अंतरा पुन्हा पुन्हा त्या नोट्स पाहत होती. पुस्तकं चाळत होती. पण ठोस असं तिच्या हाताला काही लागत नव्हतं. तिने वैतागून ती पुस्तकं विस्कटली. अन् डोक्याला हात लावून बसली.

अन्विता तिला पाहून जरा नाराज झाली. अंतराचा मनस्ताप ती समजू शकत होती. तिला आपण उगाच यात गुंतवून घेत आहोत अन् तिचा वेळ वाया घालवत आहोत असं तिला वाटू लागलं. ती अंतरा जवळ जाऊ लागली.

अंतराने डोक्याला हात लावला असतानाच तिच्या नजरेला काही तरी दिसू लागलं. तिने ती पुस्तकं हातात घेतली.

श्रीधररावांनी लिहिलेलं ते एक पुस्तक होत. त्याचं नाव “वेळेचे अंतरंग” असं होतं. त्या पुस्तकाच्या दोन प्रति तिच्या हातात होत्या. ती पुस्तकं ती निरखून पाहू लागली.

दोन्ही पुस्तकांची तुलना करू लागली. त्या दोन्ही पुस्तकातली माहिती एकच आहे का हे ती तपासू लागली. हळूहळू तिचा वेग वाढला. तिच्या भुवया उंचावू लागल्या. तिचे डोळे मोठे होऊ लागले. अन्विताच्या लक्षात आलं तिला नक्कीच काही तरी महत्वाच कळाल होतं.

“अंतरा.”

अंतराने तिला थांब असा इशारा करत ती पुन्हा ती पुस्तकं पाहू लागली. ती पळत पळत आतल्या खोलीत गेली अन् तिने वेळेचे अंतरंग या पुस्तकाचा गठ्ठा उचलून आणला. तिने त्या गठ्ठ्यातलं एक पुस्तक काढलं अन् पुन्हा माहिती तपासू लागली.

ती त्या गठ्ठ्यातली पुस्तकं काढत राहिली अन् दुसऱ्या पुस्तकाशी तुलना करू लागली. तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले होते. अन्विता तिला फक्त पाहत होती. तिला सुद्धा काय चाललं आहे याची कल्पना नव्हती.

अंतराने मोबाईल घेतला अन् त्या पुस्तकात पाहून एक नंबर डायल केला.

"हॅलो. सरस्वती प्रकाशन.. मी अंतरा देशमुख.. श्रीधर रावांना ओळखत असाल.. हो हो हो.. तेच तेच.. मी त्यांची भाची आहे.. हो हो.. नाही त्यांची लहान मुलगी बोलतेय मी.. ती माझी मोठी बहीण.. हो हो.. काम म्हणजे मला एक विचारायचं होत.. काकांनी पुस्तक छापलं होतं एक.. हो हो तेच.. त्याबद्दलच.."

अन्विता तिला गंभीर होऊन पाहतच होती.

"आता बाजारात कितवी आवृत्ती आहे आपली.. बर बर.. किती प्रति होत्या.. बर बर.. बरोबर बरोबर.. होय आहेत की.. होय होय.. ह्म्मऽ ह्म्मऽ..

नाही ते बरोबर आहे.. होय होय.. चालेल चालेल.. कळवते कळवते.. हो हो.. चला..”

तसा अंतराने मोबाईल खाली घेतला. तिने दुसरं पुस्तक हातात घेऊन नंबर डायल केला अन् ती मोबाईलच्या स्क्रीनकडे बघतच राहिली. ती तशीच डोक्याला हात लावून खुर्चीवर बसली. अन्विता तिच्या जवळ गेली.

“अंतरा काय झालंय.. मला पण सांगशील..”

अंतरा डोळे मोठे करून अन्विताला पाहू लागली.

“ताई तू बरोबर बोलत होतीस. काका बरोबर होते ताई.. ते आयुष्यभर एकाच गोष्टीचं संशोधन करत होते. ती आवड नव्हती. ते मनोरंजन नव्हतं. तो एक प्रयत्न सुरू होता. स्वतःच्या मुलीला परत आणण्याचा प्रयत्न सुरू होता. लक्ष्मीला शोधण्याचा प्रयत्न सुरू होता..”

अन्विताला चांगलाच धक्का बसला. ती जागची हलली. तिला आता कळून चुकलं होतं.. ती अंतराला भरल्या डोळ्यांनी बघत होती.

“होय ताई तू बरोबर होतीस. हे एक टाईम ट्रॅव्हल आहे.” अंतराने ते दुसरं पुस्तक वर उचललं अन् म्हणाली, “बूटस्ट्रॅप पॅराडॉक्स.” अन् भरल्या डोळ्यांनी ती पाहू लागली.

अन्विताला रडू कोसळलं ती ध्रुवीच नाव घेऊन रडू लागली. अंतराचे ही डोळे भरून आले. ती तिच्या जवळ जाऊन गुढघ्यावर बसली अन् तिचं सांत्वन करु लागली.

दोघीही रडू लागल्या. काही वेळाने अंतरा शांत झाली तिने अन्विताला शांत केलं. तिला पाणी पिऊ दिलं.. काही वेळाने अन्विता शांत झाली.

"ताई" अंतराने अन्विताकडे हसून पाहिलं अन् तिला मिठी मारली.. "तू बरोबर होतीस ताई.. सॉरी माझं चुकलं.. मी नाही पाहू शकले तुझ्या नजरेने.."

अन्विताने प्रेमाने तिच्या गालाला हात लावून नकारार्थी मान हलविली. तिचे डोळे अजूनही भरले होते. तिला बोलता येत नव्हतं.

"गप ताई.. आता नको रडू.. आता ही रडायची वेळ नाही.." तसं बोलत अंतरा बोलू लागली, "ताई ही दोन पुस्तकं बघ." अंतराने तिच्या हातात वेळेचे अंतरंग ही दोन पुस्तकं ठेवली. "ही एकच पुस्तकं नाहीत. ही पुस्तकं दोन वेगवेगळ्या काळातील आहेत." अन्विता तिचं बोलणं ऐकतच होती.

"ताई हे जे पुस्तक आहे," अंतरा एका पुस्तकावर बोट निर्देश करत बोलू लागली, "ते आत्ताचं पुस्तक आहे आणि हे दुसरं भविष्यातलं पुस्तक आहे."

"कसं ओळखलं तू.?"

"प्रकाशन दिनांक बघ.. प्रकाशक बघ.. दोन्ही वेगळे आहेत. एक पुस्तक नोव्हेंबर २०२४ चं आहे. प्रकाशक आहेत सरस्वती प्रकाशन आणि तारीख आहे २६-११-२०२४. म्हणजे मागच्या वर्षीची."

"आणि दुसरं पुस्तक बघ.. २०५० सालच आहे.. प्रकाशक आहेत दुर्वा पब्लिकेशन हाऊस.. आणि आवृत्ती आहे अकरावी.."

"आधी मला ही प्रिंटिंग मिस्टेक वाटली.. म्हणून मी माहिती तपासली. थोडी पुढे मागे आहे. काही बदल आहेत.. २०५० ची कॉपी आणि २०२४ ची कॉपी यात बदल आहेत. या गठ्ठ्यातली सगळी पुस्तकं सारखी आहेत पण हे पुस्तक वेगळं आहे."

"मी प्रकाशकाला फोन लाऊन कन्फर्म केलं. आता बाजारात पहिली आवृत्ती आहे. अजून म्हणावी तशी विक्री होत नाही." तशी अंतरा शांत झाली अन् पुन्हा बोलू लागली. "ताई गेज कर २०५० मध्ये या पुस्तकाचा प्रकाशक कोण असेल."

अन्विता गंभीर नजरेने म्हणाली, "रवी.."

हो ताई." अंतराने तिला मोबाईलची स्क्रीन दाखवली अन् डायल केलेला नंबर दाखवला. अन्विता गंभीर होती.

"ताई हे पुस्तक भविष्यातून आलं आहे. हा बूटस्ट्रॅप पॅराडॉक्स आहे जो इथे सिद्ध झाला आहे." अंतरा हसऱ्या नजरेने म्हणाली.

अन्विता अजूनही गंभीर होती.

"काय झालं ताई.?"

"कोणी आणलं असेल हे पुस्तक भविष्यातून..?" अन्विता गंभीर नजरेने म्हणाली.

"आणलं असेल कोणी तरी. पण हे तर सिद्ध झालं आहे ताई की टाईम ट्रॅव्हल होऊ शकतं." अंतरा हसत म्हणत होती. पण अन्विता अजूनही गंभीर होती.

"ताई तुला काय वाटतंय तुझ्या मनात काय आहे?"

अन्विता गंभीर नजरेने मान हलवू लागली अन् बोलू लागली.

"काही नाही अंतरा. टाईम ट्रॅव्हल तर इथे सिद्ध झालं आहे पण.."

"पण काय आता ताई.?"

"ध्रुवीला आपण कुठे शोधायचं. भविष्यात की भूतकाळात. ती आता कुठे असेल. काय करत असेल..?"

"शांत हो ताई. आपण तिला शोधून काढू. आपल्याला निदान हे तर कळाल आहे की आपल्याला आता तपास कोणत्या दिशेने करायचा आहे. कोणत्या दृष्टीकोनातून करायचा आहे."

अन्विताने होकारार्थी मान डोलावली अन् ती खुर्चीतून उठली. ती पुन्हा सगळ्या वस्तूवर नजर फिरवू लागली.

"कुठून सुरुवात करूया..?"

अंतरा तिला पाहून गालात हसली. अन् तिने पुन्हा अन्विताला मिठी मारली.. "लव यू ताई.." तसं म्हणत ती बोलू लागली.

"आता बघ ताई आपल्याला हे कळालं आहे की ही एक टाईम ट्रॅव्हलची घटना आहे. म्हणजे लक्ष्मी, ध्रुवी आणि आता रवी दादा हे वेळेत

कुठे तरी अडकले आहेत. आपल्याला आता हे टाईम ट्रॅव्हल कसं होतं ते ओळखायचं आहे अन् त्यांना परत आणायचं आहे." अंतरा फारच उत्साहाने बोलू लागली. अन्विता अजूनही शांत होती.

"मग आपल्याला काय माहित आहे आता टाईम ट्रॅव्हल कसं होत असेल.. कसं करायचं आहे..?"

तशी अंतरा एकदम शांत झाली. तिचा उत्साह एकदम कमी झाला. तिने डोक्यालाच हात लावला.

"शीट.. शीट.." तसं म्हणत ती पुटपूटू लागली. "हेच तर माहित नाही आपल्याला."

"एक्झॅक्टली अंतरा. आपल्याला हेच माहीत नाही. बाबांना सुद्धा हेच माहीत नव्हतं आणि ते याच गोष्टीच संशोधन करत होते. टाईम ट्रॅव्हल कसं होतं, ते करायचं कसं.. आता आलं तुझ्या लक्षात.."

"हो ताई बरोबर.. सॉरी.. मी फारच एक्साईटेड झाले होते.."

"असू दे सॉरी नको बोलूस बाळ.. ही एक्साईटमेंट वाढवणारीच गोष्ट आहे.. आणि ही गोष्ट तुझ्याच लक्षात आली आहे.." अंतरा अजूनही विचारातच होती.

"मला सांग अंतरा शास्त्रज्ञांच्या मते आपण या गोष्टीचा कसा विचार करू शकतो."

"म्हणजे..?"

"म्हणजे असं की त्यांच्या मते आपण कसं काय ट्रॅव्हलिंग करू शकतो..?"

"तेच तर एक्झॅक्टली माहित नाही. जसं की मी तुला सांगितलं, आपण जर अंतराळातून प्रवास करत आहोत आणि एका वर्षाने पृथ्वीवर आलो तर आपण भविष्यात येतो. म्हणजे पृथ्वीवर बरीच वर्षे उलटून गेलेली असतात. परंतु आपलं वय एका वर्षानेच वाढतं. पण इथे तर सगळं उलटच आहे. हे पुस्तक भविष्यातून भूतकाळात आल आहे. याचा अर्थ कोणीतरी ते घेऊन आलं आहे. शास्त्रज्ञांचं असं मत आहे की आपण भूतकाळात मागे जाऊ शकत नाही आणि हे पुस्तक भविष्यातून भूतकाळात आलं आहे. आता हे कसं तेच मला कळत नाही या गोष्टीचं काय लॉजिक असेल."

"कळेल कळेल. वेळ लागेल. पण नक्की कळेल. आपण यावर चर्चा करू."

"चालेल."

"मला सांग शोधायचं झालं तर आपण त्यांना कुठे शोधू शकतो भूतकाळात की भविष्यकाळात.?"

"खरं सांगू तर ताई मला कळतच नाहीये. ते नेमके भविष्यात गेलेत की भूतकाळात अडकले आहेत हे सांगणं खरंच अवघड आहे कारण की वेळ ही सुरूच असते. थांब तुला सांगते." तसं अंतराने एक खडू घेतला अन्

फळयावर एक लांब आडवी रेघ ओढली. रेषेचे तिने तीन भाग केले अन् बोलू लागली.

"ताई हे बघ.. हा पहिला भाग आहे भूतकाळ जो घडून गेला आहे. हा मधला भाग आहे वर्तमानकाळ जो घडत आहे. आणि हा तिसरा भाग आहे भविष्यकाळ जो घडणार आहे.

आता सध्या आपण वर्तमानात आहोत बरोबर. पण भूतकाळ जो घडून



गेला आहे तो आपल्याला माहित आहे. आणि भविष्यकाळ जो घडणार आहे तो आपल्याला माहित नाही. परंतु या वेळेला भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ हे तिन्ही काळ एकत्रित सुरू आहेत वेगवेगळ्या कालखंडात."

"आपल्यासाठी भूतकाळ घडून गेला, वर्तमान काळ घडतोय आणि भविष्यकाळ घडेल. परंतु वेळ असं काम करत नाही. वेळ ही सुरूच असते."

"आता आपल्यापुढे हा प्रश्न आहे की आपण त्यांना भूतकाळात शोधायचं की भविष्यकाळात शोधायचं. आणि त्यापेक्षाही मोठा प्रश्न हा आहे की आपण त्यांना शोधायचं कसं. आपण त्यांच्या जगात जायचं कसं.

आपण त्यांच्या कालखंडात पोहोचायचं कसं. आणि जर पोहोचलो तर पुन्हा परत आपल्या वेळेत यायचं कसं. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे ताई. कारण की जरी आपण त्या कालखंडात गेलो तर पुन्हा आपल्याला आपल्या कालखंडात येणं फार गरजेचं आहे नाहीतर अनर्थ घडू शकतो.''

''काय होईल.?''

''एकाच कालखंडात दोन अंतरा राहू शकत नाहीत ताई. एकाच कालखंडात दोन अन्विता राहू शकत नाहीत. जी ज्या काळातली आहे तिला त्या काळात असणं गरजेचं आहे तसं नाही झालं तर याने भविष्याला धोका पोहोचू शकतो.''

''म्हणजे जरा अजून विस्तार करून सांग.''

''हे बघ ताई.. मल्टिपल टाईम लाईन ही गोष्ट ऐकून माहित असेल तुला.''

''होय.''

''ही कॉन्सेप्ट कशी आहे माहितीय का, एकाच वेळी आपल्या मल्टिपल टाईम लाईन सुरू असतात. आता उदाहरण घे आपण बोलत बसलो आहोत. तर आपली ही टाईम लाईन सुरू आहे. आपण दुपारी जेवलो ती आपली वेगळी टाईमलाइन होती जी घडून गेली होती. त्याच्याही आधी आपण सकाळी नाष्टा केला ती आपली वेगळी टाईम लाईन होती जी घडून गेली होती. उद्या सकाळी आपण पुन्हा नाश्ता करू उद्या दुपारी आपण

पुन्हा जेवण करू. या दोन्ही वेगवेगळ्या टाईम लाईन या अजून घडायच्या असतील आपल्या बाबतीत परंतु त्या भविष्यात घडत आहेत.

अशावेळी आपण त्या टाईम लाईन मध्ये गेलो आणि तिथेच अडकून बसलो तर आपलं सध्याचं वर्तमान अस्तित्वात राहणार नाही. आपण ज्या टाईम लाईन मध्ये अडकून बसू तीच आपली टाईम लाईन होऊन जाईल. आणि तेच आपलं वर्तमान होईल. परंतु त्या टाईम लाईन मध्ये ऑलरेडी एखादी अंतरा असू शकेल, अन्विता असू शकेल अशा परिस्थितीत कोणाला तरी एकालाच राहावं लागेल. एका टाईम लाईन मध्ये एकच व्यक्ती.

अन्विता गंभीर होती.

"मग रवी आणि ध्रुवी कोणत्या टाईम लाईन मध्ये असतील. त्यांना त्यांच्यासारखेच रवी आणि ध्रुवी भेटले असतील का.?"

"हेच तर आपल्याला माहित नाही ताई. ते नेमके कोणत्या टाईम लाईन मध्ये आहेत."

दोघीही शांत झाल्या.

अन्विता बोलू लागली, "अंतरा हे पुस्तक बाबांनी कधी लिहिल.?"

"प्रकाशित तारीख तर २०२४ आहे."

"होय पण याचा अर्थ त्यांनी एका वर्षात लिहिलं असेल असं तर नसेलच ना. ते पूर्वीपासून लिहीत असतील."

"होय असं असू शकत."

"तुला काही आठवत आहे का की त्यांनी केव्हापासून लिहायला सुरुवात केली असेल.?"

"नाही ताई. त्यांनी जेव्हा प्रकाशित केलं तेव्हाच मला कळाल.

"बर याआधी कधी हे पुस्तक तुझ्या नजरेला पडलं होतं का.?"

"नाही. बाबा फार दक्ष असायचे त्यांच्या वस्तूंबद्दल. आता आपण जो पसारा केला आहे ना, हाच पसारा जर ते आता इथे असते तर इथे नसता. पसारा तर दूर आपण सुद्धा येथे बसलो नसतो. बाबा त्यांच्या वस्तू फार जपून ठेवायचे. सुरक्षित ठेवायचे."

"म्हणजे त्यांना हे पुस्तक फार पूर्वी मिळालं आहे आणि त्यानंतरच त्यांनी असा अभ्यास केला असेल. या संकल्पनेचा अभ्यास केला असेल आणि जेव्हा त्यांना स्वतःला या गोष्टी कळू लागल्या, कळाल्या तेव्हा त्यांनी हे पुस्तक लिहिण्याचा निर्णय घेतला असेल."

"हो मला हे पटलं आहे. अगदी माझ्या मनातलं बोललीस. माझं सुद्धा हेच म्हणणं आहे."

"रवी घर सोडून कधी गेला होता.?"

"बरीच वर्षे झाली आता."

"तरी तुझ्या माहितीनुसार."

"कॉलेज सुरू असतानाच काहीतरी गेला होता. "

"म्हणजे त्यावेळी लक्ष्मी नव्हती."

"होय बरोबर. खरंतर काकांचे आणि दादाचे सतत वाद व्हायचे."

"कशावरून.?"

"ताई मला सांगायची की काकांचं रवीकडे लक्ष नाही. त्याला काय हवं नको, त्याच्या फिलिंगची त्यांना पर्वा नाही. आणि रवीला या गोष्टीचा फार राग यायचा. वाईट वाटायचं."

"आपल्यावर कोणी प्रेम करणारं नाही याचं दादाला दुःख होतं. त्याची आई लहान असताना वारली. आजी सुद्धा फार वर्ष नव्हती. एकूलती एक बहिण होती ती सुद्धा हरवली. बापाचं सुद्धा लक्ष नाही. त्याला वाटायचं की निदान वडिलांनी त्याच्याकडे लक्ष द्यावं. त्याची विचारपूस करावी. पण त्यांनी तसं कधीच केलं नाही." अन्विता शांत होती.

"अंतरा असं असू शकतं, जेव्हा लक्ष्मी हरवली त्यानंतर बाबा या गोष्टीचा जास्त अभ्यास करू लागले. पण बाबा याच गोष्टीचा अभ्यास का करू लागले.?"

"म्हणजे ताई.?"

"म्हणजे बघ.. असं समज काकांना टाईम ट्रॅव्हल ही गोष्ट माहीतच नाही. त्यांचा या गोष्टीशी काही संबंध नाही. अशा परिस्थितीत बाबा काय करतील.?"

"नक्कीच पोलिसात जातील."

"बरोबर. ते पोलिसांना तक्रार करतील पोलिसांकडून अपेक्षा करतील की पोलीस त्यांची मुलगी त्यांना शोधून देतील. पण बाबांनी काय केलं."

"काकांनी पोलिसांकडून अपेक्षा ठेवली नाही." अंतराला काहीतरी लक्षात आल्यासारखं ती म्हणाली.

"याचा अर्थ.."

"होय." अन्विताने होकारार्थी मान डोलावली.

"याचा अर्थ लक्ष्मी हरवण्याआधीच त्यांना माहीत होतं की टाईम ट्रॅव्हल होऊ शकतं." दोघीही एकत्रच म्हणाल्या.

"याचा अर्थ त्यांना माहीत होतं. टाईम ट्रॅव्हल होऊ शकत हे त्यांना माहीत होतं. पण जेव्हा लक्ष्मी हरवली तेव्हा त्यांनी ते कसं होतं याचा शोध घ्यायला सुरुवात केली." अंतरा बोलू लागली. तिच्या आता लक्षात येत होत.

"बरोबर."

"म्हणजे हे पुस्तक लक्ष्मी असतानाच काकांना मिळालं होत."

"होय."

"पण का आणि केव्हा. काय कारण असावं आणि कोणी त्यांना दिलं असाव.?"

"तेच तर कळत नाही. त्यांना पुस्तक लक्ष्मी हरवण्या अगोदर का मिळालं असावं. त्यांना ते कोणी दिल असावं. आणि ज्याने त्यांना ते पुस्तक

दिलं असेल त्यांनी काकांना लक्ष्मी हरवणार आहे हे सांगितलं का नाही. तो ती गोष्ट थांबवू शकत होता. त्यानं असं का केलं नाही."

"पॅराडॉक्स ताई. जसं की मी तुला सांगितलं आपण भूतकाळ बदलू शकत नाही त्याने भविष्य अस्तित्वात येणार नाही."

"जर भूतकाळ बदलायचा नव्हता तर मग भविष्यातून कोणी भूतकाळात का गेलं असेल हा प्रश्न राहतोच ना अंतरा.?" अंतरा शांत झाली.

"होय बरोबर.?" दोघीही विचारात गेल्या.

"आता ताई..?"

"बघू.. विचार करू आपण.. जे काही आहे ते बाबांच्या संशोधनावरच आहे. आपल्याला बाबांनी जे संशोधन केल आहे त्याचाच अभ्यास करावा लागेल. त्याशिवाय आपल्याला काही कळणार नाही."

"पण ताई इतकी वर्ष बाबांना जे कळालं नाही ते आपल्याला तरी कसं कळेल.. आपण कोणाची मदत घ्यायची का..?"

"नाही अंतरा चुकूनही नाही.. माझी मुलगी तर कोणी शोधणार नाही उलट या गोष्टीला एक वेगळीच दिशा मिळेल."

"बरोबर.. शास्त्रज्ञांचा झुंड येईल आणि आपल्यालाच आपल्या जागेतून बाहेर काढेल. हे आपल्यालाच शोधाव लागेल."

"अंतरा ही गोष्ट आपल्यातच राहू दे प्लीज."

"हो ताई. ही गोष्ट फक्त तुझ्यात आणि माझ्यातच राहील नको काळजी करू." अन्विता शांत होऊन पुन्हा खुर्चीवर बसली. तिची नजर खोलीभर फिरू लागली.

••

३१-०१-१९२५

संध्याकाळ उलटून रात्र होत आली तरी मास्तर अन् लक्ष्मीचा पत्ता नव्हता. रवी पडवीत त्यांची वाटच बघत बसला होता. मास्तरांची मुलं खेळताना पाहून त्याला ध्रुवीची आठवण येत होती.

दुरून त्याला बैलगाडीचा आवाज येऊ लागला. बघता बघता बैलगाडी जवळ आली अन् त्याला मास्तर अन् लक्ष्मी दिसू लागले.

"पाव्हणं कसा हाय जोड..?" मास्तर दारात बैलगाडी थांबवत बोलू लागले. रवी त्यांना बघून गालात हसू लागला.

"पाव्हणं करमलं नसलं इळभर व्हय का नाय.. आवो तुमच्या करताच गेल्यालो हिच्या बाऽ कडं गाडी आणाय..." तसे मास्तर त्यांच्याकडे बघून गालात हसले.

"सकाळ पारी जाऊ कोल्हापूरला. जरा वाईच पडतो म्या. तुम्ही बी करा आराम. प्हाऽटं प्हाऽटं निघू." रवीने डोळे भरले. मास्तर त्यांच्यासाठी काय काय करत होते हे पाहून त्याला बरं वाटू लागलं. मास्तर आत जाऊन गोणपाटावर पडले. लक्ष्मी लांबूनच त्यांना पाहत होती.

“दादा भाकर खाऊन घे.”

रवी बघतच होता.

“बाऽ म्हणजे कोण..?”

“म्या इथं आले तवा..” तशी लक्ष्मी शांत झाली.. “माझ्या बाऽ न माझा सांभाळ केला दादा. त्यांची लेक हाय मी आता.” रवी शांत होऊन पाहू लागला.

“लक्ष्मी मला तुझ्याशी काही बोलायचं आहे.” तसं म्हणत तो तिला घरापासून थोड लांब घेऊन गेला.

“काय ते दादा..?”

“मला घरी कसं जायचं ते कळालं आहे” रवी उत्साहात बोलू लागला. लक्ष्मी गोंधळून पाहू लागली.

“काय झालं लक्ष्मी.?”

“जा मग दादा..”

“काय.?”

“व्हय.”

“तू पण चल.”

“न्हाई दादा. आता माझं जग इथंच हाय.”

“काय बोलतेस लक्ष्मी.”

"व्हय दादा.. आता लय उशीर झाला. आता म्या कुठं बी जाऊ शकत नाय.. इथं माझी लेकरं बाळ हाईत.. माझा नवरा हाय.. त्यास्नी सोडून म्या जाऊ शकत नाय.." लक्ष्मीने डोळे भरले.. रवीने सुद्धा डोळे भरले.

"असं नको बोलू लक्ष्मी."

"व्हय दादा हीच खरं हाय. ही माझं सत्य हाय.. मला ती नाकारता यायचं न्हाई." रवीच्या डोळ्यांत पाणी येत होतं. तो रडू लागला. लक्ष्मी सुद्धा मुसमुसु लागली.

रवी शांत झाला अन् बोलू लागला, "लक्ष्मी एक विचारू खरं खरं सांगशील..?" लक्ष्मीने नुसतीच मान डोलावली.

"तुझ्या परिस्थितीला तू मला जबाबदार मानतेस का गंऽ..?" तसं म्हणत त्याने पुन्हा डोळे भरले. लक्ष्मीने त्याला मिठी मारली अन् पुन्हा रडू लागली.

"न्हाई दादा तुझी यात काय बी चूक न्हाय. नशिबात जी घडायचं असत ती घडतच. त्याला आपून काय बी करू शकत न्हाई.." तशी ती त्याला घट्ट मिठी मारू लागली. रवी सुद्धा रडू लागला.

लक्ष्मीने मग स्वतःला सावरलं. रवीचे डोळे पुसले. त्याची समजूत घालू लागली.

"दादा तू सवताला पापी समजू नगं.. हीच माझं आयुष्य व्हतं.. तू जा इथनं तुझी जिंदगी इथं बरबाद नगो करुस.. कुणाला दुसरा मोका मिळत

न्हाई.. तुला त्यो मिळाला हाय.. जा तुझ्या जगात परत.. तुझ्या लेकीला शोध.. ती तिथंच कुठं तर असंल.. इथं ती आली न्हाई..”

रवी शांत झाला. ती म्हणत होती ते खरं होतं. ध्रुवी तिथे आली असती तर आधी त्यांच्या घरात गेली असती. विहिरी पासून जवळ लक्ष्मीचं घर होत. जरी त्या घरात ती गेली नाही तरी या गावात कुठे तरी कोणी तरी तिला पाहिलं असतं. पण तसं काहीच झालं नव्हतं. रवी घरी जाण्याचा निर्णय घेतो.

“लक्ष्मी तुला सोडून एकट्याला जाऊ वाटत नाही.” तसं म्हणत त्याने पुन्हा डोळे भरले. लक्ष्मीने डोळ्यात पाणी आणून त्याच्या गालाला हात लावला.

“दादा जी हुतं ती चांगल्यासाठीच हुतं बघ.. आपली भेट त्याला करून द्याची हुती म्हणून तू इथं आलास बग.”

रवीने पुन्हा तिला मिठी मारली अन् रडू लागला. “मला माफ कर लक्ष्मी. मला माफ कर.”

लक्ष्मी शांत होती. रवीची मनस्थिती ती समजू शकत होती. तिने त्याला शांत केलं अन् घरी जाण्याचा सल्ला दिला. रवी शांत झाला त्याने खिशातून रुमाल काढला अन् तिला दिला. त्या रुमालात त्याने त्याचं सोनं बांधलं होतं.

“ही काय..?”

"आता माझ्या जवळ हेच आहे लक्ष्मी तुला द्यायला.. तुझं सुख तुला मी देऊ शकलो नाही." त्याने पुन्हा डोळे भरले.

"नगो दादा.."

"नाही बोलू नकोस लक्ष्मी.. नाही तर आयुष्य भर मी स्वतःला माफ करू शकणार नाही." लक्ष्मीने डोळे भरून तो रुमाल हातात घेतला.

"लक्ष्मी जाऊ मी आता." तिने त्याच भरलेल्या डोळ्याने त्याला होकार दिला. "मास्तरांना सांग मी जिथून आलो होतो तिथं परत गेलो."

तिनं नुसतीच होकारार्थी मान डोलावली. रवी भरलेल्या डोळ्यांनी मागे फिरला. तो नाहीसा होई पर्यंत लक्ष्मी तिथेच उभी राहिली. तिच्या भरलेल्या डोळ्यांनी रवीला नाहीसं होताना पाहिलं अन् ती रडत रडत घरात चुली समोर जाऊन बसली.

••

रवी विहिरीजवळ आला होता. त्याला विहीर पुर्णपणे साफ दिसत होती. पाण्यात अर्धचंद्र उठून दिसत होता.

टाईम ट्रॅव्हल का होत नव्हतं हे त्याला आता कळालं होतं. त्याच्याकडे असणारा सोनेरी दगड हा टाईम ट्रॅव्हल होण्यासाठी कारणीभूत होता.

त्याला आता ते कळालं होत. तो जेव्हा जेव्हा पाण्यात उतरला होता तेव्हा त्याच्याकडे त्याचा दगड नव्हता. त्याने त्याच्या वस्तू रुमालात बांधून घरात ठेवल्या होत्या. पण आता त्याच्याकडे तो दगड होता. तो घरी जाऊ

शकत होता. तो हळूहळू पाण्यात उतरला. त्याला आता ध्रुवीची आस लागली होती. त्याच्या जगात जाऊन तो तिला शोधून काढणार होता.

••

लक्ष्मी एकसारखी त्या रूमालाकडे बघत बसली होती. तिला तिच्या बालपणीच जग आठवत होत. ती ज्या दिवशी हरवली तो दिवस आठवत होती. लक्ष्मी लक्ष्मी म्हणून प्रत्येक जण तिला आवाज देत होतं. तिच्या कानावर ते पडत होतं.

ती सर्वांना चुकवत विहिरीत उतरली होती. अन् पायथ्याशी येऊन बसली होती. तिने पाण्यात पाहिलं तेव्हा तिला चंद्र साफ दिसत होता. तिला असं वाटत होतं की तो तिच्या जवळच आहे. ती त्याला हात लावण्याचा प्रयत्न करू लागली अन् त्याला हात लावायला जाताच ती पाण्यात पडली. पाण्यात पडली अन् कायमची एका वेगळ्या जगात हरवून गेली.

ती विहिरीबाहेर आली खरं तिचं घर तिला मिळत नव्हतं. तिची माणसं तिला दिसत नव्हती. ती रडू लागली अन् रडता रडताच ती जागीच बेशुद्ध झाली.

तिचा डोळा उघडला तेव्हा कोणीतरी तिच्या जवळ बसल होतं. ती व्यक्ती तिची विचारपूस करत होतं. ती फक्त रडत होती. त्यांनी तिच्या हाताला धरलं अन् घरी नेलं.

लक्ष्मीच्या डोळ्यातून एक एक थेंब त्या रुमालावर पडत होता. तिने त्या रुमालाची गाठ सोडायला घेतली अन् कोणीतरी बाहेरुन मास्तरांना आवाज दिला. मास्तर गाढ झोपेत होते. लक्ष्मी उठली अन् दारात जाऊन उभी राहिली. रात्रीच्या अंधारात तिला घाऱ्या डोळ्याची व्यक्ती हसताना दिसू लागली.

"गोंदा लवकर आलास बाबा आणि जरा पंधरवड्यान यायचं होतास." तसा गोंदा गालात हसू लागला.

"आवो काय सांगायचं तुमास्नी मामाची ल्याक आज्यारी पडली नव्ह का.. तिला घिऊन कोल्हापूरला जावं लागलं."

"व्हय का.. तसं सांगून जाया ईत नव्हतं मंग.. सकाळ पातूर येतो म्हणून शान गेलास अन् आज उगवलास व्ही.." तसा गोंदा गालात लाजला.

"व्हय जरा उशीरच झाला. मास्तर झोपल्यात व्हय..?"

"व्हय."

"बर बर गाडी ठेवल्या."

"उपकार केलास."

गोंदा अजूनही हसत होता.

"सकाळच्यान येतो."

"न्हाई आलास तर लय उपकार व्हतील." तसा तो हसत हसत निघून गेला. लक्ष्मी तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपूटू लागली.

"कोण गं.." मास्तर अर्धवट झोपेत पाहू लागले.

"गोंद्या.." लक्ष्मी जरा रागातच म्हणाली.

"आता आला वी ह्यो उंडगीचा. आणली का गाडी."

"व्हय."

"कुठ आय घालाय गेल्याला..?"

"मामाची पूर्गी म्हण आज्यारी हुती.. तिला घिवून गेल्याला कोल्हापूरला." तसं ऐकताच मास्तर हसू लागले.

"हसाय काय झालं तुमास्नी.?"

"पूर्गी हाय वी मामाला त्येच्या.. आमास्नी गंडवायलाय.."

"पूर्गीच हूती आवो.. मला पैंजाण दिसल्या वाणी झाल्यालं."

"घावली असंल कोण तर बाय.."

"अवो न्हाई बारक्या पुरीचं पाय व्हतं.." तसं ऐकताच मास्तर उठून बसले..

"बारकी पूर्गी.. काय सांगतियास.. आधी का सांगाय न्हाईस मला.."

"मला वाटलं असंल खरंच."

"खुळ्या बोड्याची हाईस लक्ष्मे.." तशी लक्ष्मी एकदम गंभीर झाली. मास्तर गडबड करत उठले.

"पाव्हणं कुठायत.." तसे ते रवीला इकडेतिकडे शोधू लागले.

"बघ बघ.. बोलाव त्यास्नी.. तवर त्या रांडच्याला धरून ठिवतो म्या.." तसं म्हणत मास्तर पळत गेले.

लक्ष्मी एकदम गंभीर झाली. तिने हातातल्या रुमालाची गाठ सोडली. त्यात तिला पैंजण दिसलं. अन् ते तसंच एक पैंजण होतं जे तिने अंधारात बैल गाडीत पाहिलं होतं. तिला कळून चुकलं. तिचे डोळे भरून आले अन् ती तशीच विहिरी जवळ पळू लागली.

ती धावत धावत "दादा-दादा" हाका मारत विहिरीजवळ आली. रवीला शोधू लागली. पण तिला रवी दिसेनासा झाला. तिने विहिरीत डोकावून पाहीलं.

तिला फक्त बुडबुडे येताना दिसले. काही क्षणांत पाणी पुन्हा संथ झालं अन् त्या संथ पाण्यात अर्धचंद्र पुन्हा उठून दिसू लागला.

लक्ष्मी "दादा-दादा" करत ओरडू लागली. ओरडता ओरडता रडू लागली. तिच्या तोंडातून आता आवाज निघत नव्हता. ती फक्त रडत होती. तिला उशीर झाला होता. वेळ निघून गेली होती. ती रडता रडताच त्या काळोखात रवीला शोधण्याचा प्रयत्न करू लागली अन् जीवाच्या आकांताने त्याला आवाज देऊ लागली. पण तिला कोणताच प्रतिसाद मिळत नव्हता. ती फक्त त्या काळोखात पाहू लागली.

••••

काळाचं चक्र

रवी विहिरीत डोकावून पाहू लागला. त्याला कोणीतरी आवाज देत आहे असं वाटू लागलं. तो तसाच काही वेळ विहिरीत डोकावून पाहू लागला. बुडबुडे निघून गेले अन् पाणी पुन्हा स्थिर झालं. रवीला आता कोणताही आवाज ऐकू येत नव्हता. तो सरळ समोर बघून चालू लागला.

वातावरणातली दमट हवा त्याला जाणवू लागली. त्याने आसपास पाहिलं. त्याला तिथल्या परिसरात थोडा बदल जाणवू लागला. तो हा परिसर नव्हता जो त्याने १९२५ मध्ये पाहिला होता. तो हा परिसर नव्हता जो त्याने २०२५ मध्ये पाहिला होता.

त्याची नजर पुन्हा गंभीर झाली. तो वेगाने चालू लागला. त्याला आता काही घरं दिसत होती पण त्याला अजूनही त्याची गाडी दिसत नव्हती. त्याचं घर दिसत नव्हतं.

तो घराजवळ जाऊन उभा राहिला. तिथ एका घराच बांधकाम सुरू होत. ते बांधकाम त्याच्याच घराचं होतं. त्याला कळून चुकलं तो अजूनही त्याच्या जगात आला नव्हता. टाईम ट्रॅव्हल झालं होतं परंतु तो पुन्हा एका वेगळ्या जगात आला होता. वेगळ्या कालखंडात आला होता. त्याच डोकं सुन्न पडलं. आता काय करावं ते त्याला कळत नव्हत. तो पुन्हा मागे फिरला. अन् विहिरीच्या दिशेने जाऊ लागला.

"कुणाकडं काम हुतं व्हय." तोच त्याला मागून कोणाचा तरी आवाज आला. तो हळूहळू मागे फिरला.

"कुणाकडं काम हुतं म्हणायचं. कुठल्या गावच तुम्ही. असं का भिजलायसा म्हणायचं.?"

एक पंचवीस-सव्वीस वर्षाचा तरूण मुलगा रवीची चौकशी करत होता. तो मुलगा त्याला जराजरा ओळखीचा वाटू लागला.

"पाव्हणं.. कुठल्या गावचं म्हणायचं तुम्ही.. इथं कुणाच्यात काम काढलं.?"

"मुंबईचं."

"मंबई.. कुणाकडं आला म्हणायचं.. ?"

रवी शांत झाला. त्याला काय बोलायचं ते कळेना.

"हे घर."

"माझंच हाय.. तुम्ही कोण म्हणायचं.. नाव काय तुमचं..?" तो एकदमच गांगारून गेला. समोरचा तरूण मुलगा त्याची चौकशी करतच होता.. "कुणाच्यात आलाय म्हणायचं.."

"मास्तर."

"कोण मास्तर.?"

"लक्ष्मी."

"लक्सा अक्का..?"

"होय."

"तिच्यात व्हय."

"हो."

"ती न्हाई इथं. गेल्या गावाला.. तिचं कोण म्हणायचं तुम्ही..?"

"तू कोण.." रवीने त्याला अडवत विचारलं.

"म्या श्रीधर. इथ ऱ्हातो म्या.."

रवी बघतच राहिला. ती व्यक्ती कोण ते आता त्याच्या लक्षात आलं होतं. ते त्याचे बाबा होते. ते अजून तरुण होते. तो त्यांना पाहत राहिला.

"आज तारीख काय ?"

"काय..?" श्रीधरने प्रश्नार्थक नजरेने पाहिलं.

"आजची तारीख..?"

"आज व्हय.. तेवीस तारीख.."

"महिना.."

"जानेवारी.." तो अजूनही प्रश्नार्थक नजरेने पाहत होता.

"हे साल कोणतं सुरू आहे.?"

"काय..?"

"हे साल कोणत सुरू आहे.?"

"शुद्ध हाय नव्हं का तुम्हास्नी..?"

"सांगा ना."

"पंच्याहत्तर साल चालू हाय ही.."

रवी सुन्न पडला होता. त्याच डोकं सुन्न पडलं होत. त्याने टाईम ट्रॅव्हल केलं होतं. पण तो अजूनही त्याच्या वेळेत आला नव्हता. तो भविष्यात तर आला होता पण फक्त पन्नास वर्षे पुढे. १९७५ मध्ये. याचा अर्थ तो अजूनही भूतकाळात अडकून होता.

तो तसाच पुढे चालू लागला. श्रीधर त्याला मागून आवाज देत राहिला. रवी वेगात चालू लागला.

••

१७-०२-२०२५

अन्विता विचारात हरवून गेली होती. ती कोणत्या विचारात आहे हे अंतराला कळत होत. बराच वेळ ती येऊन बसली होती. पण अन्विताला अजून ते कळालंच नव्हतं.

"ताई कुठे हरवली आहेस.?" अन्विता शुद्धीत आली अन् गोंधळून अंतराकडे पाहू लागली.

"तू केव्हा आलीस.?"

"कधीची आली आहे मी."

"अपूर्वा."

"ताई गेली मुंबईला." तशी अन्विता पुन्हा शांत झाली.

काल रात्री अपूर्वा पुन्हा मुंबईहून आली होती. जाधवांची तिने पुन्हा भेट घेतली होती. परंतु ध्रुवीच्या प्रकरणात काहीही यश मिळालं नव्हतं. जाधव अजून तिथेच अडकून होते. आप्पा पाटील यांच्याकडून देखील त्यांना काही लीड मिळत नव्हती. अपूर्वा फार नाराज झाली होती.

तिने अन्विताची समजूत घातली. लवकरात लवकर आपण तिला शोधून काढू इतकंच ती बोलू शकली.

आज दुपारी अपूर्वा पुन्हा मुंबईसाठी रवाना झाली. अंतराने अन्विताला खाली गावात सोडलं होतं. ती एकटीच तिथे विचार करत बसली होती. अंतरा येताच ती शुद्धीत आली.

"काही सांगितलं नाहीस ना.?"

"नाही गं ताई. विश्वास नाही का माझ्यावर."

"तसं नाही गं."

"नको काळजी करुस. मला परिस्थिती काय आहे ते कळतं." तशी अंतरा हलकसं गालात हसली.

"मग ताई आता कुठून सुरुवात करू या.?" अंतरा विषय बदलत अन्विताला बोलतं करू लागली.

"काही कळेनासं झालं आहे. तू मल्टिपल टाईम लाईनची जी कॉन्सेप्ट सांगितलीस तेव्हा पासून नको-नको ते विचार मनात येत आहेत."

"म्हणजे.?"

"काय सांगू आता."

"बोल तरी."

"तू म्हणालीस, रवी कोणत्याही टाईम लाईन मध्ये असू शकतो. ध्रुवी सुद्धा कोणत्याही टाईम लाईन मध्ये असू शकते."

"हो."

"मग ते एकमेकांना भेटणार कसे. कशावरून ते एकाच टाईम लाईनमध्ये असतील. एक इकडे तर एक तिकडे असंही होऊ शकतं."

"हो."

"रवीच ठीक आहे तो मोठा आहे. त्याला या गोष्टी आता पर्यंत लक्षात आल्या असतील. पण ध्रुवीच काय. तिला काय माहित असणार हे. तिला थोडी कळणार आहे तिची टाईम लाईन कोणती. त्यात पण भूत, वर्तमान, भविष्य यातल्या कोणत्याही कालखंडात ती असू शकते. त्या एवढ्याशा मुलीला काय कळणार अंतरा. या गोष्टी आपल्यालाच नीट कळत नाहीयेत." तशी अन्विता शांत झाली.

"बरोबर आहे ताई तुझं. पण इतका गोंधळ करून घेऊ नकोस. ही फक्त संकल्पना आहे."

"असेल अंतरा. टाईम ट्रॅव्हल ही सुद्धा एक संकल्पना होती. पण आता ती खरी निघाली आहे. मग कशावरून हे सुद्धा खरं नसेल." अंतरा शांत पाहू लागली.

"निघेल ताई काही तरी मार्ग निघेल. नको काळजी करू."

"अजून आपल्याला टाईम ट्रॅव्हल कसं करायचं ते माहित नाही.. त्यांची टाईम लाईन शोधन तर खूप दूर.. आणि त्यांना शोधणं तर आणखी दूरची गोष्ट." अन्विता आणखी चिंतेत गेली.

"ताई मला एक कळत नाहीये.."

"काय ?"

"जर दादा सुद्धा वेळेत कुठे अडकला असेल तर तो परत का येत नाही. म्हणजे बघ लक्ष्मी लहान होती, ध्रुवी लहान होती त्यांना या गोष्टी कळणार नाहीत पण दादा मोठा आहे त्याला तर लगेच कळालं असेल. मग तो परत का येत नाही. त्याला कोणती गोष्ट अडवत असेल." अंतरा विचार करू लागली. अन्विताही त्याच गोष्टीचा विचार करू लागली..

अंतराने खडू घेतला अन् फळ्यावर काही गोष्टी लिहू लागली. त्यावर ती चालता चालता विचार करू लागली.

"ताई आपल्याला काय माहित आहे.?"

"काय माहित आहे.?"

"टाईम ट्रॅव्हल होत आहे ते माहित आहे."

"होय."

"एक्झॅक्ट कुठून होत आहे ते अजून माहित नाही."

"होय.."

"नेमकं कसं होतं आहे ते माहित नाही."

"हो."

"दादाने टाईम ट्रॅव्हल केलंय. त्याला काय माहित असणार मग.. तसं म्हणत अंतरा बोलू लागली. "टाईम ट्रॅव्हल होत आहे.. टाईम ट्रॅव्हल कुठून होत आहे.. टाईम ट्रॅव्हल कशामुळे होत आहे हे माहित असेल दादाला..? नाही माहित.. माहित असतं तर तो इथे आला असता. आणि इथे तो येत नाही याचा अर्थ त्याला माहित नाही यायचं कसं."

"असू शकतं. किंवा तो अडकला असेल कशात तरी. कोणत्या तरी संकटात."

"हे ही असू शकतं. पण ताई आपण बाकी सगळी संकट बाजूला ठेवू थोड्या वेळासाठी. आपला एकच मुख्य प्रश्न आहे त्यावर लक्ष देऊ."

"दादाला माहित नाही यायचं कसं पण तो प्रयत्न करत असेल एवढं नक्की. मग त्याला काय अडवत आहे." अंतरा विचार करू लागली.

अन्विता तिचं बोलण समजून घेऊ लागली. अंतरा फळ्यावर काही काही लिहित होती. ते पुन्हा पुन्हा खोडत होती. तिला काही कळत नव्हतं. विचार करून करून आता तिचं डोकं ठणकू लागलं होतं.

"अंतरा शांत हो. " अन्विता तिला शांत आवाजात म्हणाली. तिने नुसतीच मान डोलावली.

"अंतरा या वातावरणातून जरा बाहेर जाऊ या."

"का.?"

"थोडं डोक्याला आराम देऊ या. विचार करून करून आणखी टेन्शन येतं. थोडं रिलॅक्स होऊ."

"तू बोलतेस ताई रिलॅक्स व्हायला."

"होय. त्याशिवाय उत्तर मिळणार नाही. चल जरा बाहेर जाऊन येऊ." तशी अन्विता उठली. अंतरा ही तिच्या मागोमाग जाऊ लागली.

"कुणीकडे जायचं ताई.?"

"चल काही तरी खाऊन येऊ."

"बर. लोणी डोसा खाऊ या..?"

"चालेल. पण गर्दीच्या ठिकाणी नको."

"नाही. तिथे नाही नेणार तुला."

"ह्म्मऽ."

अंतराने गाडी सुरू केली. काही वेळातच त्यांची गाडी कोडोलीत पोहोचली. अंतरा गर्दीची ठिकाणं टाळायचा प्रयत्न करत होती. अन् तिला एक चांगलं हॉटेल दिसलं.

"ताई इथला पण चांगला असतोय जाऊ या..?"

"चालेल.."

दोघीही हॉटेलात गेल्या. मनसोक्त त्यांनी खाण्याचा आस्वाद घेतला. अंतरा जरा उत्साहित वाटू लागली. त्यांच खाणं होताच त्या तिथून निघाल्या.

अंतराने गाडी सुरू केली तोच तिला एक फोन आला.

"मम्मा का फोन करतेय आता..?" तसं म्हणत तिने फोन उचलला.

"बोल की मम्मा.. कोडोलीत आलोय ताई सोबत.. नाही डोसा खायला.. तुला आणू.. बर.. पप्पांच्या कपाटात बघ की.. बर बर.. फोटो पाठव हाय तवर घेते.. बर.."

"ताई जरा बस इथंच.. काय झालंय आत्या आलीय.. तिच्या गोळ्या विसरल्या ती.. मी आले जरा घेऊन.."

"बर.. ये लवकर."

"हे काय गेले आणि आले.. समोरच आहे मेडिकल." तसं म्हणत अंतरा गाडीतून उतरली. ती समोरच्या मेडिकलमध्ये गेली. मोबाईल तिच्या कानाला होता. तो कानाला तसाच ठेवून ती केमिस्ट सोबत बोलत होती. अन्विता गाडीत बसून फक्त तिला पाहत होती. ती एका मेडिकल मधून दुसऱ्या मेडिकल मध्ये, पुन्हा तिसऱ्या मेडिकलमध्ये फिरतच होती. काही वेळाने ती अन्विताला दिसेनाशी झाली. अन्विताने पाच एक मिनिटे वाट पाहिली अन् तिला फोन केला. तो व्यस्थ लागू लागला. अन्विताने फोन ठेवताच तिला अंतराचा फोन आला.

"अगं कुठे गेलीस.?"

"आहे आहे इथेच आहे मेडिकल मध्ये आलेच."

"बर. लांब जाऊ नकोस. ये लवकर." अन्विता काळजीने बोलू लागली. तिने फोन ठेवला.

अन्विता गाडीत बसून अंतरा कुठे दिसते का ते पाहू लागली. तिची नजर तिला शोधू लागली. अन् ती दिसली. वेगात येताना दिसली. ती आली अन् गाडीत बसली.

"ताई सॉरी.. तू ठीक आहेस ना..?"

"हो. कुठे गेली होतीस..?"

"अगं ह्या गोळ्या जगावेगळ्या." तोच तिचा फोन वाजू लागला.

"मम्मे, तू म्हणत्यास त्या कंपनीच्या गोळ्या न्हाईत इथं. पायजे असल तर ह्या घेते बघ.. कोडोली पालथी घातली म्या.. इथं न्हाईत या कंपनीच्या.. तू पप्पास्नी सांग.. म्हणाव भनिला काय पायजे ते बघा.. माझ्या मागं लागू नका." तसं तिने फोन ठेवला. अन् गाडी चालू केली.

"काय झाल अंतरा.?"

"काय नाय गं ताई.. आत्याबाई आलीय.. गोळ्या विसरून आणि इथं आमच्या डोक्याला ताप."

"काय झालं काय नेमकं.?"

"ती ज्या कंपनीच्या गोळ्या खाते त्या कंपनीच्या गोळ्या नाहीत इथं."

"मग."

"आता ताई गोळी गोळी असत्या. कुठल्या कंपनीची का असेना. आजार बरा होतोय न्हवं त्यानं.." तशी अन्विता गालात हसू लागली.

"ती आणि तिचा भाऊ बघल.. इथ आम्ही जी हुडकालोय ती आम्हाला मिळंना आणि हिच्या गोळ्या आणि कुठनं आणू हुडकून.." तसं म्हणत अंतराने गाडी घराच्या दिशेने वळवली.

अन्विता हसता हसता एकदम शांत झाली. गंभीर झाली. ती एकदमच अंतरा काय म्हणाली ते ऐकतच राहिली.

"अंतरा मला वाटतंय आपल्याला जे उत्तर हवंय ते मिळालं आहे."

"काय..?"

"होय.. घरी चल सांगते मी.."

••

२३-०१-१९७५

रवी श्रीधरचा डोळा चुकवून पुन्हा विहिरी जवळ आला होता. त्याचं डोकं काम करायचं बंद झाल होत. त्याला वाटत होत की तो आता त्याच्या वेळेत येईल पण तसं झालं नव्हतं. तो अजूनही वेळेत अडकून पडला होता. त्याला आता ध्रुवीची आणखी काळजी वाटत होती. कारण इथे पुन्हा ध्रुवीला शोधावं लागणार होतं. रवीला नेमकं आता हेच कळत नव्हतं की ध्रुवी नेमकी कुठे हरवली असेल.

कारण तिला गायब होऊन पाच दिवस झाले होते. पण हे पाच दिवस त्याच्या जगातल्या वेळेनुसार झाले होते. तो भूतकाळात मागे मागे जात होता त्याला आता वेळेच गणित कळत नव्हतं.

तो डोक्याला हात लावून तसाच बसला होता.

तेवढ्यात त्याला श्रीधरचा आवाज आला.

"पाव्हणं अहो किती आवाज द्यायचं तुमास्नी. इथं कवासं आलासां..?"

रवी त्याला पाहताच राहिला. तो अचानक कुठून आला ते त्यालाही कळत नव्हतं. त्याला आता त्याच्या मदतीची गरज होती. तो बोलू लागला.

"बाबा."

"काय.." तसा रवी एकदम शांत झाला. त्याने डोळे एकदम घट्ट बंद केले.

"माझे बाबा आजारी आहेत."

"श्रीधर गोंधळून पाहू लागला."

"कशानं.?"

"वय झालंय."

"बर.."

"माझी मुलगी हरवली आहे." श्रीधर पुन्हा गोंधळात पडला.

"पाव्हणं नेमकं काय झालंय.?"

"माझी मुलगी हरवली आहे तिला मी शोधत आहे. तिला घेऊन मला लवकरात लवकर माझ्या बाबांजवळ जायचं आहे." रवीने एवढं बोलून एक नि:श्वास सोडला. श्रीधर त्याला गंभीर नजरेने पाहू लागला.

"कुठं हरवली पूर्गी.. काय नाव तिचं.. केवढी हाय ती..?"

"इथंच हरवली. झाले एक चार पाच दिवस. ध्रुवी नाव आहे तिचं.. आठ वर्षांची आहे ती.."

"नाव काय म्हटलासा..?"

"ध्रुवी."

"दुरवी"

"ध्रु वी.." रवी हळूहळू सांगू लागला.

"लयच अवघड नाव हाय." रवी शांत होता.

"तुम्ही अशा एखाद्या मुलीला पाहिलं आहे का.?"

श्रीधर आठवण्याचा प्रयत्न करू लागला.

"तुम्हाला नक्की खात्री हाय ती इथंच हरवल्या.?"

"होय."

तसा तो पुन्हा विचारात गेला अन् बोलू लागला.

"बघा पाव्हणं. माझ्या घराचं काम चालू हाय. मी इथंच असतुय. जर का कुणी हरवल्याल असत तर माझ्या घरा म्होरं आलं असतं. तुम्ही

म्हणतायसा चार पाच दीस झालं. मला तर अशी कुठली प्वॉर दिसाय न्हाई.'' रवी एकदम शांत झाला. नाराज झाला.

''तुम्ही चार पाच दीस झालं म्हणता तर मग आता कसं आला. तुम्ही कुठं व्हता.?'' रवीला काय बोलावं ते कळेना. रवी शांतच राहिला. त्याला श्रीधर बोलतोय त्यावर विश्वास ठेवावा की इथेच तिचा शोध घ्यावा हे कळेनास झालं.

मास्तर कोण आहेत हे श्रीधरला अजून माहित नव्हतं. पण लक्ष्मीला तो ओळखत होता. लक्ष्मी इथं आता नव्हती. लक्ष्मीने बाबांना ओळखल असेल का याची त्याला शंका वाटू लागली. तो शांतच होता.

''पाव्हणं घरी चला. जरा वाईच तोंडाव पाणी मारा. च्याऽ घ्या. शोधू तुमच्या लेकीला. ही गाव काय लय मोठं न्हाई. चिली पिली लय न्हाईत. तुमची प्वॉर इथं हरवली असती तर सगळ्या गावात कळालं असतं. नका काळजी करू.''

रवीला कळून चुकलं ध्रुवी इथे नाही. ज्या अर्थी श्रीधर बोलत होता त्या अर्थी ती इथे नव्हती. त्याने लगेच तिथून निघायचा विचार केला.

''बर. श्रीधर, माझा एक मित्र इथंच तिला शोधतोय. मी दिसलो नाही तर तो सुद्धा कुठं तरी हरवून जाईल.''

''कुठ हरवतोय. इल की आपल्या घरला..''

''नाही नको. तू हो पुढे. मी येतोच.''

तसा श्रीधर जरा शांत झाला अन् बोलू लागला, "या तवर गावकऱ्यांस्नी बोलावतो."

"हो चालेल."

श्रीधर मागे फिरला. तो दिसेनासा होताच रवी विहिरीत उतरला.त्याला विहिरीत गोलसर चंद्र स्पष्ट दिसू लागला. त्याने पाण्यात उडी मारली. काही क्षण पाण्यावर बुडबुडे आले अन् दुसऱ्या क्षणात विहिरीवरच पाणी संथ झालं.

••

१७-०२-२०२५

अंतराने गाडी एका बाजूला लावली.. अन्विताला धरत ती घरात घेऊन गेली. दोघीही वरती श्रीधर रावांच्या खोलीत गेल्या. अन्विताने फळा पुसला अन् खडू घेऊन काही तरी लिहू लागली.

"अंतरा आता हे बघ, असं समज आपण इथे आहोत." ती एक बाण काढत म्हणाली.

"बर."

तसंच तिने वरच्या भागात सात-आठ बाण काढले. अन् बोलू लागली, "अंतरा ही मेडिकल दुकानं ज्या दुकानात तू गेलीस. तुला एका विशिष्ट कंपनीची गोळी हवी होती."

"हांऽ."

"अंतरा तू दुकानात जात होतीस. तिकडे पर्याय होते पण तू ती गोळी घेत नव्हतीस. तुला ज्या कंपनीची गोळी हवी आहे तीच गोळी शोधत होतीस.."



"होय."

"इथे असंच होतंय. रवी इथून त्या दुकानात जातोय पण तिथं थांबत नाही. कारण तिथं त्याला जे हवं आहे ते मिळत नाही."

अंतरा बघत राहिली. तिला कळून चुकलं.

"शीट शीट ताई.. माझ्या लक्षात कसं काय आलं नाही हे.." तशी ती खडू हातात घेऊन लिहू लागली.

"जीपीएस ताई.. दादाला जीपीएस मिळत नाहीये. आणि हाच तर टाईम ट्रॅव्हलचा ड्रॉबॅक आहे.. शीट शीट... एवढी छोटीशी गोष्ट माझ्या लक्षात कशी आली नाही." तशी ती खुर्चीवर डोक्याला हात लाऊन बसली.

"बरोबर आहे ना माझं."

"१००%. बरोबर ठिकाणी बोट ठेवलं आहेस ताई. टाईम ट्रॅव्हल मध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे म्हणजे योग्य वेळी योग्य ठिकाणी पोहोचणे.

आपण सिनेमांमध्ये पण हेच पाहतो की टाईम ट्रॅव्हल म्हणजे भविष्यात किंवा भूतकाळात योग्य ठिकाणी योग्य दिवशी योग्य वेळी पोहोचणे. जे प्रत्यक्षात शक्य नाही. आणि सिनेमांमध्ये आपल्याला तेच कुठल्यातरी यंत्राच्या मदतीने शक्य होत आहे असं दाखवलं जातं.''

''याचा अर्थ दादा प्रत्येक दुकानात जातोय. म्हणजेच तो प्रत्येक टाईम लाईन मध्ये जातोय. पण त्याला योग्य ती गोळी मिळत नाही. म्हणजे त्याची टाईम लाईन त्याला मिळत नाही. तो योग्य ठिकाणी योग्य वेळी कसं जायचं हे शोधतोय. बरोबर ताई. मला हे पटलं. तुझं जे म्हणणं आहे तेच माझं म्हणणं आहे.. ही शक्यता असू शकते.''

''पण ताई यातून आपली टाईम लाईन शोधणं फार अवघड आहे.''

''कसं काय.?''

''मल्टी युनिव्हर्स आठवतंय. आपल्यासारखच दुसरं विश्व. आपल्यासारखीच दुसरी लोकं.''

''मी एक बोलू अंतरा.''

''हो ताई.''

''मल्टी युनिव्हर्स हे कॉन्सेप्ट असेल, मी ते मानते. पण मला वाटतं की आपल्या केसमध्ये मल्टी यूनिवर्स किंवा मल्टिपल टाईम लाईन या शक्यता होत नसाव्यात.''

''कशावरून.''

"कारण आपल्याकडे भविष्यातून आलेलं पुस्तक आहे."

"मग त्याचं काय. ?"

"याचा अर्थ कोणीतरी आहे जो हे होऊ नये किंवा हे व्यवस्थित व्हावं यासाठी प्रयत्न करतोय."

"कोण असेल मग तो."

"एकतर रवी किंवा रवीचे बाबा. आणि मला असं वाटतं की रवीच असावा. कारण की सध्या रवीच एक आहे जो या तिघांमध्ये हुशार आहे. राहिला प्रश्न रवीच्या बाबांचा तर जर त्यांनी हे पुस्तक भूतकाळात आणलं असतं तर त्या वेळच्या रवीच्या बाबांनी त्यांना ओळखलं असतं. आणि त्यांनी लक्ष्मीला हरवून दिलं नसत."

"म्हणजे तुला असं बोलायचं आहे की रवी दादा या टाईम लाईन मधून फिरत आहे."

"होय. हा रवीच असू शकतो.. त्याला हे टाईम ट्रॅव्हल कसं काम करतंय ते कळत नाहीये. तो फक्त काळात पुढे-मागे फिरतोय."

अन्विताने खडू हातात घेऊन एक सरळ रेघ ओढली.

"आणि ही सिंग्युलर टाईम लाईन आहे. म्हणजे रवी आपल्याच विश्वात आहे इथे मल्टीव्हर्स नाही. रवी फक्त वेळेत पुढे-मागे फिरतोय. इथे मल्टिपल टाईम लाईन आहेत पण या सर्व घडामोडी एका सरळ रेषेमध्येच घडत आहेत.. आणि ही सरळ रेषा म्हणजे फक्त आपलं विश्व.. भूतकाळातलं, वर्तमानातलं, भविष्यातलं.."

अंतरा तिने काढलेली आकृती पाहतच राहिली. तिला ते पटू लागलं.

"ध्रुवी एकतर भविष्यकाळात असेल किंवा भूतकाळात असेल पण एकाच टाईम लाईन मध्ये असेल. लक्ष्मीच सुद्धा असंच.

म्हणजे याचा अर्थ असा की आपल्याला जर कळालं की टाईम ट्रॅव्हल कसं होत आहे तर आपण त्या दिवशी जाऊन ती घटना थांबवू शकतो."

"बरोबर."

"आणि रवीला हेच कळत नाहीये की टाईम ट्रॅव्हल करून योग्य दिवशी योग्य वेळेत कसं जायचं, तो फक्त फिरत आहे."

याचा अर्थ ताई आपल्यालाच इथून हालचाल करावी लागणार कारण आपल्याकडेच बऱ्यापैकी माहिती आहे. दादा तिथे एकटाच आहे. त्याला कोण मदत करत असणार. त्यामुळेच तो अजून इथे आला नाही."

"होय अंतरा. हेच ते कारण आहे."

"ताई आपल्याला लवकरात लवकर टाईम ट्रॅव्हल कसं होत आहे, ते कसं काम करतं या गोष्टी शोधून काढाव्या लागतील जर आपण जे बोलत आहोत ते खरं असेल आणि देव करो असंच होत असावं तर मग दादाला आपण शोधू शकतो. आपण घरी आणू शकतो. लक्ष्मीला हरवण्यापासून वाचवू शकतो. ध्रुवीला हरवण्यापासून वाचवू शकतो."

"होय अंतरा हे आपण सर्व काही करू शकतो. फक्त टाईम ट्रॅव्हल कसं काम करत आहे हे आपल्याला कळू दे."

"आपण एक काम करू पुन्हा एकदा सर्व गोष्टींवर नजर फिरवू. घरात आणखी काही सापडतं का ते पाहू. मला असं वाटतंय बाबांनी याबद्दल संशोधन केलं असणार. नक्कीच त्यांना आपल्यापेक्षा जास्त माहिती असणार."

"होय ताई मला सुद्धा तेच वाटतय." तसं म्हणत त्या दोघीही पुन्हा त्या वह्या, ती पुस्तकं ,तिथल्या वस्तू पाहू लागल्या.

त्यांची चर्चा सुरूच होती. बाहेर काळोख वाढत होता. पण त्या काळोखाची त्यांना आता सवय झाली होती. आकाशातला चंद्र चेहऱ्यावर बारीक हसू ठेवून त्यांना लपून लपून पाहत होता.

••••

रहस्य

मध्यरात्र ०२.००

रवी पळत पळत विहिरीच्या वर आला. वर येताच त्याला तो परिसर बदललेला जाणवू लागला. पूर्वी पेक्षा जास्त आता इथे स्वच्छता दिसत होती. त्याने २०२५ मध्ये जो परिसर पहिला होता तसा हा परिसर नव्हता. रवीला पुन्हा शंका येऊ लागली. रवीचा गोंधळ काही कमी होत नव्हता.

तो पळत पळत घराच्या दिशेने जाऊ लागला. तोच त्याला कोणीतरी आवाज दिला.

"यायला थोडा उशीरच झाला तुला." त्याने मागे वळून पाहिलं. एक माणूस त्याच्या दिशेने चालत येत होता. रवी त्याच्याकडे शंकेने पाहू लागला. तो त्याला ओळखू शकत नव्हता. पण त्या माणसाने त्याला ओळखलं होतं.

रवी गंभीर नजरेने त्याला पाहू लागला.

"कोण.?"

"ओळखलं नाहीस ना.. माहीत होत मला.. तू सुद्धा ओळखू शकणार नाहीस.. मी सुद्धा ओळखू शकलो नव्हतो.."

रवी गंभीर नजरेने पाहतच होता.. त्याला काहीच कळत नव्हतं.. समोरचा माणूस कशाबद्दल बोलत आहे हे त्याला लवकर लक्षात येत नव्हतं.

"माझी मुलगी हरवली आहे इथे. ती आठ.."

"ध्रुवीच ना.." रवी एकदम गंभीर झाला. त्याचे डोळे मोठे झाले.

"ध्रुवी हरवली नाही रवी तू हरवला आहेस. या कर्मचक्रात तू हरवला आहेस." रवी एकदम त्याच्या जवळ गेला.

"कोण आहेस तू.. तुला माझ्याबद्दल कसं माहित.. कुठे आहे माझी मुलगी..?"

"तिला जिथे असायला हवं ती तिथेच आहे. तू चुकीच्या कालखंडात आला आहेस रवी.." रवी गोंधळून त्याला पाहतच होता.

"कुठे आहे मी. हे साल कोणत आहे.?"

"तू आता २०५० साली पोहोचला आहेस. ७५ वर्ष तू पुढं आला आहेस. तुला अजूनही तुझं जग मिळालं नाही रवी." रवी आणखीनच गोंधळून गेला.

"तुम्ही कोण आहात. तुम्हाला हे सगळं कसं माहीत.. कोण आहात तुम्ही..?"

"तुझ्या अजून लक्षात आलं नाही मी कोण आहे ते.. मी तूच आहे रवी.."

रवी आश्चर्यचकित होऊन भविष्यातल्या रवीला पाहत होता. भविष्यातला रवी आता वयाने खूप मोठा दिसत होता. त्याचे केस पांढरे झाले होते. वजन वाढलं होतं. रवी स्वतःला ओळखू शकत नव्हता.

"काय.?"

"होय. मी तूच आहे. मी भविष्यातला रवी आहे. २०५० सालचा आणि तू २०२५ सालचा."

"ध्रुवी कुठे आहे रवी.. हे सगळं काय सुरू आहे.. टाईम ट्रॅव्हल कसं होत आहे.. या विहिरीचं रहस्य काय आहे..?"

"मला सगळं माहित आहे रवी पण मी तुला सांगू शकत नाही.. तुला ते स्वतःला शोधावं लागेल."

"काय बोलतोयस तू..?"

"होय. मी तुला नाही सांगू शकत."

"पण का..?"

"कारण तुझ्याकडे अजिबात वेळ नाही.. तुला आताच्या आता पुन्हा टाईम ट्रॅव्हल करावं लागेल."

"पण का. माझी ध्रुवी कुठे आहे. ती इथेच आहे का. मला तिला एकदा पाहू दे." तसं म्हणत तो घराच्या दिशेने जावू लागला. भविष्यातल्या रवीने त्याला अडवलं. रवी जागीच थांबला. तो रवीकडे पाहू लागला.

"काय झालं ध्रुवी सोबत. ती कुठे आहे. मला आताच्या आता सगळं सांग." रवी, रवीची कॉलर पकडून जोरजोरात बोलू लागला..

"रवी मी तुझा भविष्यकाळ आहे. मी तुझ्याशी खोटं बोलणार नाही. जे तुझ्यासोबत सुरू आहे. ते माझ्यासोबत घडून गेलं आहे. प्रत्येक गोष्टीचा, प्रत्येक घटनेचा विचार करून मी इथे तुझ्या समोर उभा आहे."

"तू काय बोलतोयस ते मला कळत नाही."

"मला देखील कळालं नव्हतं. पण नंतर सगळ्या गोष्टी माझ्या सुद्धा लक्षात आल्या. मी जे बोलतोय ते नीट ऐक. तुझ्या जवळ वेळ फार कमी आहे तुला आताच्या आता इथून जावं लागेल."

रवी चिंतेत दिसू लागला. त्याला नेमकं काय करावं ते कळत नव्हतं. त्याचं भविष्य त्याच्या समोर होत. त्याला निर्णय घेता येत नव्हता.

"मला एकदा ध्रुवीला पाहायचं आहे."

"रवी ती तुला ओळखू शकनार नाही."

"का पण.. का ओळखू शकणार नाही.. मला तिला पाहू दे.. मला माहित आहे ती इथेच आहे.. मला तिला भेटायचं आहे."

"नाही रवी. तुला ज्या ध्रुवीला पहायचं आहे ती माझ्या काळातली ध्रुवी आहे. ती तुझी ध्रुवी नाही. ती तुला ओळखू शकणार नाही. तुला जर तुझं भविष्य वाचवायचं असेल तर तुला इथून लवकरात लवकर गेलं पाहिजे."

"तू काय बोलतोयस ते माझ्या काहीच लक्षात येत नाहीये." रवी अजूनही गोंधळला होता.

"मी तुझा गोंधळ समजू शकतो. पण स्वतःवर विश्वास ठेव. तू सगळं काही नीट करू शकतोस. तू केलं आहेस म्हणून मी इथे आहे."

"जर सगळं व्यवस्थित झालं आहे तर मी का आता मागे जाऊ."

"तुला कळत नाही रवी. ही तुझी टाईम लाईन नाही. ही माझी भविष्यातली टाईम लाईन आहे. तू इथे थांबू शकत नाहीस. जर तू इथे थांबलास तर तुझं भविष्य वेगळं होईल. मला ज्या परिस्थितीत तू आता पाहत आहेस हे तुझं भविष्य आहे. तुला मागे जावंच लागेल."

"मला ध्रुवीला पाहायचं आहे फक्त एकदा मला तिला पाहू दे."

"रवी तू जर आता गेला नाहीस तर फार मोठा अनर्थ होईल. तुझ्याकडे वेळ फार कमी आहे. हा चंद्र नाहीसा होण्याआधी तुला विहिरीत जावं लागेल. ऐक माझं."

"मला फक्त एकदा तिला पाहू दे." तसं म्हणत रवीने डोळे भरले.

"तू जर आता तिला पाहण्यात वेळ घालवलास तर तू तिला भविष्यात कधीच पाहू शकणार नाहीस रवी. ऐक माझं. निघ इथून. मी तुझी परिस्थिती समजू शकतो. मी सुद्धा यातून गेलो आहे पण विश्वास ठेव तू सगळं व्यवस्थित करशील."

"रवी अन्विता वाट पाहत आहे.. ध्रुवी वाट पाहत आहे.. बाबा तुझी वाट पाहत आहेत.. तुला त्यांच्यासाठी जावंच लागेल." भविष्यातल्या रवीने डोळे भरले. रवी शांत झाला. त्याने होकारार्थी मान डोलावली.

"मला एक सांग. तू पण माझ्यासारखाच इथे आला होतास.?"

भविष्यातल्या रवीने गंभीर नजरेने मान डोलावली अन् तो म्हणाला, "हे फक्त काळचक्र नाही रवी हे कर्मचक्र सुद्धा आहे. अन् तुझी लढाई कर्मचक्राशी सुरू आहे. वेळ आपली परीक्षा घेत नाही रवी.. आपण केलेलं कर्म आपल्याला ही वेळ दाखवत आहे. कळेल तुला लवकरच." रवी गंभीर होऊन रवीच बोलणं ऐकत होता.

"हे पुस्तक घेऊन जा. याचा तुला उपयोग होईल."

रवीने पुस्तक हातात घेतलं अन् तो विहिरीत उतरला. भविष्यातल्या रवीने मान डोलावली अन् रवीने पाण्यात उडी घेतली. त्याने उडी मारताच काही क्षणांत पाणी पुन्हा संथ झालं अन् आकाशातला अर्धचंद्र पाण्यात स्पष्ट दिसू लागला.

रवी त्याच्या घरी जाऊ लागला. त्याला जाता जाताच अन्विता गात असलेल्या गाण्याचा आवाज कानावर येऊ लागला. तो गालात हसला अन् पुटपुटला.

"रोमान्स करायचा एक चान्स सोडत नाही ही बाई."

••

१८-०२-२०२५

मध्यरात्र ०२.००

झोप काय असते हे अंतरा अन् अन्विता दोघीही विसरून गेल्या होत्या. त्या या संशोधनात इतक्या गुंतून गेल्या होत्या की दिवस काय अन् रात्र काय त्यांच्यासाठी एकच गोष्ट होती.

"अंतरा बाबा अजून कुठे जायचे का. त्यांचं आणखी एखादं घर होत का. किंवा अशी एखादी जागा जिथे ते काही महत्वाचं लपवू शकतील.?"

"नाही ताई. मी म्हणाले ना काका फार सावध असायचे प्रत्येक गोष्टीत. मी इतके वर्ष त्यांच्या सोबत होती खरं त्यांनी मला सुद्धा कळू दिलं नाही त्यांचं संशोधन." अन्विता पुन्हा विचारात हरवली.

"काय असू शकत अंतरा या टाईम ट्रॅव्हलच रहस्य. कसं काय होत असेल हे. कुठून होत असेल. तुझ्या डोक्यात काय आहे."

"मला वाटतंय घरा मागे जी जागा आहे तिथेच काहीतरी असावं. तिथेच एखादं पोर्टल उघडत असावं. ज्या पोर्टल मधून लक्ष्मी हरवली. ध्रुवी हरवली. दादा पण तिथेच पाहायला गेला होता."

"होय अंतरा. पण त्या जागेत नेमकं कुठे पण. आणि असं पोर्टल उघड्यावर असतं तर मग बरेच लोकं हरवले असते. तसं काही झालं नाही."

"मग ताई विहीर. विहीर असू शकते पोर्टल. ती पण त्याच जागेत आहे. काका पण सतत असायचे तिथे काही ना काही कारण सांगत."

"असू शकते. त्या जागेतील कोणतीही गोष्ट ही टाईम ट्रॅव्हलशी निगडित असू शकते. आपण जाऊन पाहू या का."

"नाही नको." अंतरा पटकन म्हणाली.

"मला रिस्क नाही घ्यायची. तुझी पण माझी पण. आपल्याला अजून काहीच माहीत नाही. जोपर्यंत आपल्याला कळत नाही टाईम ट्रॅव्हल कसं काम करतं तो पर्यंत आपण तिथं जायचं नाही ताई. माझी शप्पथ आहे तुला. तू पण हट्ट करायचा नाहीस." अंतरा एकदम बोलून गेली.

"हो अंतरा. कळतंय मला. मी असंच म्हणाले. नको काळजी करू." अन्विता हळुवार गालात हसत म्हणाली.

"मला आणखी कोणाला गमवायचं नाही ताई म्हणून" अंतरा डोळे बारीक करत म्हणाली.

"मला ही." अन्विता त्याच हसतमुख चेहऱ्याने म्हणाली.

"बर पुढे जाऊ या." अन्विताने बोलायला सुरुवात केली.

"हो."

"बाबांचं टाईम ट्रॅव्हल संबंधित मत होतं अंतरा की निसर्गाला जर टाईम ट्रॅव्हल दाखवायच असेल तर तो नैसर्गिक पद्धतीने दाखवेल .. बरोबर..?"

"होय.."

"आणि आता ती नैसर्गिक पद्धत आपल्याला शोधायची आहे."

"हो."

"या जागेत घडलेली एक वेगळी गोष्ट म्हणजे इथे झालेला उल्कापात. ही आपण नैसर्गिक गोष्टच म्हणू शकतो. कारण हे नैसर्गिकरित्या झालेली घटना आहे ती कोणी घडवून आणलेली नाही. बरोबर."

"अगदी बरोबर. आपल्या हातात नाही."

"मग अंतरा उल्कापाताचा आणि टाईम ट्रॅव्हलचा आपण संबंध का जोडू शकत नाही.?"

"कारण ताई त्याला कोणताही शास्त्रीय पुरावा नाही. उल्कापात होणं आणि टाईम ट्रॅव्हल होणं या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. याचा संबंध फक्त काल्पनिक गोष्टीत जोडू शकतो जसं की एखादी कादंबरी लिहिण्यासाठी, एखादा सायफाय सिनेमा बनवण्यासाठी इतकंच. पण प्रत्यक्षात ते शास्त्रीय दृष्ट्या अशक्यच आहे."

"तर मग अंतरा दुसरी कोणती गोष्ट असू शकते.?"

"तेच मला कळत नाही."

"मी सांगते. बघ आपण सुरुवातीपासून वेगळं असं काहीच केलं नाही. बाबांनी जे संशोधन केलं, आपण त्याच्यावरच चर्चा केली आणि तिथूनच आपल्याला लीड्स मिळत गेल्या. हे तुला पटतं, बरोबर की नाही."

"बरोबर."

"मग आता बाबांचंच संशोधन आपल्याला उल्कापात या विषयाकडे नेत आहे. आता बघ बाबांनी उल्कापात कुठे झाला आहे त्याची माहिती

लिहून ठेवली आहे. तिथली माती, तिथलं पाणी, वेगवेगळ्या आकाराचे दगड त्यांनी जमा करून ठेवले आहेत. तू म्हणतेस तसं, अशा ठिकाणी ते भेट देत होते आणि या गोष्टींची चाचणी सुद्धा करत होते.”

“होय करत होते.”

“आता ते का करत होते हे तर आपल्याला क्लिअर झालं आहे ना. बाबांना माहीत होतं टाईम ट्रॅव्हल होत म्हणून. ते टाईम ट्रॅव्हल कुठून होतं ते सुद्धा त्यांना माहीत होत. मग त्यांना कोणती गोष्ट अडवत होती.?”

“कदाचित जीपीएस.”

“ते तर टाईम ट्रॅव्हल झाल्यानंतर त्यांना कळणार ना. परंतु ते काहीतरी असं शोधत होते जे टाईम ट्रॅव्हल करायला मदत करतं.”

“मला काही कळत नाही ताई.”

“बघ अंतरा. आपल्याला हे माहित आहे की भविष्यातून कोणीतरी एक पुस्तक घेऊन बाबांना भेटायला आल होतं. बरोबर.”

“हो बरोबर.”

“मग ती व्यक्ती भेटायला का आली असावी असं तुला वाटतं.?”

“कदाचित त्यांना सांगण्यासाठी पुढे काय होणार आहे ते.”

“पण जर त्या व्यक्तीने बाबांना सांगितलं असतं तर ते घडलं नसतं. ते घडलं नसतं तर ती व्यक्ती मागे आलीच नसती. तुझाच एक पॅराडॉक्स आपल्याला हे सांगतो ना.”

"होय बरोबर."

"मग याचा अर्थ आपण असा घेऊ शकतो की त्या व्यक्तीला सुद्धा टाईम ट्रॅव्हल कसं होत आहे हे माहीत नसावं आणि ते जाणून घेण्यासाठी ती व्यक्ती बाबांकडे आली असावी."

"पण बाबाच का.?"

"कदाचित बाबांचं भविष्य. बाबांच्या भविष्यातलं काम बघून ती व्यक्ती मागे आली असावी."

"हे असू शकतं."

"पण ती व्यक्ती कोण असू शकते."

"तेच तर आपल्याला माहीत नाही. बाबा असतील असं मला वाटत नाही. कारण बाबा जर मागे आले असते तर त्यांनी लक्ष्मीला हरवू दिलं नसत.. आणि लक्ष्मी हरवली नसती तर पुढच्या घटना वेगळ्याच घडल्या असत्या."

"होय. रवी दादाच आला नसेल कशावरून."

"मला सुद्धा दाट शक्यता वाटते पण नाही सांगू शकत की तो आला होता की नव्हता. तो सध्या कोणत्या काळात आहे हे आपल्याला माहित नाही. तो टाईम लाईन मध्ये हरवला आहे की नाही हे आपल्याला माहीत नाही. तो नक्की भविष्य काळात आहे की भूतकाळात आहे हे आपल्याला माहित नाही. जोपर्यंत आपण टाईम ट्रॅव्हल करणार नाही तोपर्यंत या गोष्टी

क्लियर होणार नाहीत. आणि टाईम ट्रॅव्हल कसं होतं हे कळत नाही तोपर्यंत आपण टाईम ट्रॅव्हल करू शकणार नाही. हे चक्र गोल गोल असंच फिरत राहतय."

"तेच ना ताई.. एकमेकांवर ही गोष्ट अवलंबून आहे. हे झालं तर ते होईल आणि ते होण्यासाठी हे झालं पाहिजे." तशी अंतरा गोंधळून गेली अन् हसू लागली. अन्विता सुद्धा हसू लागली.

"काय गोंधळ आहे हा. ते टाईम ट्रॅव्हल का अस्तित्वात आलं असेल. नेमकं त्याचं काय उद्दिष्ट असेल. काय हेतू असेल. आपल्याला नेमकं काय दाखवायचं असेल.?"

"हेच तर एक रहस्य आहे अंतरा." तशी अंतरा एकदम अन्विताला बघू लागली आणि बघतच राहिली.

"काय झालं गंऽ. अशी का बघतेस.?"

"मी आता काय फील केलं माहितीये ताई."

"काय.?"

"देजा वू.."

"देजा वू..?"

"होय.. देजा वू.. मला देजा वू ची फिलिंग आली ताई. तुला नाही आली..?"

"नाही मला नाही आली."

"पण मला आली ताई.. तुला माहित आहे ना याचा अर्थ.?"

"हो. माहित आहे.. याआधी सुद्धा हे घडून गेलं आहे असं जेव्हा आपल्याला वाटतं त्याला आपण देजा वू मुमेंट म्हणतो."

"होय. आणि मला असं आता फिल झालं याचा अर्थ हे असं आधी घडून गेलं आहे. हे पुन्हा घडत आहे." अंतरा बारीक हसत म्हणाली. अन्विता एकदम शांत झाली.

"याचा अर्थ आपण याआधी सुद्धा असं बोलत बसलो होतो. ध्रुवी या आधी सुद्धा हरवली होती." अन्विता एकदमच नाराज होत म्हणाली.

"ताई नको काळजी करू. याचा अर्थ असा सुद्धा होऊ शकतो की ध्रुवीला आपण शोधून काढतो."

"अजून शोधलं नाही आपण तिला."

"पण आपण त्या गोष्टीच्या जवळपास आलो आहोत. ताई प्लीज स्वतः वर विश्वास ठेव. नाराज होऊ नको." तशी अन्विता पुन्हा तिच्याकडे पाहून हलकसं हसली.

"तुला एक विचारू ताई.?"

"हो."

"तुला आता टाईम ट्रॅव्हल होत आहे हे कळालं आहे. पण जेव्हा तुला हे माहित नव्हतं तेव्हा तुला काय वाटत होतं. ही गोष्ट खरी असू शकते असा कधी विचार केला होता."

"खरं सांगायचं तर नाही केला कधी विचार. पण टाईम ट्रॅव्हल होऊ शकत नाही असं कधी सुद्धा वाटलं नाही. कारण आपल्या पुराणात याची उदाहरणं आहेत. ब्रह्माच्या कथा आहेत, रामायण-महाभारतातले किस्से आहेत, या जगात काही रहस्यमय जागा आहेत जिथे देवांचा वास आहे असं मानलं जातं. देवांना ये-जा करण्यासाठी काही नैसर्गिक दरवाजे आहेत या गोष्टी ऐकून माहित होत्या. पण त्यावर कधी विचार केला नाही. ऐकून सोडून दिल्या. पण याच गोष्टी आपल्या सोबत घडतील असा तर अजिबात विचार केला नव्हता. आता असं वाटत आहे जेव्हा या गोष्टी नवीन ऐकल्या तेव्हाच त्यांचा अभ्यास केला असता तर आता काहीतरी उपयोग झाला असता."

"हो ना.. नॉर्मली आपण अशा गोष्टी ऐकून सोडून देतो. पण या गोष्टी कधी आपल्या उपयोगाला येऊ शकतील का याचा आपण विचारंच करत नाही. वेळ आली की आपल्याला सगळं कळू लागतं."

"खरं आहे आयुष्यात कधी काय होईल सांगता येत नाही. कधी कोणती गोष्ट घडेल सांगू शकत नाही. कधी कोण उपयोगाला येईल सांगता येणार नाही."

"ताई मल्टीवर्स बद्दल तुला काय वाटतं खरोखर असेल ते."

"कल्पना नाही. असूही शकतं, नसूही शकतं. आपल्याला जेव्हा कळेल तेव्हा कळेल. तोपर्यंत आपलं विश्व हेच आपलं सत्य आहे. आपण या विश्वात आहोत हेच आपलं अस्तित्व आहे." अन्विता शांतपणे म्हणाली.

"ताई," अंतरा जरा गंभीर होत बोलू लागली, "जर या विश्वात ध्रुवी मिळाली नाही अन् दुसऱ्या विश्वात जाण्यासाठी तुला एक नैसर्गिक दार मिळालं तर तू त्या दुसऱ्या विश्वातून तिथल्या ध्रुवीला आणशील.."

अन्विता गंभीर झाली. अंतराने तिची परीक्षा घेणारा प्रश्न विचारला होता.

"माझ्या ध्रुवीसाठी मी कोणत्याही विश्वात जाण्यासाठी तयार आहे अंतरा पण कोणत्याही विश्वातल्या ध्रुवीला त्रास होईल असं मी कधी वागणार नाही." अन्विता तितक्याच शांततेने म्हणाली. अंतरा गालात हलकसं हसली.

"आता आपण सध्या या विश्वावर फोकस करू या." अन्विता बारीक हसत म्हणाली. अंतराने तिला तसाच प्रतिसाद दिला.

••

सकाळ

रवी विहिरीतून वर आला. रात्र संपून दिवस उजाडत होता. त्याने पुन्हा आसपास पाहिलं परिसर तोच होता पण त्याला हवा असणारा नव्हता. त्याने ओळखायचं काय ते ओळखलं होतं. काळ आता त्याला कोणत्या कालखंडात घेऊन आला आहे ते त्याला थोड्याच वेळात कळणार होतं.

रवी पुन्हा घराच्या दिशेने जाऊ लागला. घराजवळ पोचताच त्याला दगडी बंगला नजरेस पडला.

हे रवीचं घर होत. त्याने ते ओळखलं. घराच बांधकाम पूर्ण झालं होत. म्हणजे हा नक्कीच पंच्याहत्तरचा काळ नव्हता.

तो घरात जाऊ लागला. त्याला हॉलमध्ये कोणीच दिसलं नाही परंतु त्याला त्याच्या लहानपणीच्या वस्तू दिसत होत्या. त्याची खेळणी त्याला दिसत होती. त्याची आवडती सायकल त्याला दिसत होती.

त्याने दार ठोठावलं.

"आप्पा वर यं. वर हाय मी.."

त्याला वरच्या खोलीतून आवाज येऊ लागला. तो जिना चढून वर गेला. वर जाताच त्याला एक पाठमोरा व्यक्ती दिसला जो फळ्यावर काहीतरी लिहित होता.

"अप्पा यऽ.." तसं म्हणत ती व्यक्ती मागे वळली अन् रवीला बघतच राहिली.

रवी त्या व्यक्तीला बघतच राहिला. ते श्रीधरराव होते. रवीचे बाबा होते. ते रवीला एकटक बघत होते. ते त्याला पाहून गोंधळले होते. त्यांची नजर गंभीर वाटत होती. ते रवी जवळ चालत आले. त्यांनी त्याचे खांदे धरले अन् बोलू लागले.

"विश्वास बसेना पाव्हणं तुम्ही.?"

रवी त्यांना पाहू लागला. त्याला वाटत होतं त्याच्या वडिलांनी त्याला ओळखलं पण त्यांनी रवीला ओळखलं नव्हतं. त्यांनी त्या पाव्हण्याला ओळखलं होतं ज्यांना ते पंचवीस वर्षांपूर्वी भेटले होते.

"तुम्ही अजून तरुण हायसा.. जसं तवा हुता अजून बी तसंच हायसा.. कोण हाय कोण म्हणायचं तुम्ही.." रवीचे बाबा गोंधळून डोळे मोठे करून रवीला विचारत होते. रवीला आता त्यांना खरं काय ते सांगणं भाग होत. त्याला आता त्याच्यासोबत काय घडत आहे हे सांगणं भाग होत. यातून बाहेर पडण्यासाठी त्याला आता कोणाची तरी मदत लागणार होती अन् ती मदत आता त्याला त्याचे वडिलच करू शकणार होते.

ज्या वडिलांचं कधी तोंड पाहणार नाही असं म्हणत रवी घर सोडून बाहेर पडला होता त्याच वडिलांची मदत तो आता एका वेगळ्या काळात, वेगळ्या कालखंडात घेत होता.

काळाचं हे चक्र कसं त्याला गोलगोल फिरवून पुन्हा तिथेच घेऊन आलं हे उमजून तो सुन्न पडला होता.

"मला तुमची मदत हवी आहे श्रीधरराव. माझ्या मुलीला शोधण्यासाठी तुमची मदत हवी आहे." रवी हात जोडून उभा होता. श्रीधररावांनी त्याचे हात धरले अन् त्याला बसायला खुर्ची दिली.

"पाव्हणं मला कायबी कळंना.. ही कसं काय शक्य हाय.. पंचवीस वर्षापूर्वी माझी तुमची भेट घडली हुती. ही कसं काय शक्य हाय.."

रवी त्यांना पाहत राहिला. त्यांना सगळं सांगणं भाग होत. त्याने त्याची कथा सांगायला सुरवात केली.

रवीचे बाबा डोळे मोठे करून रवी सांगत होता ते ऐकत होते. त्यांच्या अंगावर अधून मधून शहारे येत होते. एखादा सिनेमा पाहावा किंवा एखादी काल्पनिक कादंबरी वाचावी तसं त्यांना वाटत होतं. ते सांगताना तो अधून मधून भावनिक होत होता हे त्यांना कळत होतं.

रवीने ध्रुवी हरवल्यापासून ते तो इथे येई पर्यंत प्रत्येक गोष्ट सांगितली परंतु काही गोष्टी त्याने लपवून ठेवल्या. त्याने स्वतःची ओळख लपवून ठेवली. त्याने लक्ष्मी बद्दल लपवून ठेवलं. त्याने ते जाणून बुजून तसं केलं. लक्ष्मी बद्दल सांगून त्याला त्यांचं लक्ष दुर्लक्षित करायचं नव्हतं. स्वतःची ओळख सांगून त्याला त्यांना भावनिक करायचं नव्हतं. त्याने त्याचं बोलण थांबवलं तसं श्रीधरराव विचारात गेले.

"खरं वाटंणा.. न्हाई म्हंजी तुम्ही म्हणताय ती खरं असंल, खरं ही असं बी होवू शकतं यावर विश्वास बसेना पाव्हणं."

"असंच घडतंय श्रीधरराव. मी वेळेत हरवलो आहे. मला माझ्या मुलीला शोधायचं आहे. मला तिला घेऊन घरी जायचं आहे. मला मदत करा. मला तुमच्या मदतीची गरज आहे." श्रीधरराव विचारात गेले.

"खरं पाव्हणं मी यात कशी मदत करू शकतो. तुम्ही म्हणताय यातलं मला काय बी माहित नाय. यासाठी एखादा शास्त्रज्ञ हवा. तोच तुम्हाला यातनं बाहेर काढू शकतो. माझी तुम्हाला कशी मदत हूईल.?"

रवीने त्याच्या हातातलं पुस्तक त्यांना दिलं. ते पुस्तक पाण्याने भिजल होत. श्रीधररावांनी पुस्तक हातात घेत विचारलं.

"ही काय.?"

रवी शांत नजरेने म्हणाला, "हे पुस्तक तुम्ही लिहिलं आहे."

"काय..?" त्यांनी आश्चर्याने पाहत विचारलं, "म्या कवा लिहिलं.?"

"भविष्यात. "

"खरं..?"

"श्रीधरराव तुम्ही भविष्यात खूप काही करणार आहात."

"पाव्हणं मी साधा मराठी शाळेत शिक्षक हाय.. मी म्हणजी.."

"श्रीधरराव आयुष्य कधी कलाटणी मारेल हे सांगता यायचं नाही. माझ्याकडे बघून तुम्हाला हे कळेल. हीच ती बदल घडवण्याची वेळ आहे. काळाने त्यासाठी तुमची निवड केली आहे. ही संधी सोडू नका.." रवी गंभीर होत म्हणाला.

श्रीधरराव काही क्षण विचारात गेले अन् त्यांनी कपडा घेऊन फळा साफ केला. अन् खिडकीतून येणाऱ्या कडक उन्हात ते पुस्तक उघडं करून ठेवलं..

"पाव्हणं तुमचं आवरा. जरा अंघोळ पाणी उरका. उपाशी असाल. खाऊन घ्या. मला दुपार पातूर वेळ द्या. मंग बोलू आपण. या आवरून या. आपलंच घर हाय ही." तसे श्रीधरराव त्याच्याकडे शांतपणे पाहू लागले.

रवी डोळे भरून हात जोडून उभा राहिला. त्यांनी त्याचे हात खाली केले.

"पाव्हणं तुमची ल्येक म्हंजी माझी ल्येक. माझी ल्येक शोधायची म्हणून जिवाचं जितकं रान केलं असतं तितकं रान करीन अन् तुमास्नी ल्येकी सकट घरला पाठवीन."

रवीने डोळे भरले अन् त्याने त्यांना मिठी मारली. त्याच्या डोळ्यातून पाणी वाहू लागलं. श्रीधरराव त्याचं सांत्वन करु लागले. रवीचं दुःख त्यांना दिसत होत. त्याच रडणं त्यांना कळत होत. पण रवी त्या एका मिठीत किती दुःख लपवून ठेवत होता हे त्यांना दिसत नव्हतं. तो कशा कशासाठी रडत होता याची त्यांना तेव्हा कल्पना नव्हती. ते फक्त रवीला माहित होतं.

डोळे पुसत तो शांत झाला. अन् खाली आवरण्यासाठी निघून गेला.

श्रीधरराव त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होते. न जाणो का रवी त्यांना आपलासा वाटत होता. त्याच्याशी काहीतरी आपलं नातं असावं असं त्यांना सतत वाटत होतं. त्यांनी रवीला तसं थेट विचारलं नव्हतं कारण तसं काही असतं तर रवीने त्यांना सांगितलं असतं असा त्यांचा समज होता.

रवीशी कोणतंही नातं असो किंवा नसो माणुसकीच्या नात्याने ते रवीची मदत करतील हे त्यांनी मनोमन ठरवलं होतं.

त्यांनी वेळेचे अंतरंग पुस्तकावर नजर फिरवली अन् त्यात काय असेल याचा विचार करू लागले.

••

१८-०२-२०२५

सकाळ

अन्विता अन् अंतरा दोघीही बोलत बोलत झोपल्या होत्या. रात्री त्यांना कधी झोप लागली हे त्यांना कळालं नाही. सूर्याची किरणं जेव्हा अन्विताच्या चेहऱ्यावर पडली तेव्हा तिला जाग आली. तिने अंतरा कुठे आहे ते पाहिलं.

अंतरा टेबलवर मान टाकून झोपली होती. अन्विता उठली अन् तिने तिला सरळ खाली झोपायला सांगितलं. ती तशीच उठत जमिनीवर झोपली..

अन्विता हळुवार पाय टाकत खाली जाऊ लागली.

"ताई कुणीकडं.?"

"आवरते. तोपर्यंत तू आराम कर." अंतरा तशीच उठली अन् तिचा हात धरून चालू लागली.

"खालीच झोपते चल." दोघीही खालच्या खोलीत आल्या.

अन्विता तिचं आवरू लागली. अंतरा पडल्या पडल्याच घडलेल्या घटना पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर आणू लागली. तिला काकांची आठवण येऊ लागली. काका एखादी गोष्ट तिला कशी समजावून सांगत असायचे ते तिला आठवू लागलं. त्यांची शाबासकी आठवू लागली. त्यांचे विनोद आठवू लागले. त्यांच्यासोबत केलेली चर्चा आठवू लागली.

त्यांनी त्यांचं आयुष्य अशा गोष्टीत घालवलं होत ज्याचा कोणी विचार करू शकणार नव्हतं. हल्ली त्यांना असं वाटायचं की ज्या गोष्टीचा ते शोध घेत आहेत ती त्यांना लवकरच मिळेल मग त्यांना असं काय झालं की ते अचानक असे कोमात गेले. अंतरा एकदमच उठली. तिला काही तरी खटकलं. श्रीधरराव आजारी पडल्यापासून ते आतापर्यंत बरंच काही घडलं होतं. या सगळ्या गोष्टीची सुरवात काका आजारी पडल्यापासून झाली आहे असं अंतराला वाटू लागलं.

अन्विता तिचं आवरून आली.

"झाली झोप. रात्री कधी झोप लागली कळालंच नाही मला तर.." अन्विता बारीक हसत बोलू लागली.

"ताई.. मला काही तरी खूप महत्वाच सांगायचं आहे." अंतरा एकदम गंभीर होऊन बोलू लागली.

"काय झालं अंतरा.?"

"ताई मला काही तरी खटकत आहे."

"काय ते..?"

"या सगळ्याची सुरवात कधी पासून झाली वाटतंय तुला.?"

"म्हणजे.?"

"बोल तरी."

"आम्ही इथे आल्यापासून."

"तुम्ही इथे का आला.?"

"बाबा आजारी होते म्हणून."

"काका अचानक आजारी का पडले.?"

"मला काही कल्पना नाही."

"मला आहे. काका आजारी नव्हते. त्यांना आजार होता. पण ते बरे होते. चालत फिरत होते. ते आजारीपणामुळे कोमात गेले नाहीत."

"मग तुला काय म्हणायचं आहे. त्यांना कोणी."

"मला शंका आहे."

"पण कोण.?"

"ताई काका आणि माझं बोलणं झालं होतं."

"कधी ?"

"दोन दिवस आधी ते मला म्हणाले होते, घरी ये तुला खूप महत्वाचं सांगायचं आहे."

"काय महत्वाचं.. मग तू का आली नाहीस..?"

"मी का आले नाही.. मी का आले नाही.." अंतरा विचार करत म्हणाली.. "नाही ताई.. म्हणजे काका इथे नव्हते ते कुठे तरी बाहेर गेलेले."

"कुठे..?"

"मुंबईला."

"मुंबईला का.. कोणाकडे.?"

"माहीत नाही. मला म्हणाले होते एक आनंदाची बातमी आहे मला तुला सांगायची आहे. तू खूप खुश होशील."

"आणखी."

"मला म्हणाले, अकरा तारखेला येतोय मी सकाळी.. मी म्हणाले सांगा ना फोनवर म्हणून, तर बोलले की भेटूनच सांगणार. मी म्हटलं कॉलेजमध्ये वेळ होईल रात्री येते मग.. ठीक आहे म्हणाले जास्त उशीर करू नको.. इतकंच काय ते आमचं बोलणं झालं. त्या नंतर दोन दिवसांनी मी जेव्हा रात्री त्यांना भेटायला घरी आले तेव्हा तर काका बेशुद्ध अवस्थेत होते."

"तू हे आधी का सांगितलं नाहीस.?"

"मला नव्हतं माहित ते कोमात जातील म्हणून. ते अधून मधून छोट्या छोट्या गोष्टीसाठी मला असं बोलत असायचे. मी एवढा विचार केला नाही. पण आता या अशा गोष्टी घडल्या आहेत की मला एकदम काही तरी क्लिक झालं."

"पण अंतरा बाबांच्या रिपोर्टमध्ये तसं काही नाही. तसं असतं तर जाधवांनी आपल्याला तसं सांगितलं असतं."

अंतरा परत विचारात गेली. "काही कळेना ताई पण असं वाटतय की काही तरी आहे जे काकांना सांगायचं होतं."

"काय असेल मग ते. त्यांनी कुठे लिहून वगैरे ठेवलं असेल तर."

"सगळं घर शोधलं आहे ताई आपण. काही तरी नक्कीच मिळालं असतं आपल्याला."

"होय ते ही खरं."

"बाबा आणखी कोणाला भेटू शकतील..?"

"आणखी आणखी.." अंतरा विचार करत राहिली.

"माझ्या बाबांना. पण त्यांना पण काही माहीत नाही."

"मग आणखी त्यांचा कोणी मित्र. आप्पा पाटील.." अन्विताने हळूहळू त्यांचं नाव घेतलं..

"असू शकतं त्यांची मैत्री होती. जाधव पण म्हणाले होते आप्पा पाटलांनी त्यांना भेटलो होतो असं सांगितलं होतं. त्यानंतर त्यांच्याबद्दल असं कळालं."

"म्हणजे आप्पा पाटीलच आहे या सगळ्या मागे."

"मग त्याच्या बद्दल आपल्याला काही पुरावे कसे सापडत नाहीत. जाधव त्यांची खुले आम चौकशी कशी करत नाहीत. आप्पा पाटील ओपनली बोलत आहेत शेवटच भेटलो होतो म्हणून तर."

"कुठल्या बेसिसवर करणार अंतरा. बाबांच्या रिपोर्टमध्ये काहीतरी आढळलं असतंच ना." अंतरा एकदम शांत झाली.

"मी एक बोलू का अंतरा.?"

"बोल ना ताई."

"आपण एकदा भेट घेऊया का त्यांची.?"

"त्यांनी काही केलं तर.?"

"काय करणार आहेत. आपण लपून थोडी भेटत आहोत. वाटल्यास जाधवांना सांगून ठेऊ."

"तसं चालेल."

"चल मग. आवरून घे.. लगेच निघू.."

अंतरा पळतच तिचं आवरायला लागली.

••

तासाभरात अंतरा आणि अन्विता आप्पा पाटलांच्या वाड्यावर होत्या. दोघीही त्यांच्या समोर बसल्या होत्या. त्यांच्या सुनेने चहा आणून ठेवला अन् हसत हसत ती आत गेली.

"घ्या सुनबाई.. घे गं सोने.. आता कितवीला म्हणायची तू...?" आप्पांनी अंतराची चौकशी केली.

"आता तेरावीला आप्पा."

"आता रंऽ काय करायचं.. प्वॉर आमची एवढी मोठी झाली व्हय." आप्पा हसत हसत पाहू लागले.

"पोरीचा तपास कुठं पातूर आलाय.. जाधवांना काही सुगावा लागतोय का न्हाई.."

"काही नाही आप्पा.."

तसे ते शांत झाले.

"रवीचा काही थांगपत्ता..?"

"नाही.." अंतरा नाराज होत म्हणाली.

ते शांतच राहिले.

अन्विताने बोलायला सुरवात केली.

"आप्पा तुमच्याशी बोलायचं होत."

"बोला की."

"बाबांना तुम्ही भेटला होता.?"

"व्हय. अण्णानं बुलवून घितलं हुतं मला. कुठ जाणार म्हणत हुता.. म्हटला घरला ये एकदा भेटायचं हाय.." दोघीही एकमेकींना पाहू लागल्या.

"का म्हणजे. त्यांना काही महत्वाच सांगायचं होतं.?"

तसे आप्पा जरा सरकत बसले. त्यांनी काही क्षण जमिनीकडे पाहिलं अन् अन्विताकडे पाहून बोलू लागले.

"सुनबाई थेट सांगतो. राग इवून दिवु नका." तिने नुसतीच मान डोलावली.

"रव्यानं घर सोडून चांगलं न्हाय केलं. दोस्त माझा लय एकटा पडला. दोस्ता खातिर मी त्याला शोधला.. हांऽ.. लय शोधला.. खरं बेन कुठं जाऊन बसलं त्यालाच ठाव." अप्पा हात वारे करत सांगू लागले.

"अण्णा आमचा लय एकटा पडला वो.. आधी बायकु गेली.. मंग ल्याक कुठं बेपत्ता झाली.. त्याच वरसाला आई बी गेली.. रव्या एकुलतं एक.. त्यानं तर बापाला समजून घ्यायचं वो.. घ्यायला नको का..?"

अन्विताने होकारार्थी मान डोलावली.

"ती बी बेन घर सोडून गेल. अण्णा आमचा काय करील मग.. एकट राहून राहून याड लागायची पाळी आली अण्णांवं.. कुठं ती संशोधन बिंशोधन करीत बसलं.. इकड जा तिकड जा.. इथली जरा वाईच माती घे. तिथलं दगूड गोळा कर. काय बी करू लागला."

त्या दोघीही एकमेकींकडे पाहू लागल्या.

"अधणं मधनं काय बी बोलायचं. काळ कुणाचं ऐकत नाय.. त्यो काय बी करू शकतो. पुढ बी नेऊ शकतो माग बी नेऊ शकतो. अमास्नी काय कळायचं नाय.."

त्या दोघी शांतपने ऐकत होत्या.

"अण्णा एकदा म्हटला, आप्पा पोराची लय आठवण येती लका.." तसे आप्पांनी डोळे भरले. लगेच त्यांनी ते पुसले.

"बारक्या पोरावानी माझा दोस्त रडाय लागला. मला बघवतय व्हय.. म्हटलं तुझ्या लेकाला हुडकून आणतो.. नाय आणलं तर बाऽ च नाव लावत नाय इथनं म्होरं."

"मग.." अन्विता डोळे मोठे करून बोलली.

"हुडकलं की.. दोन तासात हुडकलं.."

"कसं काय.. कधी..?"

"दोस्त आमचा डीआयजी हुता मंबयला.. आम्ही एकाच वर्गातलं.. त्याला म्हटलं अण्णा आपला पोरासाठी रडाय लागलाय. पोराला हुडिक. दुसऱ्या तासाला, पत्ता पाठवला पठ्यानं.."

"मग काय झालं.?"

"मंग काय अण्णा येतो म्हटला भेटून."

"पण ते नव्हते आले घरी आमच्या." अन्विता पटकन म्हणाली.

"हाय ठाव मला. मला म्हटला त्यो.. नाय गेलो म्हणूनशान.."

"का.. का भेटले नाही ते..?" अन्विता आता आणखी उत्सुक झाली होती.

"मी बी त्याला इचारलं.. मग म्हटला पुढल्या येळंला जातो.. धाडस काय हुईना.."

"मग पुन्हा कधी आले होते ते मुंबईला.?"

"कुठला येतोय. कोमात हाय न्हव्हं का.."

तशा त्या दोघी नाराज झाल्या.

"का आले नसतील बाबा घरी.?"

"कुणास ठाव त्याला काय झालं ती.. जातो म्हटला अन् गेला नाय.. कुठं त्या दिन्याला भेटाय गेला.. कसला दगड का काय बघायचा हुता त्याला."

"कोण दिन्या आणि कसला दगड.?"

"दोस्त आमचा. मंबईत सोन्याचं मोठं दुकान हाय त्याचं.. तुमास्नी ऐकून म्हाईत असंल. सोनाई जुलर म्हणूनशान."

"सोनाई ज्वेलर्स."

"तिच ती.."

"त्यांचं काय मग इथं."

"त्यो आमचा दोस्त. या चौघांची आमची यारी. अधनं मधनं कवा तर येत्यात ती इथं. अण्णान या दिन्याला सांगून ठिवलं हुतं की असा असा दगड कवा नजरला आला तर कळीव."

"कसला दगड." अन्विताने गंभीर नजरेत विचारलं.

"काय की कसला. अण्णाला आमच्या कसला ह्यो छंद हुता काय की. कसली दगड गोळा करायचं ती."

दोघींनी एकमेकींकडे पाहिल.

"मग पुढे."

"पुढं काय. पोराला भेटला नाय. ह्यो दगूड बघून आला. आला अन् कोमात गेला."

"आप्पा तुमच्याशी काय बोलणं झालं होतं.. तुम्ही का आला होता बाबांना भेटायला ते सांगितलच नाही तुम्ही..?"

"मी व्हय.." तसे आप्पा गंभीर होत म्हणाले. "फोन केला हूता मी माझ्या दोस्ताला, म्हटलं रव्याचा एकांदा फोटू असला तर पाठिव.. ह्यो अण्णा काय तसा जायचा नाय.. जरा फोटू दावला की लगीच भेटाय पळल.. दोस्तान माझ्या लगीच फोटू धाडला.. अण्णांन पिन भेटाय बुलवलं हुतं म्हटलं, फोटू दावू त्याला.. त्योच फोटू दावाय आल्तो म्या.." आप्पांनी लगेच त्यांना त्यांच्या फोन मधला फोटो दाखवला.

तो फोटो पाहताच दोघी एकमेकांकडे डोळे मोठे करून पाहू लागल्या. अन्विताच्या वाढदिवसाला काढलेला त्यांच्या तिघांचा तो फोटो होतो. हाच फोटो ध्रुवीने सोशल मिडियावर अपलोड केला होता.

"मग काय झालं आप्पा..?"

"मग काय फोटू बघून सुन्न पडला न्हवं.. डोळ पाण्यानं दबदबाय लागलत. म्या म्हटलं चल आताच्या आता जाऊ भेटाय.."

"मग.?"

"नाय म्हटला आता लय महत्वाचं काम हाय. कुठं तर जायचं हाय."

"कुठं जायचं होत.?"

"कुणास ठाव. मला म्हटला बस जरा वाईच तुझ्याकडं काम हाय लय म्हत्वाच."

"कसलं काम.?"

आप्पा बोलू लागले, "टेबलाव बसून शान पत्र लिव्हाय लागला. ती पत्र लिफाफ्यात टाकलं अन् मला दिलं. मला म्हटला, आप्पा ही पत्र माझ्या लेका पातूर पोचव.. काय बी कर खरं त्याला ही पत्र दे."

"पत्र, कसलं पत्र.. काय होत त्यात ?"

"आता ती मला कसं ठाव."

"मग ते पत्र कुठंय.?"

"दिलं की मी रव्याला."

"कधी ?" दोघीही आश्चर्याने ओरडल्या. आप्पा डोळे मोठे करून बघू लागले.

"तवाच. दुसऱ्या दिशी.. रव्या भेटला हुता. त्याला म्हटलं तुझ्या बाऽ न तुला द्याय सांगितलं हाय."

अन्विता गोंधळली होती. "अप्पा ही गोष्ट तुम्ही पोलिसांना का सांगितली नाही.?"

आप्पा हसून बोलू लागले. "सुनबाई, अण्णा अन् मी एका ताटात जेवलो.. अण्णा म्हणल तीच म्या केलं.. अण्णा म्हटला, ही पत्र रव्यालाच भेटाय पायजे.. रव्या नाय तर रव्याची बायको.. दुसरं कुणी बी ती वाचू शकत नाय.. ती समजू शकत नाय.. कुणाला या पत्राबद्दल सांगू नगं.. मी म्हटलं असंल काय तर खाजगी.. दुसऱ्या दिशीच मला रव्या भेटला.. मी त्याला पत्र दिलं.. तुमास्नी काय म्हटला का न्हाई त्यो.?"

"आप्पा दादा तेव्हापासून गायब आहे."

"आरंऽ होय की.." तसं म्हणत त्यांनी डोक्याला हात लावला.

"आता पुढं ही असं हुईल ही काय मला ठाव नव्हतं."

एवढ बोलून अप्पा शांत बसले. अन्विता, अंतरा विचारात गेली.. त्या दोघीही एकमेकींकडे डोळे मोठे करत बघू लागल्या. अन्विता लगेच जाग्यावरून उठली. अंतराही उठली.

"आप्पा येतो आम्ही." अन्विताने घाई घाईत त्यांचा निरोप घेतला. त्या दोघीही गाडीत जाऊन बसल्या अन् घराच्या दिशेला निघाल्या.

"ताई माझं तर आता डोकं दुखायला लागलं आहे. किती हा गोंधळ. किती हा सस्पेन्स."

"गोंधळ नाही अंतरा. ज्या वेळी जे घडायचं होत ते बरोबर त्या वेळेला घडलं आहे फक्त आपल्याला या गोष्टी मागे-पुढे कळत आहे. घरी चल. मी सगळं तुला एक-एक घटना समजावते. आलंय माझ्या लक्षात." तसं म्हणत तिने गाडी घराच्या दिशेला वळवली.

दोघीही घरी आल्या. अन्विताने बोलायला सुरुवात केली.

"अंतरा एक-एक घटना लिहून काढ. आपल्याला क्रमाने सगळा घटनाक्रम मांडायचा आहे तेव्हाच आपल्याला आपलं उत्तर मिळणार."

"हो ताई."

"बाबांना रवीची आठवण येऊ लागली आणि आप्पांनी रवीला शोधून काढलं." अंतरा फळ्यावर लिहून घेऊ लागली.

"त्याच वेळेत दिनकर रावांनी त्यांना दगड मिळाला आहे म्हणून सांगितलं."

"बाबा मुंबईत आले त्यांनी रवीला न भेटता तो दगड पाहिला आणि ते गावी आले."

"आप्पांनी रवीचा फोटो दाखवला. बाबांनी एक पत्र आप्पा पाटलांना दिलं.. त्यानंतर बाबा कोमात गेले. मग आम्ही आलो. रवीला पत्र मिळालं. आधी ध्रुवी आणि मग रवी हरवले." अंतराने एका खालोखाल सगळं लिहून घेतलं.

"पत्रात काय असेल ताई.? बाबा रवीला भेटले का नाहीत..? ते कुठे जाणार होते..? अचानक असं काय झालं की बाबा कोमात गेले ?"

"मी पण तोच विचार करत आहे."

"बाबा मुंबईत आले.. तो दगड घेतला पण रवीला भेटले नाही.. असं काय होत त्या दगडात जे मुलापेक्षा जास्त महत्वाचं होतं..?" अन्विता सगळा घटनाक्रम पुन्हा जुळवू लागली.

"बाबांचं आणि सोनाई ज्वेलर्सच कनेक्शन.. रवीच त्याच ज्वेलर्सकडून चैन बनवण. तो दगड.. तो सोनेरी दगड.. अंतरा अंतरा येस येस.. वी गॉट इट.." अन्विता एकदम ओरडत सांगू लागली.

"अंतरा, बाबा तो दगड शोधत होते. अन्विता मोठ्याने बोलू लागली. तिचा उत्साह वाढला. "त्यांना तो दगड मिळाला. तो दगड रवीकडे होता. तोच दगड ध्रुवीकडे होता. तोच दगड माझ्याकडे आहे. म्हणजे याचा अर्थ.." अन्विता डोक्याला हात लावत आश्चर्याने बोलू लागली.

"याचा अर्थ तो दगड अंतरा.. तो सोनेरी दगड तोच कारणीभूत आहे या टाईम ट्रॅव्हलला."

"याचा अर्थ अंतरा तो रवीच होता ज्याने हे पुस्तक भविष्यातून आणलं. तो रवीच होता जो बाबांना भेटायला आला होता. बाबांनी रवीला टाईम ट्रॅव्हल करताना पाहिलं होतं. म्हणून ते इतके खात्रीशीर होते."

"पण ताई दादाने ओळख का लपवली असेल?"

"कदाचित त्याला बाबांचं आणि त्याच भविष्यात पटत नाही हे लपवायचं असेल.."

"मग त्याने लक्ष्मी हरवणार आहे हे का सांगितलं नाही.?"

"नाही माहित. त्या मागचं कारण नाही माहित. कदाचित तो विसरला असेल. कदाचित त्याला आधी ध्रुवीला शोधायचं असेल. कदाचित त्याला बाबांचं लक्ष विचलित करायचं नसेल. किंवा लक्ष्मी आणि त्याची भेट झाली असेल.. रवीला उशीर झाला असेल.. काहीही असू शकत अंतरा.. येस बरोबर.."

"पण ताई बाबा डायरेक्ट रवीला भेटायला का आले नाहीत. त्यांनी सरळ सरळ त्याला भेटून सगळं सांगितलं का नाही.?"

"त्यांना माहित नव्हतं अंतरा. बाबांना रवीचा पत्ता माहित होता पण ज्याच्याकडे दगड होता तीच व्यक्ती रवी आहे हे त्यांना माहीत नव्हतं. आप्पांनी फोटो दाखवला तेव्हा त्यांना कळालं. तेव्हा त्यांनी पत्र लिहिलं कारण ते कुठे तरी जाणार होते.."

"ते कुठे जाणार होते..?"

"त्यांना फक्त दगड हवा होता अंतरा.. तो त्यांना मिळाला होता.."

दोघीही डोळे मोठे करून एकत्रच बोलल्या, "टाईम ट्रॅव्हल करायला जाणार होते ते.. शीट.."

अन्विता गंभीर नजरेने बोलू लागली, "अंतरा रवी गाडीतून उतरला तेव्हा त्याच्या हातात काही नव्हतं ना.?"

"नाही ताई. तो गडबडीत उतरला होता. मला चांगलं आठवत आहे." तशा त्या दोघी डोळे मोठे करत एकमेकींकडे पाहू लागल्या.

"शीट शीट शीट.." अंतरा पळत पळत रवीच्या गाडीजवळ गेली.

तिने लॉक उघडून दरवाजा ओपन केला अन् काही पत्र वगैरे मिळतंय का ते शोधू लागली. अन् तिला ते पत्र मिळालं. तिला एक लिफाफा मिळाला. ती गाडी लॉक करून पुन्हा अन्विता जवळ आली.

"ताई.." तिने जोरजोरात श्वास घेत तो लिफाफा अन्विताला दिला. तो अजून बंद होता. याचा अर्थ रवीने देखील तो लिफाफा वाचला नव्हता.

तिने तो लिफाफा ओपन केला. त्यातलं पत्र काढलं अन् वाचू लागली. अंतरा तिच्या बाजूला येऊन उभी राहिली.

प्रिय रवी

तुला मी जे काही सांगणार आहे ते आता कळणार नाही, पटणार नाही. कारण ही गोष्टच तशी आहे.

मी आयुष्यभर केलं ते माझ्या लेकीला शोधण्यासाठी केलं. जे तू सुद्धा करत होतास. तुला आता ते कळणार नाही. पण एक गोष्ट लक्षात ठेव मी कायम तुझ्यावर प्रेम करत होतो.

माझ्यासाठी एकच गोष्ट कर माझ्या नातीला म्हणजे तुझ्या लेकीला ध्रुवीला गावी घेऊन येऊ नकोस. माझं बरं वाईट ऐकलं तरी तिला गावी घेऊन येऊ नकोस.

हे मी तुला उपहासाने म्हणून सांगत नाही त्यामागे एक मोठं कारण आहे जे तुला आता सांगून कळणार नाही. तू ते समजू शकणार नाही. ध्रुवी गावी आली की फार मोठा अनर्थ घडू शकतो. मी ते शब्दात सांगू शकत नाही कारण तुला ते आता पटणार नाही.

आपलं नातं बाप मुलगा म्हणून कधी चांगलं होऊ शकलं नाही पण विश्वास ठेव आपण मित्र म्हणून दोनच दिवस भेटलो पण जन्मोजन्मीचे मित्र होऊन गेलो.

मी फार कोड्यात बोलत आहे ते तुला कळणार नाही ते फक्त मला माहित आहे. तू कृपया करून गावी येऊ नकोस. ध्रुवीकडे लक्ष ठेव.

देव न करो पण जर काही घडलंच तर मी तुला मदत करेन. अंतरा तुझी मदत करेन. तिला माहित आहे माझं लिखाण.

मी फार लांब जात आहे. एका लांबच्या प्रवासाला जात आहे. मला जे हवं होतं, मी जे शोधत होतो ते मला मिळालं आहे. कदाचित हे पत्र तुला मिळेल तेव्हा मी या जगात नसेन. मला शोधण्याचा प्रयत्न करू नको. तू फक्त ध्रुवीकडे लक्ष ठेव. माझं प्रेम आणि माझा आशीर्वाद कायम तुमच्या पाठीशी आहे.

अन्विताचे डोळे भरून आले होते. अंतरा सुन्न होती.

"बाबांना माहीत होतं. ध्रुवी हरवणार आहे, हे बाबांना कळालं होतं. त्यांनी आपल्याला सावध करायला पत्र लिहिलं होतं." अन्विता रडत रडत बोलू लागली.

"तू बरोबर बोलत होतीस ताई." अंतरा रडत रडत बोलू लागली.

"दादा काकांची मदत घेत होता. म्हणून काकांना टाईम ट्रॅव्हल होऊ शकतं हे माहित होतं. काकांनी दादाला ओळखलं नव्हतं. म्हणून त्यांना दगड कधी मिळाला नाही. त्यांना जेव्हा कळालं की भूतकाळात आलेला माणूस हा आपलाच मुलगा आहे तेव्हा त्यांनी आपल्याला सावध करण्यासाठी हे पत्र लिहिलं. त्यांना तो दगड मिळाला होता. ते लक्ष्मीला शोधण्यासाठी जात होते. त्यांना त्यांची मुलगी परत आणायची होती ताई." अंतरा डोळे पुसता पुसता बोलू लागली.

"पण ताई दादाला हा दगड कसा मिळाला..?"

"रवीला कसा मिळाला माहित नाही. पण हा दगड रवीकडे होता हे मला माहीत आहे. त्याने आमच्या वाढदिवसाला आम्हा दोघींना सोन्याची चैन केली होती. त्यात त्याने या दगडापासून हार्ट शेप बनवून घेतला होता. आणि अशीच एक चैन त्याच्याकडे सुद्धा होती."

"ताई काका म्हणत होते मी प्रवासाला जाणार आहे मग अचानक असं काय झालं त्यांना..?"

"अंतरा ते जाणार असतील.. त्यांनी ठरवलं असेल पण मला वाटतंय तेवढ्यात त्यांची तब्येत बिघडली असणार. ते कोमात जातील हा विचार त्यांनी सुद्धा केला नसणार. तो फक्त एक अपघात होता.."

"म्हणजे काकांना मला हेच सांगायच होत म्हणून त्यांनी मला फोन केला होता .. तर मग तो दगड..?"

"तो असेल इथेच कुठे तरी."

तशी अंतरा घरभर तो दगड शोधू लागली. एका कोपऱ्यात तिला तो दगड मिळाला.

"हाच. हाच तो दगड." अन्विताने लगेच तिची बॅग काढली. अन् तिची चैन काढून तो दगड अंतराला दाखवू लागली.

"आप्पा पाटील म्हणाले तो ज्वेलर्स तो हाच. रवीने इथूनच ही चैन बनवली म्हणून बाबांच्या मित्राला हा दगड मिळाला. त्यांनीच हा दगड बाबांना दिला.."

अंतरा डोक्याला हात लावून बसली. "असं सगळं झालंय तर.."

"पुढे काय अंतरा.. बाबांनी स्पष्ट तुझं नाव घेतलं आहे.."

अंतराने तो लिफाफा घेतला अन् त्याला सरळ केलं. बाबांच्या ड्रॉवर मधून तिने एक पेन काढला अन् त्या पेनाने कागदावर लाईट मारू लागली. दोघींना त्यात काहीतरी लिहिलेलं दिसू लागलं.

दोघीही एकमेकांकडे डोळे मोठे करत म्हणाल्या, "टाईम ट्रॅव्हलच रहस्य."

••

०९-०२-२०००

रवी त्याचं आवरून वरती खोलीत आला होता. श्रीधरराव पुस्तक वाचत बसले होते. रवी त्या ठिकाणी शांतच बसला होता. श्रीधरराव बराच वेळ पुस्तक वाचत होते. रवी त्यांचं पुस्तक कधीपर्यंत वाचून होईल याची वाट बघत होता. काही वेळाने त्यांनी पुस्तक बंद केलं आणि रवीकडे पाहू लागले.

"काय आहे या पुस्तकात.?" रवीने प्रश्नार्थक नजरेने विचारलं. श्रीधरराव त्याच्याकडे गंभीर नजरेने पाहत राहिले.

"सांगतो.. मला समदं कळालं न्हाई खरं जी बी कळालं ती सांगतो. त्याआधी तुमास्नी दोन प्रश्न इचारायचं हायत.."

"विचारा." रवी पटकन म्हणाला.

"तुमचं नाव काय अन् तुमचं माझं नातं काय.?"

रवी एकदम बावरून गेला. त्याला नेमकं कोणतं उत्तर द्यावं तेच कळेना. श्रीधररावांनी त्याला अचानक हा प्रश्न का विचारला तेच त्याला कळेना. ते एकदम गंभीर नजरेने त्याला पाहत होते.

"अन्वित. माझं नाव अन्वित. अन् आपण दोघं मित्र आहोत भविष्यात."

"कसं काय.?"

"कसं काय म्हणजे."

"कसं काय म्हंजी मित्र कसं काय होतो आपण."

रवी पुन्हा विचारात गेल्यासारखा गेला अन् बोलू लागला, "मी एक प्रकाशक आहे आणि तुम्ही भविष्यात एक लेखक होता. यातूनच आपली भेट घडते अन् आपण मित्र होतो."

श्रीधरराव आणखी गंभीर झाले. "मग तुम्ही भविष्यात मला भेटायला का गेला नाहीत.?"

"तुम्हालाच भेटायला म्हणून आलो होतो. तुमची तब्येत बरी नव्हती. तुमच्या मुलाने मला फोन करून बोलावून घेतलं. मी माझ्या कुटुंबासोबत आलो अन् पुढे हे सगळं असं घडलं." रवी पटपट बोलू लागला.

तसे श्रीधरराव जरा शांत झालेले दिसू लागले. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहून त्यांचं समाधान झालेलं दिसू लागलं. पण क्षणात, त्यांच्या काही तरी लक्षात आलं अन् ते रवीच्या जवळ आले.

"माफ करा साहेब माझ्यामूळं तुमच्याव ही येळ आली." श्रीधरराव हात जोडत बोलू लागले.

"नाही नाही असं बोलू नका. यात तुमची काही चूक नाही. जे घडायचं होतं ते घडलं. ते आता बदलू शकत नाही. जे बिघडलंय ते आता आपण दुरुस्त करू." रवी त्यांची समजूत घालत म्हणाला.

तसे श्रीधरराव शांत झाले अन् बोलू लागले, "तर मग पाव्हणं आपल्या चर्चेला सुरुवात करू. आता बघा ही जी पुस्तक तुम्ही आणलयसा त्यात

सगळी संशोधन, शास्त्रज्ञांची मतं ही काय काय लिहिल्यालं हाय. ती जरा सोप्या भाषेत आपल्याला कळंल असं सांगितल्यालं हाय. तुम्ही म्हणता तसं टाईम ट्रॅव्हल का काय, ते कसं कसं घडू शकत ती यात हाय.''

''मग कसं होतं टाईम ट्रॅव्हल.?''

तसे श्रीधरराव हसले अन् म्हणाले, ''पाव्हणं यात सपष्ट नमूद हाय की टाईम ट्रॅव्हल होऊ शकत नाय.''

''काय.?''

''व्हय.''

''अस कसं होईल. तुम्हीच लिहिलं आहे हे पुस्तक.''

''असंल की, खरं भविष्यात. आता मला यातलं काय बी म्हाईत न्हाय.'' रवी एकदम गंभीर झाला. त्याला काय होतंय ते कळेना.

''श्रीधरराव असं कसं होईल. हे पुस्तक आपल्याला मदत करेल असं रवी म्हणाला होता.'' तसे श्रीधरराव गंभीर झाले.

''आमच्या रव्याला बी ही म्हाईत हाय..?''

रवीने एकदम डोळे घट्ट मिटले. त्यानं नकळत केलेली चूक त्याच्या आता लक्षात आली.

''नाही म्हणजे माफ करा चुकून एकदम रवी आलं माझ्या तोंडातून.''

तसे श्रीधरराव हसले अन् म्हणाले, ''पाव्हणं जरा शांत व्हा. गोंधळून जाऊ नका.''

तसा रवी एकदम रडवेल्या चेहऱ्याने बोलू लागला.

"श्रीधरराव तुम्हाला परिस्थिती लक्षात येत नाहीये. माझी मुलगी लहान आहे. फक्त आठ वर्षांची आहे ती. ती या काळचक्रात कुठेतरी हरवली आहे. हे मलाच नीट कळत नाहीये. तिला ते कसं कळेल. माझी बायको नऊ महिन्यांची गरोदर आहे. तिची तिकडे काय अवस्था झाली असेल याची कल्पना नाही तुम्हाला." तसं म्हणत रवीने डोळे भरले.

श्रीधरराव शांत नजरेने त्याला पाहू लागले. ते त्याच्या जवळ जाऊन त्याचं सांत्वन करु लागले.

"पाव्हणं गप व्हा. असा धीर सोडू नकासा. आपण काढू यातनं मार्ग." रवी काही वेळाने शांत झाला.

श्रीधरराव बोलू लागले, "बघा पाव्हणं ही पुस्तक आपल्याला दिलं म्हंजी नक्कीच काय तर ईचार करून दिलं असणार."

"खरं तुम्ही म्हणताय यात टाईम ट्रॅव्हल कसं होतं ते लिहिलं नाहीये."

"होय की.. नाहीच त्यात.."

"मग."

श्रीधरराव भुवया उंचावत म्हणाले, "कदाचित ती आपण शोधून काढावं अशी त्येची इच्छा असंल."

"पण का.. असं का केलं असेल त्याने. त्याने सरळ सरळ का सांगितलं नाही. मला परत का मागे पाठवलं. तो स्पष्ट म्हणाला माझ्याकडे वेळ कमी आहे चंद्र नाहीसा होण्याआधी विहिरीत जा.."

"तेच तर गुढ हाय. त्या माणसान ही सगळं बघितलं हाय म्हंजी त्याला सगळंच ठाव असणार तरी बी त्यानं तुमास्नी इथं धाडलं यात काय तर गूढ हाय."

"खरं काय."

"तीच आपल्याला शोधून काढायचं हाय पाव्हणं." तसं म्हणत श्रीधररावांनी खडू हातात घेतला अन् बोलू लागले, "पाव्हणं तुम्ही कसं-कसं टाईम ट्रॅव्हल केलंसाऽ ती समंद सांगा. एक अन् एक गोष्ट आठवून सांगा. कुठल्या दिशी केलं. कुठ गेलासा, कधी गेला, तिथं काय काय झालं समदं ईस्कटून सांगा."

"बर." रवी बोलू लागला, "१२ फेब्रुवारीला मी पहिल्यांदा टाईम ट्रॅव्हल केलं आणि भूतकाळात आलो तेव्हा १९२५ साल होत."

श्रीधरराव रवी सांगत असलेली आकडेवारी फळ्यावर लिहू लागले. "त्यानंतर मी १९२५ मधून १९७५ साली आलो. मग १९७५ मधून २०५० साली आणि मग २०५० मधून २००० साली आलो."

श्रीधरराव त्या घटनेचं निरीक्षण करू लागले.

"पाव्हणं बघा तुम्ही कसं फिरला ते. आधी १०० वरीस मागं गेला. मंग ५० अन् ७५ वरीस पुढं गेला. आणि मंग ५० वरीस मागं आला." त्यांनी एका खालोखाल त्या गोष्टी लिहिल्या.

"बरोबर."

"आणि तुमास्नी जी म्हाईत हाय ती समदं सांगा."

"पहिलं म्हणजे त्या विहिरीत पडलं की टाईम ट्रॅव्हल होत. आणि एक महत्वाची गोष्ट म्हणजे हा सोनेरी दगड सोबत असावा लागतो." त्याने खिशातून तो दगड काढला.

श्रीधरराव तो दगड निरखून पाहू लागले.

"ह्यो तुमास्नी कसा मिळाला..?"

"हा माझ्या घरी होता. मी लहान असताना मला तो मिळाला होता."

"बर. याच्या बद्दल आनी काय माहिती.?"

"काही नाही. मला चांगला वाटला म्हणून मी सोनं समजून ठेवून घेतला. खरं हा सोन्याचा नाही."

"तरी बी इतका चकाकतो."

"होय."

"मग यातच काय तरी हाय जी ही समदं घडायला कारणीभूत हाय."

"कदाचित."

"बर पुढं आणखी."

"आणखी त्याने सांगितलं की चंद्र नाहीसा होण्याआधी जा. असं का म्हणाला तो..?"

"चंद्र. म्हंजी चंद्राचा इथं संबंध हाय काय तरी."

"कसा काय.?"

"तुम्ही भविष्यात म्हटला हाय म्हंजी काय तर असणार." तसे श्रीधरराव त्याला आणखी माहिती विचारू लागले.

"आणखी विशेष असं काही आठवत नाही."

"काही वेळा टाईम ट्रॅव्हल झालं नाही कारण माझ्या जवळ हा दगड नव्हता."

"का नव्हता.?"

"ते मी कपडे बदलली होती त्यामुळे."

"तुमास्नी कवा लक्षात आलं. कसं काय कळालं की ह्यो दगड महत्वाचा हाय." रवी एकदम गंभीर झाला.

"म्हणजे त्याचं असं झालं की हा दगड माझ्या मुलीकडे पण आहे तिच्या चैनीत. माझ्या बायकोच्या मते ती ही चैन शोधायला गेली अन् हरवली आणि मी पण तसाच हरवलो. जेव्हा हा दगड सोबत नव्हता तेव्हा टाईम ट्रॅव्हल झालं नव्हतं पण जसा सोबत आला तसं ते दुसऱ्या-तिसऱ्यांदा झालं."

रवीने एक नि:श्वास सोडला. त्याने जाणून बुजून लक्ष्मीचा उल्लेख टाळला. श्रीधरराव प्रत्येक गोष्ट किती बारकाईने ऐकत आहेत हे त्याच्या लक्षात आलं.

"पाव्हणं दगड सोबत असल्यावर लगीच टाईम ट्रॅव्हल व्हायला पायजे. दुसऱ्या-तिसऱ्यांदा का झालं नाय..?"

"नाही माहित."

"हीच शोधाय पायजे. फक्त दगड इथं उपयोगाचा न्हाई.. दिवसाचं तुम्ही कवा गेला हुता का.. ?"

"हो. पण नाही झालं."

"दगड हुता सोबत. नीट आठवून बघा.."

रवी आठवू लागला.

"नाही नव्हता."

"चला आता."

"आता.."

"व्हय."

"खरं अजून आपल्याला सगळ्या गोष्टी कळाल्या नाहीत."

"एक गोष्ट माझ्या ध्यानात आली हाय तीच खरी का खोटी ती मला बघायच हाय.."

"श्रीधरराव जर मी पुन्हा काळात हरवलो तर इथं यायला जमणार नाही."

"का.. दुसऱ्यांदा आला न्हवं तुम्ही."

"किती वर्ष उलटुन गेलीत. ही रिस्क मी घेऊ शकत नाही."

"पाव्हणं माझ्याव विश्वास ठेवा. मी म्हणतूय न्हवं, काय बी हुनार नाय चला." श्रीधरराव पुढे चालू लागले. रवी त्यांना समजावत होताच. बोलता बोलता ते विहिरीजवळ आले.

"चला मारा उडी."

"श्रीधरराव."

"पाव्हणं विश्वास ठेवा मारा उडी."

रवीने त्यांना पाहत पाण्यात उडी मारली अन् पटकन त्यानं तोंड बाहेर काढलं. श्रीधरराव त्याला पाहून हसत होते. रवी त्यांना डोळे मोठे करून पाहत होता.

"या पाव्हणं. आलंय माझ्या ध्यानात."

रवी पटकन वर आला.

"कशामुळे असं झालं..?"

"तुम्हीच मला सांगितलं न्हवं का चंद्र नाहीसा होण्या आधी जा." तसे म्हणत ते हसू लागले.

"म्हणजे चंद्राचा आणि टाईम ट्रॅव्हलचा संबंध आहे."

"थेट. बघा तुमास्नी सांगतो. तुम्ही दिवसा प्रयत्न केलंत खरं काय झालं न्हाई कारण चंद्र नव्हता. टाईम ट्रॅव्हल करायला ही हीर, त्यो दगुड आणि चंद्र जाग्याव पायजे तवा ही हुतंय.."

रवीच्या आता लक्षात आलं होतं त्याने जेव्हा जेव्हा टाईम ट्रॅव्हल केल तेव्हा फक्त रात्र होती.

"आलं लक्षात. खरं मी एकदम १०० वर्ष मागे जातोय ७५ वर्ष पुढं येतोय त्याचं काय."

"ती बी काढू शोधून चला." तसं म्हणत ते घराच्या दिशेने चालू लागले.

श्रीधररावांनी पुन्हा फळ्यावर नजर फिरवली. त्यांनी खडू घेऊन एक मोठा वर्तुळ काढला.

"चंद्राचा इथे कसा काय संबंध असू शकतो..?"

"पाव्हणं आता इथं कुणाचा संबंध हाय कुणाचा नाय याला बघा काय बी महत्व नाय. सत्य हीच हाय का ही समदं घडत हाय." रवी फळ्यावर पाहू लागला.

"आणखी एक, टाईम ट्रॅव्हल करून जिथं जाईन तिथं दिवस किंवा रात्र असायची आणि तारीख एखाद महिन्याने मागची असायची."

"व्हय ती आलंय माझ्या ध्यानात. पुस्तकात ती हाय. टाईम ट्रॅव्हल जरी शक्य झालं तरी ठरलेल्या दिशी जाणं जमणार न्हाई."

"तर मग मी कसा जाणार माझ्या वेळेत.?"

"तीच तर मी हुडकाय लागलोय. माझ्या ध्यानात येईना इतक्या वर्षांच अंतर ठेवून तुम्ही काळात मागं-पुढ कसं काय जाताय. ही गणित काय कळंना." श्रीधर रावांची नजर त्या आकडेवारीकडे जातच होती. त्यांनी एका सरळ रेषेत ते आकडे लिहिले.

१००, ५०, ७५, ५०.

"पाव्हणं आठवा आणि काय असू शकतं. टाईम ट्रॅव्हल करताना जी जी तुम्ही पाहील ती समदं आठवा. तुमचं निरीक्षण आपल्याला ही गणित सोडवायला मदत करील बघा. दुसरं कोण नाय. आठवा."

रवीने डोळे बंद केले. आणि तो प्रत्येक गोष्ट आठवू लागला..

"बारीक बारीक गोष्ट मला सांगा. पाणी कसं हुतं, आणि काय दिसत हुतं का. आणि काय विशेष घडत हुतं का.. दगुड हाय त्यापेक्षा आणखी चकाकत हुता का. चंद्र पाण्यात दिसत हुता का. नेमका कुठं दिसत हुता. कसा दिसत हुता..?"

"हो हो.." रवी एकदम ओरडून म्हणाला. त्याला काही तरी आठवलं.

"चंद्र श्रीधरराव. चंद्र. मला आठवतंय.. मी चंद्र असायचा तेव्हाच टाईम ट्रॅव्हल केलं. तो एकदम स्पष्ट दिसायचा. उडी मारताना वाटायचं चंद्रावर उडी मारत आहे इतका स्पष्ट."

"आणि आठवा."

"प्रत्येक वेळी चंद्राची आकृती वेगळी असायची."

"वेगळी म्हणजे कशी.?"

"पूर्ण चंद्र.. अर्धा चंद्र.. अशी."



श्रीधररावांनी लगेच चंद्राच्या आकृत्या काढल्या.

त्यांनी एका मागोमाग आठ वर्तुळ काढली. त्यात पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत चंद्राची वाढत जाणारी अन् पुन्हा कमी होणारी बाजू दाखवली.

प्रत्येक चंद्राला क्रमांक दिला अन् त्याच्यावर त्या चंद्रकलेनुसार नाव दिलं.

"पाव्हणं बघा.." त्यांनी पहिल्या आकृतीवर बोट ठेवलं अन् बोलू लागले.

"इथं पौर्णिमा मंग ह्यो गोलसर चंद्र, ह्यो अर्धचंद्र, ही कमी झालेली चंद्रकोर आणि मग अमूशा."

"अमूशा झाली की वाढलेली कोर, पुन्हा अर्धचंद्र अन् मग गोलसर चंद्र आणि मग पौर्णिमा."

"या झाल्या चंद्राच्या आकृत्या. आता तुम्ही इथं," त्यांनी पौर्णिमेला बोट ठेवलं, "आणि मग इथं" त्यांनी गोलसर चंद्रावर बोट ठेवलं, "आणि मग इथ" अर्धचंद्रावर बोट ठेवत ते बोलू लागले.

"या या दिशी टाईम ट्रॅव्हल केलसां."

"होय."

"खरं अर्ध चंद्र होता तवा तुम्ही एकदा भविष्यात अन् एकदा भूतकाळात आलासा"

"होय."

त्यांनी लगेच कोणत्या साली रवीने टाईम ट्रॅव्हल केलं ते वर्ष लिहून काढलं.

पहिल्यांदा १०० वर्ष मागं – १९२५ साली

दुसऱ्यांदा ५० वर्ष पुढं – १९७५ साली

तिसऱ्यांदा ७५ वर्ष पुढं – २०५० साली

चौथ्यांदा ५० वर्ष मागं – २००० साली



श्रीधरराव त्या आकडेवारींच निरिक्षण करू लागले. अन् त्यांना काही तरी कळालं.. त्यांनी लगेच चंद्राच्या आकृतीखाली रवीने कधी कधी टाईम ट्रॅव्हल केलं ते लिहून काढलं.

"पाव्हणं बघा.." ते फळ्यावर लिहित लिहित बोलू लागले, "आलं का लक्षात.?"

रवी गंभीर होता. त्याने काही कळालं नाही अशा नजरेत मान डोलावली.

"पाव्हणं ही बघा पुनव अन् ही बघा अमूशा. आलं का ध्यानात.?"

"नाही."

"पाव्हणं पुनव झाली की चंद्र कमी होतोय.. होतोय का.?"

"होय.."

"म्हंजी तुम्ही भूतकाळात जाताय. त्यांनी तिसऱ्या आकृतीवर बोट ठेवलं आणि "अमूशा झाली की पुनव म्हंजी भविष्यात. बघा इथं." त्यांनी सातव्या आणि आठव्या आकृतीवर बोट ठेवलं.

"बघा ५० न पुढं.. ७५ न पुढं. अन् मग ५० न मागं.. आलं का ध्यानात.. चंद्राची कला जितकी दिसत असंल तितक तुम्ही मागं नाही तर पुढं जाता. आता ही पुनव ती अमूशा अन् अमूशा ती पूनव यावर ठरतं भूतकाळात जायचं का भविष्यकाळात.." तसे ते उत्साहाने बोलू लागले.

"खरं इतक्या वर्षाच्या अंतरानेच टाईम ट्रॅव्हल का होतंय..?" रवीने प्रश्नार्थक चेहऱ्याने विचारलं.

"चंद्र बघा.. याला चंद्र अन् त्याच्या अवस्था कारणीभूत हायत." श्रीधरराव बोलू लागले. "पाव्हणं आकृतीत बघा म्हंजी तुमास्नी कळंल."



"बघा, चंद्रकोर दिसत्या म्हंजी चंद्र २५ टक्केच आपल्याला दिसत असतोय. अर्धचंद्र म्हंजी ५० टक्के असतोय. अन् गोलसर चंद्र म्हंजी ७५ टक्के असतोय."

"इथं समजून घेण्याची गोष्ट म्हंजी चंद्राचा जितका भाग उजेडात असणार तेवढ्या वर्षानं तुम्ही टाईम ट्रॅव्हल करणार."

"जर तुम्ही पुनव ती अमूशा मधी टाईम ट्रॅव्हल करताय तर भूतकाळात जाताय अन् अमूशा ती पुनव दरम्यान टाईम ट्रॅव्हल करताय तर मग भविष्यात जाताय."

"बघा म्हंजी तुम्ही इथं," त्यांनी वाढत्या चंद्रकोर आकृतीवर बोट ठेवलं अन् बोलू लागले, "या दिशी जवा हिरीत उतराल तवा २०२५ साली जाल." त्यांनी त्याखाली २५ लिहिलं. अन् त्याचं पुन्हा निरीक्षण केलं.

"श्रीधरराव जर मी मागे येऊ शकतो तर मी पुढे ही जाऊ शकतो."

"व्हय."

"तर मग समजा मी शंभर वर्ष मागे आलोय तर पुढे कसा जाईन."

"अमूशाला.."

"कसं काय.. चंद्रच आकाशात नाही तर टाईम ट्रॅव्हल कसं होणार.?"

तसे श्रीधरराव एकदम शांत झाले अन् म्हणाले, "आरंऽ व्हय की.. ही माझ्या ध्यानात कसं आलं न्हाय.." अन् ते पुन्हा फळ्याकडे पाहू लागले.

"पाव्हणं तुम्ही पुनवं दिशी मागं कसं आला. तुम्ही मंग भविष्यात असायला पायजे हूतासा."

"तेच म्हणतोय मी."

"तुम्ही आठवा बर.."

"श्रीधरराव खरंच पहिल्यांदा मी जेव्हा विहिरीत उडी मारली तेव्हा चंद्र पूर्ण गोल दिसत होता."

"पाव्हणं पूणवीच्या दुसऱ्या दिशी बी चंद्र गोल असतोय." तसा रवी शांत झाला.

"मला माहित नाही श्रीधरराव मला इतकं आठवतंय की आकाशात चंद्र गोल होता. आता त्या दिवशी पौर्णिमा होती का नव्हती ते मला माहित नाही."

"मला वाटतंय त्यो पुनवेचा चंद्र नव्हताच. बघा समदं जुळून आलंय. हीच एक गोष्ट कळंना. आता तुमास्नी ती आठवांव लागंल."

रवीने पुन्हा डोळे बंद करून आठवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला काहीच आठवेना.

"नाही श्रीधरराव. खरंच आठवत नाही."

"आठवावं लागंल पाव्हणं. तुमच्याकडं दुसरा उपाय न्हाई." रवी चिंतेत गेला.

"पंचांग पाहिलं तर. रवीने उपाय सुचवला."

"ज्योतिषाकडं गेल पाहिजे मंग.. यानं मदत हूईल.. खरं येळ लागंल. खरं तुम्ही म्हणतायसा तुमच्याकडं येळ न्हाई."

"होय."

श्रीधरराव विचारात गेले.

"पाव्हणं समजा आपल्याला ही समाजलं टाईम ट्रॅव्हल कसं काम करतं ती.. तर मंग तुमच्या लेकीला तुम्ही कुठं कुठं शोधणार."

"कुठं कुठं म्हणजे सगळीकडे.."

"तुमच्या लक्षात येईना पाव्हणं.. बघा.. २०२५ सालात ती हरवली.. २०२५ सालात ती न्हाई.. १९७५ सालात न्हाई.. २००० हजार सालात पण नाही.. १९२५ सालात ती न्हाई.. २०५० सालात ती हाय.."

"होय."

"मला सांगा ती पुनव दिशी हरवली म्हणताय खरं पूर्ण चंद्र हाय म्हटल्याव ती भविष्यात जायला पायजे. तुम्ही बी त्याच दिशी हिरीत उडी टाकलीसा मंग शंभर वरीस मागं कसं काय आलासा."

रवीला आता कुठे श्रीधरराव काय म्हणत होते ते कळत होत.

"तुमचं काय म्हणणं हाय श्रीधरराव.?"

"बघा पाव्हणं स्पष्ट सांगतो.. मी लय बारकाईनं ती पुस्तक वाचलं हाय.. आणि तुम्ही म्हणताय तसं तुमच्या टाईम ट्रॅव्हलचं निरिक्षण बी केलं हाय."

"माझं ठाम मत हाय तुम्ही पुनवेच्या दुसऱ्या दिशी टाईम ट्रॅव्हल केलं हुतं. म्हणून तुम्ही १९२५ सालात गेला. तुमची लेक पण तिथंच असणार."

"खरं श्रीधरराव मी तिथं जाऊन आलोय. मला ती भेटली नाही."

"पाव्हणं तुमच्या लक्षात येईना अहो ही टाईम ट्रॅव्हल तुमास्नी त्या वर्षात नेतंय तुम्हाला हवं त्या दिशी घिवून जात न्हाई. तुमची लेक तिथंच गेली हुती फकस्त कुठल्या तर दुसऱ्या दिशी नाय तर दुसऱ्या महिन्यात."

रवी सुन्न पडला. त्याला आता श्रीधर रावांच गणित कळालं होत. त्यामुळे त्याला ध्रुवी तिथे शोधून सुद्धा सापडली नव्हती.

"पण तिला तिथं कोणी पाहिल नव्हतं."

"असू शकतंय .. खरं ही बी असू शकतं की ती तिथं गेली अन् कुणाला तर ती सापडली अन् त्यानं तिला तिथनं दुसरीकडं नेली. कुणाला ती दिसलीच न्हाई. मला सांगा त्या काळात इथं लय वस्ती नसणार. इथं जेवढी घरं हुती ती समदी माणसं तिथ हुती..? त्या घरातलं हर एक जण तिथं हुता..?"

रवीने आठवण्याचा प्रयत्न केला अन् पटकन त्याने नाही म्हणत गंभीर नजरेने मान डोलावली.

"कोणी तर एक माणूस का मुलगा नव्हता. तो बैलगाडी घेऊन कोणाला न सांगताच कुठे तरी गेला होता."

"तुम्ही हुता तवर त्यो तिथं आला हुता..?"

"नाही" रवीने शंकेने मान नकारार्थी डोलावली.

"पाव्हणं त्योच तो माणूस. त्यानंच तुमच्या लेकीला पळवली. लिहून देतो म्या. मी तुमच्या संग येणार अन् तूमास्नी त्यो भाड्या हुडकून देणार." श्रीधररावांनी दंड थोपटला.

रवी सुन्न पडला होता. त्याला आता श्रीधररावांच पटत होत. लक्ष्मी खोटं बोलली नव्हती. तिच्या मागे काही गोष्टी घडल्या असल्याची ही दाट शक्यता होती. तिला या गोष्टीची कल्पना नव्हती.

"पाव्हणं काळजी करू नका. मी हाय तुमच्या संगट.. मी बी येणार आता तुमच्या संगट.. तुमची लेक ती माझी लेक.. तिला घेऊन यायचं अन् तुमास्नी मी तुमच्या येळेत परत धाडणार."

रवीचे डोळे भरले होते. त्याला रडू कोसळलं. श्रीधररावांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्या बाप स्पर्शाने रवीचं काळीज पिळवटलं अन् तो रडू लागला. श्रीधररावांनी रवीला मिठीत घेतलं अन् त्याचं सांत्वन केलं. काही वेळाने रवी शांत झाला.

"पाव्हणं शांत व्हा. नका काळजी करू. अहो तुमच्यावाणी मला बी पोरगी हाय. माझ्या बर असं काय झालं असतं तर माझी बी तुमच्यावाणी अवस्था झाली असती. मी बी हीच केलं असतं जे तुम्ही करालाय. नका काळजी करू. मी हाय तुमच्या संगट.."

रवी शांत नजरेने पाहू लागला. त्याच्या मनात या वेळी काय सुरू होतं हे फक्त त्यालाच माहित होतं. श्रीधररावांनी कॅलेंडर घेतलं अन् ते त्यात काही तरी पाहू लागले.

"श्रीधरराव आपल्याला कळणार कसं कधी टाईम ट्रॅव्हल करायचं आहे ते.?"

"तेच बघालोय पाव्हणं. बघा आता मागल्या शनवारी अमूशा झाली. आता पूनवं पातूर भविष्यात जाता येतंय. पुनव झाली की अमूशा पातूर भूतकाळात जाता येतंय."

"आता आज नऊ तारीख.. ह्यो शनवार गेला की पुढल्या शनवारी पुनव येतीया. अन् मंग गोलसर चंद्र दीसाय बघा चार पाच दीस लागत्यात. म्हंजी बघा," एक, दोन, तीन, चार ते मोजत मोजत बोलू लागले, चोवीस तारखेला आपण जाऊ शकतो."

"खात्रीने म्हणताय ना श्रीधरराव.?" रवी शंकेने पाहू लागला.

"पाव्हणं प्राथमिक शाळंचा मास्तर हाय खरं विज्ञानाचं याड हाय मला. तुमास्नी काय वाटतं उगा हवेत गोळ्या मारत सुटलो व्हय मी." तसे म्हणत ते गालात हसले.

"नाही मला तसं म्हणायचं नव्हतं." रवी जरा गोंधळला.

"असू द्या वं पाव्हणं. तुम्हांला माहीत असंल की मी भविष्यात काय काय केलं हाय ती."

"हो." रवीने शांतपणे हसून उत्तर दिलं.

"पाव्हणं उद्याच्याला चंद्रकोर दिसत्या बघा काय म्हणता भविष्यात तुमच्या वेळेत फेरफटका मारून यायचं का..?"

रवी गालातच हसला. ते सुद्धा हसू लागले.

"श्रीधरराव," रवी बोलू लागला.

"बोला की.."

"मला एक कळत नाही भविष्यातला अन्वित मग असं का म्हणाला की माझ्याकडे वेळ कमी आहे..?"

"तुम्ही गेला तवा उजाडत आलं हुतं का..?"

"नाही रात्र होतीच की."

"चंद्र कुठं हुता तुम्ही पाण्यात उडी मारताना.?" तसा रवी डोळे बंद करून विचार करू लागला.

"पाण्यात दिसत होता."

"कुठं दिसत होता. मधोमध की.."

"नाही एका कडेला होता."

"झालं की मग पाव्हणं आणि एक गोष्ट आता ध्यानात ठिवा चंद्र निस्ता आकाशात असून ऊपेग न्हाई त्याची सावली, त्याची आकृती आपल्याला पाण्यात दिसनं महत्वाच हाय." रवी शांत झाला.

"श्रीधरराव किती गोष्टी आहेत या. दर वेळी वाटतं टाईम ट्रॅव्हल आता कळालं खरं दर वेळी काही तरी नवीन कळतं."

श्रीधरराव हसू लागले आणि फळ्यावरील आकृतीत बदल करत हसत हसत बोलू लागले, "हीच तर गंमत हाय निसर्गाची. "

"बघा पाव्हणं ही म्या तुमचं टाईम ट्रॅव्हलचं रहस्य सोडिवलं." श्रीधररावांनी हात झाडले अन् रवीकडे हसऱ्या नजरेने पाहू लागले. रवी आकृतीचं निरिक्षण करू लागला.

श्रीधरराव बोलू लागले, "पाव्हणं ही विज्ञानाची देण नाय जी प्रत्येक गोष्ट आपण ठरवल तशी व्हायला. ही निसर्गाची देण हाय अन् निसर्ग आपल्याला लवकर लक्षात येणार न्हाय. त्यो कधीच लवकर लक्षात येत

न्हाय. जवा त्याला वाटंल की आता ही सांगाय पायजे तवाच ती आपल्याला कळणार. तवर नाय. तवर आपण फक्त हुडकत ऱ्हायचं."

"ही शास्त्रज्ञ काय म्हणत्यात मी ह्यो शोध लावला, मी त्यो शोध लावला. आम्ही ह्यो ग्रह हुडकला, आम्ही त्यो तारा हुडकला तसं नसतं ती पाव्हणं. ही समदं आधी पासनं हुतं फक्त आपणाला ती म्हाईत नव्हतं."

"ती जाणून घ्यायची येळ अजून आली नव्हती. त्यो काळ अजून आला नव्हता. निसर्ग, ही ब्रम्हांड आपल्या नुसार न्हाई चालत आपण त्यांच्या नुसार चालतो. कलियुगातल्या ह्या माणसानं ही जाणून घेतलं पायजे."

रवी गंभीर नजरेने त्यांना पाहत होता.

"श्रीधरराव तुमची भेट झाली नसती तर मी असाच भटकत राहिलो असतो. माझ्या या गोष्टी लक्षात आल्या नसत्या. तुम्ही इतक्या कमी वेळेत."

"न्हाई पाव्हणं अजून मला काय बी म्हाईत नाय. मी फकस्त तुम्ही सांगितलेल्या गोष्टीवरनं ही समदं ओळखू शकलो. अवो ह्यो विज्ञान खेळंच असा हाय, इथं समदं निरिक्षणावरनं सुटतयं."

"तुमच्या वाणी मी बी अजून लय मागं हाय. आता बघू निसर्ग आनी काय काय शिकवतो ते, आनी काय काय चमत्कार दावतो ते."

"होय." रवी एकदम शांत झाला अन् विचारात जात म्हणाला.

"हा चमत्कार फार महागात पडला मला श्रीधरराव. फार महागात. मला सारखा प्रश्न पडतोय मीच का. माझ्यासोबतच असं का. मी काय पाप केलं होतं की, माझ्यावर अशी वेळ आली. श्रीधरराव कुणासोबत भांडण नाही.

कुठलं व्यसन न्हाई. आपण भलं आपलं काम भलं या कॅटेगरीतला माणूस आहे मी. मग माझ्या सोबतच असं का..?"

"पाव्हणं शांत व्हा.. बसा.." श्रीधरराव खुर्चीवर बसत बोलू लागले.

"असा विचार करू नका. मीच का. असा विचार करा मला निसर्गानं निवडलं हाय म्हणजे माझ्यात काय तर हाय. देव पण त्याचीच परीक्षा घेतो जो त्याच्या लायक असतो."

"माझ्या मुलीला मग यात का घेतलं त्याने. माझी एकट्याची परीक्षा घ्यायची ना."

"तसं नसतंय पाव्हणं. दुसऱ्या कोणासाठी तुम्ही इथं आला असता का मला सांगा. जितक्या तळमळीने तुम्ही तिला शोधताय तितक्या तळमळीने तुम्ही दुसऱ्यासाठी ही केलं असता का.?"

रवी शांतच होता.

"तुम्ही म्हणताय ते खरं असेल श्रीधरराव. देवाला वाटलं असेल माझ्यात काहीतरी वेगळं आहे. म्हणून घेत असेल माझी परिक्षा.. पण मला सांगा, ही असली कसली परिक्षा म्हणायची.. चक्क निसर्गाने मला काळाच्या प्रवाहात अडकवून ठेवलं आहे."

"मी असं कोणतं पाप केलं आहे की त्याने अशी शिक्षा करावी. अन् शिक्षा करायची आहे तर मग मला करायची ना माझ्या लहान मुलीला का म्हणून तो शिक्षा देत असेल." रवी डोळे मोठे करत बोलत होता.

"पाव्हणं रागावनार नसाल तर एक गोष्ट सांगतो." रवीने शांतपणे होकारार्थी मान डोलावली.

"कसांय पाव्हणं, आता तुम्ही म्हणताय माझ्या संगच असं का घडलं म्हणून.. मी काय पाप केलं, माझ्या लेकीला का म्हणून ही शिक्षा..? आता तुम्ही पाप-पुण्याचं इचारताय म्हणूनश्यान तुम्हाला एक कर्माचं उदाहरण सांगतो." रवीने होकारार्थी मान डोलावली.

"कर्म कसं काम करतं हे ध्यान देवून ऐका." रवी ऐकू लागला.

"श्रीकृष्णान कंसाचा वध करून आपल्या आई-बाला तुरुंगातन सोडवलं. श्रीकृष्णाची आई काय म्हटली म्हाईत हाय.. कृष्णा मी तुझी जन्मदाती आई असून तू मला तुरुंगातून सोडवायला इतका उशीर का केलास. चौदा वर्ष मी तुरुंगात राहिले. तू कुठं व्हतास..? श्रीकृष्ण काय म्हटला असंल..?"

रवी शांत होता.

"कृष्ण म्हटला हे माते, यात माझी काहीच चूक नाय.. हे तुझंच कर्म हाय."

"कर्म..?"

"व्हय कर्म पाव्हणं. कृष्ण म्हटला, माते तू या जन्मात खूप चांगली हायस. खरं तू तुझ्या मागच्या जन्मातलं पाप फेडत हायस.. मागच्या जन्मात

मी राम होतो तू कैकयी होतीस. तू मला चौदा वर्ष वनवासाला पाठवलंस. तेच पाप तू या जन्मात माझी आई बनून फेडत हायस.''

''पाव्हणं आपल्याबर जे काय बी होतंय ती आपल्याच कर्माच फळ हाय. या जन्मातल नसंल खरं मागल्या जन्मातलं असू शकतंय ..''

''कर्म भोगल्याशिवाय माणसाची सुटका न्हाई. अवो यातनं देव बी सुटलं न्हाईत आपण तरीबी माणूस हाय.'' तसं म्हणत श्रीधरराव शांत झाले. ते रवीकडे शांत नजरेने पाहू लागले.

''पाव्हणं लय इचार करू नका. जी होतंय त्याला सामोरं जावा. वेळ आली की समदं कळंल तुम्हाला. लक्षात ठेवा वेळ काही विसरत नसते. ती बरोबर कवा काय दाखवायचं ती दाखवते.''

''आपलं कर्म ती दाखवाय भाग पाडतं. पाव्हणं आपलं कर्म आपल्याला चांगल्या अन् वाईट वेळेत घेऊन जात असतंय. आता कुठल्या वेळेत जायचं हे आपण ठरवायचं.''

''श्रीधरराव माझ्या मुलीने काय केलं असेल. फक्त आठ वर्षांची आहे ती.''

''तुमच्या लक्षात येईना पाव्हणं. बघा, या गोष्टी एकमेकांशी जुळलेल्या हायत.''

कृष्ण जनमल्या जनमल्या त्याच्या आईबापासून लांब गेला. आता याचं दु:ख श्रीकृष्णाला बी हुतं अन् त्याच्या आईबाला बी हुतं.. खरं करणार

काय.. कर्मापुढं देव बी काय करू शकलं नाय.. जी व्हायचं हाय ती हुतंच.. जी फेडायचं हाय ती फेडावं लागतंच..”

“मग श्रीधरराव माझ्या बाबतीत काय घडलं आहे.. नेमकं हे कर्म कोणाचं आहे..?”

“आता ही मी सांगू शकत न्हाय. ती तुम्हाला बी कळणार नाय.”

“का खरं ..?”

“मागच्या जन्मात आपण काय केलं ही कसं ध्यानात राहणार आपल्या.”

“मग ते कसं कळणार.?”

“ते कधीच कळत नसतं.”

“का.?”

“कारण प्रत्येक जन्म हा वेगळा असतो. त्या-त्या जन्मात आपण कोण होतो ? आपली माणसं कोण होती ? ही सगळं बदलत जात. ती समदं मिटवलं जातं. आत्मा फकस्त शरीर बदलत न्हाई त्या आठवणी पण पुसून काढतो.”

“असं का होतं खरं.?”

“कारण की आपल्याला त्रास होऊ नये. त्या आठवणी आठवून आपण रडत बसू नये. या जन्मात आपलं काय उद्दिष्ट हाय ती आपण शोधायचं अन् पुढं चालत राहायचं.”

"कुठवर श्रीधरराव.. कुठवर चालत राहायचं. कधी कधी वाटतं सगळं सोडून द्यावं. सगळं संपवून टाकावं."

"तसं करून नाय चालत पाव्हणं. तुमास्नी पडलेला प्रश्न समस्त माणूस जातीला पडला हाय. त्याचं उत्तरच आपल्याला शोधायचं हाय. ही असं समदं संपवून चालत नाय. पाव्हणं, आपल्याला त्रास झाला की वाईट वाटत. लय त्रास झाला की आयुष्य संपवाव वाटतं. पण तसं केल्यानं काहीच होत नाय. आत्म्याला मुक्ती मिळत नाय. आत्मा पुन्हा जन्माला येतो खरं या वेळी शिक्षा म्हणून आणखी बेकार परिस्थितीत जन्म घेतो."

"म्हणजे.?"

"म्हंजी असं की, समजा तुम्हाला या जन्मात सगळं मिळतंय. तुम्ही चांगल्या घरात जन्माला आला अन् त्रास झाला म्हणून जीव दिला तर तुम्ही पुढल्या जन्मात आणखी वाईट परिस्थिती असलेल्या घरात जन्म घेणार. तुमास्नी वेळेवर काय मिळणार न्हाई."

"अन् ज्याला वेळेवर समदं मिळतंय त्याला बघून मग तुम्ही म्हणाल त्याचं आयुष्य किती चांगलं हाय त्याला समदं वेळेवर मिळतंय. देवानं असं आयुष्य का दिलं न्हाई."

तसा रवी हलकासा हसला.

"पश्चाताप."

"व्हय. खरं त्यो पश्चाताप तुमच्या लक्षात येणार न्हाई कारण."

"मी सगळं विसरलेलो असणार.."

"अगदी बरोबर. आता तुमच्या लक्षात यायला लागलंय." रवी हलकसं हसला..

"श्रीधरराव चांगलं बोलता हो तुम्ही. या कर्माच्या गोष्टी वगैरे.."

"लहान पनापासून शिकत आलोय पाव्हणं. आमच्या आईनं हीच शिकवलंय.."

तसा रवी शांत झाला. त्याला एकदम त्याच्या आजीची आठवण आली. त्याच्या आजी सोबत तो किती आनंदी असायचा हे त्याला आठवू लागलं.

"श्रीधरराव तुमचं कुटुंब.?"

"हाय की. पोरगा हाय, पोरगी हाय, आय हाय.."

"आणि बायको ?" रवी शांत नजरेने म्हणाला.

"पाव्हणं बायको आमची लय लवकर सोडून गेली आम्हासनी.."

"कशामुळे."

"आजारपणामुळ.." श्रीधरराव शांत झाले.

रवी विषय बदलत बोलू लागला, "कुठे गेलीत मुलं..?"

"गेल्यात जरा गावाला. उद्या संध्याकाळ पातूर येतील."

"मी थांबलो तर चालेल ना..?"

"काय पाव्हणं.. अवो ही भविष्य नाय.. परवानगी घेऊन दुसऱ्याच्या घरात जायला.. ह्यो आमचा काळ हाय. ही आमचं गाव हाय. इथली माणसं आमची हायत."

"इथं तुमचं सुख म्हंजी आमचं सुख.. तुमचं दुख म्हंजी आमचं दुख.." श्रीधरराव गालावर हसू ठेवत बोलू लागले.

सूर्य मावळत आला होता. वातावरणात गारवा वाढत होता. बऱ्याच दिवसांनी रवी जरा शांत वाटत होता. त्याला आता टाईम ट्रॅव्हल कसं काम करतं ते कळालं होत. श्रीधर रावांच्या मदतीने तो आता ध्रुवीला परत आणणार होता. तो खिडकीतून बाहेर बघत विचारात हरवून गेला.

••

१८-०२-२०२५

अंतरा श्रीधररावांनी सांगितलेल्या गोष्टी फळ्यावर लिहू लागली. अन्विता ते नियम एक-एक करून वाचू लागली अन् त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करू लागली.

टाईम ट्रॅव्हल होण्यासाठी महत्त्वाच्या गोष्टी.

१. टाईम ट्रॅव्हल फक्त रात्री होऊ शकतं.

२. विहीर, चंद्र आणि सोनेरी दगड या तीन गोष्टींमुळे टाईम ट्रॅव्हल करता येतं. या एकत्र असणे गरजेचं आहे.

३. टाईम ट्रॅव्हल करण्यासाठी चंद्राची आकृती विहिरीतल्या पाण्यात स्पष्ट दिसावी लागते. चंद्राची जी आकृती पाण्यात दिसत असेल त्यावर आपण किती वर्ष पुढे किंवा मागे जाणार हे अवलंबून आहे.

४. पौर्णिमा ते अमावस्या पर्यंतचा काळ हा भूतकाळात जाणारा काळ आहे कारण यावेळी चंद्राची आकृती कमी कमी होत जाते.

५. अमावस्या ते पौर्णिमा पर्यंतचा काळ हा भविष्यात जाणारा काळ आहे कारण यावेळी चंद्राची आकृती वाढत जाते.

६. चंद्राच्या प्रमुख चार आकृत्या आहेत.

पौर्णिमेचा चंद्र, गोलसर चंद्र, अर्धचंद्र, आणि चंद्रकोर.

७. टाईम ट्रॅव्हल होण्यासाठी चंद्राची उपस्थिती महत्त्वाची आहे. ज्या दिवशी चंद्र दिसणार नाही त्या दिवशी टाईम ट्रॅव्हल होणार नाही. अमावस्याला टाईम ट्रॅव्हल होऊ शकत नाही.

८. पौर्णिमेच्या दिवशी आपण भविष्यात १०० वर्षे पुढे जाऊ शकतो. तर पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी आपण भूतकाळात १०० वर्षे मागे जाऊ शकतो.

९. गोलसर चंद्र जेव्हा असेल तेव्हा आपण ७५ वर्षे पुढे किंवा मागे जाऊ शकतो.

१०. अर्धचंद्र असेल तेव्हा आपण ५० वर्षे पुढे किंवा मागे जाऊ शकतो.

११. चंद्रकोर जेव्हा असेल तेव्हा आपण २५ वर्षे पुढे आणि जेव्हा चंद्रकोर कमी झालेली असेल तेव्हा २५ वर्ष मागे जाऊ शकतो.

१२. आपण ज्या काळातून टाईम ट्रॅव्हल करत आहोत त्या काळात चंद्राची अवस्था ही ज्या काळात टाईम ट्रॅव्हल करणार आहोत तिथल्या अवस्थेप्रमाणे असेल असं नाही.

१३. टाईम ट्रॅव्हल हे आपल्याला फक्त त्या वर्षात घेऊन जातं मग त्या वर्षातल्या आपण कोणत्याही महिन्यात किंवा कोणत्याही दिवशी जाऊ शकतो. टाईम ट्रॅव्हल आपल्याला हव्या त्या दिवशी घेऊन जाऊ शकत नाही.

अंतराने शेवटचा नियम लिहिला. अन् हात झाडत ते नियम वाचू लागली. तिने पुन्हा कागद व्यवस्थित पाहिला अन् खडू घेऊन आकृती काढू

लागली. हातातला पेपर बाजूला ठेवत तिने आपले हात झाडले. अंतरा पुन्हा फळ्याकडे पाहून ते नियम वाचू लागली अन् आकृतीचं बारकाईने निरीक्षण करू लागली.

"अंतरा," अन्विताने तिला आवाज दिला.

"ध्रुवी हरवली त्या दिवशी १२ तारीख होती."

अंतराने खडू घेऊन फळ्यावर ती तारीख लिहिली.

"त्यादिवशी पौर्णिमेचा दुसरा दिवस होता."

अंतरा तिच्याकडे गंभीर नजरेने पाहू लागली.

"याचा अर्थ ताई ध्रुवी १९२५ सालात आहे."

"होय."

"नक्की. खरंच तो पौर्णिमेचा दुसरा दिवस होता..?"

"होय अंतरा माझा वाढदिवस ११ तारखेला होता. त्यादिवशी पौर्णिमा होती हे माझ्या चांगलं लक्षात आहे. त्या रात्री आम्ही गावी येण्यासाठी निघालो. १२ तारखेला ध्रुवी हरवली. पौर्णिमेचा दुसरा दिवस. आणि बाबांनी सांगितलं त्याप्रमाणे पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी आपण भूतकाळात १०० वर्षे मागे जाऊ शकतो. याचा अर्थ हाच होतो की ध्रुवी आणि रवी दोघेही १९२५ सालात अडकले आहेत."

अन्विताने मोबाईल काढला आणि त्यात बराच वेळ काहीतरी करत राहिली. अंतरा तिला पाहतच राहिली.

"अंतरा आता १४ मार्चला पौर्णिमा आहे. म्हणजे १५ मार्चला मी १०० वर्षे मागे जाऊ शकते."

ताई अंतरा गंभीर होत म्हणाली. "हे काय बोलतेस ताई..?"

"होय अंतरा."

"तू जाऊ शकत नाहीस ताई."

"मला जावं लागेल अंतरा."

"नाही ताई वेडी झाली आहेस का.. तुझी अवस्था बघ.. नऊ महिन्यांची गरोदर आहेस तू आणि तू टाईम ट्रॅव्हल करणार असं म्हणतेस.. शुद्धीत आहेस का..?" अंतरा जरा मोठ्याने बोलू लागली.

"अंतरा माझी मुलगी तिथे हरवली आहे.. माझा नवरा तिला शोधतोय. त्यांना माझी गरज आहे मला जावंच लागेल."

"नाही ताई सध्या तुला कोणाची तरी गरज आहे तू नाही जाऊ शकत.. तू गेलीस आणि तुला काय झालं तर तुला कोण बघणार. दादा जर उद्या ध्रुवीला घेऊन आला तर त्याला मी काय सांगणार. ताई हट्ट करू नकोस हा वेडेपणा आहे." अन्विता शांत झाली.

"ताई मी जाते. मी घेऊन येते दोघांना."

"नाही अंतरा तुला जर काय झालं तर मी काय करणार. ही रिस्क मी घेऊ शकत नाही. मीच जाते. आजच जाते. १५ मार्च यायला अजून एक महिना आहे. इतके दिवस मी वाट बघू शकत नाही."

"मग."

"मी आजच जाते."

"वेडी आहेस का ताई."

"अंतरा हा वेडेपणा करावाच लागणार. १५ मार्चपर्यंत मी थांबू शकत नाही. आतापर्यंत आपण टाईम ट्रॅव्हल कसं होतं हेच शोधत होतो आणि आता आपल्याला ते कळालं आहे तर आपण का थांबायचं. मला लवकरात लवकर भूतकाळात जावं लागेल."

अन्विता खिडकीजवळ आली आणि आकाशात पाहू लागली. तिला चंद्र गोलसर दिसू लागला.

"चंद्र गोलसर आहे म्हणजे ७५ वर्षांनी मागे जाईन. चालेल म्हणजे फक्त २५ वर्ष राहतात. तिथे गेल्यानंतर चंद्राची कोणती अवस्था आहे ते पाहून मी पुन्हा टाईम ट्रॅव्हल करेल कदाचित तो दिवस त्याच दिवशी असू शकतो किंवा दुसऱ्या दिवशी असू शकतो."

"आणि तसं झालं नाही तर.?"

"नाही अंतरा तसंच होईल. आतापर्यंत देवाने आपल्याला या गोष्टी शोधून काढण्यात मदत केली आहे. इथून पुढे पण देव नक्कीच मदत करेल त्याला करावीच लागेल."

"ताई प्लीज ऐक माझं. तू ज्या अवस्थेमध्ये आहेस त्या अवस्थेत तुला नॉर्मल चालणं, फिरणं देखील जपून करावं लागतं त्यात तू टाईम ट्रॅव्हल करून भूतकाळात जाणार असं म्हणतेस. तुझं तुला तरी पटत आहे का.?"

"ते काहीही असू दे अंतरा मला माझ्या कुटुंबासाठी जावंच लागेल आणि मला कोणीही अडवू शकत नाही प्लीज."

"म्हणजे मी तुझी कोणी नाही का.?"

"अंतरा प्लीज गैरसमज करून घेऊ नकोस माझी परिस्थिती समजून घे."

"तू स्वतःच तुझी परिस्थिती समजून घेत नाहीस ताई."

अन्विता काही क्षण खाली बघू लागली आणि उठली.

"ताई ऐकणार नाहीस का.?"

"मला जावं लागेल अंतरा. नको हट्ट करू."

"मग मी पण येते. आपण दोघ जाऊ. तुला काय झालं तर मी सुद्धा स्वतःला माफ करू शकणार नाही. मला तुझ्या सोबत तरी असू दे तुझी काळजी घेण्यासाठी प्लीज ताई आता नाही म्हणू नकोस."

अन्विता डोळे भरून तिच्याकडे पाहू लागली. अंतराने तिला मिठी मारली. अन्विताने होकारार्थी मान डोलावली. अंतरा हलकीशी गालात हसली.

"चल चंद्र नाहीसा होण्याआधी जाऊ.."

अन्विताने तिची चैन गळ्यात घातली. अंतराने श्रीधर रावांना मिळालेला दगड स्वतः जवळ ठेवला.

दोघीही विहिरीत खाली उतरल्या. गोलाकार चंद्र पाण्यात स्पष्ट दिसत होता.

"ताई सर्व लक्षात आहे ना तुझ्या.?"

"होय."

"जाऊया मग.?"

"जाऊया."

दोघीही हळूहळू पाण्यात उतरल्या. त्यांनी पाण्यात डुबकी मारली.

पाण्यात हळूहळू बुडबुडे येऊ लागले. काही क्षणात पाणी पुन्हा संथ झालं आणि पाण्यावर गोलाकार चंद्र पुन्हा स्पष्ट दिसू लागला.

••

२६-०२-१९५०

दोघींनी काही क्षणात पुन्हा आपल्या माना हळूहळू वर केल्या. वातावरणात त्यांना हलकासा उजेड दिसू लागला. अजून संध्याकाळच होती. काही क्षणापूर्वी, त्यांनी डुबकी घेतली तेव्हा रात्र होती अन् आता संध्याकाळ. त्या दोघीही हळूहळू पाण्यातून बाहेर आल्या. दोघींनाही कळून चुकलं की त्या टाईम ट्रॅव्हल करून भूतकाळात आल्या आहेत.

अन्विता अंतराला धरून सावकाश विहिरीच्या बाहेर आली.

"विश्वास बसत नाही ताई. काही क्षणापूर्वी रात्र होती आणि दुसऱ्याच क्षणाला संध्याकाळ."

"चल जाऊया." अन्विता हळूहळू चालू लागली.

"हा परिसर किती बदलला आहे ना."

"हो." अन्विता पोटाला धरत म्हणाली. तिला कसं तरी होऊ लागलं ती अचानकच थांबली..

"काय होतंय ताई.?"

"अचानक कळा यायला लागल्या आहेत."

अंतरा एकदम गंभीर झाली. ती परिस्थिती काय आहे ते ओळखून गेली. ज्या गोष्टीची तिला भीती होती नेमकं तेच घडत होतं. अन्विता हळूहळू खूपच गंभीर वाटू लागली.

"ताई जरा बस तू." अंतरा तिला सावरू लागली. अन्विताला कळा खूपच मारू लागल्या.

"ताई खूप त्रास होतोय का आता.?" ती जोरात मान हलवू लागली. अंतरा एकदम घाबरून गेली.

"ताई चल हळूहळू पुढे जाऊ. चांगल्या ठिकाणी जाऊ. इथे नको." अंतराने तिला उठवलं अन् दोघीही हळूहळू चालू लागल्या.. पण अन्विताला चालता येईना.. अंतराने तिला एका ठिकाणी बसवलं. ती मदतीसाठी पुढे पळत गेली.

अंतराला दुरून एक घर दिसलं. ते थोडं पडकं घर होत. अंतरा मदतीसाठी हाका मारू लागली.

"कोणी आहे का. काका, काकी कोणी आहे का.?"

अंतरा मदतीसाठी आत जाऊ लागली. आत जाताच तिला वेगळं चित्र दिसलं.

"जरा धीर धर बाय माझे. जरा कळ सोस.." एक बाई गरोदर अवस्थेत जमिनीवर पडली होती अन् दुसरी बाई तिचं बाळंतपण करत होती. अंतरा ते पाहून अजून गंभीर झाली. ती मदतीसाठी त्या बाईला बोलवू लागली.

"काकी काकी." त्या बाईने मागे वळून पाहिलं. ती एकदम गोंधळून गेली.

"काकी माझी ताई तिथे.." अंतरा बोलायचा प्रयत्न करू लागली.. तिचा आवाज निघेना..

"कोण तू... काय पायजे तुला..?"

"माझी ताई गरोदर आहे तिला चालता येईना.. तिथं विहिरीजवळ तिला बसवून आलेय मी.. प्लीज मला मदत करा." ती बाई एकदम घाबरून गेली.

"आता रंऽ काय करायचं.. कुठं हाय ती.."

"तिथंच बसवली आहे मी तिला." ती बाई एकदम घाबरून गेली.

"पोरे तू इथं बैस मी आले तिला घेऊन."

"दुर्वे गंऽ जरा कळ काढ.. हूईल समदं यवस्थित.." ती गरोदर बाई काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती.

"ए पोरे थांब तू.. मी आले.. नको काळजी करुस.." अंतराने घाबरत घाबरत मान डोलावली. ती बाई तशीच पळत गेली.

"लक्सा आक्का.." ती गरोदर बाई हळूहळू आवाज देऊ लागली. अंतरा तिच्या जवळ जाऊन बसली. तिला धीर देऊ लागली.

"काकी मी आहे.. मी आहे.. काळजी करू नका.." अंतरा तिच्या डोक्यावर हात ठेवू लागली. ती एकदमच घाबरून गेली होती.

अन्विता "अंतरा अंतरा" करत हळूहळू घरात आली.

"ताई ताई सावकाश सावकाश."

"पोरे हिला इथं झोपव.. आणि पाणी गरम कराय ठेव.. मी बघते दोघींस्नी.."

"पांडुरंगा सांभाळून घे रे बाबा.." तसं बोलत ती त्यांच्या बाळंतपणासाठी हालचाल करू लागली.

अंतराने चूल पेटवली. पाण्याची डीचकी चुलीवर ठेवली. अन् पुन्हा अन्विता जवळ आली. अन्विता आता बेशुद्ध अवस्थेत जात होती.

"पोरे तिला शुद्धीत ठेव.."

"हो हो.."

"दुर्वे कर माझे बाय काय तर हालचाल कर." दुर्वा जोरजोरात किंकाळू लागली. इकडे अंतरा अन्विताला शुद्धीत ठेवण्याचा प्रयत्न करू लागली.

दुर्वा बाईने आणखी एक किंकाळी फोडली अन् बाळाच्या रडण्याचा आवाज येऊ लागला. दुर्वा बाई जोरजोरात दम घेऊ लागली. लक्सा बाईने बाळ व्यवस्थित हातात धरलं.

"पोरे इथं ये." अंतरा पटकन उठून गेली.

"त्यो बघ त्यो ईळा.. ईळा घे अन् ही नाळ काप.." अंतरा बघतच राहिली.

"आवर पोरे तिला अजून बघायची हाय मला." अंतराने घाबरत घाबरत विळा घेतला.

"चार बोट राखून काप लवकर." अंतराने घाबरत घाबरत नाळ कापली. लक्साबाईने बाळाला कापडावर ठेवलं. "पोरे पाणी घे अन् पुसून काढ.. जा लवकर." अंतरा ती सांगत होती तसं पटपट करत होती. लक्साबाई अन्विता जवळ येऊन बसली.

"ए बाय माझे." त्यांनी तिच्या गालावर चापटी मारली. लक्साबाई तिला शुद्धीत आणण्याचा प्रयत्न करत होती.

"ताई ताई.." अंतरा अन्विताला आवाज देत होती. दुर्वाबाई आता कुठे जरा शुद्धीत येऊ लागली. तिला सर्व अंधुक अंधुक दिसत होत. बारीक बारीक ऐकू येत होतं. ती हळूहळू उठली. ती तिच्या बाळाकडे पाहू लागली.

एक मुलगी तिला दिसू लागली. तिने बाळ तिच्या हातात घेतलेलं पाहिल. तिच्या लेकराला पाहून तिने डोळे भरले. तो एक मुलगा होता.

"लक्सा आक्का पोरगा हाय."

"व्हय गं राणी.. राजकुमार आला एकदाचा जन्माला."

दुर्वा बाई रडू लागली. हे तिचं पाचवं बाळंतपण होत. आधीच्या चार मुली होत्या. देवानं या वेळी मुलगा देऊन तिचं गाऱ्हाण ऐकलं होत.. ती डोळे पुसत उठली. लक्सा बाईला मदत करू लागली.

"दुर्वे गं.. पोरीची शुद्ध गेल्या. तिला शुद्धीत आन.." तसं म्हणत लक्सा बाईने अन्विताचे पाय गुडघ्यात वाकवले.

दुर्वा भरलेल्या डोळ्याने अन्विताला शुद्धीवर आणत होती. तिच्या बाळाचा आनंद व्यक्त करण्याआधीच, त्याला जवळ घेण्याआधीच ती अन्विताला मदत करू पाहत होती.

एका आईची अशा स्थितीत काय अवस्था होते हे तिने नुकतंच अनुभवलं होतं. अन्विता हळूहळू शुद्धीत आली. तिला कळा सहन होत नव्हत्या. ती किंकाळू लागली.

"जरा कड काढ माझे बाय. जरा जोर लाव."

अन्विता जोर जोरात जोर लावत होती किंकाळत होती. तिने जोरात एक किंकाळी फोडली अन् जोरजोरात श्वास घेऊ लागली.

बाळ बाहेर आलं होतं पण ते रडत नव्हतं.. लक्सा बाईने बाळाला पालथ केलं. त्याची पाठ घासू लागली. अंतरा पटकन उठून बाळाजवळ आली.

"काय झालं बाळाला.?"

"काय नाय. पोरे घाबरू नकोस.. होतं असं कधी कधी.."

दुर्वा बाईने बाळाला आपल्याजवळ घेतलं. त्याची पाठ घासली. त्याला सरळ करून तोंडाने श्वास दिला. त्याच्या छातीवर मालिश केली अन् हळूहळू बाळाने हंबरडा फोडला.

अंतराला ते पाहून रडू कोसळलं. ती रडत रडत अन्विता जवळ गेली. "ताई मुलगा झाला" असं म्हणत ती तिच्या गळ्यात पडून रडू लागली. अन्विता ही रडू लागली.

लक्सा बाईने बाळाची नाळ कापली अन् त्याला पुसून घेतलं. दुर्वा बाई तशीच पुन्हा जमिनीवर पडून राहिली. आज तिला देवाने जे हवं होत ते दिलं होतं. त्या दोन्ही बाळांना बघतच ती झोपी गेली.

••

०९-०२-२०००

"पाव्हणं घ्या लाजतायसा व्हय.." श्रीधरराव रवीला भात वाढत बोलू लागले..

"नाही श्रीधरराव माझं जेवणच एवढं आहे."

"घ्या जरा वाईच घ्या.. लेक मिळणार त्या खुशीत घ्या."

रवी शांत झाला. "अजून भेटली नाही माझी ध्रुवी.."

"भेटल पाव्हणं. लय मोठा प्रवास करून आलायसा.. नक्कीच भेटल."

"भेटायलाच हवी."

"श्रीधरराव मी काय म्हणत होतो" रवी हात धूत बोलू लागला.

"बोला."

"म्हणजे तुम्ही म्हणाला तसं उद्याचा दिवस मला २०२५ मध्ये घेऊन जाऊ शकतो.."

"व्हय.."

"मी म्हणत होतो की जर मी उद्या गेलो आणि ध्रुवीला त्या विहिरीत पडण्यापासून वाचवलं तर.?"

श्रीधरराव गालात हसले अन् बोलू लागले.

"पाव्हणं. तसं करून चालणार न्हाई."

"का ?"

"बघा समजावतो तुमास्नी.."

"पहिली गोष्ट म्हंजी तुम्ही २०२५ सालात नेमकं कुठ जाणार हे तुमास्नी माहीत नाय.. त्यामुळ तुम्ही काय करू शकत नाय. आणि दुसरी गोष्ट म्हंजी.." तसं म्हणत त्यांनी खडू घेतला अन् फळ्यावर एक रेष काढली अन् तिचे तीन भाग केले.

"पाव्हणं ही वेळेची रेषा हाय. ह्यो भूतकाळ.. ह्यो वर्तमान.. ह्यो भविष्य.. या तिन्ही काळात वेळ थांबलेली न्हाई. वेळेचा प्रवाह सुरू हाय.. या वक्ताला तुम्ही तिथ पण हायसां."

"तुम्ही जर गेला तर तुमची वेळ रेषा बिघडते. तिथ दोन अन्वित समोरासमोर येणार. तसं होऊन चालणार न्हाई. एका वेळ रेषेत एकच अन्वित."



"आणि जर समजा तो तिथं नसला तर..?"

"तुम्ही ठामपणे सांगू शकता का. आणि जर भलतंच काय झालं तर." रवी शांत झाला.

"पाव्हणं तुमचा गोंधळ म्या समजू शकतो खरं असं होऊ शकत न्हाय. आता जी झालं ती झालं. भूतकाळ बदलता येत न्हाई."

"खरं मी भविष्यात जाणार म्हणतोय."

"होय. खरं भविष्यात घडून गेलेला भूतकाळ तुम्ही बदलायच म्हणताय. तसं होत न्हाई. त्या पुस्तकात विरोधाभास सांगितलं हायत. तुम्ही भूतकाळ बदलाय जाल आणि एक नवीन वेळ रेषा तयार करून बसाल अन् मग

तिकडच अडकाल. नाय तर तुमच्या मूळं ही घडलं असं होईल.. काहीही होऊ शकत.. तुमच्या एका चुकीमुळे तुमचं अस्तित्व मिटू शकतं.. ना भूत, ना वर्तमान.. ना भविष्य.. नाय तर..''

''बास बास श्रीधरराव तुमची एक सुद्धा गोष्ट माझ्या लक्षात आली नाही. नाही जात मी भविष्यात. आपण ठरलेल्या दिवशी १९२५ मध्ये जाऊ.'' तसे श्रीधरराव हसू लागले.

''या गोष्टी लय किचकट हायत तुमच्या माझ्या लवकर लक्षात येणाऱ्या न्हाईत..''

''तरी तुम्हाला जरा जरा कळाल्या असं वाटतंय.''

''पुस्तकात दिलं हाय ते समजून मी सांगालोय..'' दोघेही एकमेकांकडे बघून हसून लागले.

''पाव्हणं आता आराम करा. उद्याच्याला मी जरा ज्योतिषाकडं जाऊन येतो.''

''ज्योतिषाकडं.''

''व्हय. माझा दोस्तच हाय. पंचांग तेन बघतो त्यो. आता आपण काळात फिरायच म्हंजी १९२५ सालात कवा कवा पुनव हाय अमूशा हाय म्हाईत असायला पायजे. जरा त्याची माहिती मिळती का बघतो.''

''मी पण येतो.''

"नेलं असतं पाव्हणं खरं लांबचा प्रवास हाय. तुम्ही दमला असाल. आराम करा."

"आराम कसला होतोय श्रीधरराव. मी पण येतो."

"पहाटं जाव लागलं. इष्टीनं."

"चालेल."

"बर तुमची मर्जी. झोपा आराम करा. सकाळनं उठवतो."

"चालेल." तसं म्हणत श्रीधररावांनी झोपण्यासाठी अंथरूण टाकून दिलं.

रवीने अंथरुणात अंग टाकलं अन् त्याची झोप लागली. आज बऱ्याच दिवसांनी त्याला चांगली झोप लागली होती.

••••

भेट

१०-०२-२०००

सूर्याची किरणं रवीच्या तोंडावर पडू लागली तेव्हा कुठे रवी जागा झाला. तो गडबडीत उठला. त्याने इकडे तिकडे पाहिलं. त्याला श्रीधरराव दिसेनासे झाले.

तो त्यांना आवाज देऊ लागला. तेवढ्यात त्याला एक चिठ्ठी दिसली.

"पाव्हणं लय गाढ झोपला हुता. उठवायचं काय बरोबर वाटणा.. काळजी करू नका संध्याकाळ पातूर येतोय म्या घरला."

रवीने स्वतःच्या डोक्याला मारलं. त्याला स्वतःचा राग येऊ लागला. तो तसाच पुन्हा खाली पडला. त्याला त्याचे जुने दिवस आठवू लागले. लहानपणीचे दिवस.

आजी असताना तो किती खुश असायचा हे त्याला आठवू लागलं. लक्ष्मी असताना ते किती खेळायचे हे त्याला आठवू लागलं. लक्ष्मीचा विचार येताच त्याला ती हरवली तेव्हाचा दिवस आठवू लागला. त्याला आठवू लागलं लक्ष्मी रडत होती. कारण तिने त्याच्याकडचा तो सोनेरी दगड पाहिला होता. तिला सुद्धा तो हवा होता. त्याने तिला तो दिला अन् लक्ष्मी हरवली. त्याच दगडामुळे ध्रुवी सुद्धा हरवली. त्याच दगडामुळे सगळं घडू लागलं. तो पटकन उठला. त्याच्या डोक्यात काही तरी भलतच येऊ लागलं.

"हा दगडच मला भेटला नाही तर.. लक्ष्मी हरवणार नाही.. ध्रुवी हरवणार नाही.. ही वेळच येणार नाही."

"सगळं या दगडामुळे झालं. मी तो दगडच लपवून ठेवतो. नको तो संपवून टाकतो. मला तो परत कधी भेटायलाच नको. तो भेटलाच नाही तर सगळं व्यवस्थित होईल. बरोबर असंच करतो." रवी एकटाच पुटपुटू लागला. तो पटकन अंथरुणातून उठला अन् तो दगड घरात शोधू लागला. शोधता शोधता त्याच्या डोक्यात बरेच विचार येऊ लागले.

"पण हा दगड मी संपवला तर मी जाऊ शकेन ना.. नक्कीच जाऊ शकेन.. माझ्याकडे माझा दगड आहे. मी फक्त भूतकाळातला दगड मिटवत आहे. दोन्ही वेगवेगळे आहेत. काही नाही होणार. होय काही नाही होणार." तो सकारात्मकतेने तो दगड शोधू लागला. त्याने घरभर शोधलं. तो त्याला सापडला नाही. तो आठवू लागला. तो दगड त्याला कुठं भेटला होता ते आठवू लागला. अन् त्याला ते आठवलं. त्याला तो दगड एका पेटीत भेटला होता. ती पेटी त्यांच्या घरामागच्या बंद खोलीत होती.

तो पळत पळत त्या खोलीत गेला. ती पेटी शोधू लागला. त्याला ती पेटी सापडली. तो उघडून ती तपासू लागला पण त्यात तो दगड नव्हता.

तो पुन्हा आठवू लागला. तो दगड त्याला याच पेटीत भेटला होता. तो फार चमकत होता. म्हणून त्याने लगेच तो कपड्यात गुंडाळून लपविला

होता. पण आता तो दगड कुठे गेला. तो पुन्हा पुन्हा शोधू लागला. त्याने ती पेटी बाजूला सारली अन् दुसऱ्या पेट्या बघू लागला.

त्याला वर असलेली एक पेटी दिसली. त्याने ती खाली घेतली.. त्याला कुलूप होत. त्याने दगड घेऊन ते कुलूप तोडलं.

त्याला त्यात बऱ्याच गोष्टी दिसू लागल्या. त्याला कळालं की ही पेटी त्याच्या आजोबांची होती. त्यांचं बरंच सामान त्याला त्यात दिसू लागलं. त्याच्या हाताला एक रुमाल लागला अन् तो रुमाल तो उघडू लागला. रुमाल उघडता उघडता त्यातून सोनेरी प्रकाश येऊ लागला अन् त्याला एकदाचा तो दगड मिळाला.

तो खुश झाला. आता तो त्या दगडाला मिटवणार होता. त्याच्या आयुष्यात येणारी सगळी संकटं तो मिटवणार होता. आता लक्ष्मी कधीच हरवणार नव्हती. त्याची ध्रुवी कधीच हरवणार नव्हती. हे टाईम ट्रॅव्हल कधी घडणारच नव्हतं. त्याने तो दगड हातात घेतला अन् पेट्या होत्या तश्या ठेवल्या. शेवटची पेटी तो उचलणार तोच त्याला मागून आवाज आला.

"कोण..?"

हा आवाज कोणत्या तरी स्त्रीचा होता. तो एकदम दचकला. त्याने हळूच पेटी उघडून तो दगड आत टाकला. अन् हळूहळू मागे वळला.

समोर कोणी तरी वृद्ध बाई उभी होती. ती दरवाज्यात उभी असल्याने अन् तिच्या मागे बरोबर सूर्य असल्याने रवीच्या डोळ्यावर एकदम प्रकाश

आला. त्याने एक हात आपल्या डोळ्यावर घेतला अन् पाहू लागला. ती वृद्ध बाई त्याच्या समोर आली.

रवीने तिला ओळखलं. ती त्याची आजी होती. दूर्वा आज्जी. त्याचे डोळे एकदम भरून आले. दूर्वा आजी आश्चर्याने त्याला पाहत होती.

तिचे डोळे एकदम भरून आले. ती त्याच्या समोर येऊन उभी राहिली. तिने रडत रडत त्याच्या गालाला हात लावला…

"तू आलास."

रवी एकदम गोंधळून गेला. त्याचे डोळे सुद्धा पाण्याने भरले होते. त्याला वाटलं नव्हतं त्याची आजी त्याला ओळखू शकेल. पण तिने ओळखलं होतं.

"आई.." रवीने रडत रडत तिला मिठी मारली. दोघेही एकमेकांच्या मिठीत रडू लागले.

"तू ओळखलंस मला आई."

"होय रवी.. तू माझा मोठा रवी.. तू इथं का आलास.."

रवीने डोळे पुसले. "कसं काय ओळखलंस आई.. मी मोठा रवी ते कसं काय ओळखलंस.?"

"लहानाचं मोठं केलं मी तुला. माझ्यासाठी तू कितीही मोठा झालास तरी लहानच." तसं म्हणत तिने त्याच्या गालाला हात लावला. रवीने पुन्हा डोळे भरले.

"तू भविष्यातून आला आहेस..?"

"हो आई."

"का..?"

"आई माझी मुलगी कुठे तरी हरवली आहे तिला मी शोधतोय. तिला शोधत शोधत मी इथे आलोय." दूर्वा आजीने तसे डोळे भरले.

"रवी कसं काय हरवून बसलास तिला.."

रवी रडू लागला. "मला माहित नाही आई ती कशी हरवली. तिला शोधता शोधता मी पण हरवून गेलो."

"रवी कसा रे तू.?" तसा तो पुन्हा रडू लागला.

"गप.. रडू नकोस.. आता कुठे शोधणार तिला. इथं.."

"नाही आई.. ती वेळेत मागे आहे अजून. मला तिथे कसं जायचं हे कळालं आहे आता. बाबांनी माझी मदत केली आहे. त्यांनी शोधून काढलं आहे. आम्ही दोघं जाऊन तिला परत घेऊन येणार."

"कुठं गेला श्रीधर.?"

"मित्राकडे. काही कामानिमित्त. माझ्याच कामासाठी. संध्याकाळी येणार आहे परत.."

"रवी किती खराब झालास रे.."

"तू गेल्यानंतर एकटा पडलो ना आई." तसं म्हणत तो पुन्हा दूर्वा आजीला मिठी मारून रडू लागला. रडता रडता तो खाली बसला. त्याची

आजी सुद्धा खाली बसली. रवीने तिच्या मांडीवर डोकं ठेवलं. रवीच्या डोक्यावर हात ठेवून ती त्याचं बोलण ऐकू लागली.

"माझं बाबांचं कधी पटलं नाही आई.."

"का.?"

"त्यांनी माझ्याकडे कधी लक्ष दिलं नाही. स्वतःच्या कामात गुंतून राहिले. तू पण नव्हतीस. लक्ष्मी पण.. आई.." तसं म्हणत रवी उठून बसला.

"आई मला तुला खूप महत्वाचं सांगायचं आहे."

"नको सांगू रवी."

रवी एकदम गोंधळला.

"मला माहित आहे तू भूतकाळ बदलायचा प्रयत्न करत आहेस. पण बाळा तसं होणार नाही."

"नाही आई आता जे घडणार होतं ते घडणार नाही. लक्ष्मी हरवणार नाही. माझी मुलगी सुद्धा हरवणार नाही. मी भूतकाळ बदलला. आता सगळं ठीक होईल."

"भूतकाळ बदलत नसतो रवी. तो बदलता येत नसतो. हा निसर्ग त्याची परवानगी देत नाही. आपल्याला वाटत असतं आपण सगळं बरोबर केलं पण आपणच ते बिघडवत असतो."

रवीला दूर्वा आजी काय बोलत आहे तेच कळत नव्हतं. त्याला फक्त इतकं माहीत होत की त्याने आता भूतकाळ बदलला आहे.

"मला काही ऐकायचं नाही आता. मला थोडे दिवस तुझ्या सोबत राहायचं आहे. मी आता काही दिवस इथेच आहे. पुढच्या महिन्यात पौर्णिमा झाली की मी आणि बाबा भूतकाळात जाऊन माझ्या मुलीला परत आणणार आहोत. आणि मी इथून पुन्हा तिला घेऊन भविष्यात जाणार आहे."

दूर्वा आज्जी त्याला निरागसपणे पाहू लागली. रवी लहान मुलासारखं तिला त्याचं नियोजन सांगत होता.

दूर्वा आज्जीने डोळे भरले अन् ती बोलू लागली, "तू म्हणतोस तसं होणार नाही रवी."

"का.. असं का म्हणतेस तू..?"

"रवी निसर्ग तुला भूतकाळ बदलायची परवानगी देत नाही.. तू भूतकाळ बदलायला गेलास तर तो काय करेल माहित आहे..?"

"काय करेल..?" रवीने पटकन विचारलं.

"तो तुला जेलमध्ये टाकेल."

"काय.." रवी एकदम गोंधळून म्हणाला.. तसा तो एकदम गंभीर झाला. त्याचं डोक सुन्न पडलं. तो मोठे डोळे करत आज्जीला पाहू लागला.

त्याची आजी डोळे भरून त्याला पाहत होती. तशीच ती बोलू लागली, "बाबा इतका कसा भोळा रे तू.. अजून तू मला ओळखलं नाहीस.. तुला जेल मधेच टाकते मी थांब.."

रवी बोलता बोलता थांबला. तो एकदम गंभीर झाला. तो गंभीर नजरेने आज्जीला पाहू लागला त्याची आज्जी त्याला पाहून रडू लागली.

त्याला बोलता येईना. त्याची बोबडी वळू लागली. त्याने ध्रुवी म्हणत जोरात हंबरडा फोडला. तो तिला पाहतच होता. जोरजोरात रडत होता. हात पाय आपटत होता. एखाद्या बारक्या पोराने खेळण्यासाठी हट्ट करावा अन् तो जमिनीवर बसून हात पाय आपटू लागावा तसा रवी रडू लागला.

ध्रुवी त्याच्या बाबाला पाहून तोंडावर हात ठेवून रडू लागली. तिचा बाबा तिला शोधत आला होता. पण आता बराच उशीर झाला होता. इतका उशीर की आता तो काहीच करू शकणार नव्हता.

रवी आकांडतांडव करत होता. त्याला ही परिस्थिती मान्य नव्हती. त्याला हे अनपेक्षित होतं. त्याला इतक्या जोरात झटका बसेल असं वाटलं नव्हतं. ध्रुवी त्याला जवळ घेवू लागली. रवी रडत रडत तिच्या मिठीत गेला.

"ध्रुवी.. ध्रुवी.. ध्रुवी.." तो रडतच होता. हे त्याचं दुःख कधी तो विसरू शकणार नव्हता. ही न भरणारी जखम होती. जी आयुष्यभर त्याला दुखवणार होती.

"बाबा गप.. नको रडूस.. आता काही होऊ शकणार नाही.." ध्रुवी रवीचं सांत्वन करु लागली. रवीच रडणं कमी होत नव्हतं.. तो काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. तो फक्त रडत होता. ध्रुवी त्याला समजावू

लागली. रवी हळूहळू शांत झाला. तो डोळे पुसू लागला. त्याने ध्रुवीला जवळ घेतलं.

"ध्रुवी तू कशी आहेस.?" त्याने पुन्हा डोळे भरून विचारलं.

ध्रुवीने सुद्धा डोळे भरले. "मी बरी आहे बाबा. पण तू बरा दिसत नाहीस."

"काय झालं हे ध्रुवी. मी तुला शोधत होतो." तसा त्याने एक हुंदका दिला.

"आता खूप उशीर झाला बाबा. तू आता घरी जा. तू मागे परत जाऊ शकत नाहीस."

"मी तुला शोधून पुन्हा भविष्यात घेऊन जाईन ध्रुवी. मी तुला पुन्हा घेऊन जाईन. सगळं पाहिल्यासारखं होईल."

"नाही बाबा ते होऊ शकत नाही. तसं केल्याने तुझा जन्मच होणार नाही. तू माझाच नातू आहेस.. हे सगळं विधिलिखित आहे बाबा.. तू काहीच करू शकत नाहीस."

"मी हे बदलणार बाळा. मी सगळं बदलणार."

"बाबा," ध्रुवी गंभीर होत बोलू लागली, "बाबा हे चक्र आहे. हे जे काही घडत आहे ते एक चक्र आहे. आणि हे चक्र तूच सुरू केलं आहेस. तुझ्या सोबत जे काही घडत आहे ते तुझं कर्म आहे बाबा."

"कसलं कर्म बाळा.?"

"बाबा," ध्रुवी तिची कथा सांगू लागली.

"मी हरवले आणि १९२५ मध्ये गेले. मी खूप घाबरले. मी तिथेच बेशुद्ध पडले. मी शुद्धीत आले तेव्हा मला काहीच कळत नव्हतं. सगळे अनोळखी चेहरे माझ्या समोर होते. मी तिथून जाण्याचा प्रयत्न केला पण मला ती विहीर कुठेच सापडली नाही बाबा. तिथे मला एका माणसाने सांभाळलं. मी कोणालाच काही सांगू शकत नव्हते. माझं कोणाला पटणार नव्हतं."

"मग काही वर्षांनी माझं लग्न लावून दिलं बाबा." तशी ती रडू लागली. रडत रडत बोलू लागली. रवी सुद्धा रडू लागला.

"मी खूप लहान होते बाबा. मी खूप रडत होते. माझं कोणीच ऐकलं नाही. एका मोठ्या माणसासोबत माझं लग्न लावून दिल आणि मी इथे आले."

"इथे आल्यावर मला ती विहीर दिसली. मी खूप खुश झाले. मी परत येण्याचा प्रयत्न केला पण मी परत येऊ शकले नाही. मी रोज प्रयत्न करत होते पण मी येऊ शकले नाही."

"माझ्या नवऱ्याने एकदा ते बघितलं. त्याला ते विचित्र वाटू लागलं. तो मला वेडी समजू लागला बाबा."

"मला लक्ष्मीनं साथ दिली." लक्ष्मीचं नाव ऐकताच रवीने डोळे भरले.

"मला तिने सगळं सांगितलं. तू आला होतास बाबा. मला घ्यायला तू आला होतास." ती हुंदके देत रडू लागली. रवी ही रडू लागला.

"लक्ष्मी मला सांगत होती.. तू आलास तेव्हा मी तिथेच आहे हे कोणालाच माहीत नव्हतं."

"माझ्या नवऱ्याने मला लपवून दुसऱ्या गावात ठेवलं होतं. त्याला मी आवडली होते. त्याला माझ्याशी लग्न करायचं होतं. मी जरा मोठी झाले अन् माझ्याशी लग्न करून त्याने मला इथे आणलं होतं."

"मला हे सगळं लक्ष्मीने सांगितलं. खरं तेव्हा खूप उशीर झाला होता.. तेव्हा मी मोठी झाले होते. मला तेव्हा मुलगी झाली होती बाबा."

"मला जेव्हा हे सगळं समजलं तेव्हा मला माझ्या नवऱ्याचा खूप राग आला. पण तो सैतान होता बाबा. त्याला काहीच वाटत नव्हतं. त्याला माझ्याकडून मुलगा हवा होता."

"मला मूल होत नव्हतं. मला चार मुली झाल्या." ती तिची व्यथा रडत रडत सांगत होती. रवीला ते ऐकून वाईट वाटत होतं.

"मला शेवटी मुलगा झाला बाबा. पण मुलगा होऊन पण माझ्या नवऱ्याला त्याच्याशी नीट वागता येत नव्हतं."

"माझा मुलगा माझ्या नवऱ्याच्या विरुद्ध होता. त्याला बापाचं काही पटत नव्हतं. त्यांच्यात सतत भांडणं व्हायची. माझा श्रीधर किती दिवस घर सोडून दुसरीकडे राहिला."

"माझ्या नवऱ्याचं जेव्हा वय झालं तेव्हा त्याला त्याच्या चुकांची जाणीव होऊ लागली. पुत्र प्रेमासाठी तो तडपडू लागला. माझा श्रीधर आला

नाही. त्याने बापाला जवळ घेतलं नाही. त्याच्या मनात इतका राग होता की तो इथं कधीच आला नाही.”

“स्वत:च्या मुलाला पाहण्यासाठी माझा नवरा तडफडू लागला. त्याला त्याच्या चुकांची जाणीव झाली. त्याला मुलासोबत राहायचं होत. त्यानं ज्या चुका केल्या त्या पुन्हा करायच्या नव्हत्या. त्यानं जे पाप केलं ते त्याला भोगायचं होत.”

“माझी सून म्हणजे तुझी आई गरोदर होती. ती तुला जन्माला घालणार होती आणि इकडं माझा नवरा शेवटचे श्वास मोजत होता.”

“मला म्हटला, दुर्वा मी फार मोठं पाप केलं मी तुला तुझ्या बापापासून वेगळं केलं म्हणून देवानं माझ्यापासून माझ्या मुलाला वेगळ केलं.”

“मला माझा पोरगा हवाय. मी पुन्हा जन्म घेईन. मी माझं पाप फेडीन. माझ्या कर्माची फळं भोगिन. मला पुन्हा जन्म मिळू दे. माझ्या पोराच्या पोटी मी जन्माला येऊ दे.”

“मी सगळं विसरून त्याला पोटाशी धरीन. चांगला मुलगा बनीन.. मला माझ्या पोराच्या पोटी जन्म मिळू दे.”

“बाबा माझा नवरा हे बोलत बोलत मेला आणि तुझा जन्म झाला बाबा.” तशी ती रडू लागली. रवी तिच्याकडे गोंधळून पाहत होता. त्याला हे चक्र गोंधळात टाकत होतं.

"बाबा तुझ्यासोबत जे झालं ते तुझ्या मागच्या जन्मीच कर्म होत. तूच मला स्वतःपासून दूर केलंस बाबा.. तूच मला तुझ्यापासून दूर केलंस." ध्रुवी रडू लागली. रवी तिला जवळ घेऊन रडू लागला.

"यात तुझी चूक आहे पण आणि नाही पण. तुझ्या एका जन्माने पाप केलं अन् दुसऱ्या जन्माने ते पाप फेडलं."

रवीला आता काहीच कळत नव्हतं. हे कर्मचक्र, हे काळचक्र हे सर्व पाहून ऐकून तो चक्रावून गेला होता.

"मला माफ कर ध्रुवी.."

"बाबा.. नाही बाबा.. तुझ्या मागच्या जन्मासाठी तू जबाबदार नाहीस. तू माझा बाबा म्हणून चांगला होतास. मला हवा होतास. पण कर्मा पुढं कोणी मोठं नसतं बाबा.. तुला आता हे चक्र मोडावं लागेल."

"कसं बाळा.." रवी पटकन म्हणाला.

"चांगलं वागून बाबा. पहिल्या जन्मात तू श्रीधरशी वाईट वागलास. म्हणून श्रीधर तुझ्यापासून लांब गेला. मग तू पुन्हा जन्माला आलास पण तुला मागच्या जन्मीच काहीच माहित असू शकणार नव्हतं. तू जसा श्रीधर वागत होता तसा वागू नको. श्रीधरला तो जसा त्याच्या बापाशी वागत होता तीच वागणूक देऊ नको.. तू माझ्या मुलाशी नीट वाग. त्याला समजून घे. तो वाईट नाही."

रवी रडू लागला. तो का रडत होता हे त्याला चांगलं कळत होतं. ध्रुवी जे सांगत होती ते आता शक्य नव्हतं. कारण तो आधीच त्याच्या वडिलांशी भांडला होता. त्यांना सोडून दूर निघून गेला होता.

"बाबा हे चक्र तू सुरू केलं आहेस.. तुलाच ते मोडायला हवं. बाप मुलाच नातं हे टिकवायला हवं.."

रवी रडतच होता. कारण ध्रुवी जे सांगत होती ते आता होणार नव्हतं. कारण तो आता एक भूतकाळ होऊन गेला होता. सध्या त्याचे बाबा कोमात होते. तो काहीच करू शकत नव्हता.

"बाबा वागशील ना चांगलं.. मोडशील ना हे चक्र..?"

ध्रुवी त्याला रडत रडत विचारत होती. रवी रडतच होकारार्थी मान हलवत होता.

"मला माफ कर आई मी फार चुकीचं वागलो. मी स्वार्थी होऊन स्वतःचा विचार करत होतो. मी बाबाला कधी समजून घेण्याचा प्रयत्न केलाच नाही. त्याच्यावर जी वेळ आली होती, ती जेव्हा माझ्यावर आली तेव्हा मला कळालं. मला माफ कर आई मी तुझ्या मुलाशी कधीच चांगला वागलो नाही. मला माफ कर."

रवी दुर्वा आज्जीची माफी मागू लागला. दुर्वा आजी त्याला जवळ घेऊन त्याच सांत्वन करु लागली.

"रवी बापाशी नाही जमलं मुलाशी तरी चांगलं वागशील ना.?" रवीने डोळे भरून आजीकडे पाहिलं..

"होय रवी तुला मुलगा झाला आहे. बाबा मला भाऊ झाला आहे. मम्मा आली होती मला परत घ्यायला." रवी डोळे मोठे करत बघू लागला.

"माझ्या श्रीधरचा जन्म आणि तुझ्या मुलाचा जन्म एकाच दिवशी एकाच ठिकाणी झाला बाबा.."

"काय.?"

"होय."

"अन्विता कुठे आहे..?"

"ती सुखरूप आहे बाबा. मी तिला केव्हाच घरी पाठवलं. त्याला आता ५० वर्ष होतील."

रवी रडू लागला. "कशात अडकलो बाळा मी.. नेमकं कुठल्या चक्रात अडकलो.. एकीकडे हे काळ चक्र.. एकीकडे हे कर्म चक्र.." रवी स्वतःला मारून घेऊ लागला.

"नाही बाबा. असं करू नकोस. यात तुझी चुकी नाही."

"माझीच चुकी बाळा. मी जन्माला येऊनच चूक केली."

"नाही बाळा असं बोलू नकोस.. जन्म होणं हे आपल्या हातात नाही. त्याला आपण काही करू शकत नाही. मिळालेल्या जन्माच चीज करणं आपल्या हातात आहे. या जन्मात चांगलं कर्म करणं हे आपल्या हातात

आहे. तू आता चांगलं वागून या जन्माचं चीज करू शकतोस. तू चांगलं वागून हे चक्र मोडू शकतोस. वागशील ना..?"

"हो आई.. मी वागेन.. मी माझ्या मुलाशी चांगलं वागेन.." तसं म्हणत त्याने जोरात मिठी मारली.

"बाबा मम्माला तुझी गरज आहे तू जा आता.." रवी भरल्या डोळ्याने पाहू लागला.

"माझ्यासोबत चल बाळा."

ध्रुवीने डोळे भरून पाहिलं अन् म्हणाली, "माझ्या छोट्या रवीला, माझ्या लक्ष्मीला माझी गरज आहे बाबा मी नाही येऊ शकत. तुला माहित आहे ते चांगलच." त्याने रडतच मान डोलावली.

"बाबा तुला कसं जायचं ते माहित आहे.?"

"हो."

"मग तू कधी जाणार. श्रीधर पासून या गोष्टी लपवून ठेव.. त्याला यातलं काही कळू देऊ नकोस."

"नाही त्यांना माहीत नाही मी कोण आहे ते. आणि हे सुद्धा मी सांगू शकत नाही." त्याने डोळे भरले.

"मला आजच जावं लागेल बाळा.. आजच्या दिवशी मी माझ्या वेळेत जाऊ शकेन."

“तुला जायला हवं बाबा. मम्मा तुझी वाट बघत असेल.. माझी नात सुन तुझी वाट बघत असेल.. माझा भाऊ..” तशी ध्रुवी रडत रडत म्हणाली, “माझा भाऊ तुझी वाट बघत असेल.. माझा मुलगा तुझी वाट बघत असेल.. जा बाबा.. जा माझ्या बाळा..” रवीने पुन्हा तिला मिठी मारली. बाहेर अंधार पडला होता. चंद्रकोर आकाशात दिसत होती.

“बाबा..” रवी शांत नजरेने म्हणाला.

“मी सांगेन मी घरी आले तेव्हा इथे कोणी नव्हतं.” रवीने शांततेने मान डोलावली.

“जाऊ मी..” त्याने डोळे भरून विचारलं.

आजीने.. ध्रुवीने.. डोळे भरून त्याला उत्तर दिलं..

“मला एक वचन दे बाळा.. आई मला एक वचन दे..” तसा तो मुसमुसत बोलू लागला.

“पुन्हा जन्म मिळाला तर माझ्या पोटालाच जन्माला येशील ना.. मला तुझी फार गरज आहे.. मला तू हवी आहेस.. प्रत्येक जन्मात तू हवी आहेस.. माझी मुलगी म्हणून.. माझी आज्जी म्हणून मला तू हवी आहेस.. वचन दे मला..” रवीने त्याचे हात पुढे केले.

ध्रुवीने रडत रडत हात पुढे करून होकारार्थी मान डोलावली. दोघांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली.. रवी शांत झाला. ध्रुवी शांत झाली.

“जाऊ मी..”

"हो.."

त्याने पुन्हा ध्रुवीला मिठी मारली. आजीच्या पाया पडला अन् तिच्या हाताला मुके घेत तो मागे फिरला.

ध्रुवी त्याच्या बाबाला डोळे भरून पाहू लागली. दुर्वा आजी आपल्या नातवाला मन भरून आशीर्वाद देऊ लागली.

रवी भरभर पायऱ्या उतरला. चंद्रकोर पाण्यात स्पष्ट दिसत होती. त्याने उडी मारली अन् पाण्यात बुडबुडे येऊ लागले. काही क्षणांत पाणी पुन्हा संथ झालं अन् चंद्रकोर पुन्हा स्पष्ट दिसू लागली.

••

२७-०२-१९५०

दोन्ही बाळं शांत झोपली होतीत. त्यांच्या आया त्यांना प्रेमाने पाहत होत्या. अंतरा लक्सा अक्का सोबत बसली होती.

लक्सा अक्का त्या भुकेल्या आयांसाठी नाश्ता करत होती. तिने गरम गरम शिरा केला अन् सर्वांसाठी ताटात वाढला. अंतराने तिला मदत केली.

"व्हय गं पोरींनो कुठलं तुम्ही.. इथं कव्हा दिसाय न्हाईसा."

अंतरा अन् अन्विता दोघीही एकमेकांकडे पाहू लागल्या. दुर्वा बाई शांतपने तिच्या आईला पाहत होती.

"आम्ही इथलं नाही मावशी."

"मग कुठलं तुम्ही.?"

"आम्ही खूप दूरचा प्रवास करून आलो आहोत आणि पुन्हा एका दूरच्या प्रवासाला जाणार आहोत." लक्सा अक्का त्यांना गंभीर नजरेने पाहू लागली.

"बाळंतपणात कशापाई ह्यो लांबचा प्रवास करायचा म्हणते म्या."

"काय करू मावशी.. वेळच अशी आली की प्रवास करण भाग पडलं."

"असू दे.. आता जरा वाईच आराम कर पोरी.. तान्ह्या लेकराला घिऊन आता प्रवास करू नगं.."

"कुणाच्यात आलायसा नेमकं म्हणायचं." दोघीही पुन्हा शांत झाल्या. त्यांना काय बोलायचं ते कळेना. दुर्वा त्या काय म्हणतात ते फक्त ऐकून घेत होती. त्या काहीच बोलल्या नाहीत. प्रसंग ओळखून मग दुर्वानेच विषय बदलला.

"लक्सा अक्का ह्यांची काय खबर..?"

"कुठं गेलाय तुझा गोंद्या कुणास ठावं.. पडला असंल कुठं तर..."

"मावशी आता पौर्णिमा कधी आहे." अन्विताने विचारलं.

"का गं बाई तुला काय करायची पुनव.?"

"सांगा की.."

"आता येत्या शनवारी हाय.."

अन्विता विचार करू लागली.

"मावशी आम्ही काही दिवस थांबलं तर चालेल का."

"थांबा की. मी तिच सांगलोय.. तान्ह्या पोराला घिवून परवास करू नगं."

"हो." तशी अन्विता हलकसं हसली.

"बायांनो बसा.. मी आले रानातन.. दुर्वे मी आले गं.." तसं म्हणत लक्सा अक्का उठून बाहेर गेली. दुर्वा अन्विताकडे पाहतच होती..

"तुम्ही इथलं न्हाईसां मग मंबईतन आलाय..?" दोघीही आश्चर्याने एकमेकींकडे पाहू लागल्या.

"तुम्हाला कसं कळालं..?" अंतरा पटकन म्हणाली.

"तुमची भाषा शुद्ध हाय.. शहरातली लोकं बोलतात तशी.."

"हो." अन्विता म्हणाली..

"तुम्ही कुणाला हुडकत आलाय का..?" त्या पुन्हा आश्चर्याने पाहू लागल्या.

"असं का विचारताय..?"

"गरोदर पनात घरा बाहेर पडला हायसा म्हंजे कोणतरी जवळचं हरवलं असणार.." अन्विताचे डोळे भरले. अंतरा दुर्वाकडे पाहूच लागली.

"तुम्ही फार हुशार आहात हो." अंतरा पटकन बोलून गेली. दुर्वा शांतपने पाहत राहिली.

"तुमचं मूल हरवलं आहे की नवरा हरवला आहे..?" अंतरा अजून गंभीर होती.

"कशावरून अंदाज बांधत आहात..?"

"त्याशिवाय असं धाडस कोण करणार न्हाई." दोघीही शांत होत्या.

"मला वाटतंच होतं. असंच काय तर असणार."

"कोणाला सांगू नका. पण हे खरं आहे. आम्ही कोणाला तरी शोधत शोधत इकडे आलोय. पण आम्हाला ती व्यक्ती इकडे भेटणार नाही. आम्हाला काही दिवस इथे थांबव लागेल. काही दिवसांनी आम्ही इथून जाऊ." अंतरा बारीक आवाजात म्हणाली.

"व्हावा की.. इथं तुम्ही सुरक्षित हायसा.. लक्सा आक्का काय बी बोलणार न्हाई."

"तुम्ही कोण त्यांच्या सुनबाई."

"न्हाई. आत्या हाय ती माझी.. खरं आईसाररखं वाढवलंय तिनं मला.. लक्सा आक्का माझं सर्वस्व हाय." दुर्वा शांतपणे बोलू लागली. "नवऱ्याच आमच्या संसाराकडं लक्ष न्हाई.." तसं म्हणत ती एकदम शांत झाली. दोघीही शांत झाल्या. त्यांना काय बोलावं ते कळेना.

"तुम्ही सरकारची मदत का घेत नाहीसा..?"

"दुर्वा ताई आमची मदत कोणीच करू शकत नाही." अन्विता एकदम गंभीरपणे बोलून गेली.

"का..?"

"नाही करू शकत. आम्ही असा प्रवास करतोय जो कोणाला पटणार नाही. आम्ही अशा व्यक्तीला शोधतोय जी.."

"ताई.." अंतरा एकदम तिला शुद्धीत आणत म्हणाली, "पाणी देऊ तुला.." अन्विता शुद्धीत आली. अंतराने तिला डोळे मिचकावत गप्प बसायला सांगितलं.

"कोण हरवलं हाय तुमचं..?"

"माझी मुलगी आणि नवरा."

"तुमची लेक.."

"होय."

"केवढी हाय ती.?"

"खूप लहान आहे ती.. आठ वर्षांची आहे."

"किती दीस झालं तिला हरवून."

"आठ दिवस झाले."

"खरं इथं कोणी हरवल्याली पोरगी कुणाला घावली न्हाय."

"ती इथं हरवली नाही दुर्वा ताई."

"मग कुठं हरवली..?"

दोघीही शांत बसल्या. त्यांना काय बोलावं ते कळेना. दुर्वा बाईंचे प्रश्न थांबतच नव्हते.

"बोला की." दुर्वा अन्विताच्या डोळ्यात डोळे घालून म्हणाली. अन्विता काहीच म्हणाली नाही. तिने नकारार्थी मान डोलावली.

"बोला न्हाई तर तुमास्नी मला जेलात घालावं लागल.." अंतरा एकदम डोळे मोठे करून बघू लागली. अन्विता एकदम सुन्न पडली. दुर्वा बाईने तिचे डोळे पाण्याने भरले.

"मम्मा सांग, न्हाई तर तुला मी जेलात टाकेन.." तसं म्हणत दुर्वा तोंडाला हात लावून रडू लागली. अंतराच्या अंगावर काटा आला. ती डोळे मोठे करून दुर्वाला बघत होती.

अन्विता अजून सुन्न होती. तिला तिने काय ऐकलं यावर विश्वास बसत नव्हता. तिला हळूहळू सर्व लक्षात आलं अन् तिचे डोळे पाण्याने भरले.

तिने दुर्वाकडे पाहत हंबरडा फोडला. दोघीही तशाच उठल्या अन् एकमेकींच्या गळ्यात पडल्या. अंतरा तोंडावर हात ठेवून तिचा आक्रोश दाबत होती. तिचे डोळे सुद्धा भरून आले होते. ती दोघींना पाहून उभ्या उभ्याच रडू लागली.

दोघी मायलेकींचा आक्रोश आसमंतात गुंजला. त्यांची लहान बाळं त्या आक्रोशाने जागी झालीत.. त्यांनी सुद्धा त्या आक्रोशात भर घातली.

त्यांचा आक्रोश कमी होत नव्हता. अंतराला या गोष्टीवर अजून विश्वास बसत नव्हता. लक्सा आक्का घरात आल्या आल्या त्यांना गंभीर नजरेने पाहू लागली. तिला काय झालं ते कळत नव्हतं.

दुर्वा शांत झाली. तिने लक्सा आक्काला होकारार्थी मान डोलावून इशारा केला तसं लक्सा अक्काने डोळे भरले. ती खालीच बसली. अंतराने तिला मिठी मारली. ती अंतराच्या गळ्यात पडून रडू लागली. डोळ्यातला समुद्र आटला तेव्हा कुठे तिथला आक्रोश थांबला. अंतराने दुर्वाला मिठी मारली.

"ध्रुवी मला न सांगता का गेलीस तू..?" तसं म्हणत ती तिच्या गळ्यात पडून रडू लागली. ध्रुवीने "ताई ताई" म्हणत तिला शांत केलं. तिने लक्ष्मीची ओळख करून दिली. अंतरा अन् अन्विता दोघीही लक्ष्मीच्या गळ्यात पडून रडू लागल्या. काही वेळाने सगळेच शांत झाले.

अन्विताने दुर्वाच्या बाळाला घेतलं. दुर्वाने अन्विताच्या बाळाला घेतलं. अंतरा अन् लक्ष्मी दोघीही डोळे भरून त्यांना पाहू लागल्या. वातावरण जरा शांत झालं.

अन्विता बोलायला सुरुवात करू पाहत होती पण ध्रुवीकडे बघताच तिला रडू येत होतं. अंतराने ते ओळखलं अन् तिने बोलायला सुरवात केली.

"ध्रुवी कशी काय हरवलीस.?"

"ताई, मलाच कळालं नाही. मी एकदम त्या विहिरीत पडले आणि.." तशी ती शांत झाली.

"लक्ष्मी.." अन्विताने लक्सा आक्काच्या हातावर हात ठेवला.

"मला माफ कर वयनी.." तसं म्हणत लक्सा अक्काने डोळे भरले.

"रवी हिला घ्यायला आला हुता.. खरं तवा इथं नव्हती ही.. हिच्या नवऱ्यानं तिला लपवून दुसऱ्या गावाला ठेवली हुती.."

"रवीची माझी ओळख पटली.. म्याच रवीला इथनं जा म्हटलं दुर्वी इथं नव्हती.. मला जवा कळालं तवा रवी गेला हुता." तसं म्हणत ती अन्विताचा हात धरून रडू लागली.

"गप बसा लक्सा अक्का.. तुमची यात काही चूक नाही.. लक्सा अक्का तुम्ही कशा इथं आलात..?"

लक्सा आक्का डोळे पुसत बोलू लागली, "दादा अन् मी खेळत हुतो. दादाला एक दगड घावला हुता घरातल्या एका पेटीत. आमची भांडणं सुरू झाली. त्यानं मग एक तुकडा मला दिला. मी त्यो माझ्याकडं ठिवला. खेळता खेळता मी हिरी जवळ गेले अन् पाय घसरून पडले. अन् त्यानंतर.." तशी ती शांत झाली.

"तुम्ही परत येण्याचा प्रयत्न केला नाही." अंतराने विचारलं.

"केला की लयदा केला खरं.." तशी ती पुन्हा शांत झाली.

"हा दगड तुमच्या घरात आला कुठून नेमका.?"

"हा दगड माझ्या नवऱ्याला मिळाला होता." दुर्वा बोलू लागली.

"१९२५ साली आकाशातनं काय तर त्या हिरीत पडलं हुतं. माझा नवरा तिथंच हुता.. त्याला चमकणारं काही तरी दिसलं अन् त्यानं सोन समजून ते घेतलं."

"त्याला माहीत आहे तू कुठून आली ते.?"

"नाही. त्याला मी विहिरीजवळ बेशुद्ध अवस्थेत सापडले. मला तो त्याच्या मामाकडं ठेऊन आला."

अंतरा अन् अन्विता दोघीही एकमेकींकडे पाहू लागल्या. त्यांना आणखी एक गोष्ट कळाली होती.

"मम्मा तू का आलीस अशा अवस्थेत." ध्रुवी तिच्या मम्माला विचारू लागली.

"तुला परत घेऊन जायला बाळा." तिने डोळे भरून उत्तर दिलं.

"आता ते शक्य नाही मम्मा.." अन्विता शांत झाली.

"चला आमच्या सोबत.." अन्विता गंभीर होत दोघींना उद्देशून म्हणाली.

"ते आता शक्य नाही मम्मा. आता हीच माझी वेळ आहे. मला आता मुलगा झाला आहे. मला इथंच रहावं लागेल."

"मुलाला घेऊन चल." अन्विता एकदम गंभीर होत म्हणाली. अंतरा तिला पाहतच राहिली.

"ताई काय बोलतेस हे..?"

"काय हरकत आहे अंतरा. घेऊन जाऊ शकतो आपण."

"ताई ध्रुवी ही रवी दादाची आजी आहे. हे बाळ म्हणजे काका आहेत. लक्षात येतंय का तुझ्या."

"माहित आहे मला. पण मी असं कुठे म्हणतेय की आपण ह्यांना काही करायचं आहे. आपण ह्यांना भविष्यात वाढवू." अंतरा अन्विताकडे गोंधळून पाहू लागली.

"ताई अशी काय बोलतेस.. काय झालंय तुला.. तुला कसं कळत नाही.. याने तुझं अस्तित्व धोक्यात येईल.."

"कसं काय..?"

"तू यांना भविष्यात वाढवलं तर तुझं आणि दादाचं लग्न कसं होईल.?"

"आमचं लग्न झालं आहे."

"पण तू भूतकाळ बदलत आहेस."

"नाही. मी नवं विश्व बनवत आहे. एक नवी टाईम लाईन बनवत आहे. ज्यात माझी मुलगी माझ्या सोबत आहे. ती मोठी झाली असली तरी चालेल मला."

अंतरा अजूनही गोंधळलेल्या नजरेने पाहत होती. तिला आता अन्विताला कसं समजवायचं तेच कळत नव्हतं.

"तुला आता कसं सांगू ताई."

"काही सांगू नकोस. आपण ध्रुवीला घ्यायला आलो होतो. आपल्याला ती मिळाली. आता आपण तिला घेऊन जाऊ. बास आता मला काही ऐकायचं नाही." अन्विता कपाळावर आठ्या आणत खाली मान घालून बसली.

"ताई.."

"बास अंतरा खूप ऐकलं तुझं.. आता तुला फक्त माझं ऐकावं लागेल." लक्सा अक्का अन् दुर्वा एकमेकींकडे पाहत होत्या.

"मम्मा.."

"मी कोणाच ऐकणार नाही."

"रवी आणि तुझी भेट झाली का वयनी..?" अन्विता लक्ष्मीकडे पाहू लागली. "तो तुमच्या वेळेत हाय का..?"

"ताई बरोबर बोलत आहेत लक्सा आक्का.." अंतराने तोच मुद्दा धरत पुढे बोलायला सुरुवात केली.

"दादा अजून भेटला नाही. तो अजूनही वेळेत हरवला आहे. तोच जर नसेल तर तुझं विश्व कसं पूर्ण होणार. तुझ्या निर्णयाने तू दादाचं निर्माण होणारं अस्तित्व सुद्धा धोक्यात घालत आहेस." अन्विता शांत झाली.

"आपल्याला दादाला शोधायचं आहे."

"तो येईल."

"त्याला माहीत नाही टाईम ट्रॅव्हल कसं काम करतं ते. काकांकडून त्याला या गोष्टी कळतील. जशा आपल्याला कळाल्या.. मग त्याला ध्रुवी कोण आहे हे पण कळालं असेल. त्याला कळणारच.."

"नाही कळणार.."

"का नाही कळणार.. ध्रुवीने त्याला पहिल्यांदा पाहिलं असेल तर ती त्याच्या बाबाशी बोलणारच ना.." लक्ष्मी अन् दुर्वा त्यांना फक्त पाहत होत्या.

"ताई दादाला कळालं आहे ध्रुवी कोण आहे ते. आपल्या आधी तो टाईम ट्रॅव्हल करत आहे."

"तूच म्हणालीस ना ते पुस्तक दादाने दिलं म्हणून. त्या नंतर या सगळ्या संशोधनाला सुरवात झाली. दादा इकडे येऊन गेला ताई फक्त तो दुसऱ्या वर्षात आला जेव्हा ध्रुवी त्याची आजी झाली."

"तू जर आता ध्रुवीला आपल्यासोबत घेऊन गेलीस तर दादा तिला भविष्यात भेटू शकणार नाही. तो बाबांना कधी भेटू शकणार नाही. त्याला टाईम ट्रॅव्हल कधी कळणार नाही.. त्याला सत्य कधी कळणार नाही. तो असाच वेळेत फिरत राहिल ताई.." अन्विता एकदम गंभीर होऊन पाहू लागली. तिने डोळे भरले. ती रडू लागली.

"मला माझी मुलगी हवीय.. मला ध्रुवी हवीय.. मला काही माहीत नाही, मला माझी मुलगी हवीय." ती बोलत बोलत रडू लागली. तिला लहान मुलासारखं रडताना पाहून सगळ्यांच्या डोळ्यात पाणी आलं.

"मम्मा.." ध्रुवीने तिला सावरलं.

"तुम्ही काय बोलताय ते आम्हांला कळत नाही.. मला फक्त इतकं माहित आहे की जे घडायचं होत ते घडलं.. आता ते बदलण्यात काही अर्थ

नाही.. ते आपण बदलू शकत नाही.. आता आपण सगळ्यांनी ते विसरून जायला हवं. यातच आपलं भलं आहे..”

“माझी मम्मा, माझा बाबा मला भेटायला आले होते हीच गोष्ट माझ्यासाठी पुरेशी आहे.” अन्विता तिच्या गळ्यात पडून रडू लागली.

“तुला जायला हवं मम्मा बाबांसाठी तुला जायला हवं.. बाबाला त्रास झाला म्हणजे तो त्रास मलाही झाल्यासारखं आहे. आणि मला त्रास होईल अशी माझी मम्मा कधी वागणार नाही.” अन्विता रडू लागली.

“नाही तर..” ध्रुवी रडत रडत बोलू लागली, “नाही तर मी माझ्या मम्माला जेलमध्ये टाकीन.” तश्या त्या दोघी गळ्यात पडून रडू लागल्या. अंतरा ही रडू लागली. लक्ष्मीने सर्वांना शांत केलं.

बाहेर अंधार पडला होता. अन्विताने अंतराला डोळ्यांनी इशारा केला तशी ती बाहेर जाऊन चंद्र बघुन आली.

“गोलसर आहे ताई. २०२५ मध्ये जाऊ शकतो.”

ध्रुवी उठली अन् ती तिच्या सामानात काही तरी शोधू लागली अन् तिला ते मिळालं. तोच दगड होता जो ध्रुवीच्या चैनीत होता.

तिने तो दगड बाळाच्या हातात ठेवला. “मोठ्या बहिणीकडून..” तसं म्हणत ती पुन्हा तिच्या गळ्यात पडली.

“जाऊ..” अन्विताने डोळे भरून विचारलं.

“हो.” ध्रुवी तोंडावर हसू, डोळ्यात पाणी ठेवत हो म्हणाली.

अन्विताने लक्ष्मीची गळा भेट घेतली.. लक्सा आक्काच्या पाया पडली.. अंतराने ध्रुवीची गळा भेट घेतली. लक्सा आक्काने बाळाला एका चांगल्या टोपलीत बांधून ठेवलं. ते सगळेच विहिरीच्या दिशेने गेले.

त्यांच्या पुन्हा गळाभेटी झाल्या अन् अंतरा, अन्विता अन् बाळ पाण्यात उतरले. त्यांची भरलेल्या डोळ्याने नजरा नजर झाली अन् तिघांनी पाण्यात एक डुबकी मारली.

पाण्यात बुडबुडे येऊ लागले. दुसऱ्या क्षणात पाणी स्थिर झालं अन् गोलसर चंद्र पाण्यात स्पष्ट दिसू लागला.

••••

जाणीव

२५-०२-२०२५

दोघीही बाळाला सावरत पटकन पाण्याबाहेर आल्या. अन्विताने बाळाची टोपली उघडली. बाळ सुरक्षित होतं. टोपलीत पाणी गेल नव्हतं. त्या चालत चालत वर आल्या. वर येताच विहिरीला टेकून बसलेला रवी त्यांना दिसला.

रवीने पटकन डोळे पाण्याने भरले अन् तो त्यांच्या जवळ गेला. त्याने अन्विताला मिठी मारली. दोघेही एकमेकांच्या मिठीत रडू लागले. त्यांनी रडत रडत एकमेकांना झालेल्या गोष्टी सांगितल्या. अन्विताने रवीचे डोळे पुसले. अंतराने बाळाला रवीच्या हातात दिल.

"बाबा.." रवी भरलेल्या डोळ्यांनी म्हणाला. "बाबा परत आले अनू.. बाबा परत आले.." तसा तो बाळाला जवळ घेत रडू लागला. अंतराला कळून चुकलं. ती रडू लागली. अन्विताने तिला सावरलं. एकमेकांना सावरत ते घराच्या दिशेने चालू लागले.

••

रवी उदास चेहरा करून बसला होता. अन्विता त्याला मिठी मारून उभी होती. अंतरा बाळाला घेऊन बसली होती. श्रीधररावांच निधन झालं होतं. रवी ज्या दिवशी आला त्याच दिवशी ते सर्वांना सोडून गेले होते.

रवीने त्याच्यासोबत काय काय झालं, त्याने काय काय पाहिलं ते सर्व त्या दोघींना सांगितलं. अन्विता त्याच्यासमोर बसली अन् बोलू लागली.

"म्हणजे तू म्हणतोयस की हे तुझं कर्म होतं. हा जन्म तुझ्या मागच्या जन्मीच पाप फेडण्यासाठी झाला आहे.?"

"होय." रवीने अपराधी पणाने सांगितलं. त्या दोघीही एकमेकींकडे बघत होत्या.

"हे जे काही झालं ते माझ्यामुळे झालं. या सर्व गोष्टीला मी जबाबदार आहे. मला माफ कर." रवीने भरलेल्या डोळ्यांनी हात जोडले अन् खाली मान घालून बोलू लागला. अन्विताने त्याचे हात खाली घेतले.

"रवी असं नको बोलूस.." ती डोळ्यात पाणी आणत म्हणाली.

"हो दादा.. यात तुझी चुक नाही.. ठीक आहे आपण मानू तुझा तो मागचा जन्म होता.. असेल.. पण या जन्मात तू चांगला आहेस.." रवी शांतच होता.

"रवी प्लीज असं अपराधीपणाने स्वतःला पाहू नकोस. याने कोण कधीच खुश राहणार नाही." अन्विताने त्याच्या हातावर ओठ टेकवले.

रवी शांत आवाजात बोलू लागला, "मला अजून विश्वास बसत नाही हे सगळं घडलंय म्हणून. अजून सुद्धा हे एक स्वप्नच वाटतंय.. वाईट स्वप्न.."

"हे काळ चक्र.. हे कर्मचक्र.. अनु या सर्व गोष्टींचा जेव्हा विचार करतो ना मी, तेव्हा मला काय वाटतं माहितीये.." अन्विताने शांततेने प्रतिसाद दिला.

"असं वाटतं की, ही एक शिक्षा होती. अशी शिक्षा जिचा विचार करूनच लोकं चुका करणार नाहीत. तसा विचारंच करणार नाहीत. नाही तर त्यांच्या सोबत हे असं काही तरी होईल."

"माणसाला सरळ तोंडाने सांगितलं तर तो ऐकत नाही. त्याला ते पटत नाही.. तो समजून घेत नाही.. अशा वेळी ही अशी शिक्षा द्यायची म्हणजे तो परत कधी वाईट कर्म करणारच नाही."

"अनु किती सरळ सोपी गोष्ट होती. गोविंदने ध्रुवीला कुठे लपवलं नसत तर ती मला मिळाली असती. मी तिला पुन्हा इकडे घेऊन आलो असतो. पण नाही. गोविंदचा स्वार्थ, त्याची लालसा या सगळ्याला कारणीभूत ठरली."

"तेव्हाच चांगले कर्म केले असते तर ही वेळ आली नसती. वेळेने पण शिक्षा दिली अन् कर्माने पण शिक्षा दिली. अनु, वेळ सगळं लक्षात ठेवते. आपलं चांगल कर्म, वाईट कर्म. अन् बरोबर त्याचं फळ देते. आणि वेळ इतकी चलाख आहे की ती आपल्या कर्माचं फळ अशा पद्धतीने देते की आपल्याला ते कळायला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात."

रवी गालात हसला.

"मला तरी एक घ्यावा लागला. अनु, मला हे अजिबात कळालं नसतं मी मागच्या जन्मात काय केलं.. मी कसा होतो.. मला ते कधी जाणून देखील घ्यायचं नव्हतं. पण वेळेला, या काळाला या गोष्टी मला सांगायच्या होत्या. मला दाखवायचं होतं की, "बघ माणसा तू मागच्या जन्मात हे वाईट कर्म केलं होतंस म्हणून या जन्मात तुझ्यासोबत हे असं असं झालं.. त्या कर्माची तू शिक्षा भोगत आहेस.."

"हे जर कोणी मला तोंडाने सांगितलं असतं तर मला ते कधीच पटलं नसतं."

"वेळेला, या काळाला मला हे पटवून द्यायचं होतं. मला हे दाखवून द्यायचं होतं की, मी चूक केली आहे आणि त्याची शिक्षा मी भोगत आहे. उगाच कोणाला दोष देऊ नकोस. ही तुझीच कर्म आहेत. ही त्याचीच फळं आहेत."

"तू चांगला वागला असतास तर चांगलं झालं असतं. आणि हे खरं आहे अनु.. मला ते पटलंय.."

"मी कोणाच्या तरी मुलीला अडवून ठेवलं नसतं तर माझी मुलगी माझ्या पासून दूर गेली नसती. माझ्या मुलाशी मी नीट वागलो असतो तर माझा मुलगा माझ्याशी नीट वागला असता."

रवी हसू लागला हसत हसत बोलू लागला, "काय खेळ खेळला आहे नियतीने. इथे चुका करणारा मी आहे पण ती चूक मी केली नाहीये.. ही

शिक्षा मी भोगतोय पण ही शिक्षा माझी नाहीये." रवी एकटाच वेड्या सारखा हसू लागला.

"काय झालं हे माझ्यासोबत.. काय होतं हे अनु.."

"किती साधी गोष्ट होती ही अनु.. काय करायचं होत मला.. मला फक्त चांगल वागायचं होतं.. ज्या मुलाचा मी अट्टहास धरला होता त्याच मुलासोबत मी भांडू लागलो.. त्याच्यावर रागवू लागलो.. का.. तर तो मला दारू पिण्यापासून अडवत होता.. वाईट कर्म करण्यापासून अडवत होता.. बरोबरच करत होता ना तो.. काय चुकीच केलं त्याने.. पण मला ते समजलं नाही.. गेला माझा मुलगा मला सोडून.. आयुष्यभर लांब राहिला माझ्यापासून.. आणि मला हे कधी समजलं..?"

"जेव्हा मी मरायला टेकलो तेव्हा माझ पुत्रप्रेम जागून आलं. मुलाची किंमत कळाली. आणि मग मी भावनाविवश होऊन म्हणालो, माझ्याच मुलाच्या पोटी जन्म घेईन.."

"का का का.. काय गरज होती.." तसं म्हणत रवी स्वतःला मारून घेऊ लागला. "काय गरज होती तसं म्हणायची.. काय गरज होती पुन्हा जन्माला यायची.." तो स्वतःच्या थोबाडीत हाणून घेऊ लागला.

अन्विता रडत रडत त्याला अडवू लागली. अंतरा बसल्या बसल्या रडू लागली.

"गप रवी गप.." अन्विता त्याला गप्प करू लागली.

"जन्माला यायच आहे. काय उपटली परत जन्माला येऊन.." रवी रडत रडत स्वतःला मारून घेत होता. अन्विता त्याला अडवत होती.

"स्वतःच्या बापाशीच कधी पटवून घेतलं नाही. जो पहिल्या जन्मात मुलगा होता तो आता बाप झाला होता तरी सुद्धा पटवून घेतलं नाही. त्याला कधी समजून घेतलं नाही."

माझ्यामुळे माझी बहिण हरवली. तिला शोधण्यासाठी माझ्या बापाने सगळं आयुष्य घालवलं अन् मी काय केलं.."

"प्रेम पायजे, प्रेम पायजे म्हणून भांडत राहिलो.. पण मला इतकं कळालं नाही.. प्रेम दिल्यावर प्रेम मिळत असतं.." तसं म्हणत तो आणखी रडू लागला. आणखी जोरजोरात स्वतःला मारून घेऊ लागला. अन्विता रडतच होती. त्याला अडवतच होती.

"अनु प्रेम दिल्यावर प्रेम मिळतं.. ते असंच नाही मिळत.. मला हे कधी समजलंच नाही.."

"माझा बाप आयुष्यभर त्याच्या मुलीला शोधत होता.. मला ते कधी समजलंच नाही. मी ते कधी जाणून घेतलंच नाही."

"त्याचीच मी शिक्षा भोगली अनु.. माझी ध्रुवी मी गमावून बसलो.." तसं म्हणत तो जोरजोरात हुंदके देऊ लागला. जोरजोरात स्वतःच्या कानाखाली मारू लागला.

अन्विताला आता रवी ऐकत नव्हता. अंतराने बाळाला पाळण्यात ठेवलं अन् ती सुद्धा रडत रडत रवीला अडवू लागली.

रवीचा आक्रोश काही कमी होत नव्हता. एकाच वेळी नियतीने त्याच्यावर बरेच वार केले होते. आईचं दुःख, बापाचं दुःख, मुलीचं दुःख, मुलाचं दुःख, बहिणीच दुःख ही सगळी दुःख नियतीने एका मागोमाग एक त्याच्या समोर मांडली होती.

एका दुःखातून माणसाला बाहेर पडायला किती वेळ लागतो.. अशात रवी कसा काय ही सगळी दुःख पचवणार होता.

अन्विताने त्याला मिठीत घेतलं. त्याला शांत करू लागली. पण रवीचा आक्रोश, त्याचं एक-एक दुःख मांडत होता.

"मी आता चांगला वागणार अनु.." रवी हुंदके देत बोलू लागला.

"मी आता चांगला वागणार.. मी माझ्या मुलाची विचारपूस करणार.. त्याला माझा वेळ देणार.. त्याला प्रेम देणार.. त्याला चांगल कर्म करण्याची शिकवण देणार.. मी चांगला वागणार अनु.. मी चांगला वागणार.." त्याने अन्विताला मिठी मारली.. अन्विता त्याला शांत करू लागली.

"मी चांगला वागणार.." रवी बोलत बोलत उठला.. तो बाहेर आला.. अन् मोठ मोठ्याने बोलू लागला..

"मी चांगला वागणार.. मी जर बाप म्हणून जगत असेन तर मी माझ्या मुलाशी चांगलं वागणार.. मी मुलगा म्हणून जगत असेन तर मी माझ्या

बापाशी चांगलं वागणार.. मी वाईट कर्म करणार नाही.. कधीच करणार नाही.”

“हे देवा मला माफ कर.. मी चुकलो.. मी ज्या ज्या जन्मात वाईट कर्म केली असतील त्याची मी क्षमा मागतो.. मला हवी ती शिक्षा दे पण माझी माणसं माझ्यापासून तोडू नकोस.. त्यांना माझ्यापासून दूर नेऊ नकोस.. मी क्षमा मागतो..”

रवी आकाशाच्या दिशेने पाहत जोर जोरात बोलू लागला.. अन्विता अन् अंतरा त्याला वेड लागलं आहे अशा नजरेने त्याला पाहू लागल्या. दोघीही त्याला बघून रडू लागल्या.

अन्विता रडत रडत त्याला थांबवू लागली. पण रवीचा आक्रोश काही कमी होत नव्हता.

तो रडत रडत गुडघ्यावर बसला अन् अन्विताच्या मिठीत त्याने त्याच्या डोळ्यातला समुद्र रिकामा केला.

••••

भविष्याची वाटचाल

२६-०२-२०२५

रवी शांत झाला होता. खूप शांत झाला होता. त्याला नियतीने शांत केलं होतं. काळाने त्याला शांत केलं होतं. कर्माने त्याला शांत केलं होतं.

अन्विता अन् अंतरा दोघीही घाबरून गेल्या होत्या. अन्विताला तर रवी आता वेडा झाला असंच वाटत होतं. ती रात्र भर त्याला मिठीत घेऊन रडत होती. तिची झोप उडाली होती.

सूर्य डोक्यावर आला तेव्हा अन्विताला जाग आली. तिने आजू बाजूला पाहिलं. तिला रवी दिसेनासा झाला. ती उठून बसली. तिला तिचं बाळ देखील दिसेनासं झालं. ती एकदम घाबरली.

रवीला आवाज देत ती बाहेर पडली. धावत पळत विहिरीच्या दिशेने जाऊ लागली. तिथे पोहोचताच तिला रवी अन् अंतरा बाळासोबत बसलेले दिसले. तिने एक नि:श्वास सोडला.

ती वेगात रवी जवळ आली आणि त्याला मिठी मारली. रवीने तिला मिठीत घेतलं.

"झाली झोप.?"

"घाबरली मी.."

"यावेळी मी आणि अंतरा बाळासोबत हरवलो म्हणून.." तसं रवी हसू लागला. त्या दोघीही हसू लागल्या.

"इकडे काय करताय..?"

"असंच जरा बोलत बसलो होतो."

"इथे..? इथे का आलात.. इथे यायचं नाही आता.. ही जागा चांगली नाही.. रवी आपण आता मुंबईला जाऊ.. बास झालं आता.." अन्विता एकदम बोलून गेली. रवी शांतच होता. तो काहीच बोलला नाही.

"रवी काय बोलतेय मी.." त्याला शांत पाहून अंतराने बोलायला सुरुवात केली.

"ताई, दादा म्हणतोय आता इथेच राहायचं.."

अन्विता गंभीर नजरेने पाहू लागली. रवी दगडावर बसला. अन्विता त्याच्या जवळ त्याला मिठी मारत बसली.

रवीने काही महत्वाचे निर्णय घेतले होते. तेच निर्णय तो अन्विताला सांगू लागला..

त्याने आता इथेच राहण्याचा निर्णय घेतला होता. इथे राहून तो त्याची जमीन, शाळा सर्व काही पाहणार होता. त्याला बोलताना पाहून अन्विता शांत झाली होती. ती गंभीर होऊन त्याला विचारू लागली.

"तुझं ठरलं आहे इथेच राहायचं ते."

"बाबांची हीच इच्छा होती अनु.. ते असताना त्यांच्या मनासारखं कधी वागलो नाही. निदान आता मला सगळं खरं कळाल्यावर तरी त्यांच्या इच्छेप्रमाणे वागतो." रवी भरलेल्या डोळ्याने म्हणाला.

"दादा," अंतरा बोलू लागली.

"टाईम ट्रॅव्हलचं काय करायचं. ते बंद करायचं की.."

"नाही अंतरा ते बंद करून चालणार नाही. हे एक चक्र आहे. भविष्यात एक रवी पुन्हा इथे येणार आहे. मला त्याला योग्य मार्ग दाखवायला हवा. हे चक्र थांबवू शकत नाही.? हे काळचक्र, हे कर्मचक्र आपण थांबवू शकत नाही."

"हे काळचक्र थांबवणं आपल्या हातात नाही. वर्षानुवर्षे हे चालत आलेलं आहे. वेळेवर कधीच आपल्याला नियंत्रण ठेवता येणार नाही. त्यात बदल करता येणार नाही.. विधिलिखित म्हणतात ते हेच. या गोष्टी पुन्हा पुन्हा घडणार. त्या आपण थांबवू शकत नाही."

"मग आपण हे कोणालाच सांगायचं नाही.?"

"नाही. हे फक्त आपल्यापुरत मर्यादित ठेवायचं. अंतरा तुला यात संशोधन करायचं असेल तर तू करू शकतेस."

"दादा मग हे कोणाला तरी मला सांगावं लागेल आणि जर हे जगाला कळालं तर ते आपल्यासाठी योग्य होणार नाही. आणि तसंही वेळेत पुढं जाऊन किंवा माग जाऊन कोणाचं चांगलं होणार आहे."

"भूतकाळ आपण बदलू शकत नाही.. भविष्य आपण बदलू शकत नाही तर मग काय उपयोग या टाईम ट्रॅव्हलचा. त्यापेक्षा ही गोष्ट कोणाला न सांगितलेलीच बरी.."

"एक वाईट स्वप्न म्हणून मी या गोष्टी विसरून जाणार आहे. माझा अनुभव फार बेकार होता. माझ्यासाठी हा एक वाईट सिनेमा होता.. मी कोणत्या तरी वेगळ्या गोष्टीत संशोधन करते." अन्विता डोळ्यात पाणी अन् गालावर हसू ठेवून अंतराला पाहू लागली. तिने लगेच तिला मिठी मारली.

"मग आपण आता काय करायचं इथे सायंटिस्ट."

"आपण इथे सर्वांनी मिळून आनंदात राहायचं."

"होय.. आनंदात.. आपण ही जमीन सांभाळायची.. बाबांचं संशोधन सांभाळून ठेवायचं.. बाबांची शाळा सांभाळायची.. ती दुरुस्त करायची.. ती नव्याने सुरू करायची.. खूप मोठी करायची.." तसं म्हणत रवी आनंदी चेहऱ्याने पाहू लागला.

"मग आपण एक काम करू आपण त्याची सुरवात आज पासून आता पासूनच करू.." अन्विताने त्याला साथ दिली.

"होय होय अगदी बरोबर.. दादा ताई एकदम माझ्या मनातलं बोलला तुम्ही.. जे तुमच्या मनात आहे तेच माझ्या मनात आहे.." अंतरा एकदम आनंदी चेहऱ्याने बोलून गेली अन् ती बाळाचे मुके घेऊ लागली.

"ए बबदी, आता आपण ताला तुलू कलायची.. तू काय काय तिकणार.. दे माद्या मनात आहे तेच तुद्या मनात आहे ना.." अंतरा बाळाशी बोबड्या स्वरात बोलू लागली. त्याचे मुके घेऊ लागली. अन्विता अन् रवी तिच्याकडे आनंदी चेहऱ्याने प्रेमाने पाहू लागले.

अंतराला पहिल्यांदा पाहिलं तेव्हा रवीला प्रश्न पडला होता.. त्याला अंतरा कोणासारखी तरी भासत होती.. आज त्याला त्याचं उत्तर मिळालं होतं. तो डोळ्यात पाणी अन् चेहऱ्यावर हसू ठेवून त्याच्या लक्ष्मीला बाबांसोबत खेळताना पाहत होता.

तिघंही तिथल्या नयनरम्य वातावरणात आपलं उज्ज्वल भविष्य घडतानाचं दृश्य डोळ्यासमोर आणू लागले.

वारा मंद वाहू लागला. मधूनच कोकिळा तिच्या आवाजाने वन्यजीवांना, मनुष्य जणांना मंत्रमुग्ध करू लागली.

काळ सुद्धा या वातावरणात स्वतःला सामावून घेऊ लागला. काळाच्या साथीने कर्माचं चक्र पुन्हा संथ गतीने फिरू लागलं.

••••

“आपलं अस्तित्व टिकून आहे कारण या विश्वाला वाटतं की आपण टिकून राहावं..”

२६-०२-२०५०

रवीने हसतच घरात प्रवेश केला. अन्विता हातात माईक घेऊन जोरजोरात गाणं बोलत होती. रवीला आलेलं पाहून ती त्याच्या जवळ गेली अन् त्याच्यासोबत नाचत नाचत गाणं म्हणू लागली.

आपल्या बाबाला आलेलं पाहून ध्रुवी त्याच्याजवळ पळत गेली अन् तिच्या मम्माला बाजूला सारून ती बाबांसोबत नाचू लागली. अन्विताने नाक मुरडलं तशी अंतरा त्यांना पाहून हसू लागली. रवी बास बास म्हणत अपूर्वाच्या बाजूला येऊन बसला. अन्विता रवीला पाहून गाणं म्हणतच राहिली.

"बास बास अनु.. माहित आहे आम्हाला तुमचं किती प्रेम आहे ते एकमेकांवर.." अपूर्वा ध्रुवीकडे नजर टाकत त्यांना बोलू लागली.

"साठी आली तरी तुमचा रोमान्स काही कमी होत नाही."

"वयाला कुठं प्रेमाचं बंधन असतं.. मी तर आता ध्रुवीला आणखी एक लहान बहिण द्यायचा विचार करतोय." तसं म्हणत रवी हसू लागला.

"दादा काय हे.." अंतरा ध्रुवीकडे हात करत बोलू लागली, "मोठी मुलगी आहे जवळ."

"त्याला काय होतंय.. ध्रुवी तुला अजून एक लहान बहिण हवी ना..?"

"हांऽ.." ध्रुवी पटकन हसत म्हणाली.

अन्विता तिच्याजवळ येत बोलू लागली, "बहीण पायजे काय गं तुला म्हातारे.. जरा आम्हा दोघांना मोकळं सोडतेस का.. पंधरा वर्षाची घोडी झाली तरी सारखं आपलं "बाबा-बाबा, मम्मा- मम्मा करत असते."

अंतरा लाजू लागली. अन्विताने अपूर्वाला टाळी दिली..

"जरा आम्ही बोलत बसलो की, येते लगेच बाबा-बाबा करत."

"मग माझा बाबा आहे.."

"हो तुझाच आहे.. माझा नवरा आहे आधी.." अन्विता तिच्याशी भांडत बोलू लागली..

"बाबा तू आधी कोणाचा आहे..?" ध्रुवीने तिच्या बाबाला विचारलं..

"तुझा.." तशी ती त्याच्या गळ्यात पडली..

"बाबा मला बहीण झाली तर तिचं नाव चांगलं ठेव.. माझ्यासारखं नको ठेवू.."

सगळे ध्रुवीकडे हसऱ्या नजरेने पाहू लागले..

"का गं ध्रुवी.." अंतरा तिला विचारू लागली..

"किती वेगळं नाव आहे. मला माझ्या नावाचं मिनिंग पण माहीत नाही.. तुम्ही मला सांगत पण नाही.." तसे सगळे एकमेकांकडे पाहू लागले.

"असेच बघत बसता तुम्ही दर वेळी मी मिनिंग विचारलं तर.. सांग ना बाबा माझं नाव ध्रुवी का ठेवलं..?" रवी हसून पाहू लागला.

"कारण.." रवी तिला सांगू लागला.. तोच श्री पळत पळत खाली आला. तो हसऱ्या चेहऱ्याने बोलू लागला.

"बाबा बाबा.." सगळे त्याच्याकडे पाहू लागले..

"काय झालं श्री.." अंतराने विचारलं..

"मावशी उल्कापात झालाय.. आपल्या घरामागे, उल्कापात झालाय.. एक आगीचा गोळा येऊन पडला आहे.." तसं म्हणत श्री बाहेर पळत गेला.

"दादा मी पण येते.." ध्रुवी सुद्धा त्याच्या मागोमाग पळत गेली..

"उल्कापात झालाय..? आपल्या गावात..? बघू तरी नेमकं काय झालंय..?" अपूर्वा त्यांच्या मागोमाग चालत गेली..

रवी, अंतरा, अन्विता गंभीर नजरेने एकमेकांकडे पाहू लागले. निसर्गाने आता कोणता चमत्कार दाखवला असेल याची भिती त्यांच्या नजरेत एकमेकांना दिसू लागली.

तिघंही गंभीर नजरेने बाहेर गेले. आकाशातून एका मागोमाग एक उल्का जमिनीवर पडत होत्या. गावकरी लांब उभे राहून त्या उल्का पडताना पाहत होते. रवी, अन्विता अन् अंतरा गंभीर नजरेने एकमेकांना पाहत होते.

रात्र गडद होत होती आणि आकाशातला अर्धा चंद्र आता हळूहळू आणखी जवळ आलेला जाणवत होता. त्याची हसरी नजर रवीच्या नजरेतून चुकली नाही.

अंतराने अन्विताचा हात धरला. अन्विताने रवीचा हात धरला.

ते तिघंही एकमेकांकडे गंभीर नजरेने पाहू लागले. आकाशातला चंद्र ढगाआड लपून गालातल्या गालात हसू लागला.

•••

लेखक परिचय

नमस्कार..

माझं नाव अक्षय आहे.

मी साहित्यक्षेत्रात लेखक म्हणून कार्यरत आहे.

"ॲमेझॉनवर" तसेच "अक्षय खजिना" या ब्लॉगवर मी नियमित नवनवीन कथा-कादंबऱ्या प्रकाशित करत आहे.

सर्वद फाऊंडेशनतर्फे देण्यात येणारा "राज्यस्तरीय स्टार साहित्यिक" या पुरस्काराने मला २०२३ साली सन्मानित करण्यात आलं आहे.

पुस्तकांच्या अक्षय खजिन्यात आपलाही एखादा मोती चमकावा म्हणून सुरू असलेला हा एक प्रयत्न !

अक्षय पोवार यांचे प्रकाशित साहित्य

ई-साहित्य प्रतिष्ठानवर उपलब्ध



[सखी]

[अदृश्य वेदना]



[भीतीचे सावट]

ॲमेझॉनवर उपलब्ध



[आरशातलं प्रेम]

[अधुरी कहाणी]